# हृदय



कुमार रघुवीर

१०१

भारत-गौरव-ग्रंथमाला

हिंदुस्थानांत

सर्वोत्कृष्ट, सर्वोपयुक्त,
सर्वांगसुंदर सर्वसंग्राह्य
आणि अत्यंत स्वस्त
अशी ही एकच ग्रंथमाला
आहे. माहितीपत्रक
मागवा.
फुकट पाठवूं.

गिरगांव - मुंबई

# हृदय



रघुवीर सामंत

[शब्द-चित्रें]

द्वि. आवृत्ति

रघुवीर सामंतांची

उपकारी माणसें

मराठींतील एक प्रदीर्घ सामाजिक कादंबरी

* तीन खंड
* डेमी ७८० पृष्ठें
* अँ. कागद; कापडी बांधणी

एकत्र ग्रंथालय प्रत

[ ग्रंथालयांना २ प्रती खास सवलतीनें ]

पा रि जा त प्र का श न

१४ बी हरजीवनदास एस्टेट; विन्सेन्ट रोड
दादर मुंबई १४

रघुवीर सामंतांचीं

## आगामी पुस्तकें

*

**चिमण्या जगाचे नेते**

[ शालेय जीवनावरील कादंबरी ]

*

*

**आम्हाला जगायचं आहे!**

[ संक्रमणकालीन नवभारताची
हृदयंगम कादंबरी ]

*

**पाण्यावरल्या रेघा**

[ लघुकथा–लघुनिबंध ]

*

**यथावकाश प्रकाशांत येतील**

**कुमार रघुवीर**

( श्री. रघुनाथ जगन्नाथ सामंत )

जन्म—कृष्णकांठ, वाई; जि० सातारा.

( संध्या० ४॥), २४ डिसेंबर १९०९.

भारत-गौरव-ग्रंथमाला—पुष्प १०९ वें.

# हृदय

[ शब्दचित्रें व गोष्टींचा एक संग्रह ]



नहि ज्ञानेन सदृशं । पवित्रमिह विद्यते ॥ १ ॥

—भगवान् श्रीकृष्ण

" Come forth, and bring with you a heart,
That watches and receives ! "

—Wordsworth

—लेखक—

**कुमार रघुवीर, ठाणें**

२४ डिसेंबर १९३२

साधी बांधणी रु. २-०-० } किंमत { कापडी रु. २-८-०
सहा रुपये

# आमचें हृद्गत—

कुमार रघुवीरांच्या आतांपर्यंतच्या निवडक लेखनाचा प्रस्तुत ग्रंथ, भारत-गौरवग्रंथमालेचें १०९ वें पुष्प म्हणून, रसिक वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला आनंद होत आहे. वाचकांना—विशेषतः 'प्रगती'च्या वाचकांना—त्यांची नव्यानें ओळख करून देण्याचें कारण नाहीं. 'सुभान्या' हें त्यांचें पहिलें शब्दचित्र प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांचीं व इतरही कांहीं लेखकांचीं बरींच शब्दचित्रें 'प्रगतीं'त प्रसिद्ध झालीं. त्यांतील कित्येक, प्रस्तुतपैकीं बऱ्याचशाप्रमाणें सुंदर निपजलीं. तथापि साहित्यशास्त्राच्या तंत्रनियमांच्या कसोटीवर कलाकृती घासून पाहण्याची आमची आजची दृष्टि नसल्यामुळें या पुस्तकांतील या 'शब्दचित्र' ह्या नवीन प्रकाराविषयीं आम्ही येथें मौनच स्वीकारतों; त्याविषयींची चर्चा तज्ज्ञ टीकाकारांनीं करणें, हेंच जास्त उचित.

स्वतः आमची ह्या पुस्तकाकडे पाहण्याची दृष्टि अगदीं निराळ्या स्वरूपाची आहे. त्यांतील कला आम्हांला आनंद देते; पण त्यापेक्षां, प्रथमपासून शेवटा-पर्यंत दिसून येणारा, व 'हृदय' या नांवामागें पुरेपूर असणारा, उच्च व कोमल भावच आम्हांला अतिशय महत्त्वाचा वाटतो! आणि हें, 'अप्पांची बैलांची जोडी,' 'संधिप्रकाश', 'भंगीण', 'भूक', 'धाकूचें आयुष्य' 'माळीण', 'माईचा रमेश'; 'तारा', 'हृदय' वगैरेंसारखीं डोळ्यांपुढें तीं तीं चित्रें उभीं करणारीं शब्दचित्रेंच सिद्ध करतील.

सध्यां 'हृदया'विषयीं बोलत असल्यामुळें, या दृष्टीनें सृष्टीकडे पाहूं लागल्यास काय दिसतें?...कदाचित् मानवी प्राण्यांची बढाई असेल, दुबळेपणा असेल, परंतु मनुष्येतर प्राण्यांत आपल्याला एका अतिशय मोठ्या गोष्टीचा अभाव दिसून येतो. ती म्हणजे हृदय!...ईश्वरनिर्मित सृष्टींत मनुष्यप्राण्याला तात्त्विक-दृष्ट्या इतकें महत्व प्राप्त होण्याचें कारण कदाचित् तेंच असेल! सामाजिक कल्पना, तसेंच इतरांच्या दुःखाची जाणीव, इतरांचीं दुःखें—स्वतःला अगदीं कमी लेखून—सहानुभूतीपूर्णपणें, त्यांबद्दल समवेदनात्मक संवेदना प्रकट करण्याची त्याच्या ठायीं असलेली महान् शक्ति, हृदयापासूनच उगम पावते!



पण हें ईश्वरदत्त हृदय, आम्ही तत्व व व्यवहार निराळा करून, स्वार्थांत दंग होऊन जवळजवळ गमावतच चाललों आहों. दंभ जिकडे तिकडे बोकाळत चालला आहे. आमची सुधारणा म्हणजे बुद्धीच्या कोलांट्या उड्यांची कसरत किंवा बुद्धीचा समाजविघातक दुरुपयोग याच अर्थाची होत चालली आहे! 'हिऱ्या-सोन्या', 'हंबीर'सारखे मूक प्राणीही कधीं कधीं ही सहृदयता दाखव-तांना दिसतात; पण आमच्या व्यवहारी, स्वार्थी व चैनी दृष्टीला 'भंगीण' वगैरे खालच्या दलित वर्गाची 'भूक' दिसत नाहीं. 'जीवन', 'सुभान्या' सारखे अशिक्षित लोक आपल्या नुसत्या जीवनवृत्तांतांत गोंवून पाठवित असलेला संदेश, आमच्या बुद्धिवान् सुशिक्षितांच्या ध्यानींही येत नाहीं. शिवाय सुशिक्षितपणा म्हणजे सुसंस्कृतपणाच असें नव्हे! कारण आमचं आजकालचें शिक्षण बरेंचसें ध्येयहीन झालेलें आहे. आमच्या सुशिक्षितांत 'केशवमामा'च फार! ही बऱ्याचशा तरुणांची स्थिति; जुन्या पिढींत, 'ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या' हा वेदांती जाडा बुद्धिवाद करून, सामाजिक चालीरीतींतील एखाद्या क्षुल्लक फरकावरून, अवास्तव अकांडतांडव करण्याइतकी, दुराग्रही व आकुंचित वृत्ति!

अशा वातावरणांत 'तारे' सारख्यांच्या आत्महत्या, कालिंदी सारख्या स्त्रियांचें प्रवाहपतित जीवन, अविनाश किंवा माधव सारख्या कर्तबगार व समाजोपयोगी सहृदय व्यक्तींच्या आयुष्याचा नाश, वगैरे प्रसंगांपेक्षां निराळें काय संभवतें? आणि अशी वस्तुस्थिति असतांना, प्रस्तुतसारख्या वस्तुस्थितिनिदर्शक ग्रंथांतील कांहीं गोड कट सोडल्यास, एकंदर निराशाजनक व दुःखपूर्ण वातावरण पसरलेलें दिसतें, त्यांत लेखकाचा काय दोष? तें आनंदी करण्याचें समाजाच्याच हातीं आहे.

ज्या प्रसंगांच्या द्वारें, मानवाच्या वर उल्लेखिलेल्या वैशिष्ट्याविषयींचा आमच्यांतील उणेपणा दृष्टोत्पत्तीस आणला गेला आहे ते प्रसंगही, किती काट-कसरीनें व योग्यप्रकारें वापरले आहेत तें वाचक स्वतःच वाचून ठरवितील. मराठी लघुकथेच्या दालनांतील, आतांपर्यंतच्या बऱ्याचशा नुसत्या चर्वित प्रेमकथांचा जमाना सोडून, मूलगामी दृष्टीनें समाजाकडे पाहण्याची कुमार रघु-वीरांची ही पद्धति स्तुत्य आहे.

प्रस्तुत लेखक अजून अल्पवयस्क व होतकरू विद्यार्थी आहेत. त्यांच्याकडून आम्ही यापुढेंच पुष्कळ अपेक्षा करतों. यानंतरही ते आपला व्यासंग असाच

कायम ठेऊन, मराठी भाषेच्या उत्तम साहित्यांत भर घालतील अशी आशा आहे.

अशा या पुस्तकाचें, बाह्यांगही उत्तम करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. जीवनकलहाच्या या काळांत, बाह्यांगाकडे पाहूं नये ही गोष्ट खरी! पण कला अगदींच दुर्लक्षितां येत नाहीं. पुस्तकांतील नखचित्र हा प्रकार व वरील तीन रंगी चित्र आमच्या आश्रयदात्यांना आवडेल अशी आम्हांस खात्री आहे.

कर्नाटक प्रेस
१५ डिसेंबर १९३२ } प्रकाशक

# हार्दिक—

दोन तीन वर्षांच्या संकल्पानंतर, महाराष्ट्र रसिकांपुढें, 'हृदय' ठेवण्याचा आज योग येत आहे.

दुसऱ्यांच्या बऱ्या वाईट अभिप्रायावरून, पहिली ओळख करून घेण्यापेक्षां, त्यांनीं स्वतःच एकदम त्यांत अवगाहन करून, त्याची कमीजास्त काय ती योग्यता ठरवावी. सद्हेतुप्रेरित प्रत्येक टीकेचा, प्रस्तुत लेखक, त्याच्या पुढील लेखनांत, उपयोग करून घेतल्यावांचून राहणार नाहीं.

वेळोवेळीं लिहून प्रसिद्ध केलेल्या निवडक लेखांच्या या संग्रहाला, नांव देतांना, थोडा विचार करावा लागला. सबंध पुस्तकाची रचना करण्यांतहि बरीच काळजी घ्यावी लागली. पुस्तकाच्या प्रत्येक घटकांतील मध्यवर्ती कल्पनांची संगतवार सांगड घातल्यास, वाचकांस सुरवातीपासून शेवटपर्यंत एक धागा धरून जातां येण्यासारखें आहे, असें वाटल्यावरूनच प्रस्तुत अनुक्रम कायम केला.

पुस्तकाचे एकंदर चार विभाग केले आहेत.

सुरवातीस 'विहंगम दृष्टी'नें जगाकडे पाहण्याचा प्रयत्न केल्यावर 'मुंग्यांच्या जगांत' प्राणीमात्रांच्या आपआपसांतील संबंधाची कल्पना केली आहे. त्यानंतर माणसाशीं संबंध! 'आप्पांची बैलांची जोडी' आणि 'संधिप्रकाश' यांत माणूस व प्राणी यांतील परस्पर संबंधांत कसा फरक दिसून येतो तें पाहिलें आहे. ह्यापुढें माणसामाणसांतील संबंधाकडे दृष्टि वळविली आहे. 'भंगीण' वगैरेंचें, समाजांत काय स्थान आहे तें पाहिल्यावर शेतकरी 'जीवन,' कोळी 'सुभान्या,' खुनी बेरड सोम्या, वगैरे कांहीं हीन मानलेल्या व्यक्तींचीं शब्दचित्रें काढण्याचा प्रयत्न करून, पहिला भाग संपविला आहे.

दुसऱ्या भागांत, पूर्वी 'महान् आशा' नांवाखालीं 'प्रगती'त प्रसिद्ध झालेल्या दहा शब्दचित्रांचा समावेश झाला आहे. त्यांत, 'अंध भिकारी' महाऱ्या-पासून, 'लखपतीऽ' होण्यासाठीं धडपडणाऱ्या बॅरिस्टरसाहेबांपर्यंत, 'जन्मा-' पासून 'मृत्यू'पर्यंत, सर्व माणसें आशेभोंवतीं कशीं फिरत असतात याचा आविष्कार केला आहे.

तिसऱ्या भागाची सुरवात 'धाकू,' 'ट्राम ड्रायव्हर,' 'गणपत शिपाई,' वगैरे खालच्या दर्जाच्या नोकरीपेशाच्या व्यक्तींत करून, धागा, 'केशवमामा' या पांढरपेशा कारकुनापर्यंत आणून सोडला आहे. यापुढें 'सेवाधर्म' या गोष्टीनंतर

'माळीण' व 'माईचा रमेश' यांत, गरिबश्रीमंत, मागसलेले-पांढरपेशे, या सर्वांच्या हृदयाच्या भावभावना सारख्याच असतात असें ध्वनित केलें आहे.

अशा तऱ्हेनें, सूक्ष्म समजल्या जाणाऱ्या प्राण्यांपासून, सुधारलेल्या पांढर-पेशा मानवांपर्यंत आल्यावर, त्यांच्यांत तरी हृद्भावनांच्या विकासाला कोठपर्यंत अवसर मिळत आहे, ह्याची पुस्तकाच्या चौथ्या विभागांत पाहणी केली आहे. 'निराळ्या फ्हांटे'तील, 'योषितां परमं दैवं पतिरेव न संशयः' अशासारखी प्रांजल समजूत असणाऱ्या तिलोत्तमाताई शेजारींच, जुन्या वातावरणांतील आयुष्यें निरस व निष्प्रेम दिसून आल्यामुळें 'तारे'नें केलेल्या आत्महत्त्येचें चित्र ठेविलें आहे. यानंतर 'तोच इतिहास?' मध्यें अजूनही दिसून येणारें, सर्वसाधारण स्त्रीचें प्रवाहपतित जीवन दाखवून, 'प्रतिमा-पूजन' व 'पंकस्य प्रक्षालनम्' मध्यें सध्यांच्या लग्नपद्धतीमुळें, हृद्भावना असलेल्या सरल व्यक्तींच्या आयुष्याचा कसा चुथडा होऊं शकतो, हें चित्रित केलें आहे. यापुढें 'डायरीचा उपयोग' 'हरवलेले तारे' हीं सुखस्वप्नें, तसेंच 'गोष्टीच्या गोष्टीं'त गतानुगतिकत्वामुळें बालमनाच्या आकांक्षांचा होणारा हिरमोड, चित्रित केल्यावर 'हृदय' या स्वतःला अतिशय आवडणाऱ्या हृदयंगम शब्दचित्रानें, चौथा भाग व एकंदर संग्रह संपविला आहे.

'हृदया'चीं बहुतेक स्पन्दनें शोकपर्यवसायी झालेलीं (विशेषतः अगदीं शेवटल्याचाही दुःखांत) पाहून, लेखकाविषयीं, कांहीं वाचकांचा कदाचित् अकारण गैरसमज होईल. स्वभावतः, प्रत्येक सुखी व्हावा हीच इच्छा असल्यामुळें, त्याला सुखान्तच जास्त प्रिय झाला असता; परंतु वस्तुस्थिति व कला यांच्या त्याला मर्यादा होत्या. अशा वेळीं, त्या दुःखी व्यक्तींबद्दल अंतःकरणापासून सहानुभूतीचे दोन अश्रू ढाळणें व ढाळावयास लावणें हाच त्याला एक मोकळा मार्ग होता.

प्रस्तुत पुस्तकांत आलेला शब्दचित्र हा प्रकार नवीनच आहे. त्याविषयीं, स्वतःला वाटणारे, दोन शब्द येथें लिहिल्यास, तें अप्रस्तुत होणार नाहीं. (१) 'सुभान्या,' 'महंमद,' 'गणपत शिपाई;' (२) 'भंगीण,' 'माळीण,' 'भूक;' (३) 'अप्पांची बैलांची जोडी,' 'तारा,' 'हरवलेले तारे;' (४) 'मुंग्याच्या जगांत,' 'विहंगम दृष्टि;' वगैरे निरनिराळे प्रकार लक्षपूर्वक वाचल्यास लक्षांत येईल कीं, शब्दचित्र साधारणपणें लहान असतें असें म्हटलें तरी हा त्याचा मुख्य विशेष नव्हे. शब्दचित्र हें प्रथम शब्दांनीं काढलेलें चित्र असतें; नंतर तें कथानक वगैरे मुळें, कदाचित्, लघुकथेंतही मोडेल. ('शब्दचित्र' हा बऱ्याच वेळां लघुकथेचा एक प्रकार असतो, असें धरल्यास फारशी चूक होणार नाहीं.) परंतु त्यांत कथानक असलें किंवा नसलें तरी तें अगदीं गौण होय. म्हणजेच कथानकाला शब्दचित्रांत पार्श्वभूमीचें (back-ground) स्थान असतें. त्यांतील शब्दरचना, विशेष सूचक व अर्थगर्भ असते; आधुनिक इंग्रजी लघुनिबंधांप्रमाणें, त्यांत लेखकाच्या आवडीनिवडीचें व स्वभावछटांचें अप्रत्यक्ष पडलेलें प्रतिबिंब, प्रत्यक्ष दिसून येतें; एखादी व्यक्ति, एखादा प्रसंग, किंवा एखादें दृश्य व त्यामुळें उद्भूत झालेले मनोविकार, यांचें सूचक शब्दांत, परिणामकारक व थोडक्यांत काढलेलें चित्र तेंच शब्दचित्र! अर्थात् तें काव्यांतील भावगीताच्या बाजूसच जास्त झुकतें असें म्हणावें लागतें. त्याच्या मदतीनें आपल्या लहानसान पण उत्कट भावभावनाही, गद्यांत चित्रित करतां येतात. कधीं कधीं त्यांत विचारांची भरारी किंवा तत्त्वबोध (didacticism) देखील येणें शक्य असतें. असो. याविषयीं जबाबदार टीकाकार योग्य ती चर्चा करतीलच.



या पुस्तकाच्या प्रसिद्धीच्या बाबतींत, 'भारत-गौरव-ग्रंथमाले'चे मालक, श्री. मंगेशराव कुळकर्णी यांचे मनःपूर्वक आभार मानणें जरूर आहे. माझे ज्येष्ठ बंधूसमान मित्र, श्रीयुत त्र्यंबकराव शेजवलकर, बी. ए., यांनींही, मला वेळोवेळीं सूचना देऊन व तसेंच इतर बाबतींतही बराच त्रास घेऊन, फार उपकृत करून ठेवलें आहे. प्रस्तुत पुस्तकांतील कांहीं प्रसंगांचीं वगैरे, आस्थापूर्वक नखचित्रें काढून दिल्याबद्दल, माझे नवपरिचित मित्र श्रीयुत बिंदुमाधव शहाडे यांचे आभार मानावयास मी विसरणार नाहीं. महाराष्ट्र प्रकाशनांत हा त्यांचा चित्रप्रकार नवीन आहे. रसिक त्याचें योग्य चीज करतीलच. नखचित्रांचे ब्लॉकसाठीं, काळजीपूर्वक, फोटो काढून देण्यांत माझे मित्र श्री. शांतारामभाऊ वालावलकर, ठाणें, यांनीं बरीच तसदी घेतली. वरचें तीन रंगी सुंदर चित्र कोणाही रसिकाला अतिशय आवडण्यासारखेंच आहे. तें अगदीं अल्पावधींत फार मेहनतीनें काढून देण्यांतच श्री. बाळ कुळकर्णी (शीव) यांचें मजवरील निरपेक्ष प्रेम दिसून येतें.

रसिकांना हें सर्व प्रकारचें नाविन्य मनापासून आवडेल अशी सबळ अपेक्षा करून, सध्यां विरामचिन्ह वापरतों.

सर्वांचा बंधु,

सावंतवाडी; ठाणें.
६ डिसेंबर १९३२.

**कुमार रघुवीर.**

# अनुक्रमणिका


अर्पणपत्रिका

अंधुक आठवण ( फोटो अभावीं )

पृष्ठ.

**हृदय—भाग १ ला—**

स्पन्दन १ लें—विहंगम दृष्टि! १
,, २ रें—मुंग्यांच्या जगांत ! ५
,, ३ ,,—अप्पांची बैलांची जोडी ९
,, ४ थें—संधिप्रकाश १६
,, ५ वें—भंगीण २१
,, ६ ,,—भूक ! २७
,, ७ ,,—जीवन ३०
,, ८ ,,—सुभान्या ३६

**हृदय—भाग २ रा—**

स्पन्दन १ लें—अंध भिकारी ४२
,, २ रें—पाटीवाली ४७
,, ३ ,,—मासळीविकी ५२
,, ४ थें—व्हिक्टोरियावाला ५५
,, ५ वें—महंमद ६१
,, ६ ,,—चिनी कापड विक्या ६४
,, ७ ,,—परदेशगमन ६७
,, ८ ,,—लखपती ऽ! ७१
,, ९ ,,—जन्म! ७६
स्पंदन १० वें—मृत्यू! ८१

**हृदय—भाग ३ रा—**

स्पन्दन १ लें—धाकूचें आयुष्य ९०
,, २ रें—ट्रामड्रायव्हर ९७
,, ३ ,,—गणपत शिपाई १००
,, ४ थें—केशवमामा १०३
,, ५ वें—सेवाधर्म १०९
,, ६ ,,—माळीण ११९
,, ७ ,,—माईचा रमेश १२५

**हृदय—भाग ४ था—**

स्पन्दन १ लें—निराळी पहांट १३४
,, २ रें—तारा १४५
,, ३ ,,—तोच इतिहास? १५६
,, ४ थें—सूड ( प्रतिमा-पूजन ) १६५
,, ५ वें—पंकस्य प्रक्षालनम् ! १७९
,, ६ ,,—डायरीचा उपयोग २१०
,, ७ ,,—हरवलेले तारे २२७
,, ८ ,,—गोष्टीची गोष्ट ! २३३
,, ९ ,,—हृदय ! २३८


॥ पितृभ्यां नमः ॥

“ झुंजुनी संकटांसवें आयु कंठले,....
चारित्र्य, मुक्यासहि, ज्यांचे, करि झणीं अहा ! बोलके.
जीवना बघुनी ज्यांचिया शान्ति लाभते,
भरुनिया भक्तिभावानें आकंठ हृदय दाटते ! ”

—दत्तात्रय.



तीर्थरूप काका.

फोटो–श्री. शां. बा. वा.

प्रेमळ पित्यास

व

फक्त, अजाणपणांतील 'अंधुक आठवण' च

हृदयांत ठेऊन गेलेल्या

स्वर्गवासी जननीस

सादर व सप्रेम

समर्पण

# अंधुक आठवण.

**( मातेच्या फोटो अभावीं )** —एक शब्दचित्र.

"बाळ, इकडे येऽरे जराऽ !....मला तुझा गोडसा पापा देऽ एक !" अंथरुणाशीं खिळलेल्या माझ्या माईनें मला खेळतांना पाहून हांक मारली; जवळ बसलेल्या ताईनेंही मला हातानें जवळ येण्यास खुणावलें !

पण लहान मुलें व फुलपांखरें सारखीं ! मग मी कसला तेथें रहायला ??....

"अंऽ...मी नाहीं जाऽ आतां ! थांबरे बापू...आलों मी; तूं लप, मी शोधतों तुम्हाला."

मी दुडदुडु धांवत पसार झालों !

* * *

पण त्यानंतर माई लपली; मी, तिच्याशीं तेव्हांपासून लपंडाव खेळत आहें. ती मला सांपडत नाहीं, मी हरलों !...

* * *

ती पीतवस्त्रांतील कुंकुमचर्चित मूर्ती माझ्या अजूनही डोळ्यांसमोर येते !

मी खोलींत तिच्याजवळ जातांच वडिलांनीं आपले डोळे पुसून मला उचलून घेंतलें.

पिवळें पातळ, कपाळावर लालभडक कुंकवाची चीर, किंचित् हसरा, गोरा चेहरा...मला ती बिछान्यावर गाढ झोंपलेली दिसली; भोंवतीं ताई, अक्का वगैरे सर्व बसून रडत होत्या.

मी कावराबावरा सर्वांकडे पहात होतों ! सर्वांनाच तसें पाहून मी रडकुंडी फिरलों.

"चल्‌ वेडा कुठला ! आपण आतां खेळायला जायचं बाहेर !" माझा खालचा ओंठ पुढें मागें थरथरतांना पाहून, काका माझ्या डोक्याचे केस मागें सारीत मला म्हणाले.



"मग ताई कां रडते ?" मला पुन्हां आनंदाची लहर आल्यासारखें होऊन मी त्यांना उलट विचारलें.

"उगीच ( ! ); माईला पाहिलीस ना ?....हं ! आतां बाहेर जा खेळायला. आम्ही तिला देवाघरीं पोहोंचवून येतों." काका मला खालीं सोडत म्हणाले.

"देवाच्या घरीं ?"

मी त्यांचें धोतर ओढीत वर पहात म्हणालों.

"हं"

"मग मज्जाऽ ! मी जाऊं तिच्याबरोबर ! तिच्याच बरोबर परत येईन."

"चल्‌ मूर्ख ! खेळायला जा पाहूं बाहेर."

काकांनीं डोळे कां पुसले तें त्या वेळीं मला समजलें नाहीं !

* * *

"कायरे, तुझी आई मेली ना ?"

"नाहीं बा !...ती कनीऽ, वर देवाकडे गेली आहे. मी पण जाणार होतों पण काका म्हणाले नको !....पण माणूस मरतं म्हणजे रे काय तात्या ?"

अज्ञानांत अतिशय आनंद असतो !

* * *

ताई वगैरेंना रडतांना पाहून मला कोडेंच पडे; मी अर्धवट स्वतःची व त्यांची समजूत करण्यासाठीं, थोडा रडकुंडीला येऊन विचारीं, "मी बघ बरं किती शहाणा ? जरा तरी रडतों का ?....आपली माई परत येणार नाहीं का ग ?"

त्या वेळीं मी रडलों नाहीं; पण आतां —

* * *

कोंवळा वेल वळवावा तसा वळतो !....तसेंच लहान मुलाचें मोठेपण आईच्या हातीं असतें !...

पूण...पण, 'जिचे हातीं पाळण्याची दोरी'...या म्हणीप्रमाणें, स्वतःचाच नव्हे, तर आपल्या देशाचा व पर्यायानें जगाचा उद्धार करण्याची शिकवणूक देणारी, माझी मातृदेवी, मी जगांत आल्यावर डोळे उघडून सभोंवार पहातों,

त्यांतील दोन चार चित्रविचित्र रंग अवलोकन करतों, न करतों तोंच, मला सोडून, कायमची निघून गेली ! !....

किती मी अभागी ? अशा या मातेच्या शिकवणीचा आस्वाद न घेतलेल्या ठोंब्याचा जगाला काय उपयोग ?...त्याच्या कृतींना जगांत कोण धन्य म्हणणार ?

* * *

मला वाटतें देवाला चांगलीं माणसें फार आवडतात ! म्हणून तो त्यांना या जगांत फार वेळ ठेवीतच नाहीं. माझ्या माईचें तसेंच झालें नसेलना ? तिला–ती पुण्यवान् असल्यामुळें त्याची आवडतीच होती—म्हणूनच त्यानें लौकर नेलें असेल का ?

पण त्यांत माझा अभाग्याचा किती बरें तोटा झाला ? ?

मी मातृसुखाला, कायमचा....अगदीं कायमचा....मुकलों ! !....

नासिक; २४ डिसेंबर १९२४.
( प्रसिद्धि-'गृहलक्ष्मी' )

# — हृदय —

" ज्वालेनें* रमणीय एक ठिणगी माझ्याकडे धाडिली,
ती मी आपुलिया उदात्त हृदयीं सानंद हो स्थापिली !
पृथ्वीनें मज आणण्यास वरतीं होतें जिला धाडिलें,
प्रीतीनें मग त्या फिरूनि मज या लोकामधिं आणिलें ! "

—केशवसुत.

* बलि दिला ज्वालेस त्या मी किती ! ( परि तुम्हा त्याची कशाला मिती ? )

परिस्थितीशीं झगडण्यासाठीं करावयाच्या क्रियाप्रतिक्रियांतच,
मानवी समाजांतील व्यक्तीच्या आयुष्याची
उभारणी व समाप्ति होते !

# हृदय

## भाग पहिला

### १–विहंगम दृष्टि !

एक शब्दचित्र

कधीं कधीं मनाची मोठी गंमतीची स्थिति असते !

त्या दिवशीं मी निद्रावश होण्यापूर्वी माझ्या मनांत सारखा एकच विचार चालू होता;...मी पक्षी असतों तर...उंच उंच भराऱ्या मारल्या असत्या...विशाल दृष्टीनें उंच खोल सर्व पाहिलें असतें...लांब लांब फिरलों असतों;....आतां येथें आहें न् आतां नाहीं...म्हणजे जणुं काय वारा!....किंवा सर्व ठिकाणींच आहें.... म्हणजे जणुं काय समुद्राचें पाणी !....

माझ्या मळ्याला मुळीं कुंपणच नको पडायला !...अमर्याद पोकळी आणि आपण....फिरतोय् सारखा....

*　　　*　　　*

...आणि मौज ही कीं मी थोड्याच वेळांत आकाशांत उडूं लागलों; वर जाऊं लागलों तसतसें सध्यांचें जग अगदीं लहान लहान वाटूं लागलें....मी पंख हलवीं आणि गार वारा माझ्या अंगाला भिरी भिरी स्पर्शून जाई !....त्या नव-चैतन्यपूर्ण झुलुका मोठ्या आल्हाददाई होत्या !...

जगांतून पहाणाऱ्यांना मी एक नाहक भराऱ्या मारणारा लहानसा प्राणी दिसलों असेन; तथापि माझ्या उंचीवरून मला उलट तेच अति सूक्ष्म वाटत होते !

ज्या बाजूस व जें जें पाहीन त्या सर्वांचा मी राजा होतों; आणि मी सर्व बाजूंसच पहात होतों !...

माझ्या अंगाला लागून जाणारे ढग किती लांबवर पसरले होते ?....मला वाटलें आपल्यालाही असेंच लांबवर पसरतां आलें असतें तर ??...

सहज खालीं दृष्टि फिरविली....ते नानाकृति लहान मोठे डोंगर असंख्य वळणें घेऊन दूरवरपर्यंत पसरले होते! त्यांच्या माथ्यावरील मोठमोठे वृक्ष वाऱ्याबरोबर माना डोलावीत होते, झुडपें सळसळत होतीं; भूमीला धरून वाढणाऱ्या हिरवळीनें गालिचा पसरला होता; त्यावरून मधून मधून जाणारी वाऱ्याची झुळुक त्याला थरथरवीत होती. नानाठिकाणीं अनेकविध व रंगीबेरंगी फुलांचे झाडांवरील गुच्छ माझें स्वागत करीत असल्यासारखे दिसत होते; त्या भोंवतालच्या प्रदेशांतच, नागमोडी वळणें घेणारे, पाण्याचे, हलणारे प्रवाह होते! डबकीं व तलावें, लहान मोठ्या आरशांप्रमाणें मजकडे निरखून पहात होतीं!...

मी दुसऱ्या बाजूस दृष्टि फेंकली. रत्नाकर आपल्या बालिकांना—वारिवीचींना आपल्या अंकावर खेळवीत होता; त्यांच्या तोंडून दमल्यामुळें फेंस येत होता. दूरदूरपर्यंत पसरलेल्या त्या जलधीवर माझी दृष्टि स्थिरच होईना!

तेथून नजर मागें खेंचून मी वर चोहींबाजूंस पहाण्याचा प्रयत्न केला!...पण सर्व बाजूस, अनंत निळी पोकळी पसरली होती....

कांहींसें वाऱ्याच्या झोतामुळें व कांहींसें हृदयींच्या भावनांमुळें माझ्या नेत्रांतून अश्रू टिपकले! मी हृदयाला आवेगानें दाबलें; डोळे नीट पुसले....मी विचार करूं लागलों...

पहा! सारेंच निसर्गतः किती अनंत....अपार....छेः, कल्पनाही करवत नाहीं! ....आणि मी?....मी किती पामर....क्षुद्र! कुठचा कःपदार्थ!!....

वाऱ्याच्या झोताबरोबर, एक नवीनच विचारलहरी आली....येथून दिसतें त्या सर्वांचा....अगदीं सर्वांचा मी राजा आहें!....नाहीं, इतकेंच नव्हे—तर तें सर्व मी—हो...स्वतः मीच आहें! हा सर्व माझाच पसारा आहे....मी अनंत आहें!

...पण दुसऱ्याच क्षणीं मला तें खरें वाटेना! मी माझें शरीर चाचपून पाहिलें. 'हें इतकें अनंत पसरेल?...छेः, शक्यच नाहीं!'

मग मला असें कां वाटावें?

पण शरीर म्हणजेच मी का?...नाहीं?...मग शरीराचा उपयोग काय??.... मला कर्मयोग आठवला. मी वाचलेली गीता येथें बोलूं लागली!.... "अजोनित्यं शाश्वतोऽयं पुराणो, न हन्यते हन्य माने शरीरे!"



तोंवर माझ्या पंखांनीं मला एका गजबजलेल्या शहरावर आणून सोडलें होतें!....शरिराविषयींचा विचार तितकाच सोडून मी खालीं पाहूं लागलों....

शहरची गजबजलेली वस्ती सहज ओळखूं येते! मनुष्यनिर्मित कृत्रिम हवेल्या जणूं काय मजकडे वर धांवत येत होत्या; वक्र रस्त्यांतून विसाव्या शतकांतील सुधारलेलीं वेगवान् वहानें धांवपळ करीत होतीं. गिरण्यांचे धुरकटलेले बंब धूर सोडीत होते. सर्व जातींचे व वर्गांचे लोक आपापल्या घाईनें रस्त्यांतून लगबगीनें जातांना, मुंग्यांच्या हालत्या रांगांची मला आठवण होत होती!....

पण त्या सर्वांची ही सारी धडपड कशासाठीं? फक्त पोटासाठीं??...

म्हणजे शरीरासाठीं?!...

तर मग एकंदरींत हें व्यर्थच ना सारें!

माझें मन मला सांगूं लागलें, प्रत्येक मनुष्याला जन्मल्यानंतर, जगांत जगण्याचा हक्क आहे; त्याला पोट जाळावयासाठीं, नेहमीं, अहोरात्र, मरावयास नको!...

पण मग असें कां?...शरीर जगवण्यासाठीं कोणी मरमर काम करून मरतो; तर कोणी कांहीं न करतां नको इतकें घेऊन नाहक जगतात!...

सृष्टि बापडी सर्वांना पुरून उरेल इतकें उत्पन्न करण्यास सारखी झटते तें फुकटच तर!!...

पहा, हजारों वर्षांपूर्वी सुद्धां, अशाच हजारों मानवांची, जीव जगवण्यासाठीं, अशीच धडपड चालली असेल!...वीस शतकांची ही सुधारणा व हे शोध, मनुष्यप्राण्याला सुखी करण्याच्या कामीं, मुळींच उपयोगी पडूं नयेत ना??....

आधींच पशूंहून 'उत्क्रांतीमुळें वरच्या दर्जास पोहोंचलेले आम्ही मानव,' इतक्या शतकांच्या सुधारणेनंतर, किंवा धर्मांचीं बंडें करून व त्याला डोक्यावर नाचवूनही, आपला खरा धर्म—खरें कर्तव्य—शिकलों नाहीं!...उलट तेंच जास्त विसरलों आहों!....

निसर्ग पुष्कळ शिकवतो; पण आपण शिकलें पाहिजे ना!....तो निःस्वार्थी व समदृष्टीचा असला तरी स्वार्थ व त्यापासून उत्पन्न होणारी विषमता समाजाला हातूंतील बाहुलीप्रमाणें खेळवीत आहे त्याला काय उपाय?....खरें कर्तव्य बाजूस राहून, मानवी स्वार्थामुळें उत्पन्न झालेल्या भस्मासुरालाच तोंड देण्यासाठीं अगणित आयुष्यें मातीमोल होत आहेत!....

आळस मनुष्याचा शत्रु खरा; पण उद्योगाची सध्यांची व्याख्या अतिशय नीच व आकुंचित नव्हे काय ?

स्वार्थी जगांतील पोटार्थी, जडजीवनाच्या धडपडीला उद्योग म्हणतात....पण आत्मिक, अनंत, जीवन, हास्यास्पद व आळसाचें ठरतें ! ! मला रामतीर्थांची आठवण झाली !

...दगडाचे देव, दागदागिने व तलम वस्त्रालंकारांनीं नटून, पक्वान्नें 'खातात;' पण त्याचवेळीं एखाद्या कवडीसाठीं किंवा घासभर भातासाठीं हाडामासाचे जिवंत बांधव गोणपाटाच्या चिंध्यांत उघडे नागडे मरून पडलेले दिसतात ! !....

पण तरीही आम्ही धर्म व विसाव्या शतकांतील सुधारणा यांचा दिमाख दाखवीत असतोंच !....अरेरे....

मला तें सहन करवेना; सभोंवार मला धुकें पसरल्यासारखें झालें !

माझे नेत्र डोळ्यांसमोर दिसणाऱ्या असंख्य हृदयद्रावक देखाव्यामुळें भरून आले !....गात्रें शिथील झालीं; पंख हलेनात....मी भराभर खालीं पडूं लागलों—

* * *

....आणि दुसऱ्याच क्षणीं, मी माझ्या सत्रंजीवर पडलेलों होतों; डोळ्यांतून अश्रुप्रवाह सुरू होता !....

माझ्या तोंडून उद्गार आले "स्वकर्तव्याचें विस्मरण व स्वार्थ !....हो, स्वार्थ आणि विषमता ! !"

नासिक, २४ मे १९३२.

# २—मुंग्यांच्या जगांत !

## एक शब्दचित्र

तोंडानें शीळ घालीत सायकलवरून मीं उगाच फेऱ्या घालीत होतों !

आकाशाकडे पाहा, झाडांकडे पाहा, पश्चिमेकडे अस्ताला जात असलेल्या सूर्याकडे पाहा, असे माझे चाळे चालले होते ! इतक्यांत माझें माझ्या पायाकडे लक्ष गेलें !

....आणि स्वतःच्या पायाखालीं नेहमीच उशिरां लक्ष जातें !

मुंग्यांची काळी रांग लांबवरपर्यंत वांकडीतिकडी वळसे घेत गेली होती ! पण ती पाहून थांबण्यापूर्वींच माझ्या सायकलीचीं दोन्ही चाकें एक लहानसा भाग चिरडून त्या रांगेवरून पुढें निघून गेलीं ! मला एकदम चमत्कारिकच वाटलें !

ब्रेक दाबून सायकल थांबवली, खालीं उतरून ती जमिनीवर पाडून ठेवली व जरा लक्षपूर्वक निरखून पाहण्यासाठीं त्या मुंग्यांच्या काळ्या रांगेजवळ जाऊन उकिडवा बसलों !

माझ्या सायकलीचीं चाकें गेलेला भाग माझ्या समोरच होता !....स्वतःच्या उंचीवरून थोडें खालीं आल्यावर व मान जरा नमती केल्यावर मला सर्व स्पष्ट दिसूं लागलें !

वीस–पंचवीस सूक्ष्म मुंग्या मीं जमीनदोस्त केल्या होत्या ! ती त्या दिवसाची माझी फुशारकी !

मला वाईट वाटलें !

....पण हळहळणाऱ्या हृदयाला मीं थोड्या कठोरतेनें दाबलें. "इतका भावनाप्रधानपणा काय उपयोगी जगामध्यें ?...काय मीच एक मनुष्य ? आणि इतर कोणीच नाहींत ?"

माझी दृष्टि त्या मुंग्यांच्या काळ्या रांगेवर स्थिर झाली होती !

....आवाज नव्हता ! गिल्ला–गोंगाट नव्हता ! ! जाणाऱ्या येणाऱ्या काळ्या रांगा सतत् जात अन् येत; जणूं काय आघात–अपघात कुठें कांहीं झालाच नाहीं

मला रागच आला; जरा कांहीं नवीन झालें कीं आरडाओरड ऐकण्याची संवय झालेली! मुंग्यांना आम्ही मोठ्या उद्योगी म्हणतों, म्हणून इतका निष्ठुरपणा काय उपयोगी ?....मेलेल्या जातभाईंची व्यवस्था लावण्यापुरती-सुद्धां त्यांना फुरसत नाहीं ?

पण माझ्या मानवी मनाचा संशय खोटा ठरला; चिरडलेल्या जागीं जाणाऱ्या येणाऱ्या रांगेंतील मुंग्यांचें आपापसांत बोलणें सुरू झालें! एक एक सेकंद, एक दुसरीशीं बोले व आपल्या मार्गाला लागे! थोडा वेळ तसा विचारविनिमय झाल्यावर, जाणाऱ्या येणाऱ्या रांगा तशाच कायम ठेऊन कांहीं मुंग्यांचा घोळका अपघाताच्या ठिकाणीं जखमी व ठार झालेल्या बांधवांभोंवतीं गोळा झाला. त्यांचे सर्व व्यवहार अगदीं जलद चालले होते.

जमिनीवर चिरडून गतप्राण झालेल्या वीरांचीं शवें अलगद वर उचलण्यांत आलीं! तिघातिघांचा एक कंपू होऊन प्रत्येकानें बळी पडलेला एक एक वीर आपल्या ताब्यांत घेतला व चालावयास त्वरित सुरुवात केली!

थोड्याच वेळांत ती सर्व तुकडी जाणाऱ्या येणाऱ्या रांगेपैकीं एकींत मिसळून, ताब्यांतील हुतात्म्यांच्या शवांसह, शांतपणें, रांगेंतून जाऊं लागली!

माझ्यादेखत तसले कितीतरी अपघात माणसांकरवीं त्या शांतताप्रिय प्राण्यांतहि होत होते! पण त्यांची रांग जशीच्या तशीच कायम होती!

चिकाटी....सहनशीलता!...सन्मार्ग व सत्याग्रह!!

प्रत्येक ठिकाणीं त्या हें शांततात्रत असेंच कायम ठेवीत असतील काय ?

मी थोडा जास्त बारकाईनें पाहूं लागलों! जिवंत मुंग्यांची ये-जा पुनः ठरल्या रस्त्यानें, पूर्वी इतक्याच शिस्तीनें व शांततेनें भरभर होऊं लागली! त्यांत किंचित् देखील खंड पडला नाहीं!

भिंतीच्या बाजूनें येणाऱ्या रांगेंतील प्रत्येक मुंगीच्या तोंडांत रव्याचा किंवा साखरेचा बारीक पांढरा कण होता; रिकाम्या मुंग्या भिंतीकडे जात होत्या!

भिंतीपासून लांब जाणाऱ्या रांगेंत, मेलेल्या मुंग्या घेऊन गेलेली मयांची तुकडी मी शोधूं लागलों; पांच सहा पावलें पाहत पाहत चालल्यावर मला ती तात्काळ दिसली! मी त्यांच्याबरोबर पुढील रस्ता काढूं लागलों!

सुमारें पांच मिनिटें माझा त्यांच्याबरोबरच प्रवास चालला होता! त्या चिमुकल्या जीवांची धडपड किती उत्साहपूर्ण होती म्हणून सांगूं ? शेवटीं, त्या माळरानांतील एका उंचवट्याजवळ, आम्ही सर्व येऊन दाखल झालों.



त्या लहानशा पोकळ टेंकाड्याला वळसा घालून, ती मुंग्यांची काळी रांग शेवटीं मला आपल्या जगाच्या प्रवेशद्वाराशीं घेऊन आली! त्या भोंकांतूनच त्या सर्व आंत जात होत्या...बाहेर येत होत्या!

मी तेथपर्यंत, त्या मुंग्यांच्या स्वयंसेवकदलांत मिसळूनच येऊन पोहोंचलों होतों! त्यांचा माझा बराच वेळ संबंध आला होता! मी त्यांच्या चिमुकल्या राष्ट्राकडे आपुलकीच्या भावानें पाहूं लागलों!

त्यांची सारी धडपड सत्य तत्त्वांना धरून होती; आणि म्हणूनच उघड उघड चालली होती! स्वराष्ट्रपोषण, स्वराष्ट्रोन्नति, प्रत्येक व्यक्तीचें सुख, समाधान, शांति आणि आत्मोन्नति हींच त्यांचीं उदात्त तत्त्वें! तीं वाखाणण्यासारखीं नव्हतीं असें कोण म्हणेल ?

पण ती एकजुटीनें चाललेली त्यांची स्वोन्नतीची अव्याहत धडपड, सर्व जगावर स्वतःचेंच साम्राज्य स्थापण्याची स्वार्थी महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या साम्राज्यशाहीप्रिय मानवाला कशी सहन होणार ? त्याला वाटतें आपण ती सहज पायाखालीं चिरडूं! आणि तो तसा प्रयत्नहि करतो!

पण स्वतःच्या श्रेष्ठत्वाच्या घमेंडींत त्याच्याकडून कांहीं वेळ ठिकठिकाणचे थोडेसे भाग चिरडले गेले म्हणून काय झालें ? त्यांच्यांतील प्रत्येकाच्या हृदयांत स्वातंत्र्याची तीच जागती ज्योत सारखी तेवत असली, तर मधले साम्राज्यशाहीच्या हावेनें व अरेरावीनें चिरडलेले भाग मुळींहि न डगमगतां भरून निघतील! ती जुटीची रांग तशीच अव्याहत चालू राहील!

तो देखावा अगदीं अवर्णनीय होता!

घमेंडखोर मानवानें देखत्या डोळां स्वतः पददलित केलेल्या अथवा मजप्रमाणें यंत्राच्या साह्यानें अमानुषपणें जखमी किंवा ठार केलेल्या त्यांच्या राष्ट्रवीरांना परत घेऊन येणारी एक ' रेड क्रॉस 'ची तुकडी, तितक्यांतच माझ्या अगदीं समोरून मोठ्या अभिमानानें व शिस्तीनें त्या भोंकांतून आंत गेली!

पण त्याच वेळीं तितक्याच उत्साहानें, तितक्याच धैर्यानें, स्वकर्तव्यासाठीं मुंग्यांचे नवीन नवीन स्वयंसेवक वीर, टोळ्याटोळ्यांनीं व अगदीं शांततेनें बाहेर पडून, त्या चिमुकल्या काळ्या रांगेला मिळून, तिला अखंड पुढें चालवीत होते!

त्यांना स्वराष्ट्राच्या स्वातंत्र्याची खरी कल्पना होती! आणि त्यांना नुसतें जगण्यापेक्षां तें स्वातंत्र्य टिकवावयाचें होतें!

होय ! स्वातंत्र्याची लज्जत एकदाही चाखलेल्या व्यक्तीचें असेंच असतें ! हृद-याच्या हांकेला पुढाऱ्यांची किंवा नेत्यांची गरज काय ? खरेंच !...

अहाहा ! अशा या जगांतील या स्वतंत्र राष्ट्रांतील अंतर्व्यवस्था कशी असेल ?

माझे अंतश्चक्षू आंत शिरले खरे; पण बहिश्चक्षूंनाहि तें पाहण्याची झालेली प्रबळ इच्छा मोडवेना !

मी जवळची एक काटकी उचलून त्या मुंग्यांच्या जगाचा वरचा भाग फोडून आंत काय आहे तें पाहण्यासाठीं हात पुढें केला तोंच—

माझें हृदय धडधड हलूं लागलें !...त्यांतून खोल पण रागाचा स्पष्ट आवाज ऐकूं आला...

"नीचा ! थांब. पारतंत्र्याच्या पंकांत मानेपर्यंत रुतलेल्या व त्यांतून बाहेर पडण्यासाठीं स्वतः किंचित् देखील हालचाल न करणाऱ्या तुला, मुंग्यांच्या या स्वतंत्र राष्ट्राचें स्वास्थ्य बिघडविण्याचा काय अधिकार ?"

....आणि दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा जुलमजबरदस्तीनें दडपून टाकण्याचा जगांत कोणाला अधिकार आहे ?

माझा हात नकळत एकदम मागें झाला ! तोंड अगदीं लाजेनें काळें झालें !

....पण त्याबरोबरच नवीन आशेनें हृदय फुलून आलें ! !

पुणें, ४ जान्युआरी १९३२.
(प्रसिद्धि—'लोकशिक्षण.')

# ३—अप्पांची बैलांची जोडी

**एक शब्दचित्र**

जवळजवळ ऐशींच्या घरांत वय गेलेलें; पण अप्पांचें शरीर म्हणजे नुसती उभी काठी ! अन् चालणें तरी किती भरभर ? उत्साहाचें वारें अंगीं पुरेपुर जणूं काय भरलेलें !

म्हातारा उद्योगीहि तितकाच जबरा ! कामांत काम करण्याची मोठी हातोटी त्याची; पुन्हा सारें होतां होईतों स्वतः करायचें ! सूनबाई न् मुलगा न् गडी.... कोणाची मग मिजास नको चालायला मागून !

थंडी असो का महाथंडी असो, अप्पा दुसऱ्या कोंबड्यानंतर कधींच पडून नाहीं राहायचे अंथरुणांत. प्रातर्विधि आटोपले कीं तोंडानें भूपाळ्या गुणगुणत, खराट्यानें मागच्या पुढच्या अंगणांतील किंवा माजघरांतील केर काढायला सुरुवात व्हायची ! नातवांचे किंवा स्वतःचे लहानमोठे कपडे धूत बस, घराभोंवतालचें गवतच काढायला घे....त्यांना एकंदरींत पुष्कळ उद्योग सांपडत ! स्वावलंबन ही अप्पांच्या आयुष्यक्रमाचीच गुरुकिल्ली, तर नेहमींचा कसला प्रश्न राहिला ?

कोल्ह्याचोरांच्या भीतीनें कुठें वाड्याच्या वईला झालेलीं 'गोपटीं'च नीट करून घे, टोणग्याला ओढतांना जड पडूं नये म्हणून रहाटांतच वंगण घाल, पाण्याची कुंडी नाहींतर 'चोप'च खराट्यानें धूत बस; विहिरींत सोडलेली वोड्यांची माळ नीट करून घे, आवारांतले बांध भरून काढ, कुठें आंब्यांच्या कलमांनाच कुटाखत घालायला लाव, असें त्यांचें कांहींना कांहीं तरी सारखें चाललेलें असायचें काम ! अगदीं कांहींच नाहीं तर वेळ आल्यास चिंचेची शिपटी घेऊन, 'या ऽऽऽ पप्प ऽऽ !' करीत पाणरहाटाचा टोणगाहि हांकायला त्यांना लाज वाटत नसे !

'डोक्या'च स्वतः काम करीत असला म्हणजे गडीहि मोठ्या उत्साहानें सारें करीत असत !

मात्र सणावाराला पक्वान्नें किंवा आंब्याच्या दिवसांत आंबे खातांनाहि अप्पा आपल्या गड्यांना विसरत नसत ! गड्यांना, 'वावली'साठीं 'तमाखू'हि ते रोज नियमानें वांटीत !

शहरांत श्रीमंती–सुख पैशावर मानतात ! पण खेडेगांवांत, मिळणाऱ्या वस्तूंवर व आनंदावर !

वेळच्या वेळीं काम होण्यावरच फक्त 'वाडगो'चा कटाक्ष असल्यामुळें गडी वचकून असले तरी अप्पांबद्दल त्यांना फार प्रेम वाटे !

पण अप्पांना जनावरांची भारी हौस ! त्यांचा गोठा नेहमीं दुभत्या गायी-म्हशींनीं अन् बैलांनीं भरलेला असे आणि त्यांची निगाहि त्यांनीं तितकीच आस्थेनें राखावी. "त्यांना धू रे, चरायला ने रे, पाणी दाखव रे, गोठा साफ कर रे........" त्यांचे दोन गडी सारखे जनावरांमागेंच असत काम करीत !

आपल्या सारवटगाडीच्या बैलजोडीची मात्र ते स्वतःच विशेष काळजी घेत. "माझी हिऱ्या-सोन्यांची जोडी म्हणजे सारी हिऱ्यासोन्याची संपत्ति आहे माझी संपत्ति !" अप्पा त्यांना थोपटीत, मोठ्या अभिमानानें म्हणत; आणि तें अगदीं स्वाभाविक होतें !

सहज त्यांना कोणीं प्रश्न विचारावा, "कुठून पैदा केली ही जोडी तुम्हीं अप्पा ? फार त्रास घेतां बुवा तुम्ही त्यांच्यापायीं, अशा म्हातारपणींसुद्धां !"

"हंऽ चाललंयू....अरे आईविना पोरं आहेत हीं, बाबा !" ते एखाद्या माणसाविषयीं बोलणें चालल्याप्रमाणें सुरवात करून बोलूं लागत; अन् पुढेंहि ते अगदीं सबंध इतिहास सांगत एकेकाचा ! "घरचाच हा 'खोंड' बरं !....माझ्या डोळ्यांदेखत लहानाचा मोठा झाला ! ह्या हिऱ्याची आई.... त्या शिवा पाटलाच्या गोठ्याला आग लागली होती, त्यांतून कशीबशी जळलीपोळलेलीच बाहेर काढली होती ! आमच्या मंगळ्या गड्यानं कसलेसें औषधमंतर करून तिला बरी केल्यावर दोन वर्षांनीं हा हिऱ्या झाला तिला...हो ! याच गोठ्यांत, इथं !...त्यांतच मेली बिचारी मग ! हल्लीं आमच्या सूनबाईचा तान्हा दूध पितो ना, ती तांबू गाय या हिऱ्याच्या मोठ्या बहिणीची दुसरी मुलगी..."

त्यांना कंटाळून 'अन् हा सोन्या ?'...म्हणून उगाच कोठें प्रश्न टाकावा कीं तसाच एखादा इतिहास बाहेर पडून तोहि 'घरगुती खोंड' ठरायचा !

मग ते आपण होऊनच त्यांच्या त्या जोडीविषयीं वर्णन करूं लागत. "प्रथम गाडीला काढतांना फारच त्रास दिला हो शिंच्यांनीं ! मस्त लेकाचे ! धावतां धावतां गाडी कुठं तरी नेत रस्त्याच्या कडेला ! पण मग थोड्या सवयीनं गुलाम



असे छानदार चालींत धावूं लागले म्हणतां, कीं तो सातपाटीचा करीमसाहेब... हं, तोच लागला माझ्या मागं...म्हणाला, 'वाटेल ती रक्कम घे, पण,..."

हे लांबूं लागले कीं त्यांना पुन्हा आठवण करून द्यावी लागे; अप्पांचें हिऱ्या-सोन्यांवर प्रेमच तसें अतोनात ! त्यांच्याविषयींची एखादी लहानसानशी आठवणहि त्यांना मोलाची वाटे !

अप्पांच्या चिरंजीवांनीं आपण एक घोड्याचा टांगा ठेऊं म्हणून सहज त्यांच्याकडे मागें एकदां गोष्ट काढली, तेव्हां ते किती मोठ्यानें त्यांच्यावर खेंकसले !

त्यांच्या एका सावकार मित्रानें स्वतः मोटर घेतली त्या वेळीं अप्पांनाहि त्यानें घ्यावयाचा आग्रह केला; अप्पा आपल्या हिऱ्या-सोन्यांच्या पाठीवर थोपटीत म्हणाले, "या सजीव जोडीची गाडी सोडून मला तुमच्यासारखी निर्जीव मोटर नको !"

अप्पांनीं रोज आंघोळीपूर्वी स्वतः हिऱ्या–सोन्यांना धुवावें, दाणावैरण चारावी अन् पाणी दाखवावें. गवताच्या पेंढ्या तेवढ्या, गडी आणून सोडीत असे त्यांच्यापुढें.

कुठेंहि काम असलें कीं, हिऱ्या–सोन्याला जुंपून ते आपल्या सारवट गाडींतून बाहेर निघत ! जोडी जोडायची आपण स्वतः; शिवळजोतं देखील सैल, घट्ट काय तें आपणच बांधायचें त्यांचें !

पागा हातांत घेऊन अप्पांनीं हांक मारली, कीं ते चालूं लागत. शेपट्या पिळायला नकोत, कीं पराणी मारायला नको ! एकदां खोकून अप्पांनीं इशारा दिला कीं जोडी चौखुर धावूं लागे !

पाऊसपाणी चांगलें व्हावें; दसऱ्याला भरघोंस कणसें दारावरल्या तोरणांत लटकावींत ! कापणीमळणी संपल्याचे निरोप आले, कीं चालले अप्पा हिऱ्या-सोन्यांच्या सारवट गाडींतून, मोठ्या पहांटेस, खंडाच्या मापणीला, दहादहा मैलांवरच्या आपल्या शेतावर ! म्हाताऱ्याला अजूनहि या गोष्टीचा कंटाळा येत नसे.

पूर्वेकडे फटफटीत झालें आहे, कावाडी गाड्यांच्या चाकांचा खडखड आवाज ऐकूं येत आहे ! रस्त्याला लागूनच, पण जरा आंत असलेल्या शेतांतील झोंपड्यांजवळ धनगरी कुत्रीं भुंकत आहेत व कोंबडे आरवत आहेत ! दळणाला

मांडलेल्या जात्यांचा घरघर आवाज ऐकूं येत आहे व पक्ष्यांचा किलबिलाट सुरू झाला आहे ! अशा वेळीं आप्पांची गाडी खडीच्या खडबडोत रस्त्यावरून खेड्याकडे जाणाऱ्या, एखाद्या मऊ मातीच्या गराडींत उतरत असे ! सूर्यबिंब नुकतेंच वर येत असलें तर अप्पांनीं पागांसकट हात वर करून सूर्यनारायणाला भक्तिभावानें नमस्कार करावा ! त्या मऊ मातींतून गाडीचीं चाकें शांतपणें घसरत असल्यामुळें, हिऱ्या–सोन्यांच्या गळ्यांतील घुंगुरांचा मंजुळ ध्वनि तेवढाच सारखा ऐकूं येई !

गराडीजवळ बाभळीचीं झुडपें, गाडीच्या तट्टयाला ओरबडून मागें जात आहेत ! गराडीच्या मधल्या उंचवट्यावर वाढलेल्या करवंदीच्या जाळ्या मधून-मधून गाडीच्या धुरांडाखालून मागें निसटत आहेत ! कमरेला बांडीं–कोयता लटकावून, काथ्याच्या दोराच्या साह्यानें ताडांच्या झाडांवर चढणारे उतरणारे भंडारी किंवा लांबवर गवती नंबरांतून गवताच्या मोठमोठ्या राशींच्या जवळपास कामास सुरुवात करणारे काथोडी दिसत आहेत !....

अप्पा असें इकडेतिकडे पाहत असतां, हिऱ्या–सोन्यांनीं, आपल्या गळ्यांतल्या घुंगुरांच्या तालावर, गराडीच्या चाकोरींतील तांबसर मऊ मातींतून गाडी जोरांत पुढें न्यावी !

अप्पांनाहि त्यांची काळजी असे ! अर्धी चाल झाली कीं, विसांव्यासाठीं एखादी छायेची जागा पाहून त्यांनीं गाडी थोडा वेळ उभी करावी, हिऱ्या-सोन्यांना थोपटावें, त्यांच्या शिंगांजवळ खाजवावें, दोनचार खुरासणीच्या पेंडीचे तुकडे चारावेत, जोतींशिवळ सैल करून पुन्हां बांधावीं कीं, नुसत्या हातांतल्या पागांच्या इशाऱ्यावर दौड करावयास हिऱ्या–सोन्या पुन्हा आपले आनंदानें तयार !

मापाचें वगैरे काम झालें कीं, संध्याकाळीं सूर्य थोडा खालीं कलल्यावर, थंड वेळीं परत फिरावें; घरच्या ओढीनें हिऱ्या–सोन्या सारख्या चालीनें धावूं लागत ! गराड सोडून रस्त्याला लागेपर्यंत सांज होऊन बराच काळोख पसरलेला असे !

नुकत्याच घराकडे परतलेल्या गुरांच्या पावलांनीं उडालेला धुरळा सर्व बाजूस हवेंत पसरला आहे ! जवळपासच्या झोंपड्यांतून एखाददुसरा दिवा मिणमिणत आहे; दमल्याभागल्या पुरुषांचें स्नान चाललें आहे; पोरांच्या खेळाचा आरडा-



"सूर्यबिंब नुकतेंच वर येत असलें, तर अप्पांनीं पागांसकट हात वर करून, सूर्यनारायणाला भक्तिभावानें नमस्कार करावा !"

[ पान १२ ]

ओरडा सुरू आहे !...चुलींत घातलेल्या बोंबलांचा किंवा रस्त्याच्या कडेला असलेल्या एकप्रकारच्या झुडपांचा 'भुताटकीनें उकडलेल्या बटाट्यां' सारखा उग्र वास येत आहे ! अशा समयीं चंद्रप्रकाशामुळें पडलेल्या वडांच्या सावलींतून हिऱ्या-सोन्यांच्या जोडीनें अप्पा बसलेली सारवट गाडी घरीं घेऊन यावी !

अशीं अठरा वर्षें गेलीं होतीं !

जिथें जिथें अप्पांनीं जावें तिथें तिथें हिऱ्या-सोन्यांची जोडी ! !

* * *

हिऱ्या सोन्याकडे बघे !...सोन्या हिऱ्याकडे बघे ! !...

आज दोन दिवस अप्पा त्यांना दिसले नव्हते; त्यांना त्यांनीं दाणावैरण चारली नव्हती; पाणी दाखवून अंजारलेंगोंजारलें नव्हतें कीं 'हिऱ्याऽ'... 'सोन्याऽ' म्हणून नुसती हांकहि मारली नव्हती !

सुरुवातीस थंडीवाऱ्याचें निमित्त होऊन दोनतीन दिवसांत म्हातारा तापानें बिछान्याला खिळून पडला होता, हें बिचाऱ्यांना कसें समजावें ?

गडी येऊन त्यांच्यापुढें वैरण ठेवीत...ते खात नसत ! पाणी दाखवीत... ते पीत नसत ! गवताच्या पेंढ्या सोडीत....त्याला ते शिवतहि नसत !

त्यांना वाटे कीं आत्तां आपला मालक येईल; आपल्याला प्रेमानें हांक मारील; आपल्या थरथरत्या हातानें आपल्याला थोपटील; व पेंडीचे तुकडे तोंडांत घालून कांहीं तरी बोलत आपल्या मानेला विळखा घालील !

पण त्या सर्व हिऱ्या-सोन्यांच्या कल्पनाच होत्या !

अप्पा तापानें बिछान्यावर तळमळत होते !...आळशीच्या पोटिसाच्या सारख्या शेकानेंहि त्यांचा कफ सैल होत नव्हता ! वैद्यबुवा म्हणूं लागले होते, " म्हातारं माणूस केव्हांतरी जायचंच !"

पण अप्पांना हिऱ्या-सोन्यांची आठवण झाल्यावांचून राहात नसे ! "ते 'डोबे' झाले म्हणून त्यांना विकून टाकाल रे !"–ते मधून मधून ओरडत व त्यांच्या डोळ्यांतून अश्रु टपकूं लागत !

चार दिवसांत हिऱ्या-सोन्यांनीं गवताची काडीहि खाल्ली नव्हती ! पाणी नुसतें हुंगून पाहात ! गोठ्यांतून, पुढल्या अंगणांतील अप्पांच्या नेहमींच्या बसावयाच्या खुर्चीकडे किंवा दाराच्या उंबरठ्याकडे 'ते आत्तां येतील, मग येतील' अशा दीन उत्कंठेनें पाहून निराशा झाली किंवा घरांतून त्यांच्या कण्ह-

ण्याचा क्षीण, पण ओळखीचा आवाज ऐकूं आला, कीं हिऱ्या–सोन्या दोघेहि मोठमोठ्यानें हंबरत !

....आणि तें हंबरणें अप्पांच्या कानीं गेलें कीं तेहि बिछान्यावर पडल्या पडल्या ओरडत, "अरे, त्यांचं दाणा–वैरण झालं का?...पाणी दाखवायचं राहिलं असेल..."

नाहींतर त्यांनीं चिडखोरपणें ओरडून म्हणावें, " अरे, मी नसलों तर तुम्ही त्यांना उपाशीं मारून टाकाल, मारून ! "

पण त्या चालत्या धडधाकट बैलजोडीला मारण्याचा कोणाचाच विचार झाला नाहीं व नसता !

त्यांच्यापुढें सारें येत होतें; पण हिऱ्या–सोन्यांना अप्पा दिसत नव्हते ! त्यांचा प्रेमळ हात त्यांच्या पाठीवरून फिरत नव्हता ! त्यांच्या हातचे पेंडीचे तुकडे चघळण्याचा किंवा ते बसलेली स्वारीची गाडी ओढून नेल्याचा आनंद अनुभविण्याची संधीही त्यांना येत नव्हती !

शेवटीं एके दिवशीं सकाळीं, लोकांनीं त्यांच्या अप्पांना उचलून अंगणांत आणिलेलें हिऱ्या–सोन्यांना दिसलें! त्यांच्या जिवाची कोण धडपड !... मोठ्यामोठ्यानें हंबरून त्यांनीं दावीं तोडण्याचा प्रयत्न केला ! हिऱ्या मोकळा होऊन अंगणाकडे येऊं लागला तोंच त्याला एका गड्यानें पुन्हा दोरानें भक्कम बांधलें !

ते मोठमोठ्यानें हंबरतच होते ! पण अप्पा कांहीं बोलले नाहींत कीं त्यांच्याजवळहि आले नाहींत !

हिऱ्या–सोन्यांच्या देखतच, लोकांनीं, अप्पांना उचलून, फाटकाबाहेर लांब, अगदीं लांब नेलें !

आश्चर्यमिश्रित दुःखानें ते सतत मोठ्यानें हंबरूं लागले, " अप्पा, या हो या ! तुम्ही भेटलां नाहींत म्हणून आम्ही उपाशीं आहोंत ! पाठीवरून नुसता हात फिरवून आम्हांला प्रेमानें थोपटा तरी ! "

पण अप्पा आले नाहींतच ! दोन दोन रपाटे मात्र बसले पाठींत काठीचे ! 'वाघ खाययेन् !...बुगाच वरडाया रोग झालाया का आंऽ ?'...गोवाऱ्याकडे दीनपणें टक लावून पाहत माराच्या भीतीनें हिऱ्या–सोन्या स्तब्ध राहिले !

मुक्या हृदयाच्या भावना हृदयांतल्या हृदयांत धुमसूं लागल्या ! आधीं वाचा नव्हतीच; पण आतां भाव प्रकट करणेंहि अशक्य झालें !



पशुहृदयालाहि प्रेमाचा ओलावा व भावभावना असतात हें मानवी हृदयाला समजलेंच नाहीं !

* * *

दुसऱ्या दिवशीं सकाळीं हिऱ्या–सोन्यांची जोडी एकमेकांच्या मानेजवळ मान टाकून मरून पडली होती !

हा असा चमत्कार घडला तरी कसा हें शेजाऱ्यापाजाऱ्यांना कोडेंच पडलें !

शोक आवरून आप्पांचे चिरंजीव बाहेर येऊन पाहतात तों त्यांनाहि आश्चर्य वाटलें ! त्यांत गाडीला चांगली चालणारी सुदृढ जोडी एकदम अनपेक्षित मेली याबद्दलचें दुःखच जास्त डोकावत होतें !

शेवटीं सर्वानुमतें ठरलें कीं, कोणतें तरी विषारी किरडूं रात्रीं चावून हिऱ्या-सोन्या मेले !

हिऱ्या–सोन्यांचा अंत विषामुळें झाला होता, कीं अमृतामुळें हें मात्र खुद्द त्यांचें त्यांनाच ठाऊक !

महारांनीं त्यांना उलटें करून कातडें काढण्यासाठीं, वांशावर घालून नेईपर्यंत शेजारच्या बंडूनानांचा अरुण, त्यांच्याकडे कुतूहलपूर्ण दृष्टीनें पाहत होता !

बंडूनानांनीं हांक मारली तरी तो हिऱ्या–सोन्यांच्या अश्रूंनीं डबडबलेल्या डोळ्यांकडेच पाहत राहिला ! त्यानें जरा आणखी खालीं वांकून पाहिलें असतें तर त्यांत त्याला स्वतःचेंच प्रतिबिंब दिसलें असतें ! महार उचलूं लागतांच अरुणचे बालिश कोमल डोळेहि आंसवांनीं भरूं लागले !

तोंच बंडूनाना त्याच्यावर ओरडले, " अरेऽ....मी काय म्हणतोयू मघा-पासून, तें तुला ऐकूं येतंय् कीं नाहीं, एऽ बैलोबा ? ! "

पुणें; सप्टेंबर १९३१.

( प्रसिद्धि—'लोकशिक्षण' )

# ४—संधि-प्रकाश

**एक शब्दचित्र.**

हंबीर मरावयास टेंकला होता !

*　　　*　　　*

तो असा आजारी पडून किती तरी दिवस झाले होते; अलीकडे तो येतां जातां लत्ता खाणारा निरुपयोगी मुडदाच गणला जात असे !

त्याच्या अंगाचें कातडें कमावून फारच सुंदर होईल याची त्यांना जाणीव होती. पण ते 'चांगले' लोक म्हणाले, "त्याला ठार मारणें चूक होईल !"

होय; आणि असें त्या चांगल्या लोकांना वाटलें म्हणूनच फक्त हंबीर, हळूहळू मरण्यासाठीं, एकाकी पडून होता ! बाकी, त्याचें सर्वांना केव्हांच विस्मरण झालें होतें ! !

कधीं कधीं, तो फारच हळू हळू मरत आहे, हें त्याला समजाविण्यासाठीं, ते पुण्यात्मे त्याला लाथांचा खुराक चारीत ! नाहींतर अलीकडे त्यांचा त्याचा फारसा संबंध येत नसेच ! !

एकदां, ज्या कुत्र्यांबरोबर तो शिकारीचा पाठलाग करी, ते शिकारी कुत्रे त्याला भेटावयास त्याच्या तबेल्यांत आले !....पण...कुत्र्यांचीं मनें म्हणतात नीचच...( बाकी साहजिकच आहे म्हणा !...मनुष्यप्राण्याच्या अतिसंगतीनें याशिवाय दुसरें काय होणार ? ? )....धन्याच्या हांका ऐकतांच ते तत्काल त्याला सोडून निघून गे[illegible] !...त्यांच्यांतला म्हातारा मोत्या तेवढाच काय तो त्याच्याकडे बराच वेळ बसून असे ! डोळे किलकिले ठेवून, हंबीरच्या खाण्यापिण्याच्या घमेल्याजवळ पडल्या पडल्या त्याचे अश्रुपूर्ण, दुःखी व सूचक असे मोठे डोळे पाहून मोत्याला दुःख होई; व भीतीही वाटे !

असे त्या म्हाताऱ्या एकाकी घोड्याचे भोग होते !...दिवस त्याची सोबत करीत;....सोनेरी, गुलाबी अशा तऱ्हेचे ते असत;....पण कधीं कधीं दुःखी कष्टी दिवस, त्याचा तो तबेला रड्यानें भरून टाकीत !....त्याची ती स्थिति पाहूनच जणूं काय, त्याचें पाऊल पुढें पडत नसे, इतक्या हळू निघून जात ते !

तथापि हंबीरला लहानशा, पण स्तब्ध व भयाण अशा रात्रींचीच जास्त भीति वाटे....तो नक्की मरणार असें त्याला त्याच वेळीं खरेंखुरें समजून येई !....आणि



तो भीतीमुळें बेफामपणें धडपड करूं लागे ! कुठें भिंतीवर लाथा आपट, कुठें बांधून ठेवलेली दोरी तोडण्याचा प्रयत्न कर....त्याला आपली सुटका करून घ्यावी अशी उत्कट इच्छा होई....पळून....कुठें तरी लांब पळून जावेंसें त्याला वाटे....

*　　　*　　　*

मावळत्या सूर्याचे लांब किरण, फळकटांच्या भिंतीच्या फटींतून तबेल्यांत येतांना त्यानें पाहिले; दुःख असह्य होऊन आर्त स्वरानें तो मोठ्यानें खेंकाळूं लागला !

त्या बुडत्या दिवसाच्या स्तब्धतेंत त्याची बिचाऱ्याची कोण दाद घेतो ?

चिमण्या भुर्कन् उडून जात; आपल्या घरट्यांतून चिवचिवत;...लांबून... अगदीं लांबून...कापणी चाललेल्या शेतांतून विळ्यांचा 'खस् खस्' असा सूक्ष्म आवाज अजून ऐकूं येत होता !...कापतां कापतां बाहेर पडणारी, एखाद्या ग्राम्यगाण्याची लकेर...आपापसांतील कुजबुजणें....सर्व...सर्व कांहीं इतक्या दुरूनही स्पष्ट ऐकूं येत होतें !

पण हंबीरसभोंवतीं भयाण...अगदीं भयाण शांतता पसरली होती !!

त्याच्या अंगावर भीतीनें कांटा उभा राहिला...त्या दुःखी जीवानें हताशपणें धडपड केली...धडपड....खूप धडपड करून त्याची दावणी तुटली...तो मोकळा झाला...आणि आवारांत पळूं लागला.

सूर्याला पाहून त्याच्या डोळ्यांपुढें अंधेरी आली ! त्याच्या पोटांत भयंकर दुःख होत होतें. आपलें डोकें खालीं करून तो सुन्न होऊन उभा राहिला !

पण थोड्याच वेळांत तो पुन्हां भानावर आला; शेतें, अरण्यें, कुरणें, सर्वांच्या अंधुक अंधुक आठवणी त्याच्या डोक्यांत भ्रमूं लागल्या...'सारखें धांवत सुटावें ! सारखें धांवत सुटावें !!' असें त्याला वाटूं लागलें ! पुन्हा दूरवर धांवत जाण्याची इच्छा ! 'जगावें !' अजून जगण्याची अतृप्त तृष्णा...

त्या आवारांतून बाहेर पडण्यासाठीं तो रस्ता शोधूं लागला...पण त्याची खटपट व्यर्थ होती...बिचाऱ्याला सरळ उभेंही राहवत नव्हतें; त्याला भयंकर दुःख होत होतें....

दुखीच्या सडलेल्या भागांतून रक्ताचा प्रवाह चालूच होता...

शेवटीं त्याला एक कुंपण दिसलें. तेथून त्याला आपल्या धन्याचें घर दिसत

होतें ! त्या समोरील फुलांनीं आच्छादिलेलें गवती हिरवेंगार कुरण,...त्याच हिरव्यागार गवतांत ऊन खात पडलेले त्याचे एकेकाळचे सवंगडी, ते शिकारी कुत्रे....सोनेरी किरणांनीं चकाकणारीं खिडकीचीं तावदानें....सर्व कांहीं त्याला दिसत होतें...तो दुःखपूर्णपणें खेंकाळला...जणुं काय तो म्हणाला, "याऽहोऽ ! कोणी तरी माझ्याकडे याऽहोऽ ! !".......

कोणी त्याच्याकडे आले असते....एखादा प्रेमळ शब्द बोलले असते...'बेटा हा मी आहें इथें....' म्हणून त्याची पाठ थोपटली असती...तो आनंदानें—अगदीं आनंदानें...मेला असता !...पण छे ! सभोंवार शांत होतें....स्तब्ध....पूर्ण स्तब्ध...दिशासुद्धां धुंद दिसत होत्या ! !....

फाटकाशीं टक्कर खेळ, कुठें कुंपणाच्या तारांनाच चावे घे....बिचाऱ्याची मुद्दून दूर दूर त्या घराजवळ जाण्याची अजून धडपड चालली होती !....शेवटीं फाटक मोडून पडला....तो बागेंत आला....दुःखामुळें त्याचें आर्तस्वराचें ओरडणें चाललेंच होतें,...पण तें कोणाला ऐकूं गेलें नाहीं;...तो पडदा लावलेल्या खिडकीकडे गेला...दोन पायऱ्या चढून तेथें खेंकाळला....शेवटीं सर्व घराभोंवतीं त्यानें प्रदक्षिणा घातली; पण त्याला कोणी...कोणी दिसलें नाहीं ! !...

इतक्यांत त्याला एकदम कांहींही दिसेनासें झालें !...एखाद्या समुद्रासारखीं, दूरवर अगदीं दूरवर...क्षितिजापर्यंत...पसरलेलीं कुरणेंच फक्त त्याला दिसत होतीं !....आधींच शक्ति नाहीं, त्यांत असलीं दृश्यें सभोंवार घोंटाळूं लागलीं !...बिचारा पदोपदीं अडखळत ठेंचाळत होता...

हंबीरचें अंग थरारलें !....त्याचे डोळे दुःखानें भरून आले !....श्वासोच्छ्वास जड सुरू झाला...गरम झालेल्या नागपुड्या त्यानें हिरव्यागार व ओलसर कुरणांत खुपसल्या !...तहान....खूप तहान लागली होती....पण तो तसाच पाय ओढीत पुढें चालत होता....त्याला मुद्दून जावें असें सारखें वाटत होतें !...तो तसाच धडपडत चालला...शेवटीं त्याचे पाय जवळ जवळ हालेचनात, इतके जड झाले. कापलेल्या पिकांच्या देठांवरही तो आपटूं लागला...लहान सहान खांच खळगे त्याला मोठ्या खड्ड्यासारखे वाटूं लागले....कोंवळ्या कुरणांतूही त्याचे पाय गुंतूं लागले....छोटीमोठीं झुडपेंही त्याचा रस्ता आडवीत !...सर्व पृथ्वीच जणूं काय त्याला आपल्याकडे ओढूं पहात होती...त्याला कांहींच दिसेनासें झालें...सगळीकडे अंधार पसरला होता ! !...



क्षणोक्षणीं, त्याचा मुका जीव आंत...आंत—भीतीच्या भयाण काळोखांत शिरत होता ! धुक्यांतून चालल्याप्रमाणें त्याला कांहीं दिसत नसतांही तो पुढें जाण्याची धडपड करीतच होता...एक पक्षी जातां जातां त्याच्या दोन पायांमधून उडून गेला...त्याच्या स्पर्शामुळें त्याचें अंग भीतीनें थरारलें. तो तेथल्या तेथेंच स्तब्ध उभा राहिला !...त्याला पुढें जाण्याचें धैर्यच होईना !......कावळ्यांनीं उडतां उडतां, त्याला पहातांच, ते जवळच्या झाडावर बसले ! !...त्यांचा कर्कश, व अपशकुनी ओरडा चालू झाला......

हंबीरची शक्ति संपत आली...तो जमिनीवर गलितगात्र होऊन पडला !...त्यानें हात पाय ताठरले......शून्य आकाशाकडे दृष्टि लावली......व मोठ्यानें करुण स्वरानें तो खेंकाळूं लागला !......

कावळे झाडावरून खालीं उतरले...उड्या मारीत मारीत ते हळूहळू त्याच्या अगदीं जवळ आले...कुरणांतील रोप वांकून वांकून, त्याच्याकडे, आपल्या फुलांच्या डोळ्यांनीं पाहूं लागले......कावळे आणखी जवळ आले......आपापल्या चोंची गवताच्या सुकलेल्या देठांवर शस्त्राप्रमाणें पाजळूं लागले......कांहीं मोठ्यानें 'काव काव' करीत त्याच्या भोंवतीं घिरट्या घालूं लागले...त्याला त्यांच्या अर्ध्या उघड्या चोंची व वाटोळे डोळे दिसले...पण त्याला हालणें शक्यच नव्हतें...त्यानें आपले खूर जमिनीवर आपटले...त्याला वाटलें आपण पुन्हा उठून...इकडे तिकडे दौडच करीत आहोंत...शिकारीचा पाठलाग करीत आहोंत ...जवळच कुत्रे भोंकत भोंकत दौड करीत आहेत...

पण सगळें 'वाटत'च होतें......

दुःख असह्य झालें...त्यानें पुन्हा विव्हल होऊन आर्तस्वरानें किंकाळी फोडली !

कावळे तितकाच वेळ कायते दूर पळाले...पण पुन्हां...

आतां त्याला कांहीं दिसत नव्हतें...समजत नव्हतें...सर्व सभोंवार फिरत होते...त्याला तो कोठें तरी आंत आंत रुतत आहे असें वाटलें...तोंच एक अगदीं गार लाट त्याच्या शरीरांतून गेली...आणि तो—त्याचें शरीर—पूर्ण स्तब्ध पडलें...पुन्हां थोडेंसुद्धां हाललें नाहीं...

* * *

सूर्य बुडाला...संधिप्रकाश जिकडे तिकडे पसरूं लागला....कुत्र्यांचें भुंकणें लांबूनही ऐकूं येत होतें...

मोत्या धांवतच आपल्या मित्राकडे गेला...पण हंबीरनें त्याला मुळींच ओळखलें नाहीं...त्या म्हाताऱ्या कुऱ्यानें त्याला चाटून पाहिलें...पण छे...जरासुद्धां शब्द नाहीं...मोत्या भुंकत भुंकत इकडे तिकडे वेड्यासारखा फिरूं लागला...'धांवा हो धांवा ! मदतीला या ! !'...जणूं काय तो ओरडत होता...पण...पण कोणीही आलें नाहीं...

हंबीराच्या पेंचलेल्या डोळ्यांत गवत पुन्हां पुन्हां वांकून पहात होतें...पक्षी जास्तच वाढूं लागले....हजारों जीवजंतु त्याच्या शरीरावर, त्याला पोखरण्यासाठीं, त्याला फाडण्यासाठीं, त्याच्या मांसावर मेजवानी करण्यासाठीं, उड्या घालूं लागले !...कावळ्यांचा कलकलाट जास्तच जोरानें सुरू झाला...

मोत्या मात्र मोठ्यामोठ्यानें हेल काढून रडत होता...

आणि तीं 'चांगलीं' माणसें ? ? ?......*

पुणें, ३ एप्रिल १९३१

( प्रसिद्धि–'प्रगति' )

* रेमंट, या पोलिश लेखकाच्या 'ट्वायलाइट'च्या आधारें.

# ५–भंगीण !

**......एक शब्दचित्र.**

सावली अंगावर पडेल म्हणून मुलें लांब लांब पळत होतीं, पण तिचें तिकडे लक्षच नव्हतें !

डोक्यावर माखलेला डबा होता. हातांत वापरून वापरून झिजलेला खराटा होता. दुसऱ्या हातानें ती डबा सांवरीत होती. हात माखूं नयेत म्हणून कागद दुडून डब्याच्या कांठाला मात्र धरला होता !

एकंदर कपडे मळीनच होते ! मळकट लांबरुंद घेराचा घागरा तिनें आंवरून घेतला होता. पिवळा तांबडा अशा कांहींशा रंगाच्या कापडाच्या तुकड्याचा कंबरेजवळ अडकवून नंतर वर घेऊन, तिनें पदरासारखा उपयोग केला होता ! घागऱ्याला एका बाजूस मळकासा रुमाल खोचला होता !

तशी ती बरी काळी सावळी होती !...पण काळजीपूर्वक निगा न राखल्यामुळें तिचा चेहरा होता त्यापेक्षां जास्त काळा दिसत होता. त्यांत पोटाच्या काळजीनें, एक प्रकारें भर घातली होती ! डोक्याला कुंकूं नव्हतें ! नाकांत कसलीशी तांबड्या खड्याची चमकी होती ! काळ्यांत तांबडें तें कितीसें उठून दिसणार ? कानांत चांदीचे अवजड दागिने लोंबत होते. खराटा धरलेल्या उघड्या हातावर कसलीशी आकृति गोंदून घेतलेली दिसत होती. मनगटावर हस्तिदंती बांगड्या रुळत होत्या ! पायांत चांदीचीं वळीं होतीं ! घोट्याजवळ चांदीचे तोडे होते.

ती झपझप पावलें टाकीत होती. कोणच्याही घराच्या पुढील बाजूशीं तिचा संबंधच नव्हता. मागील बाजूस जाऊन आपलें काम झालें, कीं ती पुढील घराचा रस्ता धरी ! प्रत्येक ठिकाणीं तिला सारखाच अनुभव येत होता !

आतां या आळींतील ह्या शेवटच्या घरामागें जावयाचें, कीं तिचें सकाळचें काम संपलें !...पुढला बंगला तसाच टाकून ती मागच्या बाजूस गेली. वईतून, केराकचऱ्यांतून तिच्यासाठीं केलेल्या वांकड्या तिकड्या मार्गानें जातांना तिनें डबा सांवरला. डोक्यावरील डबा खालीं उतरून तिनें डांबर लावलेलें दार उघडलें !

तीसुद्धां माणूसच होती !—तिनें एक क्षणभर घाणीमुळें नाक मुरडलें ! पण करणार काय ? त्याच कामासाठीं तिचा जन्म जावयाचा होता !...तिनें नाका-

वरील हात काढून, आपल्या पदरांतून एक कागद हातांत घेतला. त्याची जाडशी घडी करून ती पुढें वांकली; घाण येतच होती…माशा घोंघावत होत्या…वरून पाणीही पडत होतेंच…कागदाच्या साहाय्यानें तिनें टोपलीला हात घातला !

'इस्वर तेरा दिल दिखनाऽरा' असें कोणतेंसें गाणें गुणगुणत तिनें आपल्या कर्तव्यास सुरवात केली…दोन्ही तिन्ही टोपल्या साफ करून पुन्हा जागच्या जागीं ठेवल्यावर तिनें दार बंद केलें…डबा संभाळून आपल्या उत्तमभागीं चुंबळीवर ठेवला…दुसऱ्या हातांत खराटा घेऊन ती, आतां घरीं जावयास मिळेल या आनंदानें लवकर लवकर चालूं लागली !…

"एऽबयाऽ !" तेथील बाईसाहेब कडाडल्या. तिला या प्रकाराचा प्रत्येक ठिकाणीं अनुभव येत असेच ! तिला बाईसाहेब न् दादासाहेब पुष्कळ !!

"काय गऽए ! बरीच कीं ग माजोरी झालीस ! हल्लीं बरोबर साफ करीत नाहींसच संडास ! आणि आंत इकडे कोण झाडू मारणार ? तूं का मी ? न् तो तिथं बाबू बसलाय् तें कोणी काढायचं ?…तें कांहीं नाहीं; तुझ्याविरुद्ध मुन्सीपाल्टींत तक्रारच केली पाहिजे……"

येथेंच नाहीं; सगळीकडे तिला असेंच ऐकून घ्यावें लागत असे ! एखाद्याच ठिकाणीं कसूर करण्यांत तिचा मोठासा फायदा तो काय होणार होता ? घाणेरडें काम खरें, पण तें एकदां करावयाचें ठरविल्यावर, थोडें कमी न् थोडें जास्त करून काय मोठासा फरक होणार ?…परंतु तिच्या दृष्टीनें कोण पहाणार इतकें ?…जो तो स्वतःच्याच तोऱ्यांत असतो ! हीं कोणीं माणसेंच नव्हत अशीच त्यांची कल्पना असल्यास न कळे !

तिला हें सर्व कळत होतें म्हणूनच तिनें बाईसाहेबांनीं केलेल्या सर्व सूचना, थोडेंसें कुरकुरत कां होईना, पार पाडल्या ! मुकादमाचीही थोडीशी भीति वाटल्यावांचून राहिली नाहीं तिला ! शिवाय बाईसाहेबांकडून पुढें मागें पोस्त मिळेल ही आशा तिनें मनाशीं कां बरें बाळगूं नये ?

तिनें ठरल्या जागीं जाऊन डबा मोकळा केला.

आतां ती घराची वाट चालूं लागली !….दिवसांतील आनंदाची घटका जवळ येत होती !….मलीन अंगाचीं, नागडीं उघडीं पोरें तिच्या डोळ्यांसमोर नाचूं लागलीं !…ती झपझप् पावलें टाकीत होती !

चांगल्या आळ्या गेल्यावर भंगी आळी आली ! थोडक्या वेळांत जाण्यासाठीं, जवळचा रस्ता म्हणून या रस्त्याचा लोक उपयोग करीत त्यावेळीं ते



जिवावर उदार होऊन, 'प्राणायाम' करीत, नाकपुड्या दाबून जात. केव्हां बाहेर पडतों त्या भागांतून असें त्यांस वाटे ! पण ही जसजशी आंत जाऊं लागली तसतसा तिचा आनंद वाढूं लागला !…तिचें सर्वस्वच त्या भागांत दडलेलें होतें !……

सर्व गांवांतून गोळा करून आणलेल्या केरकचऱ्याच्या ढिगाऱ्यांत गाढवें लोळत होतीं !…मुलें खेळत होतीं !! त्यांच्या कामाच्या मानानें खावयास न घातल्यामुळें बिचारीं गाढवें, मिळतील त्या गवताच्या काड्या त्या ढिगांतून शोधून काढीत होतीं !…कसल्या तरी आशेनें मुलें त्या केरांत हात घालून कांहीं शोधत होतीं.

बिचारीं निष्पाप बालकें !

प्रत्येकाची किंमत सारखी कां नसावी ? एकाची योग्यता दुसऱ्यापेक्षां कशामुळें जास्त होते ?

'नरेंच केला हीन किती नर ?'

केर उपसून रिकाम्या केलेल्या गाड्या तेथेंच होत्या ! संडासामागील टाक्याचें पाणी उपसून आणणाऱ्या टाक्या तेथेंच होत्या ! वापरावयाचे डबेही तेथेंच होते !…घाणीचीं गटारें त्याजवळूनच वहात जात होतीं !…लोकांचे संडास झाडणाऱ्या या माणसांचे स्वतःचे संडास रांकेनें जवळपासच होते !…आणि त्यांनजीकच त्यांचीं रहातीं घरें—खोपटीं—होतीं !

खोपटीं वरखालीं सर्व बाजूनें पत्र्याचीं केलेलीं होतीं !…पत्रे गंजलेल्या डब्यांचे ठोकून चपटे केले होते, व त्यांचाच छपरांसाठीं व भिंतीसाठीं उपयोग केला होता !…फळकटें गोळा करून दारें दोनच,—एक मागील, एक पुढील,—तयार केलीं होतीं !

दारांत खाटा पडल्या होत्या. खाटांवर मलीन बिछाने होते. दोन तीन पांघरुणें अस्ताव्यस्त पडलीं होतीं !…रस्त्याच्या सपाटीलाच खोपटाची जमीन होती !

तिनें डोक्यावरील डबा व खराटा बाजूस ठेवला !

नवरा नुकताच परत आला होता. पावसाळा जवळ येऊं लागला असल्यामुळें तो घराचे पत्रे ठाकठोक करून नीट करीत होता ! त्याला तसा काम करीत असतांना पाहून तिला प्रेमाचें भरतें आलें ! आपल्या नवऱ्याबद्दल तिला किती अभिमान वाटे !…तो थोडा दारुड्या होता म्हणून तिला त्याचा राग येई; पण

त्याला तिचा इलाज नव्हता, तसाच त्याचाही नव्हता म्हटलें तरी चालेल !... पैसा जास्त असला म्हणजे 'कसा खर्च करूं ?' या चिंतेनें मनुष्य दारुड्या होतो; तसेंच पैसाच नसला म्हणजे त्या चिंतेनें मनुष्य दारुड्या होतो !.!... जग विविध आहे !

ती त्याच्याकडे पाहून प्रेमानें तोंडभर हंसली ! त्यांनींही हंसून आपल्या कामास पुढें सुरवात केली.

ती पुढें येतांच दाराशींच खांबाला बांधलेली बकरी बें बें करून तिला ओळखल्याचें दाखवूं लागली ! तिनें तिला थोपटलें.

झोळींत तिनें वांकून पाहिलें, तिचें लहानगें नुकतेंच चुळबुळ करूं लागलें होतें ! त्या काळ्या मचकट कापडाच्या झोळींतून तिनें त्याला वर उचलून त्याचे मटामट मुके घेतले !

कोपऱ्यांतील मातीचीं मडकीं, रांजणें व हांडे पाण्यासाठीं तिची वाट पहात होते !

नवऱ्याला पाणी तापवून दिल्यावर तिनें स्वतःही अंघोळ केली !...स्वच्छ—तिच्या मानानें—कपडे घालून तिनें अन्न शिजत घातलें.


केरांत खेळत असलेलीं मुलें दुडदुडां धांवत आलीं. एकाला खुळखुळा सांपडला होता, त्यामुळें त्याला तो त्या दिवसाचा राजा असल्यासारखें वाटत होतें. आपल्या इतर भावंडांपेक्षां आपण कांहीं तरी जास्त आहोंत असें वाटून तो त्यांना हिणवीत होता !...मनुष्यस्वभावच आहे तो ! !...सगळीकडे तसेंच असतें !...

तिला वाईट वाटलें ! मुलांना खेळायला द्यायला खर्चावयाचें तिच्या पगाराच्या आटोक्याबाहेर होतें !...कधीं मधीं पोस्त मिळे त्याच वेळीं असल्या खरेदी ! तिनें उद्यां सणांचें पोस्त मागावयाचें ठरविलें !

मुलांना अंघोळी घातल्यावर तीं सर्व मिळून जेवलीं ! या आनंदाच्या घटकेसाठींच तिची व तिच्या नवऱ्याची धडपड साऱ्या दिवसांची ! !

गरिबीचें जेवण !...कितीसें रुचकर असणार ?...पण रुचकर केलेलें नसलें म्हणजे तें रुचकर लागतच नाहीं असें थोडेंच आहे ?...कधीं कधीं रुचकर अन्नही कोणाकोणाला रुचकर लागत नाहीं ! ! मानसिक समाधानावरच सर्व अवलंबन असतें !...

* * *



"कोणत्याही घराच्या पुढील बाजूशीं तिचा संबंधच नव्हता !"

[ पान २१ ]

आज त्या लगीनघरचा थाट पाहून तिला मेजवानीच्या वेळीं जेवावयास मागण्याची सहज इच्छा झाली !

"बाई ऽ ! भंगिणीला वाढा हो ! !" ती एका कोपऱ्यांत बसून केव्हांची ओरडत होती. पण कोणीच तिची दाद घेत नव्हतें !!

ती दोन तीन तासांपूर्वी आली होती, पण त्या वेळीं "आतां या घाईच्या वेळीं काय ग तुझी कटकट ? जा; अजून आमचीं जेवणें व्हावयाचीं आहेत. चल जा !" असें खेंकसून कोणी तिला हाकलली होती !

आशा असते माणसाला !...एक दिवस आपलीं पोरेंबाळें खातील गोड धोड !! नेहमींचें आहेच आपलें अन्न !!

ती घरीं जाऊन, परत दोनतीन तासांनीं टोपली घेऊन आली होती ! पण तिच्या ओरडीकडे कोण देतो लक्ष ! लग्नघरच तें; आणि पुन्हां श्रीमंतांचें ! नुसता बोवाळ व बडेजाव ! पोकळ डौलाचें माहेरघर !!

"दादासाहेब, भंगिणीला पान वाढा हो !" ती पुन्हां ओरडे. लोक येत जात ! हंशांचे आवाज येत ! फोनोपेटीचा धुमाकूळ चाललाच होता ! त्या गोंधळांत कोण दाद घेणार हिची !

तिला कालच्या एका प्रसंगाची पुन्हा आठवण झाली. जवळच्या घरीं सणाचे दोन आणे पोस्त मागितलें तेव्हां त्या 'बाई'नें व 'दादासाहेबां'नीं तिला न समजणाऱ्या अर्थशास्त्रावरील व्याख्यानाचा इतका डोस पाजला कीं, पुढील स्वतःचें काम चोख करण्याचा उपदेश ऐकावयास ती उभीच राहिली नाहीं !

पोटासाठीं दीन झालेल्यांपुढेंच यांचें पांडित्य ! त्याच वेळीं यांची काटकसर उसळावयाची ! नाहीं तर हवी तशी उधळपट्टी !! हे आमच्या उच्च जातीच्या, सुशिक्षितांचे गुणधर्मच आहेत मुळीं !!......

ती पुनःपुन्हां ओरडत होती ! पण त्या बोवाळांत तिच्याकडे कोणाचेंच लक्ष जात नव्हतें !

सकाळपासून जेवणाच्या आशेवर ती उपाशी होती !

घरचे पट्टेवालेकुत्रे, तिच्या देखत लाडू जिलब्या खातांना दिसत होते ! ती बिचारी मधून मधून सुग्रास अन्नासाठीं व आपल्या घरच्या मुलांच्या मायेमुळें, ओरडत होती, "बाईऽऽ, दादाऽऽ, भंगिणीचें पान !"

कुत्रीं वगैरे 'पशू'ना, माणसांपेक्षां कमी प्रतीचें लेखण्याचा तरी आपल्याला काय बरें अधिकार ?

निष्ठूर व डोळे फोडणारी नीच विषमता ! जडजीवनप्रधान ध्येयें, माणसाची स्वतःच्या पोटासाठीं चाललेली धडपड ! ! सर्व सारखें चाललेलें दिसून येतंच नाहीं काय ? आणि स्वार्थ काय कमी आहे त्यांच्यांत ?

पण मग 'समाजप्रिय उत्क्रान्त प्राणी' अशी स्वतःची घमेंडपूर्ण व्याख्या आपण कशाच्या जोरावर व कां करावी ?

पुष्कळ वेळानें एक जण बाहेर आला !

"काय आहे ग ओरड उगाच ? आधीं यायला काय झालं होतं ? आमचीं जेवणें केव्हांच होऊन गेलीं ! वाटेल त्या वेळीं कसं मिळेल ? चल, नीघ. उगाच नको इथं कटकट !"

मघां आली त्यावेळीं बराच वेळ होता जेवण व्हायला ! आतां जेवण होऊन बराच वेळ होऊन गेला होता ! !

दरम्यान, मोठ्यांच्या घरची, मोठ्यांसाठीं,–आपला पोकळ बडेजाव, आपल्या सारख्याच पोकळ 'मोठ्यां'त कायम राहण्यासाठीं–अन्नाची नासधूस होईपर्यंत, आग्रहानें वाढून वाढून मेजवानी–बडी मेजवानी–संपली होती ! !

भंगीण आली ! भंगीण गेली ! !

'मोठ्यां'कडची मेजवानी, खावयास कंटाळलेल्या 'मोठ्यां'साठींच असते, हें बिचारीला ठाऊक नव्हतें !

तिनें, कुत्र्यांनीं खाल्लेल्या ठिकाणीं पाहिलें ! खरकटें टाकलेल्या जागेकडे नजर फेंकली ! सुशोभित केलेला मांडव वरपासून खालपर्यंत पाहिला ! व रिकामी टोपली, डोक्यावर टाकून हातांत दोन तीन रिकामीं भांडीं घेऊन ती आली तशीच परत आपल्या घरीं फिरली !

तिच्या डोळ्यांतून अश्रूंचा प्रवाह चालला होता !

लोकांच्या दृष्टीनें ती चांगल्या वस्तींतून भंगी आळींत,–घाणेरड्या वस्तींत–परत जात असेल !

पण वस्तुस्थिती त्याच्या अगदीं उलट होती !

नासिक, १५ मे १९३१.

( प्रसिद्धि–'प्रगति' 'ज्योत्स्ना' )

---

# ६–भूक !—

**एक शब्दचित्र.**

भूक व मनुष्यत्व यांचा फार निकटचा संबंध असतो ! विषम जगांत ती जास्त वाटते; आणि मनुष्याला तीच अमानुष करते ! !

* * *

सोम्या माणसाच्या जन्माला आला, तेव्हां तो माणूसच होता !

गरीबी व तो अगदीं बालमित्र; त्यामुळें तिचा सहवास त्याला फारसा जाचक होत नसे. मात्र, माणसें, चांदीचा चमचा तोंडांत घेऊन जन्माला कां व कशीं येतात याची त्याला कधींच कल्पना येत नसे !...

तो जिवंत राहून वाढला; बायको व संसार पाठीमागें लागलीं; आणि त्याला मुलेंही झालीं !

...हे असे कितीतरी दिवस गेले ! !

* * *

गांवांत भयंकर सांथ आली !...दुष्काळ—अर्थात् सोमासारख्यांना—पडला ! गुरेढोरें सुद्धां पटापट वैरणीविना मरूं लागलीं ! !...

तें पाहून, सांथीनें एकदम पछाडलेल्या, आपल्या कच्च्याबच्च्यांबद्दल व बायकोबद्दल सोमाला काळजी उत्पन्न झाली !

आपली गरीबी त्याला दिसूं लागली, आणि त्याचे सर्व प्रयत्न व श्रम निष्फळ वाटतांच त्याला ठिकठिकाणची श्रीमंतीही दिसूं लागली !

...आणि गरजू गरीबाला श्रीमंती दिसूं लागल्यावर दुसरं काय व्हावयाचें ? ?...

* * *

...शेवटीं, सोमा तुरुंगांत गेला ( त्याला पाठविला म्हणणें जास्त योग्य ! ).

बायको मुलें तशींच झोंपडींत सांथीनें विव्हळत.

"काय उलट्या काळजाचा हो !..,लेकानं...."

त्याला काळीज होतं; पण उलटं होतं एवढ्यावरच लोकांचा कटाक्ष !

म्हणजे बरंच कबूल करीत होते कीं ! !....

* * *

चार साडेचार वर्षांनंतर—

नंबर ९९९ चे निरनिराळे फोटो घेऊन त्याला बाहेर सोडण्यांत आलें; गांवापर्यंत जाण्याचें तिकिट काढून देण्यांत आलें व बाहेर पडतेवेळीं त्याला थोडा उपदेशही केला !

तरी 'सोम्या बेरड'ची त्यांना भीति होतीच; एक वॉर्डर दुसऱ्याकडे पाहून म्हणाला, "हरामखोर पुन्हां इथं हजर होईल हातकड्यांत, पहा थोड्याच दिवसांत !"

आणि हें त्याचें बऱ्याच वर्षांच्या अनुभवाचें बोलणें होतें !....

* * *

सोम्याला बाहेर पडल्यावर बरें वाटलें व वाईटही वाटलें !

पुन्हां जगांत आल्यासारखें वाटल्यामुळें त्याला समाधान झालें !

आणि आंत पोटभर खावयास मिळत होतें हें आठवून तीन दिवसांच्या उपाशीं सोम्याला वाईटही वाटलें !

पोरेंबाळें, त्या सांथींत गडप झाल्याची बातमी तुरुंगांतच ऐकली असल्यामुळें, आतां तो जगांत एकटाच होता, हें समजावयास त्याला वेळ लागला नाहीं !

आणि बाहेर सुद्धां, कोठेंही, तो 'सोम्या बेरड'च होता !!

* * *

"काय बिनकाळजाचा माणूस हो !....त्या नीचानं, पंधरा दिवस नाहीं झाले सुद्धन, तों, आतां तर, नुसतं पोट जाळण्यासाठीं, खूनच केलान् !"

पण सोम्या 'उलट्या काळजा'चा म्हणूनच तुरुंगांत गेला होता;...त्यावेळीं लोकही म्हणाले त्याला तसं !!...

मग एकूण तो तुरुंगांतून बाहेर पडला, तेव्हांच 'बिनकाळजा'चा झाला असावा !

* * *

सोम्या हातीं लागला ! व अपेक्षेप्रमाणें, हातकड्यांत, त्या तुरुंगामध्येंच 'तो परत गेला.'

ठरली तारीख अजून यावयाची होती !

* * *



दोन राष्ट्रीय तरुण शांतपणें फांसावर लटकल्याची बातमी, त्याला, त्याच्या अंधेऱ्या कोठडींत समजली !

त्याच्या दुसऱ्याच दिवशीं, त्याला कांहीं वेळ आगाऊ सांगून, कोठडींतून बाहेर काढण्यांत आलें !

आणि त्याच फासावर, ठरल्या दिवशीं, ठरल्यावेळीं, 'उलट्या' किंवा 'बिनकाळजा'चा सोम्या, 'मरेपर्यंत लटकला' !!

* * *

माणसाच्या जन्माला आलेला सोम्या, अमानुष कृत्य करून जगांतून निघून गेला ! ते दोघे तरुणही 'अमानुष'च ठरले !

त्यांचा तो तुरुंग तेथेंच असून त्यांत लोक जात येत असतात !!...

फांस व त्या खालची फळी, 'अमानुष' कृत्यें करणाऱ्यांना जवळ घ्यावयाची अजून वाट पहात आहेत !!!

पुणें, २४ मार्च १९३१.

# ७—जीवन

एक शब्दचित्र.

जीवनचं जीवित........चाललं होतं झालं कसं तरी...

पदरीं बायको, दोन पोरं.......स्वतःचं पोट होतंच बरोबर आणखी.......

*       *       *

" औंदा यगीन कयाचा ! " तो बोबडा बोलत असे.

" पैसे रे कुठून आणणार लग्नाला ? "

" तुझ्या पायीं हायेत ना ? ॲहँ, ॲहँ,..." तो खांदा उडवत हंसत असे.

" तुला कसले पैसे द्यायचे ? तूं फेडणार कसे ते ? "

" चाकयी कयीन ना तुज्याकय ! " त्यानें ढोपर खाजवीत हमी दिली.

" न् पळालास तर ?...

" नायीं नायी पयाचो मी ! "....त्यानें जास्त बोलून दाखविलें नाहीं. तो शेटच्या पायां पडला.

आणि शेटनीं त्याला पैसे द्यायचें कबूल केलें.

*       *       *

फेंगडा, काटकोळा, थोडासा अशक्त, वेडपट....देतो कोण त्याला चांगली मुलगी ?...वारल्याची जात म्हणून काय झालं ?.......

मिळाली त्याच्यासारखीच बावळट.......लगीन झालं....गडी खूष झाला... शेटला बायको दाखवायला आणली....

" आतां तूं बायकोवाला झालास, जीवन....! "

" हां ! ॲहँःऽॲहँः..." तो नेहमींच्या पद्धतीनें गुडघा खाजवीत हसूं लागला.

" तिला तूं कशी पोसणार आहेस ?....न् उद्यां दोन पोरं झालीं मग ! "

" तूं हायस ना ! " सावकाराला तो प्रत्यक्ष देव समजत असे.

*       *       *

दोन दिवसांनीं जीवन बायकोसह आला. सावकाराच्या वाड्यांत त्यानें बिऱ्हाड केलें.

त्यांच्या जातीच्या सर्वसाधारण लोकांपेक्षां जीवन अशक्तच होता. 'डोकी' केलेलें तुळतुळीत डोकें, चपटसें नाक, त्यांतून मिशांशीं सख्य करण्यास बाहेर



येणारे केस, लहानशा मिशा, पिवळे व थोडेसे पुढें आलेले दांत, वगैरे सर्व, नेहमीं हंसतमुख असल्यामुळें जास्त ठळकपणें दिसत असत. वाढलेली दाढी त्याच्या काळ्या रंगावर फारशी दिसून येत नसे........अन् तें एका अर्थी त्याला बरेंच होतें....दर महिन्याला सावकाराकडून दोन आणे घेऊन ठरलेल्या न्हाव्याकडून 'डोकी' बरोबरच दाढी करवून घ्यायला मिळे. कुठें बाहेर जाते वेळींच तो अंगांत बंडी घाली. नाहींतर नेहमीं तो उघडाच असे. कमरेंतील करगोट्यांत अडकविलेली एक मोठीशी पांढऱ्या कापडाची पण मळकट झालेली लंगोटी हेंच कायतें त्याची अब्रू सांभाळण्याचें साधन !

शिक्षण....? कुठचं बिचाऱ्याला ? ?

सावकाराचा धाकटा मुलगा दोन महिने 'शिरी' घोंटाळत होता; तें तो रोज पांचपांच मिनिटें पहात उभा राही. कधीं कधीं तो सावकाराला 'यसफ्यस्' करतांना ऐकत असे...हें काय गौड बंगाल ? त्याचें या बाबतींत डोकेंच चालत नसे ! तो सावकाराला सर्वज्ञानीच समजे !!

तो कांहीं ना कांहीं काम करीत असेच ! पण जरा मंद होता. समजण्याचीहि त्याला अक्कल तेवढीच होती. पुरता सांगकाम्याही नव्हता.

सावकाराचीं ढोरें संभाळणें हें त्याचें मुख्य काम !

एक काम करायला त्याला कमींत कमी चारदां तरी ओरडावें लागे.

*       *       *

"अरे जीवन, तोंडगा जूप रहाटाला !"...सावकाराचा धाकटा मुलगा ओरडला.

जीवन गोठ्यांत जाऊन सावकाश तोंडगा सोडीत होता. तोंपर्यंत इकडे चारदां हांका मारून झाल्या होत्या. त्यानें तोंडग्याच्या पाठीवर थाप मारून कुंडीवर त्याला पाणी दाखविलें.

"अरे जीवन तोंडगा..." सावकाराचा मुलगा पुन्हा खव्याळपणें अर्धवट ओरडला.

जीवनला समजलेंच नाहीं. त्याचें लक्ष तोंडग्याकडे होतें. मुलगा कुंडीजवळ आला.

"जीवन तोंडगा, जूप..." तो हंसत म्हणाला.

" पानी खातोय् ना पन ! " जीवन त्याजकडे पहात हंसत म्हणाला. त्यानें तोंडग्याला थाप मारली.

आपली चेष्टा अजून जीवनला समजली नाहीं म्हणून सावकाराचा मुलगा पुन्हा म्हणाला, " अरे, जीवन तोंडगा—जूप...." " ॲहः ॲहः ॲहं ! जीवन नायी तोंगाऽ ! योऽऽतोंगा ! " जीवन आपल्या नेहमींच्या पद्धतीनें हंसून गुडघा खाजवीत तोंडगा दाखविण्यासाठीं मान पुढें करून म्हणाला.

तोंडगा म्हटलं म्हणून तो तोंडगा थोडाच होतो ?...सावकाराचा मुलगा शिकत नसे. त्याला सर्व विचारीत,—" काय रे, तूं जीवन होणार का ? "

पण खरोखर ! तोंडग्यांत न् जीवनमध्यें कांहींच का फरक नव्हता ?

* * *

" जीवन, मुंबई पाहिली आहेस का रे ? "

" नायी बा ! ॲ हंः ! " ठराविक पद्धति....

" एवढा बाप्या झालान् अजून नाहीं पाहिलीस मुंबई ? तुझं वय रे काय ? "

" कोऽनाय ठाऊक ?....असाऽदीस व्हता तवां जयमयोय्..." तो हातवाऱ्या-सह बोलत होता.

" चल्, ती बडबड नको तुझी मला...! मुंबईला कशी गंमत असते ठाऊक आहे ? "

" जत्ये सायकी ! ॲ हंः..." जीवन हंसत होता.

" हंऽहं ! जत्रेसारखीच ! "

" आज ह्ाये शितयादेवीची जत्या ! " जीवन म्हणाला; त्याला मुंबई नको होती.

" तूं जाणार ? "....

" पैस पायजेत ना ? ॲ हंः..." त्यानें खांदा उडवला व तो गुडघा खाजवूं लागला.

" कितीसे रे ? "

" चार सा आनं देस ! " आपल्या डोक्याला त्यानें फडका गुंडाळला.

जत्रा म्हणजे जीवनची चंगळ ! चांदण्यांत गप्पा मारत चालत जायचं...तिथं देवीचं दर्शन घ्यायचं....एक दोन आण्याचे डाळ चुरमुरे प्रसाद म्हणून



घ्यायचे...एक दोन आण्याचीं पोरांना शिव्या पेपेरी खरेदी करायचीं...पुन्हां बोलत बोलत घरीं फिरायचं !....

गरीबांतच जास्त हौस असते....त्यांनाच देव काय तें चांगलें समजतें. बुद्धीपेक्षां हृदयालाच जास्त किंमत ! !

* * *

जीवनची आज कोण धांदल ? सावकाराच्या मुलाची मुंज !...कुठून कुठून लोक, बोलावण्याप्रमाणें आले होते !....आधींच अशक्त व मंद...त्यांतून आज तो जास्त घाई करण्याचा प्रयत्न करीत होता. तो लवकरच थकला....त्याच्या त्या धडपडीचें कौतुक तरी करणारं कोण होतं का ? सगळं आपलं नेहमीं सार-खंच ! !

अंघोळीच्या खोलींत तो कशासाठींसा गेला ! कोनाड्यांत त्याला एक पुरचुंडी दिसली ! त्यानें ती हातीं घेतली. जो तो आपापल्याच गडबडींत...त्याच्याकडे कशाला कोण लक्ष देणार ?...त्यानें ती उघडून पाहिली. दहा दहाच्या सहासात नोटा व कांहीं किरकोळ रुपये !...त्याच्या बापजन्मींही त्यानें इतके रुपये पाहिले नव्हते. त्याला ते मोजतांच येईनात. आधींच दमला भागलेला...त्यांत ही नवी भानगड....त्याला कांहीं सुचेना....तो तसाच शेटाणीकडे धांवत गेला.

" वयनी ये वयनी ? " तो धापा टाकीत म्हणाला.

" ये बग काय ? " हातांतील पैसे तो पुढें करीत म्हणाला.

" कायरे घाईच्या वेळीं तुझा त्रास ? " वहिनी आपल्याच कामांत होती.

" हे....म...मला त्या खो–खोयींत सापययें ! " आधींच बोबडा, त्यांत त्याची इतके पैसे पाहून घाबरगुंडीच उडाली होती. " कोनाचे हायेत ?...."

वहिनीचें लक्ष जातांच तिनें झटकन् आपले हात पुढें केले. त्यांत त्यानें तें पुडकें टाकलें. वहिनीला आश्चर्य वाटलें.

" कोणाचे बाबा हे जीवन...." असें म्हणत म्हणत ती आपल्या यजमानाकडे गेली.

जीवनला सुद्धां हायसें वाटलें.

पैशाचा मालक सांपडला. त्याला त्याचे पैसे मिळाले.

कोण हरीचा लाल होता कोणास ठाऊक ? आठ आणे सुद्धां काढून त्यानें जीवनच्या हातावर ठेवले नाहीं ! !

पैशानें नव्हे पण शब्दानेंही कोणीं जीवनचें कौतुक केलें नाहीं. तिघा चौघां-शिवाय कोणाला हें ठाऊकही नव्हतें !...

"अरे जीवन, तोंडगा जूप" सावकाराचा मुलगा येऊन घाईनें सांगूं लागला, "रहाट चालूं दे. पुष्कळांच्या आंघोळी व्हायच्या आहेत अझून ! अशा घाईच्या वेळीं जलद नाहीं काम करणार तर केव्हां ?"

त्याला आपला ठरलेलाच वेळ लागला !...तोंडगा पाणी पीत होता.

"अरे जीवन तोंडगा..."

"नायी नायी जीवन नाहीं तोंगा ! योऽऽतोंगाऽ ! ! अँहेंः अँहेंः..."

तो नेहमींसारखा हंसत तोंडग्याबरोबर लंगडत लंगडत चालूं लागला.

आणि खरोखरच जीवन तोंडगा नव्हता !

जीवन कुचकामाचा ?...जीवन तोंडगा ? ?....

....आणि ते पशू त्यांच्यांतील कमी प्रतीच्या एखाद्याला, शिवी म्हणून 'माणूस' असें कशावरून संबोधीत नसतील ?

* * *

जीवनच्या अंगीं गूणही होते !...पण ते कोणाच्या व कसे दृष्टीस पडणार ? ?

* * *

"काय जीवऽन ?"

"वोऽऽ"

"कसा हाये ?"

"बया हाय !"

"ही रे कोण ?"

"कोनची यी ? यी माजी मुयगी ! न् यी गोवायाची ?" त्यानें आपल्या पाठीवर खेळत असलेल्या नागव्या मुलीला एका हातानें कडेवर घेऊन दुसऱ्या हातानें शेणी घालण्याचें काम पुढें चालू केलें.

"तिच्या अंगांत कांहीं घातलं नाहींसरे अगदीं ?"

"काय कयाच कपये ? अँहेंः अँहें !"....तो हंसत म्हणाला; या चौकशीमुळें त्याला आश्चर्यपूर्ण आनंद वाटला असावा !

"वेड्या आजारी पडेल !..."

"नायी पयाची !...कापयाया पैसं पयतात ना ?..."

कालचे पैसे काय कमी होते ? जन्मभर पुरते !



पण ते नको होते त्याला ! !......

तो सावकाराच्या 'अडोसरी'वरच खूष होता ! ! !

जीवनचें जीवित...असंच चाललं होतं असंच...

आणि तसाच त्याचा जन्म जाणार होता बहुतेक.......

त्याच्यांत कितीतरी खोडी होत्या.... तो कुचकामाचा, तो...

पण कशाला ? हें सर्व त्याचें त्यालासुद्धां समजत होतें....न् यांतच मोठेपणा आहे...अशींच माणसें ईश्वराला जवळ असतात ! एखादा गुण माणसांना दिसत नाहीं. पण म्हणून तो त्याचा गुण नष्ट होत नाहीं ! !

अशा लोकांचं कसं चालेल....चालतं; बरं चालतं...आपोआप त्यांचं चालतं ...माणसांना नाहीं पण ईश्वराला त्यांची किंमत चांगली कळते...स्वतःच्या लेंकरांचे दोष कोण विसरत नाहीं ?

कसं होणार जीवनचं ?...लोकांना नको बरं त्याची काळजी...त्याची आपो-आप घेतली जाते काळजी....

पालघर, एप्रील १९३०.

( प्रसिद्धि–'प्रगति' )


## ८—सुभान्या—

**एक शब्दचित्र.**

आपल्या मळकट कुडत्याच्या आंतल्या खिशांतून त्यानें तंबाखूची पुडी काढली. बाहेरच्या खिशांतील आपळ्याचीं दोन पानें काढून तीं त्यानें आपल्या जिभेवर फिरवून थुंकीनें ओलीं केलीं. तीं एकावर एक ठेवून थोडीं पुढें मागें सरकावून, त्यांत पुडींतील 'तमाख' घालून त्यानें 'वावली' वळली. उजव्या खिशांतील 'चकमकी' नें ती पेटवून दोन चार 'झुरके' घेतल्यावर त्याच्या दमल्या भागल्या जीवाचें समाधान झालें! त्याला नवा जोम आला!! नवीन जाळें टाकण्यासाठीं त्यानें आपली लहानगी होडी जरा आणखी आंत ढकलली......

'वलव वलव वलकारी,' तो आपल्या भसाड्या सुरांत गात होता. व हातानें होडी वल्हवीत होता. त्यानें त्याची तरी करमणूक होत होती! त्याला पाहिजे होती ती जागा आली! तो थांबला. त्यानें आपलें जाळें समुद्रांत फेंकलें व तें नीट पसरण्यासाठीं आपली होडी सभोंवार फिरविली. तो थोडा वेळ वाट पहात राहिला. त्याला सूर्य बुडतांना दिसला. तो हंसला. त्याची घराकडे फिरण्याची वेळ झाली होती!...

त्यानें जाळें ओढलें. सांपडलेल्या माशांच्या जिवाची, जिवासाठीं धडपड चालली होती! त्याच्या स्वतःच्या जिवाची पण तशीच सारखी धडपड चालली होती. त्यानें ते मासे काढून आपल्या मडक्यांत टाकले व त्यांवर झांकण ठेवलें. जाळें ठिकाणावर ठेवून त्यानें होडी परतवली. घराकडे परत फिरण्याच्या आनंदानें तो मोठ्यानें गाऊं लागला. समुद्राच्या असंख्य लाटांनीं त्याची होडी सारखी हेलकावे खात होती. तो वल्हवीत होता म्हणून ती ठरावीक दिशेनें चालली होती. नाहीं तर ती कोठच्या कोठें बहकली असती! त्याच्या संसार-नौकेचेंही असेंच होतें. गातां गातां केव्हां किनारा आला तें त्याला समजलें सुद्धां नाहीं. त्यानें होडी पाण्यांतून वर ओढून, जाळें व मडकें खांद्यावर टाकून रस्ता आक्रमिण्यास सुरवात केली.



"काळीं, शेंबडीं, मळीन असींच तीं होतीं—पण तीं त्याचींच मुलें ना!" [पान ३७]

सूर्य साफ मावळला होता. साधारण अंधुक अंधुक दिसत होतें. आपल्या घराच्या दिशेनें तो वृक्षहीन वाळवंट तुडवीत चालला ! त्याचा संसार असाच रुक्ष होता काय ?—त्याचें झोंपडें दिसूं लागलें. त्याचा आनंद गगनांत मावेना. त्याचीं दोन्हीतिन्ही पोरें त्याला पाहतांच त्याच्याकडे धांवत येत होतीं. काळीं, शेंबडीं, मलीन अशींच तीं होतीं.—पण तीं त्याचींच मुलें ना ! खांद्यावरील मडकें व जाळें त्यानें जमिनीवर टाकलें. त्यानें प्रत्येकाला पाळीपाळीनें उचलून त्यांचे मुके घेतले व सर्व लटांबरासह तो घराकडे आला.

गिरजी आपल्या कामावरून नुकतीच परत फिरली होती. तीही दमली होती. पण नवऱ्याचे श्रम पाहून ती आपले विसरली. जेवण तयार झालें ! ती हंसत-मुखानें म्हणाली, "भाकर खावाची नाय ?"

सुभान्या आंत गेला. जाळें एका कोंपऱ्यांत टाकून, माशांचें मडकें त्यानें गिरजेकडे दिलें. चुलीवर असलेलें गरम पाण्याचें मडकें त्यानें बाहेर आणिलें. नारळाच्या करवंटीला दांडा लावून केलेल्या डावेनें त्यानें अंग धुण्यास सुरवात केली. त्याची ती पिळदार शरीरयष्टी व झुपकेदार मिशा त्याच्या एकंदर कण-खरपणांत भर टाकीत होत्या. पांचसात मिनिटांत त्यानें आपलें स्नान संपविलें. अंग पुसून त्यानें काळ्या रेघांचा तांबडा फडका गुंडाळला. झोंपड्यांत जाऊन तो चुलीजवळ बसला. एका काळ्या ताटांत गिरजेनें तिखट, तिनें आणलेल्या ताज्या मासळीचें 'कोरड्यास', व चारपांच भाकऱ्या असे सर्व जिन्नस वाढून दिले. प्रकाशासाठीं एक दिवा मिणमिणत होता. गिरजेनें चुलींत चार 'सुक्या काड्या' टाकल्या होत्या. त्यांची 'उदबत्ती' दरवळत होती. त्या वासावरच सुभान्या चार घांस जास्त जेवला असता. बायकोचा थोडासा आग्रह झाल्यावर त्याचें जेवण संपलें. त्याला वैद्यशास्त्र ठाऊक नव्हतें. त्यानें जेवणावर पाण्याचा सबंध तांब्या घशाखालीं उतरविला.

पुन्हां 'वावली' वळली व तो पोरें झोंपलीं होतीं त्यांच्याच जवळ चिरगुटां-वर बसला. गिरजेचें घरांतील काम संपतांच ती बाहेर आली. त्यांचा बराच वेळ मासळीच्या विक्रीचा हिशोब चालला होता.—जगांत पुष्कळ भानगडी चालल्या होत्या ! त्याला त्यांतील एकही ठाऊक नव्हती.—आणि एकही सम-जून घेण्याची त्याची इच्छा नव्हती.—शिवाय त्याला तेवढा वेळ तरी कोठें होता ? ?

हिशेब संपल्यावर तो व त्याची बायको झोंपीं गेलीं. त्याला पांच मिनिटांत गाढ झोंप लागली. दिवसभराचे त्याचे श्रमच तसे होते ! शिवाय मचांच्या चुलीजवळच्या चारसहा लहान मोठ्या गाडग्यांशिवाय व ते झोंपलेल्या चिरगुटांशिवाय त्याच्याकडे जास्त काय होतें ? उरावर चिंतेचें ओझें नव्हतें, मग सुखानें झोंप कां लागूं नये ? ?

आयुष्यांतील एक दिवस तर गेला ! उद्यांची बात उद्यां ! ! आणि इकडे उद्यांची आहे कोणाला एवढी काळजी ?—'आज' मधून तर गरीबीनें कां होईना पण अब्रूनें बाहेर पडलों. झालें तर ! संपलें कर्तव्य. 'पुढली काळजी ईश्वराला.'

* * *

"कॉक्-कॉ-कॉक्-कॅ !"; 'पहिला कोंबडा' आरवला. आणखी थोड्या वेळानें 'दुसरा कोंबडा' झाला. कोंबडा हेंच त्यांचें घड्याळ ! पण घड्याळवाल्या लोकांपेक्षां तेंच जास्त वक्तशीर ! सुभान्या उठला. गिरजी उठली. कामाची निरवानिरव करण्यास सुरवात झाली. गिरजीनें नवी भाकर व कोरड्यास केलें. दुपारची न्याहरी बांधून तयार होईपर्यंत सुभान्या आपलीं कामें संपवून आला. थोड्या वेळानें तांबडें फुटूं लागलें. त्यानें न्याहरी केली. तोंवर सूर्य वर येत होता.

सूर्य वर आला. तो आपला रस्ता काढूं लागला. पोटाची काळजी नसलेले अजून गावांमध्यें लोळत होते. पण प्रत्येकाचेंच तसें नसतें ! सुभान्या सूर्याचें अनुकरण करून स्वतःचा रस्ता काढूं लागला !

जातांना त्यानें आपल्या पोरांकडे पाहिलें. तो लांब जाईपर्यंत गिरजी दारांत उभी होती. तिलासुद्धां मासळी घेऊन बाजारांत जावयाचें होतें पण अझून वेळ होता.

सुभान्या झोंपडी दिसेपर्यंत दोन तीन वेळां मागें वळून पहात होता. कालचेंच वाळवंट तो तुडवूं लागला. पण कालच्या सारखी त्याला जवळच दिसणारी आशाचंद्रिका नव्हती.

आपली होडी त्यानें नेहमींसारखी समुद्रांत कलली—तेथपर्यंतच काय तें ! समुद्राच्या लाटांबरोबरच त्याच्या हृदयांत आनंद व आशा यांच्या लाटा उचंबळूं



लागल्या. बरोबरच आहे ! एकदां नांव आंत ढकलली खरी ! आतां पुढचा विचार नको करायला ?

संध्याकाळपर्यंत सुभान्याचें असेंच चालावयाचें होतें !

नेहमींचाही कार्यक्रम असाच !!

* * *

पालघर; एप्रील १९२९.
(प्रसिद्धि-'प्रगति')

*         *         *

# ह्रदय
## भाग दुसरा

*         *         *

" Hope is the anchor of life, Hope is the helmet of salvation,"
Hope is a poor man's bread, Hope is a waking man's dream'

—*Pliny.*

दिवस उगवतो न् दिवस मावळतो. त्या दरम्यान कितीकजणांच्या कितीएक आशा सफल होतात त्याचप्रमाणें किती जण अपयशामुळें तात्पुरते निराश होतात. अेवढें जरी आहे तरी भिकाऱ्यापासून श्रीमंतापर्यंत, बालकापासून वृद्धापर्यंत, स्त्री आणि पुरुष, जन्मल्यापासून मरेपर्यंत आशेमागें लागलेले आढळून येतात. कोणीही असलेल्या स्थितींत संतुष्ट नसतो. आशा आहे म्हणून जग चाललें आहे !...

*         *         *

# १–अंध भिकारी.

**एक शब्दचित्र.**

काळें मळकट बंडीवजा अंगांतलें, दोन पायांत शेव सुटलेली लंगोटी, डोक्याला फाटकीशी टोपी असा त्या पोऱ्याचा पोशाख होता. त्याचें वय १२।१३ वर्षांचेंच असेल पण कानाला चिकटलेली अर्धी ओढून ठेवलेली विडी दिसत होती. तोंड पानानें रंगलेलें होतेंच. खाकेंतील लांब काठीच्या मागच्या टोंकाला धरून चालणाऱ्या आंधळ्या महाद्याला हें कांहीं माहीत नव्हतें. आंधळेपणामुळें काठीच्या दोन टोंकांमधील अंतर दोन ध्रुवांतील अंतराएवढें वाढलें होतें. एवढें बरीक खरें कीं, तो पोऱ्या त्या आंधळ्याची काठी होता.

महाद्या—दाढीमिशा व डोक्याचे केंस यांचें पांढरें शुभ्र जंगल झालेला, कृश, म्हातारपणामुळें चेहऱ्याला व एकंदर शरीराला जागजागीं सुरकुत्या पडलेला, अंधपणामुळें डोळ्यांच्या खांचा झालेला, अशा स्थितींत लकतऱ्या झालेली बंडी व चाळणीसारखें धोतर यांत आपलें काळेकभिन्न अंग कसें तरी लपवून—आपल्या म्हातारपणाचे दिवस जिवाचा अट्टाहास करीत घालवीत होता.

'कुत्रें सुद्धां पोट भरतें !' म्हण तर ठीक आहे. पण गरीब बिचारा म्हातारा ! कुत्र्याप्रमाणें 'हडहड' सोसूनही 'रोजचा शेर' मिळविण्यास किती धडपडत असे तें लोकांना कसें समजणार ?

'अहो, अशी विषमता आहे जगांत म्हणून तर मजा आहे !' खरें आहे हें म्हणणें ! पण या गहन विचारांचें महाद्याला काय बिचाऱ्याला ! ! त्याचा प्रत्येक नवीन दिवस धडपडण्यांतच जातो आहे !

पहांट होतांच महाद्या उठला होता. पोऱ्याच्या सहाय्यानें तो एका जवळच्याच स्टेशनजवळ धडपडत धडपडत गेला. त्याला तेथें सोडून पोऱ्या कोठें जवळपास भटकायला निघून गेला. महाद्यानें हात पुढें पसरला. कोणाची चाहूल लागली कीं, "या हो दादा एक पैसा !" म्हणून तो ओरडत असे. बराच वेळ ओरडूनही त्याला कांहीं मिळालें नाहीं. येणाऱ्या जाणाऱ्यांचे चेहरे दिसत नव्हते. पण शब्द मात्र त्याला ऐकूं येत होते. "एऽऽ, एक पानपट्टी देव", "कालचा सिनेमा छान होता नाहीं ?"—"हा कोट अगदींच फाटला बुवा ! दुसरा शिवला पाहिजे एक"—"बाळ, रडूं नकोस हं ! तुला फुगा घेऊन देईन मग !"—"पिस्ता बदाऽ ऽम, चेऽऽ सऽ नट् !"—एक न् दोन !—पैसेवाल्यांचे आणि पैसेवाल्यांसाठीं हजारों आवाज ऐकूं येत होते. महाद्याला काय त्याचें ? तो एखादी दिडकी देणाऱ्या शेटची वाट पहात, "दे रे नारायणा एऽऽक पैसा !" "कोणी हरीचा लाल ??" वगैरे ओरड करीत, हात पुढें करून उभा होता. ईश्वराची आठवण त्याला नाहीं होणार तर कोणाला ?



"दयाळु शेट सावकार !" तो आशिर्वाद देई. त्यामुळें दिडकी देणारा एखादा गरीबही 'दयाळु शेट' होई. आणि खरोखर गरीब लोकच 'दयाळु शेट' असतात. स्वतःला जखम झालेल्या माणसालाच दुसऱ्याच्या जखमेची खूण पाहून भडभडून येतें. बाकीचे नुसते हंसतात.

सूर्य बराच वर आला तरी महाद्याला २।३ पैशांवर कांहीं मिळालें नाहीं. पोऱ्यानें मधल्यामध्येंच १।२ पैसे विड्यांना उपटले. त्याची टोपी विड्यांनीं भरलेली होती हें तो एखादी विडी डोकें वांकवून काढतांना सहज दिसून आलें असतें.

दोन तीन पैशांनीं त्याचें काय होणार ? त्यानें दुसरीकडे कोठें तरी जाऊन उभें रहाण्याचा विचार केला. 'सुदाम्या अऽऽसुदाम्या !' त्यानें पोराला हांक मारली. तो लांब, एका बाजूला विडी ओढत बसला होता. महाद्याची हांक ऐकूं येतांच तो कुरकुरत उठला. त्यानें त्याला जवळ जवळ ओढीतच चालविलें. करणार काय बिचारा ? गप्प राहिला ! त्याचें सर्व आयुष्यच परावलंबी होतें ! ! मग एवढ्या तेवढ्याशासाठीं तो कशाला बरें कुरकुर करणार ?

ते दोघे हमरस्त्यावर येऊन उभे राहिले. कडेला उभे राहून मोठ्यानें ओरडून याचना करीत होते. एखादा मधूनच, जातां जातां, खिशांत हात घाली. त्यावेळीं पोऱ्याला मोठी आशा उत्पन्न होई. पण इतक्यांत तो दूर निघूनच जाई किंवा त्या मनुष्याच्या खिशांतून दुसरेंच कांहीं तरी निघे. तत्काळ बापड्याची निराशा होई ! या बाबतींत मात्र महाद्या सुखी होता. त्याचा आंधळेपणा त्याला मदत करी ! ! तरी पण त्याचा जन्म म्हणजे आशा निराशेचा खेळ नव्हता असें नव्हे !

सूर्य डोक्यावर चढूं लागला. पोट असल्याची जाणीव होऊं लागली. आंधळ्या महाद्याला जिकडे तिकडे प्रखर प्रकाश असूनही कांहीं दिसत नव्हतें. चोहींकडे

काळोख पसरला होता! त्याच्या अन्नाचेंही असेंच होतें; त्याबद्दल निश्चित असें. त्याला कांहींच दिसत नसे!

"आईऽऽ, आंधळ्याला वाढाऽऽ!" तो चाळीच्या मधल्या चौकांत जाऊन ओरडूं लागे. मिळालें तर तेथेंच त्याला कांहीं तरी मिळे! एखाद्या बंगल्यासमोर मिळण्याची मुळीं आशाच नको! त्याच्या फुटक्या डोळ्यांना, शाबूत असले तरी फुटतील असा अन्नाचा नाश होणारा देखावा, दिसत नव्हता हें फार बरें होतें!!

फुटपाथच्या एका टोंकाला बसून सतरा ठिकाणीं मिळालेले जिन्नस एके ठिकाणीं करून त्या बापलेकांनीं आपली भूक शमविली. थोडा वेळ आनंदी आनंद झाला! पण ती पोटाची खळगी कायमची भरते थोडीच? थोड्याच वेळांत 'संध्याकाळचें पोट' धडधडूं लागलें!

थोड्या वेळानें त्यानें पोऱ्याच्या मदतीनें प्रत्येक दुकानापुढें याचनेस सुरवात केली. 'माफ करो भाई'—'पुढचं दुकान गांठ'—'कांहीं काम धंदा करायला काय झालं?'—'पोट नाहीं भरत तर जीव दे! हॅः हॅः!!'—अशा तऱ्हेचे हजारों उपदेशाचे घुटके त्याला मिळत होते. पण कोणीही ह्या सुक्या शब्दा-खेरीज त्याला कसलीच मदत करीत नव्हता! 'माफ करून' किंवा 'पुढचं दुकान गांठून' त्याला पुन्हां तींच उत्तरें मिळणार होतीं! 'कामधंद्या'च्या सुक्या गप्पा कोणीही मारील!! त्याला चार चव्वल लागतात थोडेच??

त्याला आतां वैताग आला! त्याच्याकडे सकाळपासून धडपडून धडपडूनही अवघे ३।४ पैसे जमले होते. तो एका गल्लीच्या तोंडाशीं उताणा पडून पोटावर जोरा जोरानें हात आपटत, 'पोटापुरताऽ! लाचार आहें शेट!!' "येरे विठोब्बा!!" वगैरे ओरडूं लागला.

"गरीब बिचारा!"—'खरंच आंधळा आहे का हो हा?'—"पोटाची चामडी पहा कशी मारून मारून काळी पडलीअयू!"—"ढोंगी लेकाचा! यानं म्हणे परळच्या बाजूला मोठं इस्टेट केलंय!"—"हिंदुस्थान नुसतं भिकाऱ्यांचं आगर!"—पुन्हां सर्व तेंच! शाब्दिक सहानुभूतीला आपलें काय खर्च होतें?

संध्याकाळपर्यंत दोन तीनच दिडक्या कायत्या त्याच्या पदरीं पडल्या. पोऱ्या टोपींतून विडी काढत काढत त्याला तेथून नेण्यासाठीं आला. म्हाताऱ्याला वाटत



होतें तो कांहीं तरी मिळवून आणील. पण आजपर्यंत त्याच्या कितीशा आशा सफल झाल्या होत्या? त्यांतच ही एक भर!

संध्याकाळची भूक कशीबशी शमवली.

* * *

असे कितीक दिवस निघून प्रत्येक रात्रीं दुसऱ्या दिवसाबद्दलच्या आशा त्या म्हाताऱ्याच्या आंधळया डोळ्यांपुढें थैमान करीत असत. यापेक्षां जास्त पैसे मिळतील, यापेक्षां जास्त चांगलें अन्न खावयास मिळेल वगैरे विचारांनीं त्याचें मन व्यापलेलें असे. पण हे सर्व खटाटोप व विचार त्याच्या मागून तो मरेपर्यंत सुटणार नव्हते!!—बाकी हेंही कांहीं नक्की सांगतां येत नाहीं. त्यालाही जर तसेंच वाटतें तर त्यानें एवढी, जीव जगवण्याची धडपडच केली नसती!!!...

* * *

अपघाताच्या वेळीं गर्दी व्हायला वेळ लागत नाहीं.

"आतां कसला जगतो हो तो? पेंकाट सगळं मोडलं!" "मेला बिचारा आंधळा!"—"अन् बरोबरचा पोऱ्या कुठं मरायला गेला होता?"—"मोटा-रवाल्याला तरी लेकाला अक्कल होती कीं नाहीं??" "अहो तो तरी काय करील बापडा? हल्लीं या आंधळयांचा न् भिकाऱ्यांचा नुसता सुळसुळाट झाला आहे!!" —"कशाला मधें मधें मरत होता कोणास ठाऊक?"........

पुष्कळ निरनिराळे आवाज ऐकूं येत होते. मध्यें एका आंधळयाचें प्रेत पडलें होतें. तें महाद्याचेंच होतें. जवळपास पोऱ्या नव्हता म्हणून तो स्वतःच इकडून तिकडे जाण्याचा प्रयत्न करीत असतांना मोटारवाल्याचें लक्ष न राहून तो खालीं सांपडला. मोटार ड्रॉयव्हरनें खूप प्रयत्न केला पण कांहीं यश आलें नाहीं. बिचा-ऱ्याच्या पोटावरून दोन्ही चाकें गेलीं. पोटाची धडपड एकदांची शांत झाली!

मोटारवाल्या शेटवर त्या गरिबाच्या बाजूनें कोण फिर्याद करणार? आणि करून तिचा उपयोग तरी काय??

"अरेरे! मेला बिचारा!"—पुष्कळांच्या तोंडून शब्द आले. हॉस्पिटलमध्यें त्याला मोटारींतून नेण्यांत आलें. सर्वांची सहानुभूति उचंबळून आली. मेल्यानंतर मान!! मरेपर्यंत बिचारा सारखा धडपडत होता! निष्ठुर जगाचा हा नियमच आहे!

'सजीव तोंवरि लत्ता देती! मरतां घेती खांद्यावरती!! उरफाटा सन्मान!!!'

झालें! गेला!! आशेच्या धाग्याला बांधून ठेवलेलें त्याचें जीवित संपलें.

त्या दिवशीं हॉस्पिटलमध्यें विद्यार्थ्यांना महाद्याचें मढें मनुष्याच्या, हृदय वगैरे भागाचें ज्ञान देत होतें!!

* * *

मुंबई, सप्टेंबर १९२९.
(प्रसिद्धि–' प्रगति ')

## २–पाटीवाली

**एक शब्दचित्र.**

गंगेच्या आज पाटी घेऊन बाजारांत जाणें जिवावर आलें होतें. चार वर्षांचा राम्या काल रात्रींपासून तापानें फणफणत होता. रात्रीं तिनें शेजारच्या बागेच्या माळ्याच्या हतांपायां पडून गवती चहाच्या चार काड्या आणून त्याचा 'उन उनीत काढा' त्याला पाजला होता. पण त्याचा ताप कांहीं उतरला नव्हता. त्याला सोडून तिला आपल्या पाटीच्या धंद्यावर जाणें बिकट वाटत होतें. पण न जाऊन कसें चालेल बरें? त्याला जवळच्या दाक्तरनें दूध पाजायला सांगितलें होतें तें कोठून आणावयाचें? तिला नाहीं तर नाहीं, रखमीला तरी दुपारला भाकर नको का जेवायला वाढायला? शेवटीं तिनें लवकर जाऊन येण्याचें ठरविलें.

"पोरी, रातची भाकर हाय थाळींत! ती खा तूं न् राम्याजवळ बस! मी येन तवर बिगिबिगी दूध आन् औशाद घेऊन व्हव" तिनें आपल्या ७–८ वर्षांच्या मुलीला सांगितलें. तिचा जीव तीळ तीळ तुटत होता, पण तिनें पाटी व चुंबळ डोक्यावर टाकून दाराबाहेर धांव ठोकली.

ती बाहेर पडली खरी पण तिचें चित्त सर्व घराकडे लागलें होतें. राम्याजवळ रखमी पोर बसली होती खरी पण ती तरी काय कालची पोर! ती काय संभाळणार त्याला? राम्याचा ताप कसला बरें असेल? त्या धोंडेचा मुलगा नव्हे का परवां ६ दिवस ताप येऊन मेला? आणि त्या मनेच्या पोरीलाही असंच कांहीं तरी झालें नाहीं का?—तिच्या डोक्यांत विचारांचें नुसतें काहूर माजून राहिलें. 'देवा तूंच तारणार पोराला!' तिच्या तोंडून उद्गार आले. ती विचारांतच गर्क झाली होती. एखाद्या यंत्राप्रमाणें तिचे पाय तिला बाजाराकडे नेत होते. पाऊस जोरानें पडूं लागला नसता तर ती तशीच कितीतरी वेळ चालली असती. तिनें खांद्यावरील गोणपाटाची खोलपट कुंची आपल्या डोक्यावर टाकली व वर तिची हरकामी टोपली निवारणार्थ ठेवली. पाऊस पडत होता व ती भिजत होती. पण टोपली व गोणपाट डोकीवर असल्यामुळें तिची समजूत झाली होती.

गंगी बाजारांत येऊन पोहोंचली. तिच्या नेहमींच्या दुकानापाशीं जाऊन ती आडोशाला उभी राहिली. टोपली व गोणपाट काढून ठेऊन तिनें आपल्या भिजलेल्या लुगड्याचा ओलाचिंब पदर पिळून काढला.

" गंगेऽऽ ! प्वाराचं बरा हाय ना ग ? " लांबून खांद्यावर रिकामी टोपली अडकवलेली व गोणपाट टाकलेली सखू येतांना दिसली.

" नाय ग ! प्वाराच्या आंगाचा भडका होतुया जनु ! रखम्येला म्हनलं, पोरी बस त्याच्या पाशीं, न् आलें निघून ! " गंगीनें सर्व हकीकत सखूला सांगितली. त्यांच्या बराच वेळ गोष्टी चालल्या होत्या.

पाऊसानें सकाळपासून ठाणें दिलें होतें. मधून मधून मोठ्या सरी येत. एऱ्हवीं सारखा झिम् झिम् पडतच होता. त्यामुळें आज खरेदीला लोक फारसे येत नव्हते. गंगीनें बराच वेळ वाट पाहिली. पण कोणी गिऱ्हाईक दिसेना. तिच्या डोक्यांत पुन्हां विचार डोकावूं लागले. पोराचा ताप उतरला असेल का ? त्याला झोंप लागली असेल का 'आई आई' करत रडत पडला असेल ? त्याला दूध पाजायला पाहिजे ! पण पैशाशिवाय दूध कुठचें आणणार ?—रखमी पोर लहानच आहे. बसली असेल जवळ नाहींतर गेली असेल जवळपास खेळायला अन् राम्या बिछान्यावर एकटाच पडला असेल !—

एक गिऱ्हाईक दुकान चढतांना पाहून तिचे विचार तिला बाजूला ठेवावे लागले. 'शेट, पाटीवाली पाहिजे का ?' ती पुढें होऊन पाटी पुढें करीत अदबीनें म्हणाली. तो मनुष्य दुकानाच्या पायऱ्या चढत तिच्यावर ओरडून म्हणाला 'थांब, उगीच मधें मधें धडपडूं नकोस ! पाहिजे तर सांगेन मी !' म्हणजे अजून आशा साफ नष्ट झाली नव्हती. फडक्याची चुंबळ करीत करीत ती त्याची वाट पाहात बाहेर उभी राहिली. जसजसा वेळ अधिक होऊं लागला, तसतसा गंगेचा जीव खालीं वर होऊं लागला. पुन्हां राम्याविषयींचे विचार तिच्या मनांत येऊं लागले. पाऊस पडतच होता. तो गृहस्थ बराच वेळ दुकानदाराबरोबर गप्पा मारून बाहेर पडला. पाऊस असल्यामुळें आज सामान नेण्याचें त्यानें तहकूब केलें होतें. गंगेनें इतका वेळ धरून ठेवलेली आशा नष्ट झाली !

तिला पैसे पाहिजे होते. त्याच्यासाठीं ती अंगमेहनत करायला, त्रास सोसायला तयार होती. पण तेंही आज निरुपयोगी ठरलें. एक एक क्षण तिला मोलाचा वाटत होता. दुसऱ्या एका दुकानांत एक गृहस्थ शिरतांना गंगेनें लांबून पाहिलें. तिनें चुंबळ, टोपली घेऊन तिकडे भिजत भिजत धांव ठोकली.



" शेट, पाटीवाली—"

" हं ! पाहिजे आहे ! " तो गृहस्थ म्हणाला.

गंगेचा जीव एकदम खालीं पडला. सौदा ठरेल तेव्हां ठरेल. पण आपल्याला गिऱ्हाईक मिळालें या आनंदांतच ती होती. आतां आपण तें सामान त्याच्या घरीं पोहोंचवूं. मग तो देईल त्या पैशाचें दूध नेऊं, दाक्तरच्या हातापायां पडून औषध नेऊं. राम्याला दूध देऊं म्हणजे त्याला बरें वाटेल. त्याचा ताप आतां उतरला असेल......

कितीतरी विचार तिच्या डोक्यांतून वेगानें निघून गेले. मोजून तयार ठेवलेले जिन्नस तिनें भराभर टोपलींत भरले व उचलून डोकीवर घेण्यासाठीं तिला हात घातला.

" थांब, पाऊस ओसरूं दे जरा ! " तो गृहस्थ म्हणाला, " आणि काय घेणार आहेस हेल ? "

" कुठं जायचं शेट ? "

" रामाच्या देवळाजवळ ! जवळच आहे ! " तो गृहस्थ अंतर कमी करण्याच्या हेतूनें म्हणाला, " हं मग काय घेणार ? "

" शेट, तुम्ही काय कमती द्याल ? " गंगी म्हणाली. तिला जाण्याची घाई झाली होती.

" हं ! ते तसले चाळे नकोत ! मागाहून तुम्ही लोक किटकिट करतां ! " तो गृहस्थ म्हणाला. " हो आधींच आपलं ठरलेलं चांगलं ! नाहीं जुळलं तर दुसरं कोणी पहातां येतं ! मग बोल लवकर काय घेणार तें ? "

" चार आनं द्या शेट ! " गंगी हाताचीं चार बोटें दाखवीत म्हणाली.

" काय ? मी नेहमीं दोन आण्याला नेतों न् तूं चार न् पांच आणे सांगूं लागली तर कसें जुळणार ?" तो गृहस्थ सौदा पटवूं लागला.

" साहेब पन दोनअडीच मैल जायचं इक्तं ओझं घेऊन त्ये च्यार आनं पन नकोत गरिबाला ? आमच्या पोटाकडे पहा शेट ?" गंगी काकुळतीला येऊन म्हणाली.

तिच्या डोळ्यांसमोर आजारी राम्याचें चित्र दिसत होतें ! !....

" तें कांहीं नाहीं. अडीच आण्याला येत असलीस तर उचल टोपली; नाहीं तर मी दुसरी कोणीतरी शोधतों ! " तो गृहस्थ बेफिकीरपणें म्हणाला.

गंगी कंटाळली होती. तिला घरीं जाण्याची उत्कंठा झाली होती. तिच्या मनांत एकदम कबूल करण्याचें आलें. अडीच आणे तर अडीच आणे! हातचें सावज सोडणें तिच्या जिवावर आलें होतें. पण जरा ओढून पहावें म्हणून ती म्हणाली, " असं कसं करतां दादा. नाई नाई तरी तीन आनं द्याच!"

" बरं चल! उचल पाटी! अन् जातांना वाटेंत मला चार पांच वस्तु घ्यायच्याहेत बरं का?" गृहस्थ आपण आज सौदा चांगला पटवला म्हणून आनंदून म्हणाला. एक आणा तर एक आणा. तेवढाच कमी झाला. बाकी किती ठिकाणीं कसाही पैसा गेला तरी फिकिर नाहीं. पण असल्या काटकसरीनेंच आम्ही खूष असतों.

गंगीनें पाटी उचलून डोक्यावर चढवली. असलीं चांगलीं खाद्यें, पेयें ती रोज निरनिराळ्या लोकांकडे पोहोंचवीत होती. पण तिला भाकर चटणीशिवाय जास्त कांहीं मिळण्याची आशा नव्हती; आणि ती भाकर चटणीसुद्धां धडपड केल्याशिवाय मिळणें अशक्य होतें! अडीच तीन वर्षांपूर्वी तिचा 'घरधनी' गेल्यापासून दोन मुलांचें व तिचें स्वतःचें अशीं तीन पोटें तिच्या अंगावर पडलीं होतीं. पण जें मिळेल त्यांतच ती संतुष्ट असे.

जातांना वाटेंत तिला तिच्या घराला जाणारा रस्ता लागला. तिच्या मनांत सरळ जाऊन राम्याला बघावें असें कितीदां आलें, परंतु तिच्या डोक्यावर सामान होतें. डोक्यांत पैशाचा विचार चालला होता. पैशाशिवाय जगांत काय आहे? पैसे असते तर आज ती बाहेर तरी कशाला पडली असती? राम्याला दूध पाजायला इतका उशीर कशाला लागला असता? रखमीचे भाकरीचे हाल तरी कशाला झाले असते? 'डॉक्टर'च्या औषधाला तरी मग काय तोटा असता? पण ते नव्हतेच ना! म्हणून तर एवढी सगळी धडपड! 'अगदीं जवळ' असलेलें रामाचें देऊळ चांगलें तीन मैल लांब ठरलें. घरांत सामान काढून ठेवल्यावर तीन आणे हातांत पडले.

घाम पुसून तिनें ते पैसे कनवटीला संभाळून घट्ट गांठ मारून ठेवले. घर जसजसें जवळ येऊं लागलें तसतसें तिचें काळीज जास्त धडधडत होतें. राम्याचा ताप आतां उतरला असेल का? रखमीनें—पोरीनें भाकर खाल्ली असेल का? ........पुन्हां सर्व त्याच प्रश्नमालिकेला ती आपली समजूत करीत आपल्या मनाप्रमाणें उत्तर देत होती. पावसामुळें ती बरीच भिजली होती पण त्याची तिला मुळींच खंती नव्हती. ती झप्झप् पावलें टाकीत घरचा रस्ता काटीत होती.



सारखा आपल्या दोघां मुलांविषयीं तिचा विचार चालला होता. तेंच काय तें तिचें सर्वस्व! बरोबर घेतलेल्या भांड्यांत तिनें जवळच्या एका हलवायाकडून अर्धा शेर दूध घेतलें. राहिलेला एक आणा तिनें तसाच सांभाळून ठेवला.

" रखमे! पोरी हायेस तरी कुठं?" ती घरांत शिरतां शिरतां रखमेला ओरडून म्हणाली.

तिनें बिछान्यावर पाहिलें तर कोणी नाहीं. रखमी तिथें नव्हती. राम्याही बिछान्यावर नव्हता. तिच्या पोटांत एकदम धस्स झालें. हीं पोरें गेलीं तरी कुठें? मन चिंती तें वैरी न चिंती! तिच्या मनांत अनेक विचार येऊं लागले.

इतक्यांत बाहेर तिनें रखमेचा हांसण्याचा आवाज ऐकला. ती एकदम धांवत बाहेर आली, तर मागच्या बाजूला, मध्यें बाहुली ठेऊन, रखमी न् राम्या हंसत हंसत भाकर खात बसलीं होतीं!

"आये, आलीस? तुला ठेवली हाये भाकर न् चटणी!" रखमी हंसत हंसत आईजवळ धांवली न् म्हणाली. गंगीनें राम्याच्या अंगाला हात लावून पाहिलें तर त्याचें आंग गार होतें. तिनें त्याला आपल्या पोटाशीं घट्ट आंवळून धरलें. नंतर वर करून त्याच्याकडे टक लावून पहात पहात त्याचे मटमट मुके घेतले. राम्यानेंही आईला घट्ट मिठी मारली. रखमी मागून येऊन आईच्या पाठीवर डुलूं लागली. तिलाही गंगेनें जवळ ओढलें. त्यांना आनंद झाला.

पण त्या निष्पाप व निर्मल मनाच्या बालकांना, आपल्यासाठीं आपल्या आईच्या शरीराची व मनाची पांच मिनिटांपूर्वी, काय धडपड होत होती याची जाणीव काय होणार?

गंगीला आतां जोम आला. तिनें घरांत असलेल्या थोड्याबहुत पिठाच्या दोन भाकऱ्या भाजल्या. नवी चटणी केली. आणलेलें दूध तापवून त्यांनीं आपलें जेवण केलें.

राम्याला औषध कशाला पाहिजे होतें? आईचें प्रेम हेंच त्याचें औषध!

गंगीला तरी या मुलांमुळेंच निराशेंत आशा उत्पन्न होई. त्यांच्यासाठीं तिनें वाटेल तें केलें असतें; करत होती!

तिच्या, तीं मुलें म्हणजे चालत्या बोलत्या आशाच होत्या!!

मुंबई, सप्टेंबर १९२९

(प्रसिद्धि–'प्रगति')

# ३—मासळीविकी.

**एक शब्दचित्र**

सूर्य 'असा' वर येईपर्यंत भागूचें अर्धें अधिक काम संपत आलें होतें. ती 'दीस' उगवायच्या किती तरी आधीं उठून समुद्रावर आल्यामुळें आपल्या मुलीच्या—मरीच्या—साहाय्यानें तिनें आतांपर्यंत १०।१२ जाळीं 'ओढलीं' असल्यास नवल नव्हे.

"मरेऽ, पोरे, आटप ! ऐशी कैशीग तूंऽऽ !! घाल तो म्हावरा टोपलींत !" ती जाळ्यांतील मासे दोन खांद्यावर पाठीमागें आडकविलेल्या मडक्यांत टाकीत टाकीत सर्वसाधारण कोळणीच्या आवाजानें हेल काढीत म्हणाली.

समुद्राच्या लाटा येत जात होत्या. आधींच गुढघ्यापर्यंत असलेलें लुगडेंसुद्धां मधून मधून येणाऱ्या मोठ्या लाटांनीं ओलें चिंब झालें होतें. जाळें ओढतांना चोळीचे हात व लुगड्याचा खांद्यावरील भाग भिजून थबथबत होता. वाऱ्यामुळें मधून मधून त्या मायलेकींना कुडकुडल्यासारखें वाटे.

त्यांनीं आपलें काम तसेंच पुढें चालविलें. आणखी ५।६ जाळीं टाकल्यावर त्यांच्या दोन्ही टोपल्या भरल्या. आज 'उदान' असल्यामुळें समुद्राला म्हावरा बरा होता. जाळें पाण्यांतून काढून दोघीही बाहेर आल्या.

"पोरेऽ, पाय उचल !" भागू मासळीची टोपली मरेच्या डोकीवर ठेऊन तिला म्हणाली. आपल्या डोक्यावर तिनें दुसरी टोपली ठेवली. टोपलीखालच्या लांकडी पाटावर जाळें टाकून तीही धांवण्यावजा चालूं लागली.

वाटेंतच तिचें खोपट होतें. त्यांत तिनें जाळें टाकलें. "बाब्या, भाकर भुजली हाय. न बोंबील बी हायत भुजलेला !" तिला जास्त बोलायला वेळ नव्हता. एक हात टोपलीवर ठेऊन ती धांवूं लागली.

भागूच्या पायाच्या पोटऱ्या नेहमींच्या धांवण्यानें पिळदार दिसत होत्या. तिची एकंदर शरीरयष्टीच काटक होती. तिचा चेहरा रांकट दिसत होता. मोठाला कुंकवाचा टिळा व कानांतील वाटोळ्या व जाड मुद्या तिच्या एकंदर रांकट नजरेंत भयानकपणा आणत होते. डोक्यावरील टोपलीचें वजन ती मधून मधून दोन हातांवर तोलून धरून डोक्याला विसांवा देत असे. मधें ती हळूहळू चालूं



लागे. परंतु बहुतेक दौड करीतच जात होती. कावळ्यानें पाटीवर झडप घालूं नये म्हणून ती मधून मधून आपला हात टोपलीच्या मध्यभागीं 'हाः' 'शूऽऽः' 'मेल्या' असे कांहीं कांहीं शब्द उच्चारीत फिरवीत होती. तरी एखादा कावळा एकदम झडप टाकून एखादा मासा नेत असेच. धांवण्यामुळें तिला श्रम होत नसत असें नव्हे. मधून मधून ती कपाळावरील घाम डाव्या हाताच्या पहिल्या बोटानें उडवून टाकीत असे. धांवून दमली कीं हळूहळू चालूं लागे पण लागलीच तिला उशीर झाल्याची आठवण होई व तात्काल ती धांवूं लागे.

स्त्री जातीचा स्वाभाविक विनयशीलपणा तिच्या कर्तव्यवैशिष्ट्यामुळें लोपला होता.

* * *

मासळीबाजारांत ती आपल्या नेहमीच्या जागेच्या जवळपास जाऊन बसली. झांकण ठेवलेल्या फळीवर तिनें वांटे काढले. गिऱ्हाइकाची तिला इतकी फिकिर नव्हती. पटल्यास सौदा होई नाहींतर ती इतकी काळजी करीत नसे. प्रथम संभाळून, नंतर न पटल्यास अपमानगर्भ भाषेनें, शेवटीं सौदा न पटल्यामुळें उघड उघड "झ्यावाला आला म्येला झ्यावाला" असें मोठ्यानें म्हणत हात ओवाळण्यासही ती कमी करीत नसे. तिची एकंदर शरीराची काठी व बेफिकिर वागण्याची पद्धति पाहून साधारणतः लोक तिला किंमत विचारायला घाबरतच असत. आणि एकदां तिला विचारण्याचें धाडस केलें कीं, तिच्या जातेवेळच्या शिव्या चुकवण्यासाठीं तिच्या म्हणण्याप्रमाणें सौदा पटवून तो मनुष्य निघून जात असे. यामुळें तिची विक्री उशीरां पण चांगली होई.

सगळी मासळी संपली कीं, ती रोजचा कमजास्त बाजार करून पोरीला घेऊन घरीं परते. घरीं गेल्यावर आपल्यासाठीं व पोरीसाठीं ती नवी भाकर व कोरड्यास करी. जातेवेळीं नवऱ्यासाठीं व मुलासाठीं ती सर्व जेवण तयार करून जात असेच.

तिला बापडीला लिहितां वाचतां तें काय येणार ? पण लोकांचीं मुलें शिकलेलीं पाहून आपला बाब्याही शिकावा असें तिला वाटे. व त्याप्रमाणें तिनें मास्तरांच्या पायां पडून बाबूला शाळेंत घातला होता. मधून मधून त्याच्या अंगांत पिशाच्च संचार करी. तेव्हां ती त्याला नाना तऱ्हेचे धाक दाखवून शाळेंत पाठवी.

ती बाकी सर्वांविषयीं बेफिकीर असे, पण नवऱ्याशीं आदबीनें वागून त्याला मान देई. दुसऱ्यांना ती कालिकामूर्ती दिसे पण नवऱ्यापुढें ती गोगलगाय बने.

पैशाच्या बाबतींत मात्र ती त्याला विचारीत नसे. बहुतेक पैसाआडका भागेकडेच असे.

जेवणानंतर पुन्हा १५।२० जाळीं टाकून ती संध्याकाळीं मासळी घेऊन बाजारांत जाई. ती सर्व विकून ती सांजेच्या सुमारास परत येत असे.

सुखाची संध्याकाळ देण्यासाठींच सर्व दिवसाची धडपड असे. सबंध दिवसांत सर्वजण आपापल्या कामावर गेलेले. ते कसचे एकमेकांना भेटतात ? रात्रीं नवरा-बायको, मुलें एके ठिकाणीं जमत. त्यावेळींच त्यांचा वेळ विश्रांति घेत मजेंत जावयाचा.

सकाळीं पुन्हां भागी मरीला घेऊन कामाला लागे. तें पुन्हां संध्याकाळपर्यंत!

हें सर्व यंत्राप्रमाणें धडपड करण्याचें काम भागूच्या हातून कां होई बरें ?—

बाबू, आपली घरची मंडळी, या सर्वांविषयींचीं सुखस्वप्नें तिच्या डोळ्यां-समोर तिचा व्यवसाय चालू असतांना नाचत नसतील काय ??

* * * *

मुंबई, सप्टेंबर १९२९
( प्रसिद्धि–'प्रगति' )

# ४.–व्हिक्टोरिआवाला

**एक शब्दचित्र**

"चल बेटा !" हातांतील लगाम घोड्याच्या पाठीवर हलकेच आपटत याकूब म्हणाला. तेवढा इशारा त्या घोड्याला नेहमींच्या संवयीमुळें पुरेसा होता. तो हळुहळू दुडक्या चालीनें निघाला. गरगर फिरणाऱ्या रबरी चाकाचा अस्पष्ट आवाज घोड्याच्या ठेक्यांत पडणाऱ्या पावलांच्या आवाजांत ऐकूं येत नव्हता. मधून मधून घोड्याचें फुरफुरणें पुढील फळीवर आपटल्या जाणाऱ्या चाबकाच्या दांड्याचा 'खाद्रखाद्र' आवाज या शिवाय इतक्या पहांटेस त्या अगदीं बाजूच्या गल्लींत दुसरा कसलाच आवाज ऐकूं येत नव्हता. "अभी बहुत नजीक है बेटा स्टेशन !" जणूं काय त्या घोड्याला याची सर्व भाषा समजतच होती. तें वाक्य समजल्या-प्रमाणेंच घोडाही त्याच वेळीं फुरफुरला. बराच वेळ चालल्यावर एकदां स्टेशन आलें. त्यानें इकडे तिकडे पाहून गाडी एके ठिकाणीं उभी केली. त्यावेळीं तेथें कोणी पोलीस नव्हता त्यामुळें त्याला कोठें त्रास झाला नाहीं. तोच दिवस असता तर "एऽऽ व्हिक्टोरिआ ! इधर नहि खडी करना ! चलो हकालो !" अशा तऱ्हेच्या 'पुलीस'च्या शब्दांना दंडाच्या भीतीनें मान वांकवणें भाग पडलें असतें.

सकाळीं ४॥। ला एक लांबची गाडी यावयाची होती. त्यावेळीं भाडें मिळेल ही त्याची आशा ! अझून गाडीला पाऊणएक तास अवकाश होता. लगाम सैल सोडून चाबूक हातांत घेऊन तो आपल्या जागेवर बसून राहिला. बसल्या बसल्याच त्याला डुलकी आली. त्याची मान पुढच्या बाजूस व आजूबाजूला झोंके घेऊं लागली. आपला मालक झोंपला आहे, असें पाहूनच जणुं काय गाडीचा घोडाही उभ्याउभ्या डोळे बंद करून डुलक्या घेऊं लागला.

"ठाण् ठाण्, ठाण् ठाण् !" दुसऱ्याच कोणा गाडीच्या हालचालीचे सूचक असे ध्वनी त्याच्या झोंपीं गेलेल्या कानांत शिरले. तो खडबडून जागा झाला. घोडाही फुरफुरला ! अझून गाडीला १०।१५ मिनिटें होतीं. तो खालीं उतरून गाडीची उत्कंठेनें वाट पहात उभा राहिला.

‘ धोऽऽ’ आवाज करीत गाडी स्टेशनांत शिरली. उतारू भरभर उतरूं लागले. हमालांची ये–जा सुरू झाली. एक एक हमाल आपल्या ‘ शेट’च्या बरोबर बाहेर पडत होता. ‘ व्हिक्टोरिआ, साब ! ’ याकूब विचारूं लागला. त्याच्या पोटांत कालवाकालव होत होती. भाडें मिळेल का नाहीं ? मिळालेंच तर लांबचें का जवळचें ? सौदा ठरेल का पण ? एका मागून एक सारखे प्रश्न त्याच्या मनांत उद्भवत होते. तो चाबकाचा शेंडा वर करीत प्रत्येक उतारूकडे पहात ‘ शेऽट ! ’ असें आदबीनें म्हणत होता. वेळीं त्याचा ‘ शेट ’ कोण होईल हें सांगतां येत नव्हतें. त्यामुळें प्रत्येकाला तो खूष ठेवीत होता. साहेब लोक बहुतेक मोटारींतून जाणारे ! त्यांची आशा करण्याचें त्याला कारण नव्हतें ! गांवठी साहेबांवरच त्याची सर्व मिस्त ! त्यानें बऱ्याच लोकांना विचारलें; पण त्याला कोणी गिऱ्हाईक मिळालें नाहीं.

दुसरी लांबची गाडी आतां सहाला होती. अझून पुष्कळ अवकाश होता. त्याला अतिशय झोंप आली. त्यानें आंतल्या गादीवर हात पाय पसरून ताणून दिलें. तो किती वेळ झोंपला होता, हें त्याला समजलें नाहीं; पण जागा झाला त्या वेळीं त्याला कोणी तरी हलवीत होता. “ ए व्हिक्टोरिआऽ ! ” व त्याबरोबरच कानठळी बसविणारा मालगाडीच्या एंजीनची शीळ हे दोन्ही आवाज त्याच्या कानीं पडले. तो झटकन् उठून बसला.

“ कुलाबा आता है क्या ! ” त्याच्या समोरील बूटपॅंट घातलेला मनुष्य म्हणाला.

“ हां हां साब ! ” त्याला भाडें मिळाल्याबद्दल आनंद झाला.

“ क्या लेएंगा ! एक बात बोलो ! ”

“ देढ रुपया साब ! ” तो लोकांची पद्धत ठाऊक असल्यामुळें जरा जास्त म्हणाला.

त्याच्या अपेक्षेप्रमाणें घासाघीस होऊन १४ आण्याला भाडें ठरलें. चला ! भवानी तर झाली ! हमालानें सामान भरलें. घोडा चालूं लागला. याकूबनें विडी पेटविली. तिच्या धुराचे फवारे सोडीत तो घोड्याला मधून मधून चुचकारत होता. त्याचे सारखे विचार चालू होते. तरी यंत्राप्रमाणें तो वळणावर, नाक्यावर गाडी संभाळून नेत होता. मागून ट्राम आली कीं तिचा खणखणाट ऐकून रुळावरून बाजूस होणें, मोटारीला रस्ता करून देणें, वगैरे सर्व क्रिया त्याच्या हातून आपोआप होत होत्याच. त्याच्या नेहमींच्या अनुभवाप्रमाणेंच त्याला थोडेंसें



जास्त अंतर व ४१५ जास्त गल्ल्या धुंडाळाव्या लागल्या. चौदा आणे चुकते झाले.

त्यानें थोडा वेळ परत येतेवेळचें भाडें मिळण्याची वाट पाहिली, पण जमलें नाहीं. त्या अवधींत त्यानें घोड्याचें गवतानें व स्वतःचें चहानें पोट भरलें. त्याला चहामुळें जरा हुरूप आला. घोड्याला थोपटून, त्याचें अंग थोडावेळ मळून त्यानें पुन्हां लगाम हातीं घेतली. घोडा चालूं लागला.

सूर्य आतां वर आला होता. जिकडे तिकडे माणसांची गडबड घाई सुरू झाली होती. ट्रामचा खणखणाट व तारेवरून घसरणाऱ्या दांड्याचा ‘सऽऽऽ—’ असा चमत्कारिक आवाज, मोटारींचे ‘ पॉंक पॉंक ’ व विजेच्या शिंगाचा आवाज वगैरेंनीं शहर पुन्हां जागृत झाल्याचीं सर्व चिन्हें दिसत होतीं. याकूब घोड्याच्या लगामीला एक लहानसा हिसका देऊन आपल्या मनांतील हृद्गत घोड्याला तारायंत्राप्रमाणें कळवीत होता. तो पुन्हां बोरीबंदरजवळ आला.

घोड्याला व त्याला थोडासा विसांवा मिळाला. पण तो विसाव्यासाठीं तेथें थांबला नव्हता. त्याला एखादें नवें भाडें मिळाल्यास पाहिजे होतें. नऊ वाजून गेले होते. साडेनवाच्या गाडीला एखादा ‘ पासेंजर ’ मिळाल्यास पहावा म्हणून तो तेथें थोडा वेळ थांबला.

गाडी आली. माणसें बाहेर पडूं लागलीं. त्यानें पुष्कळांना विचारून पाहिलें. पण त्याला कोणी ‘ शेट ’ मिळाला नाहीं. आतां तो कोणाची एवढी पर्वा करीत नव्हता. तो थोडासा रागावलाही होता. आतांपर्यंत प्रत्येक ‘ शेटला ’ कदाचित् तो आपल्या व्हिक्टोरिआमध्यें येईल या आशेनें आदबीनें विचारणाऱ्या याकूबनें ‘ कां पांडुतात्या यायचं का ? ” म्हणून हंसत हंसत एका पोरगेल्या माणसाची टर उडविण्याच्या हेतूनें विचारलें. त्याला ‘कसला येतो तो ?’ असेंच वाटत होतें. पण लगेच त्याला वाटलें तो खरोखर आपल्या व्हिक्टोरिआंत आला तर ? —म्हणून तो पुढें कांहीं बोलला नाहीं. तो पुढें निघून गेला. त्याच्याविषयीं निराश झाल्यावर याकूब थोडेंसें स्वतःशीं व थोडें त्याला ऐकूं जाईल या बेतानें ‘ पैशे न्हाईत का खिसामंदी ! ’ म्हणून म्हणाला व हंसला. ‘ कशी केली टर ? ’ असें वाटून त्याला आनंद झाला. पण तो तेवढा वेळच. त्यापासून त्याला कोणता फायदा ? पुन्हां तो स्वतःविषयीं विचार करूं लागला.

तेथें आणखी उभें राहून त्याला भाडें मिळण्यासारखें नव्हतें. लांब दिसणाऱ्या ट्रॅम स्टॅंडजवळ बरीच गर्दी दिसली. त्यानें आपला मोर्चा तिकडे वळवला.

चाबूक वर करून ' शेटसाब, गाडी ! ' म्हणून तो ओरडून व खुणावून सांगत होता. तो जवळ येऊन उभा राहिला. ट्रॅम मागून ट्रॅम जात होती. प्रत्येक वेळीं लोक उत्सुकतेनें जात. प्रथम दरवाजाच बंद दिसे. पण कांहीं लोक तो वर करून आंत शिरण्याचा प्रयत्न करीत. इतक्यांत कंडक्टर मागें येऊन ' जग्या न्हि !.... पिछे गाडीसे आव ! !' म्हणून ओरडूं लागे. बिचारे खालीं उतरत. निराश होऊन दुसऱ्या ट्रॅमची वाट पहात. हीच याकूबला सुसंधि असे. ' शेऽऽट ' ! तो त्याच्या मताप्रमाणें, एखादा येण्यासारखा पगडीवाला, फेटेवाला शोधून त्याला म्हणे. त्यालाही व्हिक्टोरिआंतून जावेंसें वाटे. पण एक आणा व व्हिक्टोरिआचें भाडें यांतील अंतर होतां होई तों कमी करण्याच्या त्या माणसाच्या प्रयत्नामुळें त्यांचा सौदा कधींच ठरत नसे. असें दोन तीन वेळां होऊन एकदांच्या भरपूर जागेच्या ट्रॅम गाड्या भराभर येऊं लागल्या. एक दोन गाड्यांतून गर्दी साफ निघून गेली. याकूब बापडा गाडीघोड्यासकट ट्रॅमगाडीला मनांत शिव्या देत तेथेंच राहिला.

अकरा वाजून गेले. सकाळीं झालेल्या भवानीवर त्याला अजून कांहींच भाडें मिळालें नव्हतें. त्याला कांहीं सुचेना. त्यानें लगाम हातीं घेतली. घोडा टप्‌टप् पावलें टाकीत चालूं लागला. वाटेंत त्याला एक मुसलमानी हॅाटेल लागलें. 'एऽऽ चाय लाव एक !' त्यानें लगाम खेंचून हॅाटेलच्या पोऱ्याला सांगितलें. चहाचा कप तोंडाला लावीत तो इकडे तिकडे पहात होता. बाजूला एक इसम हातांत बॅग घेऊन उभा असलेला दिसला. त्यानें भरभर चहा घशाखालीं घालून पोऱ्याच्या हातांत १ आणा टाकला. तो आशेनें त्या गृहस्थाकडे धांवला. 'गाडी मंगता है शेट ! ' 'अरे नहिं !' 'शेट' आपल्याच विचारांत असल्यामुळें त्याच्यावर ओरडून म्हणाला. त्याची पूर्ण निराशा झाली.

आतां त्याच्याकडे सकाळीं मिळालेल्या चौदा आण्यांपैकीं अकरा आणेच शिल्लक राहिले होते. दोन आणे चहाला, एक दिडकी विडीला व तीन दिडक्यांच्या तीन पानपट्ट्या. त्या अकरा आण्यांत त्याचें, घोड्याचें, बायकोचें व दोन पोरांचें कसें होणार ? अजून त्याला एखादें नवें भाडें मिळालें तर हवें होतें.

त्याला पुष्कळ हवें होतें ! पण तें सर्व मिळेलच कशावरून ?

साडेबारा वाजून गेले. त्याला भूक लागूं लागली. त्यानें आतां आपल्या घराकडे गाडी फिरविली. जातां जातां चार आण्याचा घोड्याला दाणा घेण्यास तो विसरला नाहीं. घरीं हमिदा नवऱ्याची वाट पहात होती.



त्यानें आपली मळलेली तांबडी टोपी काढली. खाकी कोट घामानें बराच भिजला होता. मधून मधून फाटलेल्या जागेंतून त्याचें घामानें ओलें झालेलें काळें अंग दिसत होतें. विजार काढून तो लुगड्यासारखें आडव्या उभ्या पट्ट्याचें रंगीत धोतर नेसला. नळाखालीं आंघोळ करून तो घरांत आला. आज शुक्रवार होता. तो मशिदींत जाऊन निमाज पढून आला. मुलें बाहेर खेळत होतीं. घोड्याला पाणी पाजून त्याला दाणा व गवत चारून तो जेवायला बसला. बरोबर मुलांनाही त्यानें घेतलें होतें. समोर आलेलें साधेंसुधें जेवण त्यानें खलास केलें. नंतर थोडा वेळ त्यानें विश्रांति घेतली.

* * *

अडीच तीनचा सुमार होतांच, राहिलेले सात आणे बायकोच्या हवालीं करून त्यानें कपडे चढवले. घोड्याला बाहेर काढून त्यानें खोगीर वगैरे चढवलें. गाडी जुंपून थोडेंसें गवत खालच्या गोणपाटाच्या पिशवींत कोंबलें. लगाम हातीं घेऊन तो त्याच्या घोड्यासकट पुन्हां बाहेर पडला. घोडा त्याचा एकपरीनें सदा जवळ असणारा मित्रच होता.

आतां संध्याकाळ झाली होती. भाडें मिळावयाचीं ठिकाणें कालमानाप्रमाणें बदलत असल्यामुळें तो एका मोठ्या सिनेमागृहासमोर जाऊन उभा राहिला. त्यानें बराच वेळ वाट पाहिली. सात वाजले होते. आतां थोड्याच वेळांत सिनेमा सुटणार म्हणून तो उत्कंठित अंतःकरणानें वाट पहात होता.

झालें ! सुटला एकदांचा सिनेमा. एक शेट पुढें आले. हो ना करतांना त्याला आठ आण्याचें भाडें मिळालें. त्यानें गाडी तिकडे हांकली.

आकाशांत ढग जमूं लागले होते. मधून मधून चमकणारी वीज, विजेच्या दिव्यांना लाजवूं लागली होती. थोड्याच वेळांत पाऊस पडणार अशीं चिन्हें दिसत होतीं. याकूबला आनंद वाटला. त्याच्याही डोक्यांत एक आनंदी विचार विजेसारखा चमकून गेला. आकाशांतील ढगाप्रमाणेंच त्याच्या अंतःकरणांत गडगडाट होत होता.

थोड्याच वेळांत जोरानें पाऊस पडूं लागला. बऱ्याच छत्रीविहीन चालणाऱ्या लोकांची त्रेधा उडाली. याकूबला वाटलें पर्वणी आली. ह्या सोन्यासारख्या संधीचीच तो मघांपासून वाट पाहात होता. त्यांतच ट्रॅमच्या तारा नादुरुस्त झाल्या. त्याला मोठा आनंद झाला. आतां त्याला भाडें मिळणार होतेंच; पण सौद पटा-

वून लोकांचें चालणार नव्हतें. तो सांगेल ती किंमत द्यावी लागणार होती. आतां त्याच्यापेक्षां लोकांनाच त्याची जास्त गरज होती.

छत्री संभाळीत एकजण पगडीवाले पुढें आले. 'परेलकु आता है क्या?'

"हां साब! दो रुपया पडेगा!"

"नही देड रुपया देएंगा!"

"नहि नही! हम् एकच बात बोलता है!"

"अच्छा चलो!"

आतां त्याला भाडें कसें झटकन मिळालें? त्यानें घोड्याला चाबूक हाणला. विजा कडाडत होत्या. पाऊस पडून त्याला ओला चिंब करीत होता. त्याला त्याची फारशी काळजी वाटली नाहीं. त्यानें भिजत भिजतच आंतील शेटियाला त्याच्या घरीं नेऊन पोहोंचविलें. त्याच्या हातीं दोन रुपये पडले.

आतां तो श्रीमंत झाला होता. त्याच्याकडे आतां अडीच रुपये होते. त्याच्या डोक्यांत नाना विचार खेळूं लागले. झिम् झिम् पडणाऱ्या पावसाच्या सरींतून त्याला लांबचा लालहिरवा दिवा अंधुक अंधुक दिसूं लागला. नवाला पांच दहा मिनिटें होतीं. त्यानें घोड्याला चाबूक हाणला. दौड करत तो तीन चार मिनिटांत तेथें गेला. दुकान थोड्याच वेळांत बंद व्हावयाचें होतें. त्यानें आंत प्रवेश केला. पिंपाजवळ बसलेल्या पारशानें त्याला ग्लास भरून दिला.

पहिल्या दोन चार ग्लासांनाच तो शुद्धीवर होता. नंतर तो किती प्याला व किती पैसे खर्च झाले तें त्याला मुळींच समजलें नाहीं.

दुकान बंद होतांच त्याला बाहेर यावें लागलें. पडत पडत तो आपल्या जागेवर चढला. लगाम हातांत घेतांच घोडा चालूं लागला. त्याच्या सभोंवार जग गरगर फिरत होतें. पण तो गाडी घोड्याला घेऊन नीट सरळ चालला होता. घोडा, आपण होऊनच, याकूबला घेऊन, घरचा रस्ता काटत होता!

सध्यां याकूब त्याच्या जिवाचा राजा होता! जिकडे तिकडे आनंद होता!! आशानिराशा यांचें त्याच्या वरील प्राबल्य त्या वेळेपुरतें नाहींसें झालें होतें! तो पूर्ण बेफिकीर होता. जेव्हां येईल तेव्हां येईल शुद्धीवर!

पण शुद्धीवर आल्यावर मग...?

* * * *

मुंबई, सप्टेंबर १९२९

(प्रसिद्धि 'प्रगति')

---

# ५—महंमद.

**एक शब्दचित्र**

"पेंप्पें, पेंप्पेंऽऽऽप्पेंऽ!" तो रस्त्यानें जातांना एक पेपेंरें तोंडांत धरून, त्यावर आपल्या उजव्या हाताचीं बोटें नाचवून, एका ठरावीक गाण्याचे सूर काढीत होता. त्याचा पोषाख साधा व मळकटच होता. तांबड्या रंगाचा पायघोळ फडका, एक फाटका सदरा, त्यावर एक काळें जाकीट, खांदा व जाकीटाचा हात यांत अडकवलेला भडक रंगाचा पण फाटकासा रुमाल, डोक्याला एक फेव्यावजा गुंडाळलेलें धोतर!

तो फारसा म्हातारा नव्हता. त्याच्या मोठाल्या मिशा अजून कांहीं पिकलेल्या नव्हत्या. तोंड रुंद, नाक मोठें, भिंवया वाढलेल्या, मिशांचे कल्ले वर चढलेले, यामुळें त्याच्या चेहऱ्यांत उग्रता आलेली होती. रडणाऱ्या मुलांना तो 'बुवाजी' वाटून भीति वाटे. पण हंसणाऱ्या व खेळकर मुलांना त्याला पाहून नाचावयास होई.

त्याच्या खांद्यावर एक काठी असे. तिला गुंडाळलेल्या गवतांत खोंवलेल्या, चक्री व भिंगऱ्या, तो चालला असतांना, गरगर फिरत असत. वरच्या बाजूस अडकवलेल्या बांबूच्या पेपेंऱ्यांची जाहिरात तो वाजवीत असलेली पेपेरी करीतच असे. अगदीं वरच्या टोंकाला फुगवून अडकविलेले फुगे, वर खालीं हेलकावे घेऊन, मुलांना जणूं काय बोलावीत असत. डाव्या हातांतील स्प्रिंगमुळें वर खालीं नाचणाऱ्या चिमण्या पाहून, मुलांचा जीव खालीं वर होई.

रस्त्यानें जातांना कोणी लहान मूल दिसलें कीं, तो लागलीच उड्या मारणारी चिमणी, पेपेरें किंवा एखादी रंगीबेरंगी भिंगरी, त्याच्या पुढें करून व "हां हां! बाबासाब, बहोत अच्छावाला है! ए देखो, ए देखो! कैसी खेल खेलती है तुम्हारे वैसी!!" असें म्हणून त्याचे मनांत चलबिचल उत्पन्न करी; आणि बरोबर असलेल्या मोठ्या माणसाकडे सहेतुक मुद्रेनें पहात हास्य करी. त्याच्या त्या मुद्रेंत आशा परिपूर्ण भरलेली दिसे!

"आई ए आई, मला फुगा पाहिजे ग तो!"

"बाळ, कशाला उगीच; त्याला पैसे पडतात!"

"नाय् बास ! मला पाहिजे !! अं अं...."

"न् मी ती चिमणी घेणार—"

"मला भिंगरी दे मग आई घेऊन..."

"मेल्यांनीं नुसता उच्छाद मांडलाय् अगदीं...!"

"अं अं, मी नाय् जा...." "एऽऽ" "देना ग आई !"

"बरं जा घ्या !"

"ए ए फुगेवाला थांब...."

एखाद्या चाळींतून वरील संवाद ऐकूं येई व नंतर जिन्याचा धडधडाट होऊन महंमदला मुलांचा वेढा पडे. 'एऽ ही भिंगरी दे—" "तो फुगा केवढ्याचा रे ?" "ए ताई मी चिमणी घेऊं का पेपेंरी घेऊं ग ??"—एकच गलबला होई.

दिडकी दिडकी करून त्याच्याकडे हा खुर्दा जमे !!

ती लाट एकदां ओसरली कीं पुन्हां तो पूर्वीप्रमाणें सर्व उचलून 'पेंप्पें पँ !' करीत पुढें चालूं लागे. इतक्यांत एखादा मुलगा "ए फुगेवाला, हा फुटला ना फुगा !" म्हणून ओरडत येई. महंमूद हंसे. त्यानें त्याला दिडकीचा नवा फुगा काढून दिला कीं, त्याचें समाधान होई. पण तो फुगाही थोड्याच वेळांत फुटेल ही त्याच्या बालमनाला कल्पनाही नसे !

स्वतःच्या पोटाच्या आशेनें तो गल्लोगल्लीं फिरत असे ! त्याची आशा सफल होणें हें लहान मुलांना आशा उत्पन्न करण्यांतच असे. प्रत्येक मुलाला तो फुगा, भिंगरी किंवा पेपेंरी देई. त्यानें इतकीं वर्षें या जगांत काढलीं होतीं. त्याला या आशानिराशामय जगाचा कटु अनुभव आला होता. त्याला बऱ्याच अडीअडचणींतून जावें लागलें होतें.

तो सर्व इतिहास आठवून त्याचा जीव हातांतील वर खालीं होणाऱ्या चिमणीच्या हालचालीप्रमाणेंच खालींवर हेलकावे घेत असे. त्याला हा आपला कटु अनुभव कोणाला तरी सांगावा असें वाटे. संसारांत रममाण झालेल्या जून लोकांना सांगून त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं; झाला तर तो निष्पाप बालकांच्या कोंवळ्या मनांवरच होईल असें त्याला वाटे. व म्हणूनच जणुं काय त्यानें हा धंदा पत्करला होता. तो तोंडानें पेपेंरें वाजवून त्यांचें चित्त आकर्षी. मुलांना फुगा देते वेळीं मनांत जगाच्या बहिरंगावर भुलूं नका, त्याचा सर्व डौल पोकळ



आहे, हा भ्रमाचा भोपळा या फुग्याप्रमाणेंच केव्हां फुटेल त्याचा नेम नाहीं. असेंच जणुं काय तो म्हणत असे. व म्हणूनच जणुं काय तो फुगा फुटल्यावर घाबरून परत आलेल्या मुलांकडे पाहून हंसे ! तो देत असलेली भिंगरी मुलांना जगाच्या दुसऱ्या अंगाची ओळख करून देण्याचा प्रयत्न करी !!

पण त्या बिचाऱ्या कोमल अंतःकरणाच्या कोंवळ्या पोरांना त्याची काय जाणीव असणार ?

आणि जख्खड म्हाताऱ्यांनासुद्धां आशा सोडीत नाहीं तर ज्यांनीं जगांत नुकताच पाय टाकला आहे, अशा बालकांना कां दोष द्यावयाचा बरें ?

मुंबई, सप्टेंबर १९२९

(प्रसिद्धि—'प्रगति')

# ६—चिनी कापडविक्या.

**एक शब्दचित्र**

सडपातळ आणि ठेंगू अशी मूर्ती ! पण किती गोष्टींचें मूर्तिमंत दिग्दर्शन करते ?

सत्रा ठिकाणीं दुमडल्यामुळें, हजारों सुरकुत्या पडलेली साहेबी टोपी, वर खालीं बटण लावल्यामुळें, पारशी फॅशनच्या कॉलरला, ओपन कॉलरचें स्वरूप आणून, त्यांतून मळकट पिवळ्या रंगाचा गबाळा सदरा दाखविणारा, कोपरांच्या जवळ जवळ आलेल्या हाताचा तोकडा कोट, बरीचशी वर चढलेली सैल विजार, तीन चार ठिकाणीं भोंकें पडलेले पायमोजे व त्यांवर चढवलेले चालून बरेचसे झिजलेले, बिन पॉलिशचे ओबडधोबड बूट ! एवढाच त्या बिचाऱ्याचा पोशाक ! ! तीन चार गांठी मारलेलें पाठीवरील गांठोडें व हातांतील गज हींच त्याचीं भूषणें ! !

डोक्याला अगदीं घट्ट धरून असलेले खुरटेसे केस, अरुंदसें कपाळ, साधारण वक्र भिंवया, बसकें नाक, चपटे गाल, या सर्वांनीं तयार झालेला सदासर्वदा गंभीर दिसणारा गुळगुळीत चेहरा ! आपल्याच नादांत चालत असतांना सैल विजारींतून पडणारीं वांकडीं पावलें ! ओझ्यामुळें जरा पुढें वांकलेली किरकोळ शरीरयष्टी ! या सर्वांकडे पाहून त्याच्याबद्दल आपलें फारसें चांगलें मत होत नाहीं. उलट त्याची कींव करावीशी वाटते.

पण लोकांच्या बऱ्यावाईट मतांची तो कुठें पर्वा करीत आहे ? लोकांना काय ? ते चांगल्या गोष्टींनाही हंसतात आणि वाईट गोष्टींनाही हंसतात ! शहाण्यानें विचार करून स्वतःला चांगलें दिसेल किंवा वाटेल तेंच करावें. लोकांशीं आपणास काय करावयाचें ?

'चिनीऽऽ' "तरेऽऽवार लेसऽकापड !" वगैरे शब्द अस्पष्ट आवाजांत उच्चारीत, दिवसाच्या वाटेल त्यावेळीं, शहराच्या वाटेल त्या कोपऱ्यांत, आपल्या शरीराचें, व पाठीवरील कापडाचें वजन संभाळीत तो जात असतांना, आढळून येतो !



'एऽ चिनी, काय आहे ?' एखाद्या वात्रट पोरानें त्याची चेष्टा करण्याच्या उद्देशानें विचारलें आणि हें त्याला जरी पूर्ण माहीत असलें, तरी तो लागलीच तेथल्या तेथें थबकून शांत चित्तानें 'काऽऽ प्रइ ह्यायू ! लेस ह्यायू !' वगैरे त्याला असलेल्या मराठीच्या मोडक्या ज्ञानाचा उपयोग करून त्याला समजावण्याचा प्रयत्न करतो. 'कांहीं नको जा ! ' आणखी मोठ्यानें ओरडा ना ! त्याला त्याचा कधीं राग येणार नाहीं ! तुम्ही 'थांब' म्हटलेंत म्हणून तो थांबणार आहे थोडाच ? याला पुरेसें काम आहे !

थंडी पडली—असतील तेवढ्या कपड्यांवर त्याचें भागतें ! सूर्य वर तळपत असला—घाम पुसून त्याचें काम पुढें चालू होतें ! ! त्याला विजेचे किंवा साधे पंखे लागत नाहींत; किंवा थंडीसाठीं पांघरायला कपडे किंवा उबेला शेगडीही लागत नाहीं !

"ए चिनी इधर आव !" पांचव्या मजल्यावरून जरी त्याला कोणी हांक मारली तरी तो तेवढेंच ओझें घेऊन वर जाईल ! सौदा पटला ! फार चांगलें झालें. चार पैसे मिळाले ! श्रमाचें चीज झालें; आनंदी आनंद आहे. 'चार आना वार देता है ?' "हां साब !" तो लागलीच गांठोडें गुंडाळील, खांकोटीस मारील; पांचही मजले उतरून पुन्हां खालीं येईल. त्याची कधींच कुरकुर नसते ! सौदा नाहीं पटला—'कुच फिकिर नहीं'—दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं पाहूं. पांच मजले चढल्याचा कांहीं खेद नाहीं !

पाठीला ओझें बांधावें तेव्हांच पोटाचें ओझें कमी होईल !

दम लागला. पाय चालत नाहीं, फुटपाथची फरशी आहे. पाठीचें ओझें काढून आसन केलें न् थोडा वेळ घाम पुसत आराम घेतला बस्स झालें. त्याच वेळीं एखादा जोडीदार भेटला तर फारच चांगलें; आपल्या भाषेंत, आपल्या देशाच्या चार गप्पा मारल्या कीं, शरीराला व मनाला आनंदीआनंद झाला. श्रम घालवायला 'पिक् मी अप्'च घ्यावें लागतें असें नाहीं ! चार गप्पांनंतर पुन्हां गाठोडें खाकेंत मारायला तयार स्वारी; पुन्हां सुरु....'लेऽस तरेवाऽर'

सकाळपासून चालून चालून दमला ! जातांना संध्याकाळीं आण्याचें ट्राम तिकिट काढायला हरकत नाहीं. विडी ओढण्याच्या बाकावर बसून 'पाईप' फुकायलाही कमी करण्याचें कारण नाहीं ! श्रमानंतर विश्रांति नको का ?

कोठें चालला बरें हा ? आपल्या घरीं ? कुठंसं आहे याचं घर ?....आहे आपल्या ऐपतीप्रमाणं एखाद्या कोपऱ्यांत ! त्याच्याशीं काय करायचं आपल्याला ?

काय हा जबर उद्योग ? केवढी बरें चिकाटी ! धाडस व प्रयत्न वाखाणण्या जोगें ! !

कोठें चीन न् हिंदुस्थान : त्याचा दक्षिणभाग–पण तरी हा चिनी येथें कां बरें आला ?

तें निराळें सांगावयासच का पाहिजे ? ?....

*      *      *

मुंबई सप्टेंबर १९२९
( प्रसिद्धि–'प्रगति ' )

# ७–परदेश-गमन

**एक शब्दचित्र.**

**' आशा थोर नदी मनोरथ तिचें पानीय '** अशा तऱ्हेची कविता पाठ करण्याइतका विनायक लहान होता तेव्हांपासूनच अण्णांच्या मनांत एक आशा उत्पन्न झाली होती. पण ते सर्व मनोरथ पूर्ण होतीलच याबद्दल त्यांना मुळींच खात्री नव्हती. गरिबीमुळें त्यांना कसेंबसें मॅट्रिकपर्यंत गेल्यावर पुढें जाण्यास सामर्थ्य नव्हतें, म्हणून त्यांनीं एक लहानशी सरकारी नोकरी पत्करून आपला संसार थाटला होता. प्रथम प्रथम त्यांना साठ रुपये पगार पुरे. परंतु संसार वाढता पडला. पगारांत मात्र म्हणण्यासारखी वाढ नसे; त्यामुळें पुढें पुढें त्यांना जरा जड वाटूं लागलें. त्यांतही काटकसरीनें राहून त्यांनीं थोडीशी पुंजी शिल्लक टाकली होती; पण विनायकाच्या मोठ्या बहिणींच्या सोयरिकींत ती संपून त्यांना थोडेंसें कर्जही झालें. तथापि तेंही त्यांनीं धडपड करून थोड्याच दिवसांत फेडून टाकलें.

अशा तऱ्हेनें अब्रूनिशीं दिवस काढीत असतां त्यांची सर्व भिस्त शाळेंत जाऊं लागलेल्या विनायकावर असावी यांत नवल तें काय ? शाळेंतील त्याच्या हुशारीमुळें त्यांना हुरुप येत असे. एखाद्या मास्तरनें त्याच्याबद्दल कांहीं चांगलें सांगितल्यास त्यांना आनंदाच्या गुदगुल्या होत. अशावेळीं त्यांच्या मनांत बरींच भविष्यचित्रें नाचूं लागत. विनायक मॅट्रिक झाल्यावर त्यांनीं त्याला वाटेल तें करून कॉलेजांत घालावयाचा निश्चय केला. पण त्याला नादारी व शिष्यवृत्ति मिळाल्यामुळें, त्याचा, त्यांच्यावर, फारसा भार पडला नाहीं. बी.ए.मध्यें पहिला आला तेव्हां त्यांना अतिशय आनंद झाला. आतां त्यांना एक निराळीच आशा वाटूं लागली होती. पण पैशाचा प्रश्न पुढें निघतांच त्यांना तो विचारच सोडून द्यावा लागला. तथापि टाटानें व त्यांच्या जातीच्या फंडानें विनायकाच्या हुशारीमुळें त्याला कोणत्याही तऱ्हेची खटपट न करतां, कर्जाऊ पैसे दिल्याचें जाहीर केलें व विनायकानें या संधीचा फायदा घेण्याचें ठरवून त्याप्रमाणें अण्णांना पत्रानें कळविलें. एक महिन्यानें विनायक पुढील शिक्षणासाठीं विलायतेस जाणार होता.

अण्णांच्या आशेला अनपेक्षितपणें अर्धें अधिक मूर्तस्वरूप आलें ! त्यांचा आनंद गगनांत मावेना ! !

अण्णांचे, महिन्यांतील पहिले पंधरा दिवस, विनायकाच्या भवितव्याचीं भडक

चित्रें रंगविण्यांत हां हां म्हणतां निघून गेले. एका एका दिवसागणिक जाण्याचा दिवस जवळ येत चालला होता. आतां त्यांच्या मनांत आनंदापेक्षां शंकाकुशंकाच जास्त वावरूं लागल्या होत्या. सुखाच्या विचारांबरोबरच दुःखी विचारही त्यांना मधून मधून भेडसावून, विचार बदलावयास सांगत असत. पण अशावेळीं 'आशानदी' त्यांची सर्व भीती आपल्या तुडुंब प्रवाहाबरोबर धुवून नेत असे.

विनायकाचे हे सर्व दिवस, 'ही नेकटाय या सूटवर सूट (suit) होईल, का?—ही हॅट बरी का ती?—हा नाईट सूट बरा दिसतो का?—बेडिंग घ्यावं का नाहीं?—वगैरे प्रश्न मित्रांच्या व स्वतःच्या मदतीनें सोडविण्यांत, इंग्लंडमध्यें गेलेल्या आपल्या मित्रांना पत्रें लिहिण्यांत, व त्यांच्या सूचनांप्रमाणें सटर फटर खरेदी करण्यांत, त्याचप्रमाणें येथील नातलगांच्या व मित्रांच्या मेजवान्या घेण्यांत, केव्हांच भरभर निघून जात होते. बरेच दिवस पहावयास मिळणार नाहींत म्हणून तो केव्हां केव्हां संध्याकाळीं हॅंगिंगगार्डन, राजाबाई टावर वगैरे पहावयास मित्रांबरोबर जात असे.

* * *

उद्यां सकाळच्या बोटीनें विनायक जावयाचा होता. आज त्याची कोण धामधूम चालली होती. उरलें सुरलें सामान घेण्यांत, राहिलेल्या अपॉइंटमेंटस साजऱ्या करण्यांत, त्याचा सबंध दिवस निघून जात होता. त्या गडबडींत त्याला दुसरे कोणतेही विचार करण्यास वेळ नव्हता. राहिलेल्या मित्रमंडळीस व प्रोफेसर लोकांनाही तो भेटून आला.

दोन दिवसांपूर्वीच अण्णा, आई वगैरे माणसें मुंबईस येऊन राहिलीं होतीं.

त्याच्या आईची स्थिति मोठी चमत्कारिक झाली होती. तिचा आजचा सबंध दिवस अश्रु ढाळण्यांत गेला; अण्णाही गप्प गप्पच होते. त्या दोघांची मनःस्थिति वर्णन करणें शक्य नाहीं

सकाळीं लवकरच उठून अगदीं शेवटीं राहिलेली बांधाबांध चालली होती. मित्रमंडळी व नातलग येत जात होते. विनायकाचें मन आंतून त्याला अस्वस्थ करीत होतें, पण वरून वरून तो हंसून किंवा एखादें विनोदपूर्ण वाक्य उच्चारून वेळ मारून नेत होता.

शेवटीं जेवण वगैरे झाल्यावर जाण्याचा वेळ झाला. जवळपासचे लोक मोटारीपर्यंत पोहोंचवावयास गेले. मोटार 'मोल' वर निघून गेली.

तेथें किती तरी मित्र त्याची हारतुऱ्यांसह वाट पहात होते. तो प्रत्येकाकडून



ते गळयांत घालून घेई व लागलीच ते काढून आपल्या हातांत घेई. त्याचें मन चलबिचल झालें होतें.

निरनिराळ्या पोशाखाच्या व मनोवृत्तीच्या माणसांची सारखी दरवळ चालली होती. कांहीं ठिकाणीं जाणाऱ्या माणसांभोवतीं हास्यविनोद चाललेला दिसत होता, तर कांहीं ठिकाणीं बरोबरच्या माणसांच्या दुःखी मनाचें सांत्वन करण्याचा प्रयत्न चाललेला दिसत होता. कांहीं जोडपीं एकमेकांचे निरोप घेत होतीं. एखादा जाणारा गृहस्थ गळयांत माळांचें जुडगें घेऊन डुलत डुलत चालतांना व बोलतांना दिसत होता. आरामखुर्ची वगैरे घेऊन आपल्या मालाची विक्री करणारे फेरीवाले मधून मधून फिरत होते. कोठें कोठें उशीर झालेले कांहींचे नातलग हारतुरे घेऊन त्यांच्याकडे धांदलीनें धांवत होते. बाहेर मोटरव्हिक्टोरियांची धांवपळ चालूच होती.

विनायकानें हें सर्व दृश्य यापूर्वी कितीदां तरी पाहिलें होतें. पण तेंच दृश्य आज बघून त्याच्या हृदयांत कालवाकालव होऊं लागली होती.

त्यानें आपली नजर आपल्या आईकडे वळविली. तिची ती प्रेमपूर्ण पण केवीलवाणी दृष्टि पाहून त्याच्या जिवाचें पाणी झाल्यासारखें त्याला वाटलें. आईला सोडून जाऊंच नये असें त्याचें मन म्हणे. पण—

त्यानें अण्णांकडे पाहिलें, त्यांचा चेहरा नेहमींपेक्षां किती तरी उतरला होता. त्यांचा नेहमींचा वडबड्या स्वभाव आज अगदीं लोपला होता. ते विनायकाकडे पाहून हंसत, पण तें ओढून ताणून आणलेलें असल्याचें स्पष्ट दिसे. आंत त्यांना त्याच्या वियोगाचे उमाळे येत.

डॉक्टरी तपासणीचा वेळ होतांच तो बहुतेकांचा निरोप घेऊन आंत शिरला. अण्णा, आई व आणखी कांहींजण, परवाने असल्यामुळें आंत गेले. त्याची दुसरी मित्रमंडळी बाजूच्या फाटकांतून बोटीच्या अगदीं जवळ जाऊन उभी राहिली.

विनायकाबरोबरच अण्णा व आई बोटीवर गेलीं. तेथील सर्व व्यवस्था तो करमणुकीसाठीं म्हणून त्यांना दाखवीत होता. पण त्यामध्यें त्या तिघांचेंही लक्ष लागत नव्हतें. नंतर ते कठड्याजवळ जाऊन उभे राहिले. माणसांची ये-जा सारखी चालू होती. त्याकडे तीं तिघेंही पहात होतीं. त्यांचें बोलणें चाललें होतें. पण तें चालावयाचें म्हणून चाललें होतें एवढेंच! ते एकमेकांकडे पहात असत त्यावेळीं मात्र तिघांचेही डोळे पाण्यानें भरत.

'घण् घण्' घंटा वाजवीत एक खलाशी बोटीच्या प्रत्येक मजल्यावरून फिरूं लागला. एका हातांतील लोखंडी दांड्यानें तो दुसऱ्या हातांतील तासावर आघात करीत होता. पण त्याबरोबरच तो परतणाऱ्या प्रेमळ 'नातलगांच्या हृदु-वार हृदयावरच जणुं काय आघात करीत होता. पहिल्या वेळीं कोणीं जावयास निघालें नाहीं. अण्णा, आई आपल्या विनायकाकडे पहात होतीं. तोही भरलेल्या नेत्रानें त्यांच्याकडे पहात होता. दुसरी घंटा वाजवीत तोच खलाशी आला. आईनें विनायकाला जवळ घेतलें. तिला हुंदका आवरेना. विनायकही कावरा बावरा झाला होता; पण सांत्वन करण्यासाठीं तो म्हणाला, "आई, कांहीं काळजी करूं नको!'

पण बिचाऱ्या आईच्या हृदयाची काळजी या शब्दांनीं थांबेल काय?

अण्णांच्या तोंडांतून शब्द फुटेना. त्यांनीं विनायकाच्या पाठीवरून हात फिरवीत अस्पष्ट आवाजांत कांहीं तरी बोलावयाचेंच म्हणून "संभाळून जा बरं विनू!" असें कांहींसें म्हटलें.

दोघांची पाठ फिरतांच विनायकानें डोळ्याला रुमाल लावला व नाक साफ केलें.

दादर वर ओढून घेतले! हिंदुस्थानशीं असलेला संबंध जणूं काय तात्पुरता तरी तुटला!!

बोट हालली! लांब लांब जाऊं लागली!! थोडें थोडें करतांना धक्का, त्यावरील मंडळी व विनायक, यांत, भरभर, बरेंच अंतर पडूं लागलें!!!

मित्रमंडळी रुमाल हालवून त्याचा निरोप घेत होती...!

अण्णांचे डोळे भरून आले होते!

आई हुंदका दाबण्याचा प्रयत्न करीत होती!!

विनायक आतां तीन वर्षें कोणाला भेटणार नव्हता! विनायकालाही कोणी भेटणार नव्हतें!

अण्णांना व आईला तो जाऊं नये असेंच वाटत होतें! हिंदुस्थान व आईबाप यांना सोडून जाणें विनायकालाही जड वाटत होतें!

मग हें कां घडून यावें??

* * *

मुंबई, सप्टेंबर १९२९.
(प्रसिद्धी–'प्रगति')

# ८–'लखपतीऽ'!

**एक शब्दचित्र.**

'वधीरो लखपतीऽ!' ट्राम स्टँडजवळ एक पोऱ्या हातांत लहानशीं काळीं-तांबडीं पुस्तकें घेऊन ओरडत होता. प्रत्येक ट्राम थांबतांच तो दोन्ही बाजूंच्या खिडक्यांजवळून फिरून गिऱ्हाईक शोधीत असे. पण तरी तो इतका विक्रीच्या फिकीरींत दिसत नव्हता. त्याला ठाऊक होतें कीं त्याला तीं हातांतील पुस्तकें संपविण्यास फारसा वेळ लागणार नाहीं.

"एऽ इधर लाव!" एक साधासाच मनुष्य आपल्या मळकट व जुनाट कोटाच्या आंतील खिशांतून पैसे काढीत म्हणाला. त्याच्याच मागून एक शेठ्या, एक पगडीवाले, एक एक पुस्तक घेऊन निघून गेले. इतक्यांत त्या पोऱ्याचें लक्ष एका हळू हळू जाणाऱ्या 'सलून'वाल्या मोटारीकडे गेलें. 'साहेब?" तो हातांतील पुस्तक पुढें करीत आंत बसलेल्या अपटु-डेट मनुष्याला म्हणाला. मोटार हळू हळू चालली होती. 'साहेबां'नीं हात बाहेर केला. पोऱ्यानें एक पुस्तक, मोटारीबरोबर धांवत धांवत जाऊन त्यांच्या हातांत ठेवलें. पैसे चुकते होतांच मोटार पुढें निघून गेली.

मोटार बराच वेळ चालल्यावर एका बंगल्याजवळ उभी राहिली. आंतील 'साहेब' खालीं उतरले. शॉफरला कांहीं सांगून बंगल्यांत निघून गेले. घंटा वाजवितांच दरवाजा उघडला.

"ओऽहो? मि. मानकामे? सकाळींच कोणीकडे बुवा?" आंतील गृहस्थ आलेल्या गृहस्थांच्या खांद्यावर हात टाकीत म्हणाले.

"Any tips for to-day!" मि. मानकामे हंसत हंसत म्हणाले.

"भले! मी त्याचसाठीं आतां तुमच्याकडे येणार होतों!!" आंतील गृहस्थ मि. मानकाम्यांस म्हणाले.

"हंऽ! तें ठाऊक आहे बरं का पळनीटकर? तसले लपंडाव नकोहेत! मी आतांच लाख्याकडं जाऊन आलों. तो म्हणाला पळनीटकराला बित्तंबातमी लागली आहे काल संध्याकाळीं! म्हणून मी थेट इकडेच आलों. हं आतां बोला पाहूं; मग मी माझ्या (सूचना) suggestions सांगतों!"

"बरं तर" पळनीटकर टेबलाचा खण उघडीत म्हणाले. "पण काय हो, शिंचा चांगलाच जिरला बरं का लाटे गेल्या खेपेला! मी दिलं त्याला 'माऊंट अरगॉस'चं नांव ठोकून! भोट लेकाचा! गुंतवलेन् त्याच्या नांवावर न् आला बसलाय् माझ्या नांवानं शंख करीत! मी काय करणार, तो 'ऑल्सोरॅन' मध्येंच आला त्याला?"

पळनीटकर जोरानें हंसले. त्यांनीं खुणा केलेलें एक पुस्तक बॅ. साहेबांच्या हातीं दिलें.

"माझं अगदीं याच्या विरुद्ध झालं!" बॅ. मानकामे पुस्तक घेत घेत म्हणाले. "त्या केतकरला लेकाला मी मुद्दाम चकवायला 'ईस्टर्न ब्लूम'चं नांव सांगितलं. त्यानें आंधळ्यासारखं माझं ऐकलं. मी त्याला कांहीं ('एक्स्पेक्ट') expect करीत नव्हतों. मी कशाला त्याच्यांत गुंतवूं म्हटलं? भरले दुसऱ्याच घोड्यावर; पण गंमत ही झाली कीं 'ईस्टर्न' आला एकदम 'फ्लूक' न् माझा फुकट गेला. लेकाचं नशीब शिकंदर खरंच. अहो, 'डिव्हिडंडही' बरंच मोठं मिळालं त्याला. आम्ही दोनअडीचशें घालवून बसलों. छे:! आज आपली तर हिंमत चालत नाहीं!"

बॅरिस्टरसाहेब तोंड आंबट करीत हातांतील पुस्तक चाळूं लागले. त्यांनीं आपलें पुस्तक काढून आपलीं (अपेक्षित) expected नांवें अजमावून पाहिलीं.

"हें पाहिलंत का?" पळनीटकर कांहीं नवीन आठवल्यासारखं करून त्यांच्या हातांतील, आपल्या खुणा केलेल्या पुस्तकाचें एक पान उघडून हंसत हंसत बोटानें कांहीं दाखवीत मानकाम्यांना म्हणाले, ("अगदीं नक्की) Sure!"

"काय 'शिपशेप'? अहो म्हणतां तरी काय?" बॅ. मानकामे आश्चर्य वाटल्यासारखें करून म्हणाले.

पळनिटकरांनीं मागचीं पुढचीं पानं दाखवून त्यांची खात्री करण्याचा प्रयत्न केला.

"अहो, माझं ऐका तुम्ही, हा अगदीं नक्की!! जॉकीकडून....हं!—" ते हंसत डोळे मिचकवीत म्हणाले.

"खरंच?....पण आपली कांहीं आज छाती होत नाहीं बुवा!" बॅ. मानकामे म्हणाले.



"अरे, इसमें क्यॅं डरनेका!" पळनिटकर त्यांच्या पाठीवर थाप मारीत म्हणाले. "असं कसं चालेल पाय मागं घेऊन? आपण तर बुवा पाहणार डाव ठोकून!!—न् तुम्ही तरी काय असं अगदींच नवशिक्यासारखं करतां? अबे देखो तो सही!!"

बॅरिस्टरसाहेबांना पुनः जोर आला.

"बरं चला! पण—" नंतर ते दोघे थोडा वेळ हळूहळू बोलत होते. त्यांचा बेत सर्व ठरल्यावर बॅ. मानकामे खालीं आले.

त्यांच्या तोंडावर आशापूर्ण प्रसन्नता दिसत होती.

* * *

'रेसस्पेशल'ला कोण गर्दी होती! सर्व क्लास तुडुंब भरले होते. नवीन डबे जोडूनसुद्धां सर्वांना जेमतेम जागा मिळावयास मारामार पडत होती. गाडी भरभर स्टेशनामागून स्टेशनें टाकीत होती. आंतील शेठ्ये, वकील, बॅरिस्टर सर्वजण अजूनहि आपापसांत घोड्यांची चर्चा करीत होते. कोणी आपण 'विन' मध्यें लावणार असें सांगत होता तर कोणी 'प्लेस' मध्यें लावल्यापासून कसे फायदे होतात याची लांबलचक यादी देऊन वर्णन करीत होता. कांहीं वृद्धाचार्य नव-शिक्यांना सल्ला व धीर देत होते. गाडी स्टेशनांत येऊन दाखल होतांच, एकच गोंधळ उडाला. मोटारी, टांगे भराभर मैदानाकडे धावूं लागले. पण त्यापूर्वींच आंत बसलेल्यांचीं मनें मैदानावर दाखल झालीं होतीं. शर्यतीला अजून वेळ होता; पण त्यांच्या मनांत निरनिराळ्या आशा आतांपासूनच आपापसांत शर्यत खेळत होत्या. टांग्यांचे घोडे पाहून आपल्या आवडत्या घोड्याची व त्याच्या वायुगतीची कित्येकजणांना आठवण होत होती. मैदान जवळ येऊं लागलें तसतसें कांहींजणांना घोडामैदान जवळ येत चालल्यासारखें वाटूं लागलें.

प्रत्येकाच्या तोंडावर आशा प्रामुख्यानें उमटलेली दिसत होती.

* * *

कितीजण येत होते न् किती जात होते.

सूटमध्यें असलेले युरोपिअन, ॲंग्लो-इंडिअन व हिंदी, कांहीं नवीन मिळ-णारी माहिती वहींत लिहीत लिहीत येणारे कच्छी पागोटेवाले शेठ्ये, उंच टोपीचे पारशी, फेझकॅपवाले मुसलमान, पागोटे-फेटेवाले दक्षिणी, सर्व तऱ्हेचे लोक तेथें

फिरत होते. त्यांत 'हिंदुस्थानच्या सद्यःपरिस्थिती'वर व्याख्यान देणारे गांधी-टोपीवाले, परवांच एका जुगाराच्या अड्ड्यावर हल्ला घालून 'आरोपीं'ना अटक करून नेणारे सब-इन्स्पेक्टर, वगैरे बरेच सभ्य गृहस्थही दिसत होते. टाइम्समधील प्रिस्सीलेचा दृष्टिकोण ( 'Priscilla's Point of View' ) वक्तशीरपणें वाचून केलेल्या आजतागायत ( 'Latest' ) पोशाखांतील, युरोपिअन व पारशी स्त्रिया, त्याचप्रमाणें कांहीं शेटाणी हातांत, चामड्याच्या पैशाच्या पिशव्या अडकावून, घोळक्या घोळक्यानें, आपापसांत हंसत खिदळत, विजयीवीर ( 'winner' ) वर चर्चा करीत, मोहक चालींत चालतांना आढळून येत होत्या.

जिकडे तिकडे गोंधळ माजला होता.

घोड्यांचीं नांवें बाहेर पडतांच, आपले घोडे शेवटचे एकदां ठरवून प्रत्येकजण तिकिट ऑफिसकडे धांवूं लागला. बोर्डावर प्रत्येक घोड्याच्या नांवांचीं किती तिकिटें खपलीं. त्याचा नंबर भराभर यंत्रानें चढत होता. वीसपंचवीस मिनिटांत 'घण्घण्' घंटा वाजूं लागून सर्व देवघेवीचा व्यवहार बंद होतांच, शर्यतीला सुरवात झाली. घोडे धांवत होते. प्रत्येकाच्या मनांत कालवाकालव सुरू होती. शर्यत संपली, यंत्रें बेरीज वजाबाकी करूं लागलीं. पांच मिनिटांत सर्व तयार झालें; 'डिव्हिडंड ऑफिस' उघडलें. लोक पैसे घ्यायला तिकडे धांव ठोकूं लागले. तें सुरू होतें इतक्यांत दुसऱ्या शर्यतींतील घोड्यांचीं नांवें बाहेर पडलीं.

पैसे घेणाऱ्या लोकांकडे पाहून निराश झालेल्या लोकांना आशा उत्पन्न झाली. एकांत नाहीं, दुसऱ्या वेळीं तरी आपण जिंकूं ! डिव्हिडंड वाढून होईपर्यंत त्यांचा निश्चय ठरला.

घंटा वाजूं लागली. दुसऱ्या शर्यतीची इशारत झाली. पहिल्या शर्यतीचा जमाखर्च संपला. दुसरी शर्यत सुरू झाली.

एकमागून एक शर्यती चालल्या होत्या ! प्रत्येक वेळीं तिकिटें खपत होतीं !!

....दिवस संपला, शर्यती संपल्या !!

किती जणांच्या आशा सफल झाल्या, कितींचा प्रयत्न फोल ठरला. कांहीं आनंदून, कांहीं दुःखानें, निराश–पण निराश नाहीं म्हणतां येत त्यांना, ते आपलें नशीब पुढील आठवड्यांत अजमावण्यास कमी करणार नव्हते–होऊन परतत होते !



गाडीला सकाळसारखीच गर्दी होती. गाडींत सकाळसारखीच गडबड चालू होती; पण बऱ्याच जणांचे चेहरे उतरले होते. बॅ. मानकामे व त्यांचे मित्र यांपैकींच एक मनःस्थितींत होते !

पण अजूनही आशा निराशेचा खेळ त्यांच्या मनांत चाललाच होता !!

* * *

मुंबई, सप्टेंबर १९२९.
( प्रसिद्धि–'प्रगति')

# ९–जन्म

**एक शब्दचित्र**

" मग मला समजली ती गोष्ट खरी ना ? " राघवानें आपल्या पत्नीचा हात आपल्या हातीं घेऊन विचारलें. त्याला बरेच दिवस विचारावयास संकोच वाटत होता. मालतीलाही त्याला आपण होऊन सांगावयास लाज वाटत होती. आज हिय्या करून राघवानें प्रश्न काढला खरा, पण दोघांचीही छाती धडधडत होती. मालतीला आंतून गुदगुल्या होत होत्या. पण 'होय' हे दोन शब्दही उच्चारावयाची छाती होत नव्हती; आपल्या पतीच्या डोळ्याला डोळाहि भिडविण्यास तिला धीर होत नव्हता.

राघवानें पुन्हां प्रश्न विचारला व हंसतमुखानें तिच्याकडे पाहिलें. एकदां तिरक्या डोळ्यानें तिनें आपल्या पतिराजांकडे पाहून खालीं पहात पहात स्मित हास्य करीत, मान हलवून 'हो ऽ ऽ य' असें अस्पष्ट आवाजांत म्हटलें, व झटकन् त्याच्या हातांतील आपला हात सोडवून घेऊन तिनें लाजून स्वयंपाकखोलींत पळ ठोकली.

राघवाला आनंद झाला. त्याला एकप्रकारची उमेद आली. तो हंसत हंसत आपल्याशीं विचार करीत त्याच्या उद्योगाला निघून गेला.

मालतीच्या डोळ्यांपुढें किती तरी भविष्यकाळचीं चित्रें नाचत होतीं. तिची नाडी जलद चालली होती. हृदय थरारत होतें. मन प्रफुल्ल झालें होतें. तिला जिकडे तिकडे आनंद दिसत होता.

* * *

आज राघवाची कोण धांदल ? आणि त्याच्या घरांत पंधरावीस दिवसांपूर्वीच आलेल्या त्याच्या म्हाताऱ्या आजेसासूची आजची गडबड तर कांहीं विचारावयासच नको !

सकाळपासून मालतीच्या पोटांत दुखूं लागलें होतें !!

राघवानें जवळच्या कृष्णरावांबरोबर 'हेडक्लार्क'च्या 'तोंडावर मारण्यास' 'सिकनोट' पाठवून दिली ! तो स्वतः आजारी नव्हता; पण त्याच्या अर्धांगीचा आजार त्याच्यावर थोडासा शेकला होता !!



" कुसाताईला घेऊन येतां ना ? " त्याची आजेसासू बाहेर येऊन म्हणाली.

" होय, मीं तिला काल संध्याकाळींच सांगितलें आहे. येईल ती इतक्यांतच ! " तो कावरा बावरा होऊन म्हणाला.

" पोरीला आतां सोसवत नाहीं ! " आजी म्हणाली.

" मग ? आणूं का तिला बोलावून ?? " पांढरा फटफटीत चेहरा करून तो म्हणाला.

" हं ! "

त्यानें लागलीच डोक्यावर टोपी चढविली व तो घराबाहेर पळाला.

कुसाताई घरीं नव्हत्या. त्याच्या पोटांत धस्स झालें ! आतां काय करावें ?? घरांत तर अशी अडचण !!!

तो परत फिरला. घरीं बिचकत बिचकतच आला !

" ती भेटली नाहीं घरीं ! " मालतीची आजी बाहेर येतांच तो विरघळून म्हणाला.

" कोण ? "

" कुसाताई ! "

" ती तर तुम्ही बाहेर पडल्याबरोबरच आंत शिरली ! मला वाटलें तुम्हींच तिला पाठविली ! "

"आली का ? बरें झालें !! " तो आनंदून म्हणाला. " तिची माझी चुकामूक झाली ! पण कांहीं हरकत नाहीं ! "

आजी आंत निघून गेली. तो एका खुर्चीवर सचिंत बसला होता. त्याच्या पोटांत कालवाकालव होत होती. छाती जोरानें धडधडत होती. पण मध्येंच त्याच्या डोक्यांत कांहीं विचार येत, त्याला आनंद होई, त्याच्या तोंडावर हास्य झळके.

त्यानें मनगटावरील घड्याळांत पाहिलें, तो एकदां आंत जाऊन आला. त्याला मुळींच करमेना. आंतल्या खोलींत सध्यां काय चाललें आहे हें समजण्याची त्याला उत्कंठा लागली होती. हातांत घड्याळ घेऊन तो सचिंत असा खुर्चीवर बसला होता.

* * *

एका बाजेवर चिरगुटांचा विछाना टाकला होता. त्यावर मालती पडून होती. खिडक्या बंद केलेल्या होत्या. खाटेजवळच एक खुर्ची होती; त्यावर कुसाताई बसून मिनिटामिनिटाला आपल्या मनगटावरील घड्याळांत पहात होत्या.

मालतीचा चेहरा साफ पडला होता. तिचे केस अस्ताव्यस्त होऊन कपाळावर आले होते. कुंकवाची टिकली वांकडी तिकडी झाली होती. ती या कुशीवरून त्या कुशीवर सारखी तळमळत होती. कुसाताई आलेल्या पहातांच तिला थोडा धीर आला.

“नाहीं होऽ मला सोसवत! आईगऽऽ!” ती कुसाताईकडे केविलवाण्या नजरेनें पहात विव्हळत म्हणाली. तिला वेदना सहन होत नव्हत्या.

“असं काय वेड्यासारखं करतां बरं? धीर धरल्याशिवाय कसं चालेल?” कुसाताईंना तिच्या असह्य वेदना पाहून वाईट वाटत होतें; पण त्यांच्या नेहमीच्या पद्धतीनें हंसून त्या तिला धीर देण्यासाठीं सांगत होत्या.

तिला जास्त जास्तच वेदना होत होत्या. कुसाताई तिला मधून मधून धीर देत होत्या; पण त्यानें तिला आराम वाटत नव्हता.

“अगाऽऽईग!” ती मोठ्यानें ओरडली.

“असं काय बरं करायचं तें?” कुसाताई आपल्या विनोदी स्वभावानुसार म्हणाल्या, “मालतीबाई, अहो आईला असं थोडंसं दुःख सोसावं लागतंच! न् उद्यां त्या गोजिरवाण्या बाळाची ‘आई’ म्हणवून घ्यायला बरं, बरं वाटेल? तेव्हां नाहीं तुम्हांला या घटकेची आठवण राहणार! न् कांहीं वर्षांनीं त्याच्या लग्नांत ‘वरमाई’ होऊन मिरवायला न् ‘रासन्हाण्या’चा हट्ट धरून बसायला बरा आनंद होईल? तेव्हां तुम्हाला हें कांहीं आठवेल तरी का?”

मालतीला हें सर्व बोलणें ऐकूं येत होतें. तिच्या वेदना तशाच चालू होत्या. फार काय, क्षणाक्षणाला तिला जास्तच वेदना होत होत्या. पण तितक्यांत कुसाताईच्या बोलण्यानें तिच्या विचारांनाही गति मिळाली होती. कुसाताईनें रंगविलेलीं दोन चार वाक्यांतील चित्रें तिच्या मनश्चक्षूं पुढें स्पष्ट दिसत होतीं. तिला दुःखांत आनंद वाटत होता. तीं त्या भावी चित्रांतच रंगली होती....त्यानंतर ती बेशुद्ध झाली!

“कँऽऽहँऽऽ!” ती पुन्हां शुद्धीवर आल्यावर तिला आवाज ऐकूं आला.



तिनें डोळे उघडून पाहिलें. तिच्या समोरच चिरगुटांत गुंडाळलेलें चिमुकलें बालक हालचाल करीत होतें. तिनें त्याला जवळ ओढून घेतलें. तिला मातृप्रेमाचा उमाळा फुटला. आजीची व कुसाताईची धालमेल चाललेली तिला दिसत होती.

थोड्या वेळानें कुसाताई तिच्या जवळ आल्या. तिनें प्रश्नसूचक मुद्रेनें त्यांच्याकडे पाहिलें. आजी जवळ उभी होती.

‘घरचाच गो घरचाच! बाबाचा चेहरा आईच्या वळणावर गेलाय् बरं का! नाक मात्र बापासारखं!” आजी चिकित्सा करूं लागली.

मालती समजली. तिचा जीव खालीं पडला. तिला आनंद झाला.

* * *

राघव चिंतेंत बसला होता. त्याचें, तान्ह्या मुलाचा आवाज ऐकतांच, अर्धें अधिक समाधान झालें. तो आतां कुसाताईच्या बाहेर येण्याची वाट पहात होता.

शेजारच्या रमाबाईंनीं, आपल्या पतिराजांना, लहान मुलाचा आवाज ऐकून, विचारपूस करण्यासाठीं पाठविलें होतें!

“काय हो? झाली का सुटका कुटुंबाची?” ते आंत येत राघवाला म्हणाले.

“होय, नुकतीच झाली!” राघव थोड्याशा धडधडत्या अंतःकरणानें म्हणाला.

“काय झालें?”

“अजून समजलें नाहीं! येतील थोड्याच वेळांत कुसाताई बाहेर!” राघव म्हणायचें म्हणून म्हणाला. बाकी त्याचें सर्व लक्ष आंत लागलें होतें!

रमाबाईचे पतिराज विन्मुख परतले; त्यांच्या पत्नीला फारशी माहिती मिळाली नाहीं.

थोडा वेळ अंतःकरणाची चलबिचल सोसल्यावर, राघवाला, कुसाताई, आंतील सर्व काम आटोपून बाहेर येतांना दिसल्या. साबणानें हात धुतां धुतां त्या म्हणाल्या, “कांहीं काळजी करण्याचं कारण नाहीं बरं का! बाळबाळंतीण दोघेंही खुशाल विश्रांति घेत आहेत. मीं औषधाविषयीं आजींना सांगितलेंच आहे.”

“बाळ बरं आहे ना?” राघव चांचरत म्हणाला.

“हो, खुशाल आहे मुलगा!” कुसाताई म्हणाल्या.

राघवाला पाहिजे ती माहिती मिळाली. त्याला आनंद झाला.

“जन्माचा नक्की वेळ काय?” राघवानें कुसाताईंना विचारलें.

" नऊ वाजून अकरा मिनिटें ! " कुसाताई जावयास निघतांना म्हणाल्या.

त्यानें तें टिपून घेतलें. तो टोपी घालून त्यांना दारापर्यंत पोहोंचवायला गेला. दाराजवळ त्यानें त्यांच्या हातांत कायसें ठेवलें.

" मी संध्याकाळीं येईनच ! ' त्या जातांना म्हणाल्या.

" हो हो ! "

राघव परत आला व खुर्चीवर बसला. त्याला हायसें वाटलें.

घरांत प्रत्येकाच्या तोंडावर आनंद झळकत होता !!

आशा महान् खरीच ! .......

*　　*　　*

पालघर, सप्टेंबर १९२९.
( प्रसिद्धि–' प्रगति ' )

# १०–मृत्यू !

**एक शब्दचित्र.**

" भाऊऽ, मोसंब्याचा रस घालूं का तोंडांत ?" त्यांचा मोठा मुलगा त्यांच्या उशाशीं बसला होता, तो म्हणाला.

" नकोरे बाबा कांहीं नको अगदीं !" ते कण्हत म्हणाले.

पण त्यानें त्यांचें न ऐकतां चार पांच घोंट त्यांच्या घशाखालीं उतरवलेच.

भाऊंचें काय वाईट होतें ? बरे तीन शिकले सवरलेले मुलगे, मुलींचीं लग्नें होऊन त्या आपापल्या घरीं, मुलांना त्यांच्या मनाजोगत्या बायका मिळून त्यांना आनंदी व खेळकर मुलें होतीं, त्यांचेंही आतां वय झालें होतें. सत्तराच्या वर गेले असल्यामुळें आतां त्यांना मरण म्हणजे आवश्यकच वाटत होतें. एखादा नातू थट्टेनें " भाऊ आजोबांना शंभर वर्षें आयुष्य ! ' असें म्हणे; त्यावर ते आपल्या मानेला झटका देऊन म्हणत, " नकोरे बाबा, मला काय करायचंय् आयुष्य ? तुम्हालाच घ्या तें ! यमराजाची माझ्यावर केव्हां कृपा होतेय् कोणास ठाऊक ! "

खरेंच त्यांचें तसें म्हणणें होतें का कोणास ठाऊक ? अलीकडे मात्र त्यांची वयाच्या मानानें असलेली सशक्तता, ढांसळत चालली होती. ते हल्लीं वरचेवर आजारी पडत. गेल्या दीड दोन महिन्यांत तर ते बिछान्यावरून उठलेच नव्हते. त्यांची दर दिवशीं थोडी थोडी शक्ति कमी होत चालली होती. आतां त्यांना कांहीं पचेनासें झाल्यामुळें ते दूध, ताक, मोसंब्याचा रस वगैरेंवर रहात असत. त्यांच्या मुलांनीं डॉक्टर आणून त्यांना औषध देण्यांत कोणत्याही तऱ्हेची हयगय केली नव्हती.

गेल्या आठवड्यांत त्यांची प्रकृति जास्तच बिघडली; आतां त्यांना आपण होऊन, या कुशीवरून त्या कुशीवरही होतां येत नव्हतें. आपल्या जिवाला ते आतां अगदीं कंटाळले होते. मधून मधून ते सुस्कारा टाकून अस्पष्ट आवाजांत म्हणत, ' देवा सोडीव रे आतां ! '

डॉक्टरनें आजचा दिवस जवळ जवळ शेवटचा असेंच सांगितलें; घरांतील मंडळीचेंहि आपापसांत कुजबुजणें चाले. डॉक्टर आले. त्यांनीं भाऊंना पुन्हां तपासलें.

" काय ? " भाऊंचा मोठा मुलगा डॉक्टरना आशापूर्ण, चेहऱ्यानें विचारूं लागला.

" कांहीं आशा दिसत नाहीं ! " डॉक्टरांनीं तोंड वांकडें करून मानेनें नन्नाचा पाढा म्हणत उत्तर दिलें.

" डॉक्टर, काय तुमच्या हातीं असेल तें करा; त्यांत कोणचीहि कसूर करूं नका ! "

" नानासाहेब, आतां तुम्हास स्पष्ट सांगावयास काय हरकत आहे. अहो, पिकलं पान गळून पडल्याशिवाय रहातं का ? तुमच्या वडिलांची आणखी किती दिवस तुम्ही आशा करणार ? ते काय आतां तुमच्या हयातीला पुरणार थोडेच !" डॉक्टर त्यांची समजूत घालीत होते.

" तें खरं हो ! पण आपण शेवटपर्यंत प्रयत्न हा केलाच पाहिजे ! "

" होय ! पण त्याला यश येणं अवांक्याबाहेर गेलं आहे. "

थोड्या वेळानें डॉक्टर निघून गेले.

डॉक्टरांनीं सांगितलें खरें, पण नानासाहेबांचें पुरें समाधान झालें नव्हतें. आणि तें कसें बरें शक्य आहे ? आशावाद हा मनुष्याचा मुख्य गुणधर्म !

घरांतील सर्व मंडळींच्या मनोवृत्तींत खळबळ उडून गेली होती. त्यांच्या कुज-बुजण्याचा आवाज भाऊंच्या कानावर अस्पष्ट आदळत होता.

संध्याकाळीं भाऊंची प्रकृति अतिशयच बिघडली. त्यांना आतां नीट श्वासही घेतां येईनासा झाला. त्यांच्याविषयींची बरीचशी आशा नष्ट होत चालली.

बिछान्याजवळ दोघेहि मुलगे बसले होते. त्यांचे मोठे मोठे मुलगेही आजोबांना पहावयास त्यांच्या सभोंवतीं जमले होते.

बिछान्यावर भाऊ पडले होते. त्यांचें रुंद कपाळ, वाढलेल्या हजामतीमुळें दिसणारें पांढरें शुभ्र डोकें, तोंडांत दांत नसल्यामुळें जरासें पेंचलेलें तोंड, वाढलेली पांढरी दाढी व मोठे कल्ले असलेली मिशी, व अशक्ततेनें गालांचीं वर आलेलीं हाडें, या सर्वांमुळें त्यांचा एकंदर चेहरा जरा जास्त उग्र दिसत होता. त्यांच्या अशक्ततेमुळें त्यांना हातपाय हालवितां येत नव्हते. डोळे मात्र चोहीं-कडे गरगर फिरवून निरीक्षण करीत होते.

त्यांची दृष्टि नानासाहेबांकडे वळली. त्यांच्यापुढून एक एक जुनीं चित्रें जाऊं लागलीं. 'नानाचें बारसें, त्याच्या बाललीला, उनाड मुलगा म्हणून प्रसिद्धी, नंतर त्याच्या जीवनांतील एकदम क्रांति, त्याची हुशार मुलगा म्हणून झालेली ख्याति, मॅट्रिकमध्यें पहिला नंबर आल्यावेळीं वाटलेलें समाधान, नंतर दोन वर्षांनीं इंजिनिअरिंगसाठीं त्याचें विलायतला गमन व त्या वेळचें दुःख. परत आल्यावर मिळालेली सरकारी मोठी नोकरी, त्याच्या लग्नाचा त्या वेळचा थाट, त्याच्या पहिल्या नातवाचा जन्म,'....सर्व देखावे चित्रपटाप्रमाणें भरभर त्यांच्या डोळ्यांसमोरून निघून गेले.



त्यांची दृष्टी दुसऱ्या मुलाकडे वळली. वामनरावांचा चेहरा आपल्या आई-सारखा होता. त्यांना लागलीच आपल्या बायकोची आठवण होऊन त्यांच्या डोळ्यांतून खळकन् पाणी आलें. तिची शेवटची स्थिति, व " मी माझ्या मागें माझी आठवण रहावी म्हणून बाळाला ठेवून जात आहें " असें म्हणून चिमुकल्या वामनाचा हात आपल्या हातांत देतेवेळची तिची करुण दृष्टी, भाऊंच्या डोळ्यांसमोर स्पष्ट दिसत होती. शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या बायकांनीं 'कसा गुलाम मातृमुखी आहे पहा ! हीं भाग्यवंताचीं लक्षणं हो ! ! ' असें म्हणून केलेलें कौतुक, निरनिराळ्या वक्तृत्वोत्तेजक संस्थेंतून त्याला उत्तम वक्ता म्हणून मिळालेलीं बक्षिसें, त्याला मिळालेला शहरांतील पुढारीपणा, उत्तम वकील म्हणून थोड्याच दिवसांत संपादलेली कीर्ति, या सर्वांचीं चित्रें ते मनामध्यें रेखाटूं लागले.

त्याच नादांत त्यांनीं आपल्या तिसऱ्या मुलाकडे पहाण्यास दुसरीकडे दृष्टि फिरविली. इतक्यांत त्यांना, तो विलायतेंतून परत येण्यास अजून १० दिवसांचा अवकाश असल्याची आठवण झाली. "अरेरे, पद्माकराची न् माझी भेट होणार नाहीं तर. " त्यांच्या मनांत विचार आले. बाहेर उद्गार पडणें शक्य नव्हतें. त्यांची वाचा त्यांच्या आतां ताब्यांत नव्हती.

त्यांनीं आपल्या नातवांकडे दृष्टि फिरविली. सर्वांकडे पाहून झाल्यावर त्यांना बरें वाटलें.

त्यांची शक्ति सारखी नष्ट पावत होती. शरीराचा खालचा अर्धा अधिक भाग त्यांच्या आटोक्याबाहेर साफच गेला होता. हात हलवण्यासारखे होते. पण शक्ति इतकी कमी होती कीं, स्वतः हालवलेला हात त्यांना स्वतःलाच दिसत नव्हता. त्यांना समजून आलें कीं, आतां आपण ज्याची इतके दिवस वाट पहात होतों तोच क्षण जवळ येत आहे. त्यांना कां कोणास ठाऊक एकदम भीति वा ट

सर्वांना त्यांचें शरीर एकदम मोठ्यानें हालल्यासारखें वाटलें. सर्वजण त्यांच्याकडे टवकारून पाहूं लागले.

“आला वाटतं डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाणं संध्याकाळचा वेळ !” नानासाहेब जरा रडक्या स्वरांत म्हणाले. वामनराव कांहींच बोलले नाहींत. दाराजवळ उभ्या असलेल्या त्यांच्या दोन्ही बहिणींनीं डोळ्याला पदर लावला. भाऊंचा विचार चालूच होता.

“आतां आपलें काय आहे ? या जगांतून गेलें म्हणून काय हरकत आहे ? संसार झाला ! मुलें झालीं ! त्यांचा विद्याभ्यास झाला. ते उद्योगधंद्याला लागले. ते सुखानें संसार करूं लागून त्यांना मुलेंही झालीं ! आतां आपण आणखी किती दिवस जगण्याची आशा करावयाची ? हें थांगडें संपणार तरी केव्हां ? कांहीं नाहीं ! ही वेळ आपल्याला फायद्याचीच आहे. मी आतां या शरीराला सोडून जाणार !”

त्यांना पुन्हा भीति वाटली. शरीरानें पुन्हा एकदां उसळी मारली. जीव जाण्यास बराचसा कबूल झाला होता, पण इतकं जुनाट शरीर त्याला एकदम सोडीना. त्याची जिवाबरोबर लढालढी सुरू झाली. त्यांच्या तोंडावर माशी बसलेली त्यांना दिसत होती. ती उठविण्यासाठीं त्यांनीं हात वर केला असें त्यांना वाटलें. पण खव्याळ माशी त्यांच्या तोंडावरून कांहीं उठेना. त्यांनीं जवळ बसलेल्या नानासाहेबांना सांगितल्यासारखें त्यांना वाटलें. पण त्यांनीं ऐकलेंच नाहीं. ‘अरेच्या, इतका बेफिकिरपणा अं ऽ ?’ त्यांना थोडासा राग आला. उपहासात्मक ते हंसले; त्यांना तसें वाटलें. “आतां तरी यांचे डोळे उघडतील ! छे ! काय ही मगरूरी ? माझी कोणीच काळजी घेत नाहीं ! तोंडदेखलेपणा अं ऽ ? आतां मला म्हाताऱ्याला घेऊन काय करायचंय् त्यांना ?”

“काय हाल होत असतील माणसाला शेवटीं शेवटीं !” वामनराव म्हणाले, “या हालापेक्षां, जातील एकदांचे भाऊ तर बरें !”

भाऊंना शेवटचेच शब्द ऐकूं आले. त्यांना संताप आला. “अरेरे, ज्याला मी जास्त प्रेमानें वाढवला, ज्याचें माझ्यावर निरतिशय प्रेम, तोच वामन हें बोलूं लागला काय ? काय हा कृतघ्नपणा ! मी मरावें असें याला वाटतें अं ऽ ? कां बरं हें ?—बरोबर; आतां माझ्याकडून मिळण्याची आशाच नाहीं त्यांना कसली ! माझा म्हातारड्याचा यांना आतां काय उपयोग होणार ? मी मरायचेंच तर ?”



पुन्हां मरणाची गोष्ट निघतांच, शरीरानें, शक्ती एक करून, मोठ्यानें उसळी मारली. जणूं काय तें, “काय बरें हा वेडेपणा ! इतके दिवस आपण एकमेकांना धरून हजारों कृत्यें केलीं, कीं, एकमेकांचें मित्रत्व आपल्याला वाटलेंसुद्धां नाहीं. आणि आतां इतका माझ्यावर रोष करून दूर दूर कां चाललास ??” असें मोठ्या मिनतवारीनें जीवाला सांगत होते.

सर्वजण दुःखी उत्कंठेनें त्यांच्याकडे पहात होते.

“बस्स, ठरलाच विचार ! आतां जावयाचें ! एके ठिकाणींच अडकून रहाण्यांत काय अर्थ आहे. ‘वासांसि जीर्णानि यथा विहाय,....” भाऊंचा वेदांत बोलूं लागला.

“हं हं वेड्यासारखें काय हें ? चाललास ? तुझा पद्माकर भेटला का तुला ? पास होऊन कलेक्टर तरी होऊंदे त्याला ! न् त्याचं लग्न तुला कसं पहायला मिळेल ?...’

“हंः ! वेडा रे वेडा ! कसल्या मूर्खपणाच्या न् पोरकट आशा घेऊन बसलास ? तुझ्याशिवाय त्याचं आयुष्य जणूं काय पुढं चालू होणारच नाहीं !.......’

“मग जायचं ना हें शरीर सोडून ?.......”

शरीर पुन्हां एकदां खडबडून हललें. त्याची अझून मुळींच समजूत होईना.

“चालले वाटतं ?” कोणी तरी बोललेलें ऐकूं आलें.

“कोण तें ? कोण इतकं माझ्या जिवाला कंटाळलंय ? नाना का ? पाहूं दे त्याला बरं ?......अरे, पण हें काय, मला कांहीं दिसतच नाहीं तें !”

भाऊंनीं हात वर करण्याचें मनांत आणलें, पण आतां शरीर त्यांच्या ताब्यांत नव्हतें.

‘हा वेड्या ! अझून तुझा मोह सुटत नाहीं ना ? तुला आतां पद्माकर कसला दिसतो ?....”

“शरीर पुष्कळ सांगेल, पण शरिरावर तरी तुझा ताबा चालावयास त्यांत शक्ति पाहिजे ना !”

“आणि राहिलास शरीराला धरून तरी सभोंवतीं लोक कुठें एवढे तुझ्या जगण्याविषयीं उत्सुक आहेत ?”

“सर्व लोक तुझ्याबद्दल निराश, न् तूंच स्वतःची आशा करतोस ?”

" सूत हालत नाहीं बरं का ? " खोल व अस्पष्ट आवाज ऐकूं आला.

" पाहिलंस ? झालं आतां समाधान ? ? "

" मग ठरला ना तुझा विचार ? जायचें ना शरीराला सोडून ? "

पुन्हां शरीर दचकलें. राहिलेली सर्व शक्ति एकवटून त्यानें हालचाल केली.

हीच शरीराची शेवटची धडपड !

झालें—जीव व शरीर यांची फारकत झाली ! त्या भानगडींत आशा कुठें गेली याचा पत्ताही लागला नाहीं ! !

कदाचित् जीवाला धरूनच गेली असावी !

पण ती शेवटपर्यंत धडपड करीतच होती ! !

मुंबई, आक्टोबर १९२९
( प्रसिद्धि–'प्रगति' )

Hope is the anchor of life,
Hope is the helmet of salvation,
Hope is the poor man's bread,
Hope is the walking man's dream.

—*Pliny.*

दिवस उगवतो न् दिवस मावळतो. त्या दरम्यान कितीकजणांच्या कितीएक आशा सफल होतात, त्याचप्रमाणें कितीजण अपयशामुळें तात्पुरते निराश होतात. एवढें जरी आहे तरी भिकाऱ्यापासून श्रीमंतापर्यंत, बालकापासून वृद्धापर्यंत, स्त्री आणि पुरुष, जन्मल्यापासून मरेपर्यंत आशेमागें लागलेले आढळून येतात. कोणीही असलेल्या स्थितींत संतुष्ट नसतो. आशा आहे म्हणून जग चाललें आहे !

# हृदय

## भाग तिसरा

"....of gold, and of hope and unrest;
Of power that helps not, of wisdom that knoweth,
But teacheth not ought, of the worst and the best!"

—*William Morris.*

"Each human being, by mere birth, has a birthright in this earth to all its productions; and if they do not receive it, then it is they who are injured and it is not the "pauper" ... it is the well-to-do who are the criminal classes!"

—*Richard Jefferies.*

# १–धाकूचें आयुष्य

एक शब्दचित्र

पैशाच्या ओझ्याखालीं श्रीमंत चेंगरतात तसेच गरीबही चेंगरतात;...पण थोड्या निराळ्या अर्थानें ! ...

आणि म्हणूनच म्हणावें लागतें कीं रुका सारें जग चालवतो !! ...

निसर्ग मनापासून म्हणतो, 'सारे सुखी व्हा'!...पण मानवी स्वार्थानें त्याला धाब्यावर बसवलें आहे !!...

गरीबी श्रीमंतीचें बंड किंवा पैशाची किंमत त्यामुळेंच वाढली आहे !

नाहींतर पैशाचा आपला संबंध काय ??

अमर्याद स्वार्थ हाच जगांतला ब्रह्मदेव !....आणि त्यानें निर्मिलेली परिस्थितीच मनुष्याला व त्याच्या हृदयाला, 'गर्भ-श्रीमंत' किंवा 'गर्भ-गरीब' करते !!...

वीतभर पोटाची खळगी भरण्यांतच...सबंध आयुष्येंच्या आयुष्यें–तीं सुद्धां अतिश्रमानें लहान होऊन—नाहींशीं झालेलीं पाहिलीं कीं डोळे भरून येतात!... सबंध जग अस्पष्ट होतें!!...

पण तरीही, मानव स्वतःला अतिश्रेष्ठ प्राणी ठरवतो !

माणसानें स्वतःच काढलेलें स्वतःचें चित्रच तें !

* * *

व्यक्ति आणि झुंड !...जगांत चोहूंकडेच हा लढा चाललेला दिसतो !!

...पण विशेषतः गिरणींत तें जास्त ठळक दिसून येतें ! अन् तेथें व्यक्तीच जिंकते लढा.

गिरणींत व्यक्ती म्हणजे मालक !...झुंड म्हणजे कामगार !!

आणि साधारणपणें झुंडींतील व्यक्तीला व्यक्तित्व नसतें !...

जगांत जगायचंच तर पोटाची खळगी भरल्याचं सोंग नाहीं करतां येत;... व गरजवंताला अक्कल नसते !...



...तेव्हां पुष्कळ गिरणी चालतात यांत नवल नाहीं !....

मोटारींतून वेगानें जात असलें म्हणजे गरीबीनें पायीं चालणाऱ्यांचे चेहरे दिसत नाहींत !...

जग व्यक्तीसाठीं थांबत नाहीं !

आणि जगाप्रमाणेंच गिरणीचीं यंत्रें अव्याहत चालू रहातात !...

पोराबाळांनीं खायचं काय हा प्रश्न फार जाचूं लागल्यावरच धाकूनें, रत्नागिरीजवळचें आपलें खेडें सोडून मुंबईच्या गिरणीची वाट धरली !

'माणिजर' न् मुकादमाच्या मनधरणीनें एकदांची नोकरी मिळाली !.... परळच्या बाजूस त्याचें बिऱ्हाडबस्तान बसलें; साऱ्या गडबडींत त्याला थोडी उसनवारीही झाली !!...पण पुढली आशा त्याला समाधान देण्यास पुरेशी होती !...

....सुरवातीला त्या खेडवळाला गंमत वाटे !....भोंगा वाजला कीं त्या भागांतून किती लोक काळसर फडक्यांत शिदोरी बांधून झपझप पावलें टाकीत चालतांना दिसत; गिरणीकडे वळणारी, तोंडानें गप्पा मारीत चालणारी, ती बायकापुरुषांची लांबच लांब रांग, घाईत जातांना पाहिली कीं तो स्वतःचें व्यक्तित्व पार विसरून जाई तत्काळ !

....आपला बिल्ला देण्याबद्दलची व 'खाडा' न लागण्याबद्दलची प्रत्येकाची धडपड, नेमलेलें काम करण्यासाठीं चाललेला अट्टाहास, यंत्रांची धडधड, दुपारच्या सुट्टींतील प्रत्येकाचा शिदोरीचा कार्यक्रम,—सारें अगदीं यंत्रासारखेंच !—पण प्रथम नाविन्यामुळें, त्याला तें समजून आलें नाहीं !!...

संध्याकाळीं गिरणींतून परत फिरणाऱ्या त्या स्त्रीपुरुषांच्या झुंडींतील बऱ्याच जणांचीं तोंडें आपल्याच सारखीं उतरलेलीं असतात हें थोड्याच दिवसांत त्याला समजून आलें!...त्यांत त्याला दुःख झालें तितकेंच समाधानही वाटलें !! दुःखांत सुख शोधण्याची मनुष्याची प्रवृत्तीच असते !...

गिरणींत त्याला दुसऱ्याहि अनपेक्षित गोष्टी दिसून आल्या !....आपल्या तेरा चौदा वर्षांच्या अंबूला कामाला लावण्यांत, आपल्या संसाराला थोडी मदत होईल हाच त्याचा हेतू होता; पण मुकादमाच्या आचरटपणामुळें त्याला एका आठवड्यांतच, तिला, तिच्या हितासाठीं, घरीं बसवावें लागलें. करील काय बिचारा ! ...धरलं तर चावतं, सोडलं तर चावतं अशांतील त्याची स्थिति झाली त्यावेळीं !!—

त्याला कधीं कधीं वाटे आगींतून सुटून आपण नाहक फोंफाव्यांत येऊन पडलों !....'पण आगींत काय न् फोंफाव्यांत काय ?...कुठं तरी पिचत पडायचं हेंच आपलं भवितव्य' असें तो मनाचें आपलें समाधान करून घेई !!—

त्याला राग येत नसे असें नाहीं !...एखाद्यावेळीं तर त्याला वाटे कीं, या मुकादम 'माणिजरां'ना ठार करण्याची छाती करावी !!...

...पण भडकलेलें डोकें, थोडें ताळ्यावर आल्यावर, त्याला लागलींच पटे कीं, त्या छातीजवळच पोट आहे !...आणि पोटाला लागलेल्या पाठीशींच बायकापोरं आहेत !!....

कामाच्या व संसाराच्या चिंतेच्या दगदगीनें त्रस्त झालेल्या त्याच्या मनाला, दमल्याभागल्यानंतर उत्साह आणणारें औषधही त्याच्या गिरणींतल्या एका भाईनें, त्याला हल्लीं दाखवून दिलें होतें !....पहिल्या दिवशीं त्यानें तोंड वेडेंवांकडें केलें न् पण दोन दिवसांत त्यानें जोडीदाराला गुरुदक्षणा दिली दोन ग्लास !!...

बाटलीच्या नादानें त्याची दैना होते हें त्याला पटे !...पण पुनः ती त्रस्त मनःस्थितीची वेळ आली कीं त्याचा कांहीं इलाजच चालत नसे !!...

गिरणींतील ती बारा तासांची जीवाची धडपड त्यांच्या कपाळची कधींच सुटत नसे !....लोखंडी यंत्रांबरोबरच ही जित्या हाडामासांचीं यंत्रेंही पोटासाठीं धडपडत !!...आणि हें सर्व त्या उष्ण वातावरणांत...

एके दिवशीं, एका कामगाराचा उजवा हात यंत्रांत सांपडून उचकून निघाला !...त्याला बाहेर नेण्यांत आलें !!....लोखंडी व हाडामासांच्या बाकीच्या यंत्रांचें काम पुढें चालूंच होतें !!...

पहातां पहातां, धाकूचे डोळे पाण्यानें भरून आले! हात काम करतांना एकदम थांबला !!....

"एऽ धाक्या !...साला बघतो कुठें ?..." एकदम दचकून त्यानें समोरील काम पुढें सुरू केलें !....

"लौकर काम करून तरी होणार काय जास्त ?...आमच्या नशिबाची बारा तास धडपड न् अर्धी कच्ची मीठभाकर सुधारणार आहे थोडीच ?....देवा, आमची दैना तुझ्याही लक्ष्यांत येत नाहीं कारे ??...कामावर आलों नाहीं, तर उपाशीं मरूं !...आलों तर हे असे जिवंत मरत आहोंत !!..."



थोड्याच दिवसांत शेजाऱ्याच्या सांगण्यावरून, धाकू 'युनिअन'ला जाऊन मिळाला !...

गरीब श्रीमंत, कामगार भांडवलदार यांच्या वर्गयुद्धाविषयीं त्याचे पुढारी त्याला सांगूं लागले कीं तो त्यांच्याकडे निर्विकार मनानें पाही !...कांहीं म्हणत गांधी चांगला...कांहीं म्हणत वाईट !...त्याला त्यांतलें कांहींच समजत नव्हतें चांगलेंसें !...

बरेच दिवस तें सर्व ऐकल्यावर आपल्याला सुखासमाधानाची, पोटभर भाकर पाहिजे, अन् सर्वांनीं एकी केली तर आपल्याला कदाचित् ती मिळेलही एवढी त्याला आशा मात्र वाटूं लागली. आतां त्याला कळूं लागलें होतें... मालक काय, 'माणिजर' काय, किंवा मुकादम काय...कोणी गिरणी चालवत नाहींत !...गिरणी चालविणारे न् माल काढणारे सारे आपणच...स्वतःचे स्वतःच...

आणि मग हळूहळू संपाची भाषा ऐकूं येऊं लागली !....संप म्हणजे काय ?.... अजून पूर्वीं कधींच कसा नव्हता झाला ??...त्यांचे पुढारी त्यांना सांगूं लागले, "संपाची कल्पना कांहीं नवीन नाहीं ! तुमचं हित पहाणारे पुढारी कोणी पुढं येत नव्हते एवढेंच !!..."

येथपर्यंत सर्वांचें जुळे; पण मग कांहीं म्हणत "....हें वर्गयुद्ध आहे बरं !... भांडवलशाहीचा नायनाट होईपर्यंत हें असंच चालायचं !!...."

दुसरे कांहीं म्हणत "आपले मालक आपल्याला हृदय नाहीं असें वागवतात ! ...गरीबीची पोटभर भाकरही न देतां गुराढोरांसारखे मरेमरेतों राबवून ठारच मारतात म्हणाना !!...

आपले कामाचे तास कमी झाले पाहिजेत...पगारवाढ झाली पाहिजे.... नफ्यावर आपला हक्क असला पाहिजे...

पण बंधूंनों, एकट्या दुकट्याची डाळ बलाढ्यापुढें शिजत नाहीं !...जुटी करून, संप करून आपण त्यांना ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करूं !!...आपल्या दीन स्थितीकडे पाहून, त्यांनीं आपलें म्हणणें ऐकलें कीं, पुन्हा ते आपले मालक न् आपण मजूर !...तोंपर्यंत जुटीनें संपावर राहून उपाशीं मरण्याची पाळी आली तरी हरकत नाहीं ! ईश्वर, आहेच आपला पाठीराखा !!...."

अटी मान्य झाल्या नाहींत व शेवटीं सर्वानुमतें संप पुकारला गेला !...ठरल्या दिवशीं ठरल्या वेळेला, सर्व मजूर, थोडी सुद्धां आदळ आपट न करतां, शांतपणें, आपापल्या गिरणींतून रांगेनें बाहेर पडले !....

लाठ्या घेऊन बंदोबस्तासाठीं आलेल्या सरकारच्या पोलिसांना, कांहीं न करतां, गुपचूप परत जावें लागलें ! !...त्या दिवसाची त्यांची 'ड्यूटी' संपली !....

* * * *

संपास सुरुवात होऊन जवळजवळ तीन आठवडे झाले होते; कामगारांची स्थिति अतिशय शोचनीय होती; धाकूचें व्यक्तित्व त्यांतच गुंतून राहिलें होतें ! !...आणि त्याच्यामागें त्याचे बायका पोरांचें कुटुंबही सारें ! ! !....

जीव जगवण्याच्या आशेनें, सुरवातीलाच कितीतरी बोटीनें मुलखाला गेले !

"गांवकरांनुं, काय हो, तुमकां येणां नाय ? ?" धाकूच्या गांवच्यानें चौकशी केली जातांना....

"कित्याक ?...हंयसारच बरा असा !....हो संप आणीक किती दीस चालतलो ईश्वराक ठाऊक !..." धाकूनें कांहींतरी सांगितलें, त्याच्यापुढें कर्ज, पोरेंबाळें....सर्व दिसत होतें !....

जवळपास उसनवारीलाही वाव नव्हता इतकी सर्वांची दीन स्थिति होती ! ...आजारी बायकोचा आजार जास्तच वाढला होता ! !...पोरें भुकेनें तळमळत होतीं ! !...

इकडे सभा भरून पुढारी बोलतच होते !...पण संप थांबण्याची भाषाच दिसेना !....

गिरणीच्या मालकांचा अजून झुंडींच्या भवितव्याच्या ठरावावर वादविवाद चालून, (स्वतःस) समाधानकारकपणें सर्व प्रश्न सुटण्यासारखा असल्यास ते पहात होते !....पुढें ढकललेला एकेक दिवस मजुरांना युगासारखा वाटे !... स्वतःपेक्षां आपल्या मुलाबाळांचें तडफडणें पाहूनच त्यांचा जीव तळमळत असे !

धाकूचें नशीब शेवटीं फिरलें !...

त्याची आजारी बायको सर्व तऱ्हेच्या त्रासानें, परिस्थितीच्या एकंदर परिणामानें, लहान मोठ्या मुलांना उघडी टाकून निघून गेली !...धाकूला जबर धक्का बसला !....



पण त्यापेक्षां आतां तिच्या उत्तरक्रियेची व्यवस्था कशी करायची हीच चिंता त्याला जास्त डंवचूं लागली ! !...

...बिचारीचा देह जाळण्यासाठीं लागणाऱ्या लांकडांची, जेमतेम व्यवस्था करण्यासाठींच, इतरांनीं दिडकी दोन दिडक्या वर्गणी करून तरतूद केली !...

या दुःखामुळें झुंडींतल्या धाकूचें व्यक्तित्व जागें झालें !....

...बायकोचा शेवटचा निरोप घेऊन परत येतो तों मजुरांची जंगी सभा व मिरवणूक असल्याचें त्याच्या कानीं आलें.

सभेच्या ठिकाणीं पुष्कळ लोक जमले होते....वक्ते पुढारी म्हणत होते,.... "हें वर्गयुद्ध असेंच चालायचें !...भांडवलशाही नादान झाली आहे ! !.... तिला वठणीवर आणावयास संप असाच जोरानें पुढें चालला पाहिजे ! ! !..."

धाकूच्यानें आतां राहवेना; तो मोठ्यानें ओरडून म्हणाला, "साहेब, आमकां तुमचा–तां काय तां समजणां नाय !....बायकोपोरां मेलीं मगे मागून काय करूचा तां युध ?...निसत्या शब्दान् काय आमची पोटां..."

त्याला कोणीं मागें खेंचून बसवलें. पुढाऱ्यांच्या बोलण्याला अडथळा होऊं नये अशी पुष्कळांची नेहमींच इच्छा असते !... आणि भाषण पुढें सुरू झालें....

* * *

दोन दिवसांनंतर—

जगांतल्या न्याऱ्या विषमतेला कंटाळून, उपासमारीमुळें, मेलेल्या आपल्या तीन वर्षांच्या पोराला मूठमाती दिल्यावर, धाकू दुःखित अंतःकरणानें परत येत होता !...त्या उपाशीं कामगाराच्या दुःखी अश्रूंची किंमत लाखांनीं मोजण्यासारखी असली तरी ते धुळींत मिसळत होते ! !...

...मोटारी धांवत होत्या !...ट्रामगाड्या फिरत होत्या ! ! ....जगाचें व्यक्तीच्या सुखदुःखाकडे लक्ष नसतें !....आणि गाडें असेंच अव्याहत चालू रहातें ! !....

दुःखित अंतःकरणानें आपल्या शून्य घरांत शिरतो इतक्यांत रस्त्यावरून जाणारा एक वर्तमानपत्रवाला पोऱ्या ओरडूं लागला.

"कामगारांची मिरवणूक पोलिसांनीं लाठी चालवून मोडली !... पंधरावीस जखमी व चार इसम ठार !.... गिरणी मालकांना अटी साफ नाकबूल...कामगारांची भयंकर हलाखीची स्थिति ! !...संप मोडणार ! ! "...

धाकू ताडकन् उभा राहिला !...." संपाचा हाच उपयोग काय ?...मालकांना हृदयच नाहीं ? ?..."

दुःख, राग, हतबलपणा सर्वांमुळें त्याला रडूं कोसळलें !...

त्याला वाटलें तडक जावें व आपल्या मालकाचें निष्ठुर हृदय बाहेर फोडून काढावें !....तो आंत गेला; आपल्या मोडक्या ट्रंकांतून काबुली चाकू काढण्यासाठीं तो वांकला तोंच—

त्याच्या सहा वर्षांच्या शिवानें धांवत येऊन त्याच्या गळ्याला मिठी मारली !....

धाकूचा राग, खुनशी निश्चय सर्व जेथल्यातेथें पार विरघळून गेले !...आपण गेलों तर आपल्या पश्चात् ह्या पोरांचें !...

त्याला कल्पनाही सहन करवेना !...

त्यानें झटकन् शिवाला उचलून त्याचे पटपट मुके घेतले ! !...

* * *

तिसऱ्या दिवशीं गिरणी चालू झाल्या तेव्हां सर्व झुंडीबरोबर धाकूही पुन्हां गिरणींत काम करण्यासाठीं शिरला ! !...

पुणें; ६ जान्युआरी १९३२.

## २—ट्रॅमड्रायव्हर

**एक शब्दचित्र**

**' एकसो पऽचीस !'**

इन्स्पेक्टरच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच तुलसीदास भराभर पावलें टाकीत आपल्या ट्रॅमकडे धांवत आला. येतां येतां त्यानें एका हातांतील भेळीची पुडी आपल्या खिशांत कोंबली व उजव्या हातांतील पानपट्टी मधलें बोट व आंगठा यांमध्यें धरून तोंडांत भरीत अस्पष्ट आवाजांत ' हां साब ' असें म्हटलें.

अंगाला हिसका देऊन 'खर्रर्र'... करीत त्यानें उजव्या हातांतील दांडा गरकन् फिरवून ब्रेक सोडले व डाव्या हातानें विजेचा प्रवाह सुरू केला. त्याची गाडी पुन्हां सुरू झाली. विरुद्ध दिशांना जाणाऱ्या दोन रुळांतील अंतर अगदीं थोडें परंतु आजपर्यंतच्या अनुभवानें त्याला एवढें ठाऊक होतें कीं पुन्हां सर्व गिरकी मारल्याशिवाय त्याला म्युझिअमकडे येतां येणें शक्य नव्हतें. त्यानें उजव्या हाताच्या बोटावर घेतलेल्या चुन्यांतील बराचसा भाग जिभेवर व दांतांवर लावून सबंध पट्टी दोनतीनदां चघळून पिचकन् पिंक टाकीत, राहिलेला चुना एका फटींत पुसला. एंजिनमध्यें कोळसा भरल्यासारखें झालें. त्याची ट्राम भराभर जाऊं लागली. सांधा देणाऱ्या पोऱ्यानें पुढच्या ट्रामचा सांधा अझून बदलला नव्हता. तुलसीदास आपल्याच विचारांत गढलेला असल्यामुळें ट्राम अगदीं जवळ जाईपर्यंत त्याच्या तें लक्षांत आलें नाहीं. पण 'साला !' म्हणून तोंडानें शिवी हांसडीत त्यानें ट्राम जेमतेम थांबविली. पोऱ्यानेंहि त्याच्याकडे मोठे डोळे करीत सांधा बदलला; पण लागलीच त्याला अपशब्द बोलल्याचें वाईट वाटलें. दोघेही नोकरच ! दोघांच्याही पाठीमागें सारखींच कामें ! !

त्याची ट्राम भराभर स्टँड्र मागून स्टँड्र टाकीत पुढें चालली होती. प्रत्येक ठिकाणीं किती लोक चढत होते, किती उतरत होते; पण तुळसीदास बिचारा जागच्या जागींच आळीपाळीनें ट्राम उभी व चालू करीत उभा होता. भर रस्त्यांतून तो जात होता, पण त्यावर पाय टाकायची त्याची प्राज्ञा नव्हती. भर गर्दींतून तो जात होता, पण तो निर्जन अरण्यांत जखडून टाकल्यासारखा होता.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या बँकांत पैशाच्या घडामोडी चालल्या होत्या, पण याचा हात चक्राशीं खिळून राहिला होता. हॉटेलांत लोक 'चाय' पितांना दिसत होते, पण त्याला चहा प्यावयास खालीं उतरतां येणें शक्य न्हतें... ट्राममध्येंही बरेच लोक बसले होते. त्यांतले कांहीं लोक फिरावयास जात होते; कांहींना कामें साधावयाचीं होती; कांहींना गाडी पकडावयाची होती; कांहीं करमणुकीसाठीं सिनेमाचे 'शो' पहावयास जात होते त्या सर्वांना तो आपापल्या कामांत मदत करणार होता. तो स्वतः मात्र स्थिर होता. हेच विचार नेहमीं त्याच्या मनाला त्रास देत असत.

कामगिरीवरून संध्याकाळीं ८॥ वाजतां सुटका होणार होती, त्याला भूक तर सपाटून लागली होती. घराची आठवण झाली. बोरीबंदरपासून धोबीतलावापर्यंत त्यानें ट्रामबरोबरच आपलें मनही स्वैर सोडलें. त्याच्या मनांत पुष्कळ विचार येऊं लागले. स्वतःची बायको, स्वतःचीं मुलें.......पण छे...नकोत ते विचार ...आपलें कर्तव्यकर्म राहावयाचें बाजूला! या विचारानेंच जणूं काय त्यानें धोबीतलावाजवळ ट्रामला व आपल्या विचारांनाही खीळ घातली.

'चार मिनट देर काय कू?' इन्स्पेक्टरनें त्याला आपल्या हातांतील टाईम-टेबलकडे पहात विचारलें.

'बहुत गर्दी थी साब!'...तो म्हणाला व कंडक्टरनें त्याला दुजोरा दिला. इन्स्पेक्टरनें थोडेंसें गुरगुरतच शिट्टी फुंकली. तोही नोकरच; पण एकमेक एकमेकांना ओळखत नसतात. असे किती तरी प्रसंग आले असल्यामुळें तुलसीदासलाही असल्या गुर्मीची संवय झाली होती. त्याची ट्राम पुढें सुरू झाली.

असा पुष्कळ वेळ गेला. त्याची ट्राम भरभर पुढें जात होती, त्याचे हातही यंत्राप्रमाणें पुढें मागें होऊन तिला व्यवस्थेशीर घेऊन जात होते. पण त्याच्या मनांत कितीतरी निरनिराळे विचार येत जात होते. बिचाऱ्यांना सुट्टी म्हणजे काय चीज असते तें समजतसुद्धां नाहीं. सुट्टी बऱ्या लोकांकरितांच असते. ओळखीच्या लोकांना भेटावयास त्याला कोठून वेळ मिळणार. त्याचे कांहीं कांहीं नातलग दुसरी ट्राम घेऊन विरुद्ध दिशेनें येत, त्या वेळीं सलाम होत असेल तेवढाच. त्या वेळचें तें हास्यमुख दिसण्याचा किंवा तो एखादा अस्पष्ट शब्द, पुन्हां ऐकण्याचा केव्हां प्रसंग येईल तें नक्की सांगणें कठीण!

ट्राम परत फिरली. तोच कंटाळवाणा प्रवास पुन्हां सुरू करण्यापूर्वी त्यानें खिशांतील भेळ भराभर बोकणली व नवी पट्टी आणि चुना यांनीं तोबरा भरून



घेतला. तोंपर्यंत ४।५ मिनिटें होऊन त्याला परत निघावें लागलेंच. सर्व पूर्वीप्रमाणेंच चाललें होतें.

* * *

'अरे, अरे क्या करता है' असें म्हणतां म्हणतां शेवटीं त्याची ट्राम त्या मोटारीवर आपटलीच. तरी त्यानें विजेचा ब्रेक लावला म्हणून बरें! नाहीं तर मोटारचा चुराडाच व्हावयाचा! लोक भराभर उतरून जाऊं लागले. 'साब साब' करीत त्यानें दोघां चौघांची साक्षीसाठीं गयावया केली, परंतु प्रत्येकजण जबाबदारींतून पळत होता. खरें पहातां चूक मोटारवाल्याची होती. तुलसीदास ज्या रस्त्यानें जात होता त्याची डागडुजी चालली होती. कांहीं भाग खणून ठेवला होता. मोटारवाले दोघे युरोपिअन असल्यामुळें व त्यांनी बरीचशी 'ठांसली' असल्यामुळें त्यांना काळोखांत तें बरोबर दिसलें नाहीं. ते जोरानें दुसऱ्या बाजूस निघून जात असतां खड्ड्यांत अडकून पडले, व तुलसीदासाची ट्राम त्यांच्यावर आपटली. नशीब त्यांचें! त्यांना कोणाला फारसें लागत नाहीं. मेले असते तर बोललेच नसते; पण जिवंत असल्यामुळें आतां त्यांना जोर येऊन सर्व प्रकारची जबाबदारी ते तुलसीदासवर ढकलूं लागले.

प्रवाहपतित तुलसीदास! त्याला असले कटु अनुभव पुष्कळ वेळां आले होते. त्याला साक्षिदार कोणीच मिळेना. प्रत्येकानें पाहिलें होतें; पण जबाबदारी न् दगदग म्हटली कीं आमच्या लोकांच्या कपाळाला आंठ्या पडतात. बऱ्याच वेळानें याला एक दयाळू इसम साक्षिदार मिळाला, व त्याची ट्राम चालू झाली.

बिचारा गरीब होता. असल्याच लोकांच्या चुकांबद्दल त्याला दोनतीन वेळां दंड झाला होता. त्यांतून युरोपिअनांच्या विरुद्ध म्हणजे हटकून अपयश! म्हणूनच तो मनांत फार चरकला होता.

या गडबडींत त्याचा वेळ तर जास्त गेलाच, पण एक नवी चिंता उराशीं लागली.

नेहमीं असेंच चाले. त्रासाशिवाय काय मिळणार?

याला जगांत रहाण्याचें साधन मिळविण्यासाठीं, जगांत असूनही, जगांत नसल्यासारखेंच रहावें लागत होतें!!

नासिक, मे १९३०

(प्रसिद्धी—'प्रगति')

# ३–गणपत शिपाई !

**एक शब्दचित्र**

म्हातारा बाकी जरा गमती होता. होती वामनमूर्तीच ! पण सरकारनें त्याला दिलेलीं आभरणें त्याला खुलून दिसत असत. तें तांबडें झोंकदार पागोटें, पांढरा शुभ्र अंगरखा, पायांत पांढरी पाटलोण, कंबरेला गुंडाळलेलें उपरणें ! या सर्व इतमामावर त्याच्या छातीवर रुळणारा तांबड्या बनातीवरील 'Hawaldar' (हवालदार) म्हणून लिहिलेला बिल्ला जास्त प्रामुख्यानें दिसे. गणपतचे केस जरी रुपेरी झाले होते तरी त्याचा चेहरा साधारण वाटोळासा असल्यामुळें डोक्यावरील पगडीनें तो जास्त गंभीर दिसत असे. तो कॉलेजच्या व्हरांड्यांतून डुलत डुलत चालूं लागला म्हणजे त्याच्या कानांतील पितळेच्या का सोन्याच्या बाळ्या लुडलुड हलत असत. नेहमीं चालतांना तो उजव्या हातानें आपला पट्टा ओढी व डाव्या हाताच्या आंगठ्यानें डाव्या खांद्यावरून खालीं सरकणारा भाग खांद्याच्या बाजूला वर ढकली. मधून मधून तो आपल्या बिल्ल्यावरून हात फिरवून त्याला साफ करी. इतक्या वारंवार त्यावरून हात फिरविण्याची वास्तविक कांहीं गरज नव्हती. पण ती त्याला संवयच लागून गेली होती. ती इतकी कीं, साहेबानें हांक मारली कीं तो दोन हातांनीं आपल्या डोक्यावरील पागोटें वरखालीं करी व नंतर छातीवरच्या बिल्ल्याकडे पहात, साफ करीत करीत धावे.

कॉलेज चालू असतांना त्याचें दर्शन म्हणजे आम्हांला देवदर्शन वाटे. प्रोफेसरांची बडबड तासाच्या शेवटाशेवटाला असह्य होत असे. अशा वेळीं आम्ही गणपतची मोठ्या आशाळभूतपणें मार्गप्रतीक्षा करावी व त्यानेंही बिचाऱ्यानें आमचा पाठिराखा होऊन आमच्या कैवारासाठीं धांवत यावें. कांहीं वेळां तो ठरलेल्या वेळाच्या आधींच येई. त्या वेळीं आनंद होई. पण कांहीं वेळां 'कां मनिं धरिली अढी ?' असा प्रश्न विचारावासा वाटे.

त्याच्या हातांतील लोखंडाचा रूळ किती नवीन लाटा उठवून देई. त्यानें केलेला 'ठण्, ठण्, ठण्, ठण्, ठण्,' असा आवाज आमच्या आशाळभूत कानांना किती मधुर वाटत असे. एकदां तें त्याचें काम झालें कीं तो पुन्हां तासभर येत नसे. दर तासाशेवटीं तो एकदां दर्शन देई.



मधल्या दहा मिनिटांच्या सुट्टींत प्रत्येक प्रोफेसराकडून तो हजेरीचे कागद जमवी. त्यावेळीं त्याच्याकडे संधान बांधल्यास बहुतेक गैरहजरांच्या हजेरीचें काम होई. कॉलेजच्या मासिकाच्या दोनचार प्रती मारावयास त्याची मदत लागे. आणि तसा तो 'सरळ' असल्यामुळें वाटेल त्याच्या उपयोगींही पडे. मात्र याचा वचपा पोस्ताच्या वेळीं तो पूर्णपणें काढी. तो प्रत्येक बाबतींत 'मनुष्य' पाहून काम करी. आणि त्याला या कामीं इतक्या वर्षांचा अनुभव फार उपयोगी पडे. प्रिन्सिपॉलकडे भेट घ्यावयास सोडतांना, कॅलेंडरें, हँडबुकें पहायास देतेवेळीं किंवा वर्षाअखेर जुन्या प्रश्नपत्रिका वाटतेवेळीं तो या तऱ्हेची निवड फार उत्तम तऱ्हेनें करी.

मारवाडी लोकांची व्याजाच्या वेळीं महिने मोजावयाची पद्धत व गणपतची पोस्तासाठीं सण मोजावयाची पद्धत जवळजवळ सारखीच होती. शिमग्याआधीं पुष्कळ वेळां 'शिमगापोस्त' दिलें असतांनाही सुट्टीनंतर तो होळीचं पोस्त मागावयास कमी करीत नसे. असल्या कामांत मात्र पक्षपात न करितां प्रत्येकाजवळ तो सारखेंच पोस्त मागे.

"काय रे गणपत, तूं शिकलाहेस कितीसा रे" असें त्याला जर चेष्टेनें विचारलें तर तोही तेवढ्याच गमतींत सांगे. "साहेब, किती कां शिकलेलों असेना, तुमच्या बरोबर आज कॉलेजांत आहें ना ? बस्स तर मग !" आणि मग त्याच्या 'हाताखालून' गेलेल्या मोठमोठ्या लोकांचीं नांवें घेऊन त्यांच्या बारीकसारीक गोष्टी तो रंगवून सांगूं लागे. त्यांत ज्यांनीं ज्यांनीं त्याला वेळोवेळीं पोस्त दिलें होतें, त्यांचे तो जास्त गोडवे गाई.

मुलांप्रमाणेंच जुन्या प्रिन्सिपॉल लोकांचा तो इतिहास घडाघड सांगे. सुरवातीसुरवातीला त्याला कांहीं कांहीं साहेबांनीं लाथा कशा मारल्या होत्या, पण लागलीच संध्याकाळीं थंड झाल्यावर एकदम खूष होऊन ५ रुपयांची नोट कशी अंगावर फेंकली होती वगैरे गोष्टी मोठ्यानें हंसत हंसत खुलवून सांगण्यास तो सदा तयार असे.

पण त्याच्या इतका प्रत्येकाला ऐकावयास वेळ असेच असें नाहीं.

कॉलेजमधील अमकी वस्तू केव्हां खरेदी केली, अमकें टेनीस कोर्ट केव्हां तयार झालें, क्रिकेट ग्राउंडवर कुठं कुठं झाडं होतीं, वगैरे बऱ्याच गोष्टी तो विचारल्याशिवाय सांगत असे.

पण या सर्वांपेक्षां तो वेळच्या वेळीं किंवा थोडीशी आधीं घंटा वाजवील असे म्हणूनच आम्हांला फार आवडे.

गणपतनें 'कॉलेज प्रवेश' केला त्या सुमारास त्याला झालेला मुलगा आतां २२।२३ वर्षांचा झाला होता. गणपत पुढल्या वर्षी पेन्शन घेणार तेव्हां आपला वशिला खर्च करून त्यालाही 'कॉलेजांत घालणार' असें तो पुष्कळ वेळां बोलून दाखवितो.

नासिक मे १९३०

( -प्रसिद्धि 'प्रगति')

# ४-केशवमामा.

**एक शब्दचित्र**

त्यांना 'कोणी विचारलें तर ते सांगत, 'जी. पी. ओ.' मध्यें 'क्लार्क' आहें म्हणून !... इंग्रजी अमदानींत 'कारकून' सारखे देशी शब्द फार कमी दर्जाचे धरतात ! !....

केशवमामा मागें कॉलेजांत होते, तेव्हां त्यांच्या शेजारचा विद्यार्थी, वाचनाचा व वादविवादाचा जास्त भोक्ता !....

त्याचें नेहमींचें वाक्य असे, " केशवराव, हिंदुस्थानला ध्येयशून्यतेचा मोठा रोग लागला आहे ! आणि...."

त्याच्या कटकटीला, केशवमामा कंटाळत !... पण तरी तो त्यांच्या मागें लागेच ! !

तो त्यांच्या आयुष्याचें ध्येय विचारूं लागला कीं, केशवमामा जांभई देत सांगत, " कसल्या गंभीर विषयांत शिरतां बुवा उगीच !... सध्यां ज्यूनिअर इअर आहे तोंवर मौज करून घ्यावी ! !..."

आणि मौज म्हणजे, इकडे तिकडे भटकत असणें, अर्थहीन चकाट्या पिटणें, पत्ते झोडणें, पुष्कळ उशीरपर्यंत झोंपून रहाणें वगैरे—

शेजारी मोठा चिकट होता; सीनिअरमध्येंही त्यानें केशवमामांना तोच प्रश्न केला !—पण त्यांच्यामतें, तो विचार करावयाचा वेळ यायला, अजून सबंध सीनिअर इअर जावयाचें होतें ! !

वर्षानंतर, त्यांचा शेजारी एका विषयांत नापास झाला; केशवमामा पसार झाले !

ते, त्याचें सांत्वन करावयास गेले असतां, त्यानें केशवमामांना पुन्हा तोच प्रश्न केला !....नेहमींचाच प्रश्न, पण जरा अनपेक्षितपणें आल्यामुळें, केशवमामा चपापले व गोंधळलेही ! !—

ते म्हणाले 'अजून तसं ठरलं नाहीं बुवा काय तें !—सध्यां तरी बहुतेक टर्मस् भरून टाकाव्यात म्हणतोंय् !—पुढचं मग पाहतां येईल ! !—'

केशवमामांचा तो तीन वर्षांचा सहाध्यायी व शेजारी हंसला !...

आणि थोड्या वेळानें तेही त्याच्याकडून निघून गेले !

* * *

ऑक्टोबरमध्यें पास होऊन, त्यांचा शेजारी, हिंदुस्थानांतील एक खेड्यांत शिरला !

* * *

केशव मामा, लॅटर्मस् भरण्याचा व 'युवर मोस्ट ओबीडिअंट सर्व्हंट' म्हणून, अर्ज लिहिण्याचा, धंदा करूं लागले.

शेवटीं एकदां गोळी लागली ! केशवमामांच्या वडिलांनीं खर्च केलेला वशिला लागू पडला; व केशव मामा 'जी. पी. ओ.'त पन्नासावर चिकटले !

तेव्हां लॅटर्मस् भरण्याचें त्यांना आतां कारणच उरलें नव्हतें म्हणून बंद केल्या.....

पंधरा वर्षांतील केशवमामांच्या परिस्थितींतील फरक इतकाच कीं, आतां, सात मुलांचे ते वडील झाले होते; पगार नव्वदाच्या घरांत गेला होता; आणि त्यांचे वडील, आपल्या आयुष्यांत आलेल्या नोकरीचा सर्व अनुभव, केशवमामांना सांगून, स्वर्गस्थ झाले होते !

त्यांचा बाकीचा कार्यक्रम नेहमींप्रमाणेंच अव्याहत चालू असे !

आणि डेलीपॅसेंजरचा दुसरा कार्यक्रम कार्यक्रम तो काय असणार निराळा ??...

सकाळीं उठलं कीं, ब्रश तोंडांत घालून, जवळच्या गृहस्थांकडचा टाइम्स 'पहावयाचा !' तोंपर्यंत आठ होत; चहा घेऊन जरा शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे वीस पंचवीस मिनिटें घालवावीं तों साडेआठाचा सुमार होतोच आहे !...'काय रे बाब्या, गाढवा उनाडतोयस् नुसता ?...मास्तर कांहीं अभ्यास देत नाहींत वाटतं ? अंऽ !'...वगैरे मुलांना थोडा धाक दाखवणें भाग असे; कारण नाहींतर तीं शेफारून जायचीं !...तोंच त्यांची दृष्टी घड्याळाकडे जाई; 'अरे बापरे, नवाला तीन मिनटं आहेत !...हंऽ मला अंघोळीला पाणी काढाऽऽऽ...मी हा आलोंच '...म्हणत तांब्या उचलायचा !....परत येऊन, दोन चार तांबे या खांद्यावर व त्या खांद्यावर घेईतों सव्वानवाला दोनतीन मिनिटें असावयाचीं !

येथून हिशेब मिनिटावर सुरु !....धोतर नेसून, 'हं, आटपा आटपाऽ, मला काय उपाशी पाठवायचा विचार दिसतोय वाटतं ऽ ?' म्हणून त्राग्यानें म्हणत, साडेनवाला पांच मिनिटें असेपर्यंत जेवण संपवावयाचें !...आंचवून तीन



मिनिटांत कोटटोपी चढवून, खिशांतलें खांड तोंडांत टाकीत रस्त्यावर उडी मारावयाची;...व, नऊ अडतीसपर्यंत स्टेशनवर पोंचून नऊ चाळीसची गाडी जेमतेम गांठायची !....

"हंः, काढा वामनराव तुमची बावन अध्यायीगीता !...बहुतेक हृदयाशींच असेल अंऽ ?....नकोरे ! उद्यां खेळूं झब्बू; हं चल पाहूं...हंः हंः... काय 'नोटूंप'? ....माझे 'टू रॉयल्स'....हाऽय्या गेम...पार्टनर, यांना आतां खास रबर द्यायचा ...अरेऽ...काय मसजीद आलें...आटपा आतां....संध्याकाळीं कल्याण फास्ट नाऽ ?...वाट पहा माझी...उतरा उतरा...अंऽ ? होय !...पाऽस....लेकाला आणखी तो दाखवायला कशाला पाहिजे...त्रासबुवा या मोटारींचा....हं आलंच आतां...कायरे, हेडक्लार्क आले नाहींत ना अजून ? ठीक...." अशातऱ्हेनें जाऊन ऑफिसच्या खुर्चीवर बसायचें !!

"तसं नव्हे...( गाढव आहांत !....ग्रॅज्युएट कसे झालांत ?...ही इतकी साधी चूक....) पण साहेब...माझा काय त्यांत दोष ?....किरकिरेनं तें माझ्याकडं पाठवलं...('...') नाहीं नाहीं साहेब, तें उद्यां करीन, आतां गाडी....('...') ...बऽरं...शिंचा असा त्रास देईल. बस बाबा केशवराव...चुकेल ही गाडी कदाचित्...हं, आतां घे घाल म्हणावं तुझ्या बोडक्यावर...हें पहा....हंऽ....झालंना साहेब....जातों....हो हो, त्याची नको तुम्हाला काळजी !..." अशा पद्धतीनें ऑफिसच्या बाहेर यावयाचें !

पुन्हा गाडींत 'नोटूंप' न् 'टू नलोज्'चा किंवा 'झब्बू'चा हैदोस ! "त्याला शिंच्याला कुठची हो वरली ग्रेड...त्याच्या आधीं मी आहें कीं, अन् अक्षर काय घाण लेकाचं....हेडक्लार्क नेहमीं चिडतो. म्हणतो आतां पहिलीच्या कॉपी घटवा, घ्या...ह्या हंः....हें...आज ही कल्याण फास्ट किती हळू चालली आहे....मुलुंद गेलं वाटतं....चल उतरतोस नारे पानसे...कां चिडलास वाटतं रबर दिला म्हणून....थांब इथं थोडी कोथंबीर घेतों...हंऽ...अग ऐक छबेऽ, आतां रात्रीची मस्ती काय आहे ?...ही साखर घ्या पाहूं...न ही भाजीची जुडी..." अशा तऱ्हेनें गृहप्रवेश !....यानंतरचा कार्यक्रम जेवणाचा; तोंपर्यंत नऊ सव्वा नऊ व्हावयाचे. जवळचे कोणी आलेच तर धाकट्या संदाला खांद्यावर टाकून तिला थोपटीत अर्धातास गप्पा; मग दहाच्या आंत झोंप !

सर्व कार्यक्रम कसा अगदीं 'टाईमशीर' ! जरा इकडे नाहीं कीं तिकडे नाहीं !!...

याला सणाची किंवा रविवारची सुट्टी मात्र खो घाली;...नेहमीं उठल्या दगदग धांवपळ; ती आज नाहीं म्हणून आनंद वाटे !...पण मग घालवायचा कसा सबंध दिवस हा मोठा प्रश्नच पडे !

शनिवारीं रात्रीं, जेवणानंतर, पत्त्याचा अड्डा बसायचा एक एक वाजेपर्यंत; मग सकाळीं साडे आठपर्यंत राखण !....'हो, आठवड्यांतून एक दिवस मिळायचा सारा असा ! तर तो तरी साजरा करावा !' हा विचार;....उठलं कीं तोंडधुणं चहा होईपर्यंत व्हायचे साडे नऊ, नंतर बाजारांत निघायाचं; चारसहा दुकानांत बसायचं रेंगाळत 'वेळ घालविण्यासाठीं,' वाण्याशीं गप्पा मारीत !...ठरल्या भाजीवाल्याकडून एखाद-दुसरी भाजीची तऱ्हा घ्यायची; दुसरं कांहीं खरेदी करायचं असलं तर तें करून, यायचं निवांतपणें साडेअकरा पावणेबाराच्या सुमारास घरीं ! नंतर अंघोळ जेवण म्हणेपर्यंत, पाऊण एक; थोडी वामकुक्षी होईतों होताहेत तीन सव्वातीन !...पुन्हां 'मंडळी' जमायची एके ठिकाणीं, चहा ठोंसला कीं, बसला "अड्डा" 'पोथी' सोडून ! तें थेट जेवणाची वेळ होईपर्यंत. हातानें पानें वाटण्याच्या वेळीं तोंडानें गप्पा चालावयाच्या सर्वांच्या त्या ऑफिस मधील कमीजास्त 'हेवी वर्क'च्या किंवा साहेबांच्या !...पानें वाढल्याचें छबी सांगायला आली कीं, 'चला, संपला बुवा रविवार हक्काचा !' म्हणत जांभई देत जेवायला उठायचं !....जेवणानंतर एखादं पुस्तक हातांत घेऊन झोंप येईपर्यंत अंथरुणावर लोळायचं !

सगुणाबाईंनीं ते झोपलेसें पाहिलं कीं दिवा बारीक करून, लोळणाऱ्या मुलांना, बिछान्यावर नीट करून, त्यांच्यामध्यें, चिमुकल्या मुलाला पोटाशीं घेऊन झोंपायचं !

रात्रीनंतर सोमवार उजाडला, कीं झाला नेहमींचा कार्यक्रम सुरू !!....

आयुष्यांत केशवमामांच्या या क्रमांत एकदां खंड पडला होता;...आणि तो म्हणजे सरकारनें 'रिट्रेंचमेंट'चें बंड काढलें होतें तेव्हां !...सरकारी नोकरी अगदीं निरुपद्रवी; कधीं जाण्याची भीति नाहीं ! पण सरकारच असं उलटून घात करूं लागलं तर काय करायचं ?....केशवमामांना त्या महिन्या दीड-महिन्यांत जेवणही जात नसे नीट ! पण शेवटीं केशवमामा ग्रॅज्युएट म्हणून त्यांची निवडणूक झाली फिरून, व ते कायम झाले.....

त्यांना त्या दिवशीं काय आनंद झाला; एक रुपयाचे पेढे मिळून सर्वांचीं तोंडें गोड झालीं !....

* * *



कॉलेजांतला त्यांचा शेजारी, समेटानंतर, ठाण्याच्या तुरुंगांतून सुटल्यावर, जातां जातां सहज केशवमामांकडे वळला !...त्याचा एकंदर पोशाख वगैरे पाहून त्यांना आश्चर्यच वाटलें !!...

कॉलेज मधून गेल्यापासून, तो त्या एकाच खेड्यांत रहात होता; सुरवातीला पोटापुरती शेती, वाचन, व खेड्यांतील, इच्छा असलेल्या लहानमोठ्या अशिक्षितांना, शिक्षण देणें, यांतच त्याचा वेळ जात असे.

दोन तीन वर्षांत त्यानें आपलें खेडें नमुनेदार व सुशिक्षित केलें !

हळू हळू त्यानें लहान मुलांना व्यवस्थित शिक्षण देण्यासाठीं एक संस्था चालविली. त्यांत, चाळीस पन्नास लहान मुलें, जिल्ह्यांतील निरनिराळ्या भागांतून येऊन राहिलीं होतीं. त्यांना विविध शिक्षण देण्याचें काम, तो, त्याची सुशिक्षित पत्नी व तिचा भाऊ आणि त्याचा मित्र, असे तिघे करीत. समाज-सुधारणेसाठीं लेख, लघुकथा वगैरे लिहीत असल्यामुळें महाराष्ट्रवाङ्मयसेवकांत त्याचा बराच वरचा क्रम लागूं लागला होता; एकंदर, मूक पण भरीव कामगिरीमुळें त्याला त्याच्या जिल्ह्याचें इतक्या अवधींत पुढारीपण आलें होतें.

त्या पुढील हकीकत केशवमामांपुढें दृश्यरूपानें होतीच !

त्यांनीं त्याला प्रश्न केला—एकंदर प्राप्ती वगैरे काय होते ?

तो त्यावर नेहमींसारखाच हसला !

म्हणाला, "केशवराव, हिंदुस्थान देशाप्रमाणेंच आम्ही जन्माचे दरिद्री ! व असेच रहाणार !!...माझं, बायकोचं व माझ्या एकुलत्या एका मुलाचं—तो आतां सहा सात वर्षांचा आहे—सुखासमाधानानं पोट भरतं. बायकोच्या व तिच्या भावाच्या संगतींत आनंदानें रहातों !...लहान लहान मुलांत मिसळून त्यांच्या उत्कंठा व जिज्ञासा तृप्त करावयाच्या, स्वतः वाचालिहावयाचें याला वेळही पुरेसा पडत नाहीं !...यापेक्षां मोठी कमाई म्हणजे सर्व गांवकऱ्यांचं मजवरील हृदयापासूनचं अकृत्रिम प्रेम;...हेंच आमचं दारिद्र्य व हीच आमची श्रीमंती !...ज्याला जसं वाटेल तसं म्हणावं !...."

केशवमामा वाचतच नसत तर त्याचे लेख त्यांना कुठून ठाऊक असणार ? तो बोलत होता तोंपर्यंत केशवमामा मान हलवीत 'होहो' म्हणत होते. पण तो निघून गेल्यावर ते विचार करूं लागले; त्यांना मुळींच पटेना !....

"छेः शेतांत राबायचं....धडपडायचं !...पुनः शिकवायसाठीं घसेफोड न दगदग करायचीच !!...अन् एवढें करून मिळणार काय तर म्हणतो पोटापुरतं.... आणि तें सुद्धां मोजकं मिळेलच असं कोणी सांगावं ?....गांवकऱ्यांचं नुसतं प्रेम घेऊन काय चाटायचंयू ??....

त्यापेक्षां आमची आपली सरकारी नोकरी बरी; धास्ती नाहीं, दगदग नाहीं !...महिन्याचे तीस—तीस कुठचे....सव्वीसच—दिवस छपराखालीं, शांत सावलींत, कागद खरडून उडवले कीं, महिन्याच्या महिन्याला, नव्वद रुपये, सरकार नाहीं सरकारचा बाप देईल !!"....

पुणें, २० ऑगस्ट १९३१.

# ५–सेवाधर्म

संपूर्ण गोष्ट.

'सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः'

मी बडा बापका बेटा. त्यांतल्या त्यांत एकुलता एक. माझं हें 'ज्यूनिअर' इअर असल्यामुळें मी फेब्रुआरींतच मोकळा झालों होतों. तेव्हां लागलीच वडील होते त्या गांवीं गेलों. 'धाकटे साहेब' आले म्हणून माझा साहजीकच मान होणार! आमच्या वडिलांना सरकारांतून चार शिपाई असत. बऱ्याच दिवसांनीं मी आलेलों. तेव्हां प्रत्येक शिपाई माझी बडदास्त नीट राखणारच. त्यांतच पुन्हां स्वभाव थोडा लहरी व तापट आहे हें सर्वांना माहीत होतें. त्यामुळें तसा मला तापण्याचा प्रसंग न येईल अशी प्रत्येकजण पूर्ण काळजी घेत असे.

तरी सरते शेवटीं मी गेल्या दोन तीन दिवसांत लागोपाठ दोनदां एका शिपायावर तापलों होतोंच. आजही आमच्या स्वारीची तब्येत जरा गरम झाली. कारण अगदीं क्षुल्लक होतें. मी बसलों होतों वाचीत एक गुप्तपोलिसाची कथा. कथासूत्र अगदीं रंगांत आलें होतें. ज्या दिव्याजवळ मी वाचीत बसलों होतों तो नेहमीं जेवतेवेळीं वापरण्यांत येत असे. शंकर शिपाई नेहमींप्रमाणें आला व तो दिवा उचलून घेऊन गेला. एकदम अंधार पडल्यामुळें माझ्या गोष्टीचा धागा तुटला व मला संताप आला. मी शंकर शिपायाच्या अंगावर एकदम खेंकसलों—

"बेअक्कल नाहींतर! जेवतेवेळीं सांगायला तोंड नव्हतं का? निर्लज्जपणा तुमच्या हाडींमासीं खिळलेलाच आहे का रे?"

शंकर एकदम दचकला. तो जरा चांचरतच म्हणाला, "मी सांग–सांगितलं दादासाहेब, तुम्हांला दिवा नेण्यापूर्वी! मला वाटलं तुम्हीं ऐकलं!"

आणि तें शक्यही होतें. कारण मी त्या गोष्टींत अगदीं पूर्ण रंगलों होतों. पण मोठे लोक कधीं आपली चूक मागें घेतात? मी पुन्हां जोरानें रागीट मुद्रा करून म्हटलें, "खोटं बोलतोस का? आणि हा एकच दिवा होता वाटतं तुला या सबंध घरांत?"

त्याच्यावरील हा कालपासून तिसरा भडिमार होता. त्यामुळें त्याच्या मनांत मजविषयीं तिटकारा उत्पन्न झाला असेल यांत नवल नाहीं. तरीही तो दीन मुद्रा करून म्हणाला, " पऽऽण—तोच दिवा नेहमीं......."

" पण तुझे डोळे फुटले होते का ? मी वाचत होतों तें दिसत नव्हतं तुला ? गद्धा नाहींतर— "

यानंतर त्यालाही राग येणं साहजीक होतं. पण करतो काय बिचारा ? नोकर पडला ना ! त्यांतल्यात्यांत सौम्य शब्दांत तो हळूच पुटपुटला, " माझे गरिबाचेच कशाला फुटले पाहिजेत डोळे ? "

आतां माझा पारा 'बॉयलिंग पॉइंट' वर गेला. मी रागानें ओरडून म्हणालों, "काऽऽय ? पुन्हां तोंड वर करून उलट बोलतोस ?......."

" मी काय— "

"चूप !" मी अतिशय संतापून त्याच्या अंगावर खेंकसलों. " जास्त बोलतोस का ? दम खा ! तुला बाबांना..."

मी संतापून ओरडत असल्यामुळें आवाज मोठा येत होता. बाबांची संध्या-पूजा होऊन ते माझी जेवणासाठीं वाट पहात होते. त्यांनीं माझा आवाज ऐकतांच ते पुढें आले.

"काय रे झालं सुरेंद्र ?"

" कांहीं नाहीं ! हा शंकर हो, दुरुत्तरं देतोय ! लाज नाहीं वाटत !"

" कुठं आहे तो ? आण त्याला माझ्या समोर ! " बाबा माझी बाजू उचलून धरण्यासाठीं ओरडून म्हणाले.

"चला जेवायला !" मी म्हणालों. व ती भानगड तेथेंच आटोपली.

नंतर आम्ही जेवायला बसलों. जेवतांना मी सर्व हकीकत बाबांना सांगितली. त्यावर बाबा हंसले झालं ! अन् म्हणतात काय—"वेड्या, त्याला जर तशी तुझ्या मनाजोगत्या सर्व गोष्टी करण्याची अक्कल असती तर त्यानं शिपायाची नोकरी कशाला केली असतीन् ? हें तूंच समजून घेतलं पाहिजेस नाहीं का ? "

आमचें जेवण आटोपलें. मी माझ्या खोलींत तेंच पुस्तक घेऊन पुढें वाचावयास लागलों. थोडा वेळ वाचावयाचा प्रयत्न केला, पण कांहीं लक्ष लागेना. ग्यालरींत उभा राहिलों, इकडे तिकडे फिरूं लागलों, पण मघांचा सर्व प्रसंग डोळ्यांसमोरून जाईचना. मी शंकरला वांकडें बोलल्याबद्दल माझें मन मला राहून राहून खाई. इतक्यांत खालून ओटीवरील संवाद ऐकूं आला.



" काय शंकरराव, झालं, संपलं सर्व काम ?"

" होय बाबा, एका दिवसांतून पडलों एकदांचा पार ! " निराशाजनक आवाज ऐकूं आला.

तो संवाद दोघां शिपायांत चालला होता.

मी दिवा मालवला व अंथरुणावर पडलों.

मी जितका तापट तितकाच हळव्या मनाचा ! अंथरुणावर पडल्यावर शिपाया-बरोबर झालेल्या खटक्याचा विचार पुन्हां मनांत येऊं लागला. आपण आज कांहीं तरी चूक केली आहे असें पुनः पुन्हां वाटूं लागलें. मनाच्या त्या तशा अस्वस्थ स्थितीमुळें मला झोंपच येईना. विचार करतां करतां मध्यरात्रीच्या सुमारास माझा डोळा लागला.

[२]

मी बिछान्यावर झोंपीं गेलों होतों. इतक्यांत तीन धिप्पाड, काळेकभिन्न पण पाणिदार डोळ्यांचे पुरुष माझ्या बिछान्याजवळ आले. त्यांच्यापैकीं एकानें पुढें येऊन मला जोराजोरानें हलवून जागें केलें. मी डोळे उघडून त्याच्याकडे पाहूं लागतांच तो माझ्याकडे रागीट मुद्रेनें पहात म्हणाला, " मूर्खा, उठून उभा रहा ! "

मला त्यांची अतिशय भीति वाटली. मी हळूहळू अंग चोरून त्याच्या समोर उभा राहिलों. तो माझ्याकडे बराच वेळ निरखून पहात होता. नंतर माझ्याकडून मान फिरवून त्यानें आपल्या बरोबरच्या दुसऱ्या दोघां धिप्पाड पुरुषांना खूण केली. त्याबरोबर ते पुढें आले. ते आतां काय करणार तें मला समजेना. त्याबद्दल मी विचार करीत आहें इतक्यांत त्या दोघांनीं आपल्या कमरेभोंवतीं गुंडाळलेला रांठ दोरा सोडला व ते मला जखडून बांधूं लागले. मी धडपड करूं लागलों. पण त्या राक्षसांपुढें माझें एकट्याचें काय चालणार ? मी मोठ्यानें " बाबा, बाबा, धांवा ! मला वांचवा ! ! " म्हणून ओरडूं लागलों. इतक्यांत तो मुख्य पुरुष पुढें आला व माझ्यावर मोठ्यानें ओरडून म्हणाला, " चूप रहा, विनाकारण मोठ्यानें ओरडून दुसऱ्या सज्जनांच्या गाढ निद्रेचा भंग करूं नकोस. तुझे बाबा, न् आई न् नोकर कोणीही तुझ्या उपयोगीं पडणार नाहींत. तुला आम्हीं आतां बांधून घेऊन जाणार ! "

" मला तुम्ही कोठें नेणार ?" मी घाबरत घाबरत विचारलें.

" तें तुला आपोआपच कळेल ! तुझ्याबरोबर आम्ही जास्त बोलूं इच्छित नाहीं. " तो ओरडून म्हणाला.

यानंतर मीही कांहीं धडपड किंवा आरडाओरड केली नाहीं.

मला पूर्ण बांधून होतांच त्यांच्यापैकीं एकानें मला आपल्या पाठीवर टाकलें व ते तिघेही आमच्या घरांतून बाहेर पडले. त्या मुख्यानें वर पहातांच तिघेही माझ्यासकट वर उडाले. आम्ही वर वर जाऊं लागलों. बरेच वर गेल्यावर मी खालीं पाहिलें. मला फार भीति वाटत होती. तरीही मला तेथून, चंद्राच्या प्रकाशांत दिसणारें अगदीं अस्पष्ट जग लहान दिसत होतें. आम्ही त्याही वर गेल्यावर आम्हांला खालीं ढगाशिवाय कांहीं दिसलें नाहीं. आणखी बराच वेळ वरवर गेल्यावर तो मुख्य धिप्पाड पुरुष थांबला. माझें मन स्थिर झाल्यावर मी चोहींकडे पाहूं लागलों. तों मी दुसऱ्याच एका जगांत असल्याचें आढळून आलें. मी त्या पुरुषाला विचारलें, " आपण आतां कुठें आलों ? "

तो उपहासानें हंसून म्हणाला, " तें तुला थोड्याच वेळांत आपोआप समजेल ! "

त्याच्या हंसण्यामुळें मला फार भीति वाटली. मी त्याच्याकडे केविलवाण्या नजरेनें पहातांच तो जास्तच मोठ्यामोठ्यानें हंसूं लागला. नंतर त्या दोघांनीं मला एका खोलींत कोंडून ठेवलें. मला कांहींच समजेना. विचार करकरून दमलों, पण कांहीं उलगडा होईना. बराच वेळ गेल्यावर तोच धिप्पाड पुरुष त्या खोलींत आला. माझे दोर सोडून मला त्यानें मोकळें केलें व खोलीबाहेर काढलें. त्याच्या बरोबरच्या त्याच दुसऱ्या दोन धिप्पाड पुरुषांमध्यें मला त्यानें उभें केलें. नंतर आम्ही चौघेही चालूं लागलों.

हा सर्व गांव मला अगदीं नवीनच होता. बराच वेळ चालल्यावर आम्ही निरनिराळ्या पहाऱ्यांपहाऱ्यांमधून एका उंच टेकाडावर आलों. तेथें एका झाडाखालीं, एका उच्च सिंहासनावर, एक तेजस्वी पुरुष बसला होता. तो फार म्हातारा असून त्याची दाढी व डोक्याचे लांब केंस पिकून पांढरे झाले होते. त्या मुख्य काळ्या पुरुषानें मला त्याच्या समोर उभें केलें. तो माझ्याकडे रागीट चेहऱ्यानें व निरीक्षक बुद्धीनें पाहून म्हणाला, " हाच का तो घमेंडानंदन निर्लज्ज पुरुष ? "

" होय महाराज ! "

" याला काय शिक्षा करावी असं तुमचं मत आहे ? "

" महाराज, याच्या मगरूरीमुळें तो अजून अज्ञानांत आहे ! "



" बरें तर. त्याला मी ज्ञानी होण्याच्या मार्गाला लावतों." असें म्हणून तो माझ्याकडे पाहूं लागला. तो अतिशय तेजस्वी असल्यामुळें त्याच्याकडे मला पहावेना. तरी पण मी चांचरत हात जोडून म्हणालों. " महाराज, माझा काय गुन्हा झाला आहे ? "

" तें सर्व सांगावयास मला वेळ नाहीं. तें तुला आपोआपच कळेल " तो रागानें म्हणाला.

" पण महाराज, मला क्षमा........ "

" चूप बस, क्षमेला तुझ्या सारखा नीच पात्र नसतो. तुला मोठेपणाची मगरुरी आली काय ? मी शिकवलेली समता विसरलास ? नीचा, घे तुझ्या अपराधाचें प्रायश्चित्त ! " असें म्हणून त्यानें उठून मला जोरानें लाथ मारली.

टेकडी अगदीं अरुंद असल्यामुळें, लाथेच्या धक्यानें तिच्यावरून मी खालीं पडूं लागलों. पण खालीं पहातों तों ती पूर्वीची जमीन कांहीं दिसेना. मी हवेंत गटंगळ्या खात झरझर खालीं येऊं लागलों. अतिशय वेगानें खालीं येत असल्यामुळें मला भोंवळ आली व मी बेशुद्ध झालों. पुढें बराच वेळ मला कांहीं समजलें नाहीं.

* * *

मी किती वेळानें शुद्धीवर आलों, तें सांगतां येत नाहीं. पण जेव्हां जागा झालों तेव्हां मी एका गरिबाऊ खोपटींत, गरिबाऊ खाटेवर फाटक्या घोंगडीवर पडलों होतों, असें मला आढळून आलें. मी डोळे उघडून पहात आहें तोंच एक म्हातारा शेतकरी माझ्या जवळ आला. मी हालचाल करीत असलेलों पाहून तो धांवत पुढें आला. "आलास बाबा शुद्धीवर ! बरं झालं ! ! आतां तूं बरा होशील !" तो आनंदानें म्हणाला.

थोड्याच दिवसांत मी हिंडूं फिरूं लागलों. पण माझी आठवण सर्व नाहींशी झाली होती. तथापि त्या प्रेमळ म्हाताऱ्यानें मला एके दिवशीं सर्व वृत्तांत सांगतांच मला पूर्वीची सर्व आठवण झाली.

म्हातारा एके दिवशीं शेतावरून परत येत असतां एक अगदीं निचेष्टित पडलेला अतिशय जखमी मनुष्य त्याच्या दृष्टीस पडला. त्यानें जवळ जाऊन पाहतां त्याला तो जिवंत असल्याचें समजलें. त्यानें आपल्या गांवच्या दुसऱ्या एका शेतकऱ्याच्या मदतीनें त्याला अलग उचलून आपल्या खोपटींत आपल्या खाटेवर आणून झोंपविलें. त्याला माहीत असलेली वनस्पती त्या मनुष्याच्या अंख-

मांना लावून त्याला त्यानें स्वस्थ पडूं दिलें. त्या वनस्पतीमुळें त्याच्या जखमा ५।६ दिवसांत बऱ्या झाल्या. परंतु तो अजूनही बोलत नसे. त्यामुळें त्या म्हाताऱ्याला काळजी लागली होती. शेवटीं तो १०।१२ दिवसांनीं पूर्ण शुद्धीवर आला व कांहीं कांहीं प्रश्न विचारूं लागला.

हें सर्व सांगितल्यावर, त्यानें, तो जखमी मनुष्य मीच असल्याची माहिती सांगितली. प्रथम मी दचकलों. पण नंतर मला त्या तेजस्वी पुरुषाची आठवण झाली. मला आतां समजून चुकलें कीं, मला 'देवाच्या घरीं' नेण्यांत आलें होतें. व तेथूनच मी खालीं पडलों.

थोड्या दिवसांनीं मी आमच्या गांवीं जाण्यासाठीं त्या म्हाताऱ्याकडून निघालों. एकतर मला माझ्या आईबापांना भेटावयाची इच्छा झाली होती व दुसरें म्हणजे तो म्हातारा जरी प्रेमळ होता तरी त्याच्या गरीब झोंपडींत रहाण्याचा मला कंटाळा व तिटकारा आला होता. बरीच चौकशी केल्यावर व बरेच दिवस भटकून शेवटीं मी आमच्या गांवीं आलों. तेथें आमचें घर सर्व ओसाड पडलें होतें. मी माझ्या बाबाआईची चौकशी करतां कोणीही तेथें नसल्याचें मला सांगण्यांत आलें. प्रथम मला खरेंच वाटेना, पण बऱ्याच लोकांनीं तेंच सांगतांच मला तें खरें म्हणून गृहीत धरावें लागलें.

मला सपाटून भूक लागली होती. चालण्याचा श्रमही बराच झाला होता! भर दुपारची वेळ होती!! पण जवळ फाटक्या बंडीशिवाय कांहीं नव्हतें. शेवटीं नाइलाज झाला. मला अन्नासाठीं भीक मागावी लागली.

"बाई मला कांहीं खायाला घालतां का हो?" मी एका मोठ्या बंगल्यासमोर दीन मुद्रेनें पहात व दीन वाणीनें ओरडून म्हणालों.

"धट्टा कट्टा आहेस न् भीक मागतोस? लाज नाहीं वाटत? कांहीं कामधंदा नको करायला मेल्यांना!! फुकटची मिरास टाका यांच्यापुढें!" घरांतील बाई पुढें येऊन माझ्यावर कडाडली.

मी पुढच्या बंगल्यांत गेलों. पण मला शिव्यांशिवाय कांहीं खायाला मिळालें नाहीं. तसाच रखडत रखडत मीं गांवाच्या अगदीं टोंकाला येऊन पोहोंचलों. पोटांत भूक तर सपाटून होती. पण अन्नाची आशा नव्हती. मीं एका लहानशा घराजवळ जाऊन बसलों. तहान अतिशय लागली होती. मी त्या घराच्या आवा-



रांत शिरलों व "मला पाणी तरी प्यायला देतां का हो?" म्हणून दीनवाणीनें म्हणालों. पहिल्याच हांकेला, एक सोंवळें नेसून जेवणाच्या तयारीत असलेला म्हातारा गृहस्थ पुढें आला. माझ्याकडे थोडा वेळ त्यानें निरखून पाहिल्यावर तो मला म्हणाला—

"बाळ, तूं कोण आहेस?"

"मीं एक गरीब मनुष्य आहें!" माझ्या तोंडून साहजीकपणें शब्द आले.

"बाबारे, मींही गरीबच आहें! पण तुझं तोंड असं सुकलेलं कां? तूं बराच अवधी अन्नाशिवाय राहिलेला दिसतोस. तूं आज जेवण केलें आहेस का?"

"नाहीं महाराज, मला गेल्या दोन दिवसांत अन्न मिळालें नाहीं. आज मला अतिशय भूक लागली आहे. दोनचार मोठमोठ्या बंगल्यांसमोर मी भीक मागितली परंतु कांहीं दाद लागली नाहीं; उलट जेथें तेथें अपमान मात्र झाला. म्हणूनच आणखी शोभा करून घेण्यापेक्षां न मागितलेलेंच बरें अशा विचारानें मी आपणाकडे फक्त पाणीच मागितलें!"

"वेड्या, कांहीं फिकिर करूं नकोस. जेवण झालेलें आहे. आपण आनंदानें भोजन करूं" तो वृद्धगृहस्थ मला आंत नेतांना म्हणाला.

जेवण साधेंच पण रुचकर होतें. त्याच्या बायकोलाही माझ्या जेवणामुळें आनंद झाला. जेवतां जेवतां मी त्याला म्हाताऱ्याच्या झोंपडीपासून पुढील सर्व हकीगत सांगितली. त्यापूर्वीची मला सांगावयास लाज वाटल्यामुळें मी साफ गाळली.

त्यानें सर्व ऐकून घेतल्यावर मला म्हटलें, "तुला मी शंकररावसाहेबांकडे नोकरी लावून देतों. म्हणजे तुझें सध्यां जुळेल!"

मला दुसरीकडे कोठें नोकरी मिळत नसल्यामुळें एकदम आनंद झाला, व मी त्याला 'होकार' दिला. तो संध्याकाळीं ठरवून आला. दुसऱ्या दिवशीं मी नोकरीवर रुजू झालों.

अजून मी माझ्या 'साहेबांना' पाहिलें नव्हतें. आज कांहीं कामासाठीं त्यांनीं मला बोलावलें म्हणून मी पुढें गेलों. त्यांच्याकडे पहातांच मी एकदम दचकलों. कारण तो शंकररावसाहेबांचा चेहरा आमच्या शंकरशिपायासारखा दिसत होता. स्वतः साहेब माझ्याकडे पाहतांच दचकलेले पाहून माझा संशयच दृढ झाला. माझे आतांचे 'साहेब' म्हणजे पूर्वीचा आमच्याकडील शंकरच होता.

दिवसांमागून दिवस जाऊं लागले. सारा वेळ सारखा कामांत जात असे. साहेब, साहेबांचे मुलगे, त्यांच्या मुली, कोणीना कोणी तरी मला सारखें कांहींना कांहीं तरी काम सांगत असे. अगदीं क्षुल्लक क्षुल्लक कामें मला सांगतांना पाहून मला फार वाईट वाटे व संतापही येई. पण करणार कसें ? 'नाहीं' म्हटलें तर नोकरी जाते.

प्रत्येक दिवशीं कोणीना कोणीं तरी मला बोलेच. तरी मी प्रत्येकाला संतुष्ट ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करीं. पण व्यर्थ ! आज 'असें असें' केलें नाहीं म्हणून तर उद्यां 'असें असें कां केलें' म्हणून राग व बोल हे नेहमीं माझ्या माथीं बसतच. पण करायचं काय ? निमूटपणें पुढचं काम करावं लागे ! मधून मधून असा संताप येई कीं त्या रागावणाऱ्या माणसाला खाऊं कीं गिळूं असें होऊन जाई. पण मन घट्ट करून गप्प बसावं लागे ! कां ? तर मी नोकर ! !

एके दिवशीं अशाच एका क्षुल्लक कारणावरून आमचे साहेब माझ्यावर चिडले व मला अतिशय टाकून बोलले. मला प्रत्येक वेळीं; प्रत्येक वाक्याला उलट उत्तर द्यावेंसें वाटे. पण मी पडलों चाकर न् ते साहेब ! उलट कसं बोलणार ? माझ्या मागं सेवाधर्म होता ना ! पण मला त्याचे ते अतिकटु शब्द फारच लागले. चाकर झाला म्हणून काय झालं ? त्याला धन्यासारखंच हृदय असतं ! ! पण हें मला कळतंय तसं आमच्या धन्याला कळेल तर ना ?

कसा बसा तो दिवस संपला व मला पुन्हा चोवीस तासांनंतर ४।६ तास विश्रांतीसाठीं मिळाले. त्या दिवसाच्या मला मिळालेल्या व्यर्थ बोलाबद्दल मी विचार करीत होतों. मला अतिशय वाईट वाटलें. मी रडूं लागलों. मोठ्यानें हुंदका येई. पण मला तो आवरून धरावा लागे. कारण मी पडलों चाकर ! मर्यादा उल्लंघून उपयोगी नाहीं. मी माझ्या खोलींतून बाहेर पडलों.

पुष्कळ लांब गेल्यावर मी एके ठिकाणीं रडत बसलों. मला पूर्वीचा सर्व वृत्तांत एकामागून एक आठवूं लागला.

असा रडत बसलों आहें इतक्यांत पूर्वीचा तोच पाणिदार डोळ्यांचा काळा-कभिन्न पुरुष माझ्याकडे येत असलेला मी पाहिला. पूर्वीं आलेल्या अनुभवामुळें मला त्या पुरुषाची साहजीकच भीति वाटली. मी तसाच रडत रडत पळूं लागलों. तो मला हातानें थांबण्याची खूण करून म्हणाला, "वेड्या, भिऊं



नकोस, तुला माझ्यापासून कांहींही उपद्रव होणार नाहीं. त्या वरच्या तेजस्वी पुरुषानें तुला बोलावलें आहे. यावेळीं तुला घाबरण्याचें कारण नाहीं. त्याला तुला द्यावयाचें होतें तें ज्ञान तुला पूर्णपणें मिळालें आहे."

माझा त्याच्या बोलण्यावर विश्वास बसला. मी त्याच्यासाठीं थांबलों. थोड्या वेळानें तो जवळ आला व आम्ही दोघे वरवर उडत त्या टेंकडीच्या पायथ्याशीं आलों. यावेळीं तेथें माझा बराच सन्मान झाला. मला पालखींतून टेंकडीवर नेण्यांत आलें.

पूर्वीच्याच झाडाखालीं त्याच रत्नखचित सिंहासनावर तोच वृद्ध तेजस्वी पुरुष बसला होता. मला त्यानें आलेला पहातांच जवळ येण्यास सांगितलें व आपल्या पायांजवळचें स्थान बसावयास दिलें. त्याचा हा उदारपणा पाहून माझें अंतःकरण सद्गदित झालें. तोंडांतून कांहीं शब्द बाहेर पडेना. तो माझ्या डोक्यावर हात ठेवून म्हणाला,

"सुरेंद्र, प्रत्येक मनुष्याला मी एक फार कोमल चीज सारखीच देऊन ठेवली आहे ! हें तुला पटलें ना !"

"होय ! भक्तवत्सला !"

"कोणची ती ?"

"हृदय."

"हं ! त्यांतल्या त्यांत ती चीज गरिबांकडेच जास्त दिसून येते !" तो तेजस्वी पुरुष गंभीरपणें म्हणाला.

"होय महाराज ! त्याचा मला पूर्ण अनुभव आला आहे." मी लीन होऊन म्हणालों.

"बस्स ! झालं आतां तुला ज्ञान ! आतां तरी समता ही मुख्य गोष्ट विसरूं नकोस. प्रत्येकाला हृदय व त्याच्या भावना असतात हें तुला पूर्ण पटलें ना ?"

"होय दयाघना." मी भडभडून येऊन म्हणालों.

"हें समजल्यावर तुझें निराळें असें शुभ चिंतावयास नको !" असें म्हणून त्यानें मला जवळ घेतलें व माझ्या कपाळाचें चुंबन घेतलें. मला अतिशय आनंद झाला व माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रु गळूं लागले....

* * *

"अय्या, दादाच्या डोळ्यांतून पहा पाणी येतंय !" लहानगी बबी बिछान्या-जवळ उभी राहून मोठ्यानें बोलत होती.

मी खडबडून जागा झालों.

तोंच आईही "कायरे सुरेंद्र, आज किती वेळ झोंपा काढतो आहेस ? चहा नाहीं का घ्यायचा ? माझीं दुसरीं कामं आहेऽऽत !" असें ओरडत माझ्या खोलींत आली.

मी झटकन् उठून माझ्या उद्योगाला लागलों.

धुळें, मे १९२९
( प्रसिद्धि–'प्रगति' )

# ६–माळीण

**एक शब्दचित्र.**

सकाळीं उठली कीं, ती कामाला जात असे. भांडीं घांसणें, धुणें, झाडलोट करणें, पाणी भरणें,....सर्व लहानसहान काम ती बिनतक्रार करी ! त्याबद्दल तिला पांच टिकल्या मिळत बाईसाहेबांकडून; कधीं मधीं उरलेली भात आमटी, नाहीं तर चहाचें पाणी काळेंसें !.......

दुसऱ्या एका नवराबायकोच्या बिऱ्हाडीं ती हेंच काम करी, त्याबद्दल तिला अडीच रुपये मिळत. तेवढीच घरधन्याला मदत !

पाटाचें लगीन; नवरा म्हातारासाच होता. त्याला मूलबाळ नव्हतें; हिलाही नव्हतें.

स्त्री जात म्हणजे येथून तेथून सारखी ! तेथें गरीबीश्रीमंतीचा भेद नाहीं. स्त्रीहृदयांतच मातृहृदयाचा समावेश होतो !

मोलकरीण झाली म्हणून काय झालें ? तिला मूल होण्याची का मनीषा नसणार ?

तसें पाहिलें तर तिला पहिल्या लग्नाचीं दोन तीन मुलें झालीं होतीं;....पण बिचारीला एकही लाभलें नाहीं. कांहीं अपुऱ्या वाढीमुळें, कांहीं आजारानें !.... कितीदुःख होई प्रत्येक वेळीं तिला....

शेवटीं तर कर्तासवरता, तिच्या बरोबरीचा घरधनीच निघून गेला ! ती उघडी पडली !

तिला दुःख कसें होणार नाहीं ? तिला हृदय होतेंच ! प्रेमाची कल्पना तिलाही होती ! आणि तिचें तिच्या नवऱ्यावर प्रेम होतेंही !

पण प्रेमाची महति कितीही मोठी असली तरी गरिबांच्या मागें पोटाचीही ओरड असते ! प्रेमाची किंमत त्यांना कळते; पण प्रेमासाठीं दुःख करण्याचे श्रीमंती चोंचले त्या गरिबांना कुठले पटायला !

एखादें मूल असतें तर त्याच्या आशेवर, त्याचें संगोपन करीत तिनें एकल-कोंडें आयुष्य काढलें असतें ! पण तसें नव्हतें कांहीं....

एकाकी आयुष्य, पोटाची चिंता, मूल बाळ व्हावें अशी इच्छा ! असेंच आणखी एक वर्ष सव्वा वर्ष निघून गेलें.

जवळच साधरण चाळिशी उलटलेला माळी रहात असे. त्यानें एके दिवशीं तिला आपल्याशीं पाट लावण्याविषयीं विचारलें !

त्याला, तिनें दोन दिवस विचार करून लाजत, होकार दिला ! त्यावेळीं तिला गुदगुल्या होत होत्या ! तिचें मातृहृदय जागृत झालें होतें !

तिला पुन्हां तिच्या आयुष्यांत गोडी वाटूं लागली.

थोड्या दिवसांनीं पाट लागला. ती आतां माळ्याची बायको म्हणून ‘ माळीण ’ झाली !

घरधन्याच्या मदतीला, ‘ माळणी ’नें, मोलकरणीचें काम घेतलें !....ती आनंदानें करी तें !

*    *    *

हल्लीं माळीण जास्तच आनंदांत असे !

कामें पूर्वीपेक्षां जास्त उत्साहानें करी !

गेल्या तीनचार महिन्यांत तिनें बाईसाहेबांकडून एखाद्या दिवसाचीही रजा घेतली नव्हती. बाईसाहेबांच्या लक्षांत आलें होतें तें.

“ कागऽमाळणे ? खरं का ? ” त्यांनीं एक दिवस विचारलें.

“ होय, बाईसाहेब ! ” माळीण लाजत म्हणाली.

“ किती महिने झाले ग ? ”

“ पांचवा सरल आतां आठ दिसान् ! ”


माळणीचें अंग सांगतांना थरारत होतें. तिला खराखुरा आनंद होत होता ! तिच्या आयुष्याला पुन्हां ओलावा आला ! तिच्या हृदयांत आशा खेळूं लागली ! आईच्या प्रेमाच्या पान्ह्याची तिला जाणीव होऊं लागली होती !

भांडीं घासतांनां लहानसा गड्डू दिसला कीं ती मनाशीं म्हणे, “ माझ्या बाळाला मी असाच घेऊन देईन ! ”

झाडलोट करतांना, लहान मोठ्या बाहुल्या, बुडकुल्या उचलून ठेवतांना तिचे तशाच तऱ्हेचे विचार चालत !

बाईसाहेबांचा लहानगा बाबू, चेंडू खेळतांना दिसला कीं तिच्यापुढें सुखस्वप्नें उभीं रहात. हातांतली केरसुणी तशीच हातांत......

अडीच रुपये देणाऱ्या जोडप्याकडचे कपडे धुतां धुतां तिच्या हातीं झबली आली कीं तिचें वृक्षस्थळ वरखालीं होई !




“ बराच वेळ झाला तरी, ती तें झबलें पाण्यांत बुचकळत होती; तिच्या हातावर तिचा ताबा नव्हताच मुळीं ! ”

[ पान १२४ ]

दळण दळतांना लहान मुलांवरील ओव्याच म्हणत असे ती !

तिचें काम आपलें यंत्रासारखें चाले ! लक्ष कोठें दुसरीकडेच !!

* * *

काम संपलें कीं घरीं जाई; हल्लीं तिला झबलीं शिवण्याची आवड उत्पन्न झाली होती !

जुनेरेंच नेसलेली, ठिबक्याच्या जाड तांबड्या फडक्याचा पदर घेतलेली ती, हातांत सुईदोरा न् साध्याशा कापडाचे बारीक बारीक तुकडे घेऊन बसलेलीच सदा दिसावयाची घरीं ! रात्रीच्या वेळीं, मिणमिण पेटणाऱ्या घासलेट तेलाच्या डबड्याजवळ, झबले शिवण्यासाठीं हातांकडे एकाग्र दृष्टि केलेला, मोहक, काळा-सावळाच पण फिक्कट असा तिचा चेहरा मोठा गमतीदार दिसे !

* * *

"ताईसाहेब, एवढी मशीन मारून द्याना !" ती बाईसाहेबांच्या मोठ्या मुलीकडे एकादेवेळीं काकुळतीनें सांगे !

हातानें शिवलेलीं चारपांच चिमुकलीं झबलीं न् दोन तीन टोपरीं झालीं तरी तिची तृप्तता झाली नव्हती ! बाईसाहेबांकडच्या शिवण्याच्या यंत्रावर दोनतीन सुंदरशीं झबलीं शिवून घ्यावींत म्हणून तिला फार वाटे ! गरिबांनासुद्धां हौस असते !!

"मुलाचा नाहीं अजून पत्ता न् किती घाई ही माळणे !" ताई थट्टा करीत, "बरं पण नांव काय ठेवणार ग ?"

माळीण नुसती हसे ! ताई तिची आणखी जास्तच थट्टा करी !

"देतें शिवून ! पण गाणें म्हणून दाखव आधीं !!" माळणीचा भसाडा आवाज ताईला ठाऊक नव्हता असें नाहीं, पण ती मुद्दाम सांगे !

तीही झबल्यासाठीं गाणें म्हणूं लागे ! पण तिचें पूर्वीचें "माळणीबाय, तुझा माळी कुठं ग्येलाऽऽ !" हें गाणें जाऊन त्या जागीं हल्लीं "माज्या सोनूऽल्याऽऽ रऽ!" हें गाणें आलें होतें !....आवाज तोच होता भसाडा, पण हृदयाच्या भावनांत फरक पडला होता !

ती रोज झबल्याचीं बोचकीं सोडी, पाही, पुन्हां बांधी ! तिच्या जिवाची सारखी गुदगुल्या करणारी धडपड चालली होती.

* * *

"अग, आतांच भांडीं घासून गेली ना ती....न् बाळंत झाली केव्हां म्हण-तेस ?" बाईसाहेबांना खरोखरच आश्चर्य वाटलें त्या बातमीचें !

दोन तास पूर्वीपर्यंत नेहमींसारखें काम करीत होती; इतक्यांत गेली केव्हां न् बाळंत झाली केव्हां ! माळणीच्या घराजवळची पोर सांगायला आली होती, ती खोटेंच सांगते असें त्यांना वाटलें !

गेले चारपांच दिवस माळणीच्या पोटांत दुखत असे थोडें थोडें ! पण तिचें श्रीमंतांसारखें कसें चालावें ?....ती नेहमींसारखेंच होईल तितकें हंसत खेळत आनंदानें काम करी ! बाईसाहेबांकडील पाहुण्यामुळें चार दिवस जास्तच काम पडलें, तरीहि तिचें हूं कीं चूं नव्हतें !....

आज सकाळीं गेल्या दोन तीन दिवसांपेक्षां जास्त दुखत होतें पोटांत, पण ती असह्य होईपर्यंत काम करीतच होती !

मग केव्हां चुटकन् निघून गेली घरीं समजलें पण नाहीं ! लांबच्या बहिणीला बोलावलें होतें मदतीला; पण ती वेळेवर नव्हतीच जवळ !

कालपासूनच झबल्या टोपऱ्यांचीं व चिरगुटांचीं दोन गांठोडीं तिनें आपल्या खाटेच्या उशाजवळ ठेऊन दिलीं होतीं !

मुलाला जन्म दिला तेव्हां तिच्या मदतीला सुईण नव्हती ! बाईसाहेबांना व ताईला आश्चर्य वाटलें !

वारेवगैरेंची व्यवस्था तिनें स्वतःच केली !! 'काय बाई; धाडस तरी !' ताई म्हणाली.

नाळ कापणें, मुलाला आंघोळ घालणें वगैरे सर्व काम पहिल्या दिवशीं तिचें तिलाच करावें लागलें. बोलावलेली बहीण दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं आली !.... माळी मदत करीत होता पाणी वगैरे तापवून देण्यांत ! पण यापेक्षां जास्त तें काय करणार तो दारुड्या ?? आणि आम्ही मोठीं (?) माणसें अशा वेळीं मदत करणें साधारणतः शक्यच नसतें !!

मुलाला झबलें टोपरें घातल्यावर तिच्या जिवाचें समाधान झालें !

काळा सावळाच होता ! पण चांगला बाळसेदार होता गुलाम ! त्याला कुशींत घेतल्यामुळें व श्रमानें ग्लानी आल्यामुळें तिला गाढ झोंप लागली !!

* * *



नवीं शास्त्रें त्यांना कशीं ठाऊक असणार ?....आणि असलीं असें धरून चाललें एक वेळ तरी तीं त्या गरिबांना अमलांत कशीं आणतां यावीं ??

माळणीचा मुलगा काळोखांतच असे.

ती त्याला जिवापलीकडे संभाळीत असे !

वारा लागूं नये म्हणून दरवाजे बंद असत. झोळींत गुंडाळलेला असे त्याला !!

तिला काय मुलगा नको होता आपला ? तिच्या दृष्टीनें व तिच्या ऐपतीप्रमाणें ती त्याची पूर्ण काळजी घेत होती !

पण काय झालें कोणास ठाऊक ! एके दिवशीं त्या चिमुकल्या बाळाला ताप आला !! कफ झाला !....आणि......

आणि त्या कोमल शरिराला दुसरीं कसलीं मोठमोठीं निमित्तें लागणार दगावा-यला ?....

दोन चार दिवसांनीं कोणीं तरी सांगितलें बाईसाहेबांना "अहो, त्या माळ-णीचा मुलगा !....चांगला गुटगुटीत होता हो !....काल गेला बिचारा !!"

त्यांना मोठें आश्चर्य वाटलें !....पण आश्चर्य वाटण्यासारखें त्यांत कांहींच नव्हतें !!

माळणीची बहीण आपलें काम संभाळून २।३ दिवसांत आली. दोनतीन दिवस माळणीकडे होती. मुलाचें वाईट झाल्यावर ती दोन दिवसांनीं घरीं निघून गेली.

माळणीला दुःख झालें ! तिनें उशालगतचीं झबल्या चिरगुटांचीं बोचकीं जवळ घेतलीं !

* * *

श्रीमंती दुःखांत व गरिबी दुःखांत फार फरक असतो. श्रीमंताकडे दुःखाला पुष्कळ दिवस पाहुणचार मिळूं शकतो ! गरिबांकडे म्हणजे एकादशीच्या घरीं शिवरात्रच !!...

माळीण महिन्यानें पुन्हां कामाला आली !

पूर्वीसारखेंच तिला सर्व काम करावें लागे. ती पायमोजेही घालीत नसे न् जोडाही नसे तिच्या पायांत. पाणी भरणेंही तीच करी स्वतः !

पूर्वीचा गड्डू घासावयासाठीं डोळ्यांसमोर धरूंही नये असें तिला वाटे !

केरकचरा काढतांना बाहुल्या बुडकुल्या उचलून ठेवण्याचें तिच्या जिवावर येई !

दळतांना ती अगदींच गप्प असे ! जी एरव्हींही फारसें बोलत नसे ती गाणें कसलें गुणगुणणार !

* * *

ती नदीवर कपडे धूत होती. धोतरें लुगडीं धुवून त्यांचे पिळे तिनें बाजूला दगडावर ठेवले होते. तिचें विचारचक्र फक्त चालूच होतें ! तिच्या हाताला धुण्याच्या कपड्यांत एक झबलें लागलें.

बराच वेळ झाला तरी ती तें झबलें पाण्यांत बुचकळीत होती. तिच्या हातावर तिचा ताबा नव्हताच मुळीं !....डोळ्यांतून अश्रु वहात होते ! पुष्कळ वेळानें तिला एकदम आठवण झाली. ती भरभर बाकीचीं धुणीं धुवून सर्व पिळे घेऊन घरीं आली !

" किती उशीर हा, माळणी ! " तिला रागाचें बोलणें ऐकूं आलें.

" झाला खरा बाईऽ ! "

काम संपवून ती घरीं आली !

बिछान्यावर—चिरगुटांवर डोकें धरून बसली !

झबल्याचें बोचकें उघडून ती पुन्हां पुन्हां एक एक उलगडून पहात होती. मुद्दाम मिशीनवर शिवून घेतलेलीं झबलीं, तिच्या हातून गळून पडलीं !

आणि त्याच वेळीं डोळ्यांतून अश्रु गळाले ! !

नासिक, ५ जून १९३१

( प्रसिद्धि–' प्रगति ' ' ज्योत्स्ना ' )

## ७–माईंचा रमेश.

**एक शब्दचित्र.**

बहिणी बहिणी बोलत बसल्या होत्या.

काळोख्या रात्रींत चंद्राची कोर शोभत होती. भोंवतीं असंख्य चांदण्या चमचम करीत होत्या. वाऱ्याच्या जोरावर काळे पांढरे ढग उंच उंच धांवत चालले होते.

वनिता वर आकाशाकडे पहात होती. द्वारकामाई आपल्याच विचारांत गढल्या होत्या.

' एवढासा चंद्र ! पण त्याच्या भोंवतीं किती तारा चकाकत आहेत ग ! '

' हं ' वनिता आकाशाकडे पहातच म्हणाली.

माईंना पुन्हां वरचा देखावा पहाण्याची इच्छा झाली. त्यांनीं वर पाहिलें तों एका काळ्या ढगानें पहातां पहातां त्या इवल्याशा मोहक चंद्राला घेरलें. हळू हळू तो ढगाआड गेला, अन् त्याच्या भोंवतालच्या चमचमणाऱ्या चांदण्याही दिसेनाशा झाल्या.

" इतक्यांतच दिसत होता कीं ग ! " माईंना एका क्षणांत बदललेला देखावा थोडासा असह्यच झाला; " न् इतक्यांत चांदण्या लुकलुकत होत्या........एक तरी दिसते आहे का पहा आतां ? सगळ्या त्या चंद्राबरोबरच त्या काळ्या ढगाच्या जाळ्यांत पडल्या !......."

बहिणीच्या मांडीवर डोकें ठेऊन वनिता आकाशांतील सर्व देखावा पहात खाटेवर पडली होती. ' पडल्या '—शब्दावरून तिला आठवण झाली—

" माई, तारा पडला म्हणजे काय होतं ? " तिनें पडल्या पडल्याच बहिणीला प्रश्न केला.

" काय पोरकट प्रश्न विचारतेस ग ?—कोणीतरी सत्पुरुष म्हणे जन्म घेतो ! " प्रश्न पोरकट म्हणून माईंनीं ठरवलें. पण त्यांनीं आपण होऊनच वनितेला माहिती सांगितली.

" अस्सं ? " तिनें प्रश्नार्थक म्हटलें.

त्या पोरकट प्रश्नाला जास्त उत्तरें देण्याचें कारण नव्हतें. पण माईंचें मनच त्यांना खाऊं लागलें !

"तारा पडतांना बोलूं किंवा बोट दाखवूं नये हो !" माई वनितेकडे खालीं पहात तिच्या केसांवरून प्रेमानें हात फिरवीत म्हणाल्या. "त्यानें त्या आत्म्याचें आयुष्य कमी होतें !"

माईंचें वाक्य संपण्यापूर्वी वनिता 'तो....' करीत आकाशाकडे पहात झटकन् उठून बसली.

माईंचें लक्ष त्याच वेळीं आकाशाकडे गेलें होतें. एक चकाकीत तारा सर्र्कन् आपला तेजस्वीपणा झरवीत खालीं येऊन घराच्या मागच्या बाजूस पडल्यासारखा त्यांना दिसला ! 'हंः—' करून त्यांनीं वनितेला दटावल्यामुळेंच तिचे 'तो–' नंतरचे शब्द तसेच तोंडांतल्या तोंडांत जिरले ! दाखवण्यासाठीं पुढें करीत असलेला हात तिनें तसाच अर्धवट मागें घेतला ! तिनें स्वतः सांगण्यापूर्वी तिचा हात व तोंड आपलीं कर्तव्यें करूं लागलीं होतीं !

"किती उतावीळ आहेस ग, वनू !" माई तिच्या स्वभावाला दोष देऊं लागल्या ! "मी सांगत होतें तरी हात पुढें करायला तुझी तयारी आपली !...."

"पण मी दाखवला का ताऱ्याकडे हात, माई ? एक चकार शब्दही नाहीं बोललें हो !" वनिता माईंकडे पहात म्हणाली.

"होय ना ?" माई तारा पडलेल्या दिशेकडे पहात म्हणाल्या, "कुठंसा पडला ग तो तारा ?"

"मी मघां विचारला प्रश्न तेव्हां तो पोरकट झाला ? न् तूं इतक्या साध्या गोष्टींचा कसून तपास लावते आहेस तो तुझा 'पोर'पणा वाटतं ? काल शेजाऱ्च्या मधूनं आपला पडलेला दांत घरावर टाकलाच आहे !" वनिता माईंकडे पहात म्हणाली व मोठमोठ्यानें हंसूं लागली.

"आचरट आहेस झालं !" माई स्मित करून म्हणाल्या.

"अन् हें बघ !" वनितेला आतां आणखी जोर आला. "तो तारा या घराच्या उजव्या बाजूच्या बिन्हाडावर पडला हो ! त्या बिन्हाडाची मालकीण तूं ! काय समजलीस ?"

"छमजलें बलं, वनुताई !" माई तिला वेडावून म्हणाल्या, "मी लहान का तूं माझी थट्टा करायला ! चावनद् नाहींतर !!"

त्यांनीं लटक्या रागानें वनितेच्या गालावर हलूच चापट मारली ! वनिता खव्याळपणें हंसतच होती.



"इतकं काय बुवा हितगुज चाललंय बहिणीबहिणींचं ?" तात्या रस्त्यावरून आंगणांत येत म्हणाले.

"अग बाई ! केव्हां आले ?" माई उठून घरांत जावयास वळून म्हणाल्या. "जेवण तयार आहे. हातपाय धुवून लागलीच पाटावर बसावं ! वनू, तूं पण चल ग ! मग मारा आपल्या गप्पा !"

वनिता खोडकरपणें आपलें सर्व बिंग तात्यांना सांगेल ही माईंना मोठी भीति वाटत होती ! तिच्या हंसऱ्या चेहऱ्याकडे पाहून त्यांच्या अंगांतून एकदम आनंदाचे शहारे येऊन गेले ! कां कोणास ठाऊक ?

आंत जातां जातां सहज त्यांनीं आकाशाकडे पाहिलें, तों पुष्कळ चांदण्या चमचमत होत्या !

* * *

आज द्वारकामाईच्या गरिबाऊ घरांत आनंद थबथबला होता ! एका खोलींत, एका खाटेवर माई पडून होत्या. त्यांचा चेहरा फिक्कट दिसत होता. डोळे थोडेसे खोल गेले होते. अंगावर पांघरूण होतें. समोरच त्यांच्या हाताच्या पांघरुणाखालीं फडक्यांत गुंडाळलेलें बोचकें होतें ! आणि त्यांतच त्यांच्या आजच्या सर्व 'आनंदाचा कंद' होता.

"कॅं हॅं ! कॅं हॅं !!" त्यांच्या 'आनंदाच्या कंदाला' वाचा फुटली ! माईंची चुळबूळ सुरू झाली. त्यांनीं त्याला जवळ ओढलें. संपलें ! एवढ्यांतच एकमेकांना एकमेकांची ओळख पटली ! तें नूतन चिमुकलें बालक आपल्या आईच्या छातीवर हात टाकून दूध पिऊं लागलें ! माईंना धन्यता वाटली !!

'काय माईसाहेब, धाकट्या साहेबांचं नांव काय ठेवायचं आपल्या ?' वनिता येऊन माईंना चिडवूं लागली. 'तो चकाकित तारा आठवतो का त्या दिवसाचा, माई ? तोच बरं हा !"

माईंना धन्यता वाटली !!

"अहो राजश्री, बघूं तरी आपलं तोंड ! हं दाखवाना !" वनिता खाटेपासून थोडी लांब उभी राहून त्याला न्याहाळून पाहूं लागली. माईंनीं त्याला तिच्या बाजूला फिरवला.

बाळ बाळसेदार होतें. लालबुंद अंग ! वाटोळें तोंड ! गोलाकार डोकें, उजेडाला दिपल्यासारखे डोळे करून तें आपले मुठी आवळलेले हात हलवीत रडूं

लागलें ! " काय रे गुलामा, कोणाला ठोंसे लगावणार हे !....अरे मला ओळखतोस का ?–मी तुझी मावशी तुला घ्यायला आलें ! "

बाळ जास्तच रडूं लागलें !

" आईलाच नसेल ओळखत तर मावशीला काय ओळखणार कपाळ ? " वनिता माईंना हिणवण्याच्या उद्देशानें म्हणाली.

" बघ हं ! आतां दाखवतें तुला आईला ओळखतो का नाहीं तें ! " असें माईंनीं क्षीण आवाजांत म्हटलें व त्याला जवळ घेतला.

त्याचें रडें कोठच्याकोठें नाहींसें झालें. तो पूर्ववत् स्तनपान करूं लागला.

माईंनीं विजयी मुद्रेनें वनितेकडे पाहिलें. ती तें सर्व दृश्य पाहून कौतुकपूर्ण हंसत होती. माईंना धन्य वाटलें !!

" नाक चांगलं तरतरीत आहे. " " काय हो, मुलगाच ना ! " ' बरं झालं बाई ! हा तरी बिचारीच्या नशिबाला लागो ! ' शेजारच्या इंदिराकाकू, सखूमावशी वगैरेंची चौकशी चालली होती !

माईच्या डोक्यांतून झरकन् कितीतरी विचार येऊन गेले ! त्यांच्या डोळ्यांपुढें त्यांच्या त्या पूर्वीच्या अशाच सुंदर मुलाची मूर्ति उभी राहिली ! बिचाऱ्याला देवानें आयुष्यच कमी घातलें होतें.

" ईश्वरा ! माझ्या या बाळाला तरी दीर्घायुषी करावयास चुकूं नकोस ! पाहिजे तर माझें थोडेंसें आयुष्य कमी केलेंस तरी चालेल ! " माई पडल्या पडल्या वर पाहून प्रार्थना करावयास चुकल्या नाहींत ! त्यांनीं आपल्या नव्या बालकाकडे पाहिलें; व त्याला आपल्या जास्त जवळ ओढलें !! जणुंकाय त्याला त्यांच्याकडून कोणी घेऊनच जात होतें !!


* * *

बारा दिवस केव्हां गेले समजलेंसुद्धां नाहीं !

बाळाला स्वतःच्या नांवाविषयीं कांहींच वाटत नव्हतें ! पण त्याचें नांव ठेवतांना कोण रुसवा, फुगवा न् काय भांडाभांड !—त्याच्या मावशीच्या मनासारखें झालें शेवटीं ! तो ' रमेश ' म्हणून जगांत ओळखला जाण्याचें ठरलें !!

त्याला त्यांत सुखदुःख कांहींच नव्हतें ! हातपाय हालवणें, आईचें दूध पिणें व रडणें याशिवाय त्याला काय कळणार ??

* * *



" ...डोक्यावरील रेशमी व वर उडणारे केस !...सर्वांना वाटे माईंचें हें शिंगरूं पुढें नांव काढणार !...त्याचें हास्यच सर्वांना वेड लावी ! "

[ पान १२९ ]

भूमिका—स्व. कु. रमेश नाईक (वय ११ महिने) (याच्या अकाली निधनावरूनच शब्दचित्राची कल्पना सुचली.)

फोटो–श्री. र. ज. सा.

रमेश आतां मोठा झाला होता !—

म्हणजे कांहीं वर्षे गेलीं नव्हतीं; आतां तो सारा अकरा महिन्यांचा झाला होता !

जगांत येऊन तो पुरता चालूंही लागला नव्हता.

आईला आपलें मूल सजवावेंसें कां वाटणार नाहीं ?

माई रमेशला कांहीं फारसें सजवीत नसत ! तें पोरच मोठें गोड होतें ! कोणचाही कपडा घातला तरी त्याला खुलून दिसे.

त्या मोठ्या व वाटोळ्या डोक्यावरील रेशमी व थोडेसे वर उडणारे केस ! विशाल कपाळ, रेखीव व कमानदार भिंवया, पापण्यांचे केस लांब असलेले, काळेभोर व वाटोळे असे विशाल पण चंचल डोळे ! सरळ व तरतरीत नाक ! वाटोळ्या फुगीर गालांच्या मोहक गुलाबी छटेंत त्याचे हासरे तांबसर ओठ मोठे सुंदर दिसत ! काळ्याभोर केसांतून हळूच डोकावणारे मोठे कान व दोन रेखीव भुवयांतील बालकांची जन्मसिद्ध हक्क असलेली तकाकणारी वाटोळी तीट यांनीं तर त्याचें मुखकमल–हो, कमलच होतें तें !–फारच खुले ! !

रमेशाला आपलें नांव समजूं लागलें होतें ! सर्वांना वाटे माईंचें हें शिंगरूं पुढें नांव काढणार ! ! पण—

' रमेऽऽश ये,' म्हणून म्हटलें कीं कोणाकडेही रमेश झांप टाकी ! दांत नसलेलें आपलें लाल गळणारें बालिश बोळकें उघडून हंसूं लागला कीं वाटे, प्रेमानें, याच्या कोंवळ्या गालावर फाडफाड फटके देऊन याला रडवावा !

" माई बघा तरी आपलं हें विचित्र ध्यान ! ! "—माईंही आपल्या लेंकराकडे प्रेमपूर्ण नेत्रांनीं व मोठ्या अभिमानानें टक लावून पहात.

रडणं बिचाऱ्याच्या गांवींही नव्हतें—पण त्यामुळेंच बापडा रडकुंडीला येई ! ! सगळ्यांना तो आपल्याजवळ असावा ही इच्छा ! पण त्या ओढाताणीमुळें त्याचे नाहक हाल होत !.......सदा हंसतमुखी पोर रडवण्यांत यश मिळल्याचा आनंद कांहीं और असतो ! आणि तो अनुभवण्याचा सर्वच प्रयत्न करीत व त्याला त्रास देत ! त्याचें रडें सर्वांना हसवी ! !

त्याच्या भोंवतालीं मुलींचा प्रेमळ घोळका पाहून त्याच्या मावशीला ' गोकुळांतील बाळकृष्णा'ची आठवण होई ! त्याचें हास्यच सर्वांना वेड लावी !

माई, त्याच्याभोंवतीं, त्याच्यासाठीं भांडणाऱ्या मुलींकडे कौतुकानें पहात राही ! त्या वेळीं मुलींच्या, एकमेकांना चाललेल्या वांकुल्या पाहून, त्यांना चतु-

थींच्या चंद्राभोंवतीं एकमेकांना डोळे मिचकावणाऱ्या तारकांची आठवण होई ! पण त्यांची दृष्टि त्यानंतर मधल्या चंद्रावरच केंद्रित होऊन त्याची पौर्णिमेपर्यंत कशी वाढ होत जाईल, या विचारांत त्या गर्क होऊन जात !!

* * *

आणि शेवटीं झालें तसेंच; त्यांच्या मनीं नेहमीं डोकावणारी भीति खरी ठरवण्याचा घाट, कोणी तरी दुष्टपणें घातलेला दिसूं लागला !

कर्तव्यानें व योग्यतेनें मोठा होणारा माणूस वयानेंही मोठा होऊं नये अशी ईश्वराची इच्छा होती ! सुंदर बीं रुजल्यावर वाढण्यापूर्वी कीटकांकडून खाल्लें जावें अशी भवितव्यता होती !!

जगन्नियंत्याचें सर्व 'परिहासेन' चाललें होतें; पण दुबळ्या जगाला तें 'परमार्थेन' वाटून अतिशय असह्य त्रास होत होता !!

'गोकुळांतला बाळकृष्ण,' 'चतुर्थीचा चंद्र'–माईंचा रमेश आज दहा दिवस आजारी होता ! आईचें हृदय क्षणोक्षणीं तिळतिळ तुटत होतें; पण कांहीं चालत नव्हतें ! बापाचें अंतःकरण धडपडत होतें, पण कांहीं उपाय नव्हता ! मावशीचें हृदय प्रेमानें उचंबळून येत होतें–पण त्या ओलाव्याचा कांहीं उपयोग व्हावयाचा नव्हता ! डॉक्टर जवळ बसले होते, पण त्यांना कांहीं करतां येणें शक्य नव्हतें !

चतुर्थीच्या चंद्राची पौर्णिमेपर्यंत वाढ व्हावयाची नव्हती ! तारा थोडासाच चमकून समूळ नाश पावणारा होता !!

* * *

रमेश सर्वांना सोडून निघून गेला !

ईश्वरानें निष्ठुर करमणुकीचा कळस केला !!

माईंच्या चांदव्याबरोबरच त्याच्या भोंवतालच्या 'इतक्यांतच स्पष्ट दिसणाऱ्या' त्यांच्या हृदयाकाशांत लुकलुकणाऱ्या असंख्य आशातारिका, काळाच्या झंझावातांत फिरणाऱ्या काळ्याकभिन्न ढगाच्या जबड्यांत गडप झाल्या ! माईभोंवतीं पुन्हां पूर्ववत् निराशांधःकार पसरला !!

रमेश जगांत थोडासाच चमकून गेला सर्वांच्या अंतःकरणांतही थोडासा चमकेल ! पण–पण–माईंच्या हृदयाची कल्पनाच करतां येत नाहीं !!

* * *



स्वतःला कटु अनुभव आल्यामुळें 'तारा पडतांना बोलूं नये किंवा त्याच्याकडे बोट दाखवून त्याला हिणवूं नये !' असें वनिता सर्वांना अगत्यानें सांगते.

ती स्वतः तर तारा पृथ्वीवर पडतांना दिसलाच, तर आपले डोळे थोडा वेळ बंद करून घेते व त्याला म्हणते, "वेड्या, क्षणभर जास्त चमकण्याच्या मोहानें जगांत उडी घेण्यासारखें त्यांत आहे तरी काय एवढें ? क्षणिक मोहाला बळी पडून, स्वतःला व दुसऱ्यांनाही दुःखी करण्यापेक्षां तेथें तसाच सतत चमकत राहिलास तर किती बरें होईल ?"

पुणें, २० डिसेंबर १९३०

# हृदय

## भाग चौथा

"अभ्रडंबरलीं ढगें किति तरी;
रविकिरणांचा चूर होतसे !
मोहोर सगळा गळुनि जातसे !
कीड पिकांवरि सर्वत्र दिसे !
गाफीलगिरी तरिहि जगावरी !!"

—केशवसुत.

# हृदय

## भाग चौथा

# १–निराळी पहांट !

संपूर्ण गोष्ट.

" मला त्या दिवशींच असा डाउट आला होता. पण तशीं सिमृटम्स मला स्ट्रॉंग दिसलीं नाहींत म्हणून मी तुमच्याकडे बोलून दाखवलं नाहीं एवढंच !" डॉ. शिणोलीकर आंतल्या खोलींतून दिवाणखान्यांत येतां येतां म्हणाले.

" म्हणजे ? केस इतकी कांहीं पुढें गेलेली नाहीं ना ?" वसंतरावांनीं जरा चांचरतच विचारलें.

" माझ्या मतें मीं तुम्हांला एवढंच सांगूं शकेन कीं, आपण आशा न सोडतां इलाज करीत रहावयाचें. तिलोत्तमाबाईंची आतांची स्थिति जरा काळजी करण्यासारखी आहे यांत संशय नाहीं. त्यांची डावी लंग अफेक्ट झालेली आहे; एवढेंच नव्हे तर तींत एक मोठी कॅव्हिटी आहे. त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट म्हणजे इतकीच कीं, राइट लंग मात्र पूर्ण निरोगी आहे." डॉ. शिणोलीकरांनीं गंभीरपणें सांगितलें.

"मग आतां अशा स्थितींत तुमचा काय सल्ला ?" वसंतरावांनीं जरा निराशेनें विचारलें.

" वसंतराव, असे एकदम निराश होऊं नका ! आपण आपल्या हातून जे कांहीं प्रयत्न करतां येतील ते करूंच. आतां त्यांत यश येणं न येणं आपल्या आटोक्याबाहेरचें आहे. मला वाटतं तुम्ही डॉ. रावांना कन्सल्ट करून तुमच्या वाइफला कुठं तरी हवा बदलावयास न्या. मात्र आतां वेळ करतां उपयोगी नाहीं. कारण ही माझ्या मतें सेकंड स्टेज आहे. ॲडव्हान्स व्हायला फारसा वेळ लागणार नाहीं. म्हणून केसची काळजी फार घेतली पाहिजे. त्यांना इच्छा होईल तें खायला द्या. मन आनंदित राहील असा प्रयत्न करा. कोणच्याहि तऱ्हेनें त्यांच्या मनाला त्रास होईल असं करूं नका. ईश्वर आपल्याला खात्रीनं यश देईल," असें म्हणून डॉ. शिणोलीकर टेबलावरील हॅट घेऊन निघून गेले.

*　　*　　*



वसंतराव एलएल्. बी. होऊन त्यांनीं सनद घेतली त्याच वर्षी, माझी बहीण तिलोत्तमा, आमच्या बाबांनीं त्यांना अर्पण केली. आमच्या ताईचें शिक्षण मराठी सहाव्या इयत्तेपर्यंतच झालें होतें, परंतु त्या मानानें तिचें ज्ञान पुष्कळ जास्त होतें. ती एखाद्या कादंबरीच्या नायिकेप्रमाणें नखशिखांत लावण्यवती नसली तरी पांच पन्नास बायकांत शोभणारी, नाकाडोळ्यानें नीटस अशी होती. अलीकडल्या शिकलेल्या मुलींप्रमाणें तिला इंग्रजी फाडफाड बोलतां येत नव्हतें, पण तिला त्याबद्दल फारसा खेदही वाटत नसे. कलाकौशल्य व गृहकृत्य यांत ती कुशल होती. तिचा स्वभाव मनमिळाऊ व प्रेमळ होता.

वसंतराव जरी अलीकडचे पदवीधर होते तरी त्यांचे विचार अगदींच अलीकडच्या पदवीधरांचे नव्हते. मुली शाळाकॉलेजांतून शिकून बाहेर पडल्या म्हणजेच त्यांना मोठेपणा येतो असें त्यांना मुळींच वाटत नसे. मुलींचें शिक्षण म्हणजे उत्तम मराठी व मध्यम इंग्रजी, गृहकृत्यांत दक्षता, लहान मुलांचें संगोपन हेंच होय असें त्यांचें प्रांजलपणाचें मत होतें. इतिहास व अर्थशास्त्र घेऊन पास झालेल्या पण ढिल्या हातानें संसार चालविणाऱ्या बी. ए. वधूपेक्षां साधारण इंग्रजी किंवा नुसतें मराठी शिकलेली पण गृहकृत्यांत हुशार व अर्थशास्त्र न शिकतां काटकसरीनें संसार करणारी तरुणीच त्यांच्या दृष्टीनें श्रेष्ठ ठरे. कारण नवें शिक्षण घेतलेल्या मुलीही, अर्थोत्पादनाऐवजीं संसाराच्या जुन्या जबाबदाऱ्याच आपल्या शिरावर घेत असल्याचे त्यांनीं पाहिलें होतें. त्यांतील बहुतेक उदाहरणांत, 'ना हें ना तें' असें होऊन, दुःखपूर्ण परिस्थितीच निर्माण झालेली त्यांना दिसली. प्रेमभावना व्यक्तीच्या सुसंस्कृत हृदयापासूनच उगम पावतात व तें वातावरणच सात्विक व सुखदायक होतें, हें त्यांना त्यामुळें जास्त पटलें. तेव्हां ताईला त्यांनीं 'पाहिल्या'वर तत्काळ पसंत केली.

कल्याणला त्यांनीं बिऱ्हाड केल्यास व वकिली सुरू केल्याला दोन वर्षें होऊन गेलीं होतीं. एकमेकांच्या स्वभावांतील साम्यामुळें त्यांचें सूत जमावयास फारसा वेळ लागला नाहीं. तें जोडपें म्हणजे एक मासलेवाईक होतें. थोड्याच दिवसांत कल्याण गांवांत वसंतरावांचा चांगलाच जम बसत चालला होता, व अशा तऱ्हेनें तीं दोघें परस्परांच्या सहवासांत आनंदानें कालक्रमणा करीत होतीं.

पण हें काळाला पाहवलें नाहीं. सुमारें एक वर्षापूर्वी आमची ताई अपुऱ्या दिवसांची प्रसूत झाली; त्या वेळीं तिला त्रास झाल्यामुळें ती कांहीं दिवस

आजारी होती. आणि त्या वेळेपासून तिचें शरीरस्वास्थ्य जें बिघडलें तें अजून कांहींना कांहीं तरी दुखण्याच्या नांवानें कायमच होतें. आतां तर डॉक्टरनें तें T. B. वर गेल्याचें स्पष्ट बोलून दाखविलें.

वसंतरावांच्या प्रेमळ हृदयांत निराशा उत्पन्न झाली यांत नवल नाहीं. परंतु त्यांनीं एकदम हातपाय गाळले नाहींत. दुसऱ्या दिवशीं ताईसह ते मुंबईस डॉ. रावकडे गेले.

डॉक्टरांनीं तिला सर्व साधनांनीं तपासून, डॉ. शिणोलीकरांच्या मताला दुजोरा दिला, व नंतर सांगितलें कीं, तिला कोठेंतरी घाटाच्या कोरड्या हवेवर ठेवून निसर्गोपचार करून पहा. प्रसन्न मन, सूर्यकिरणांचें स्नान व योग्य खुराक हींच मुख्य तीन औषधें. शिवाय त्यांनीं तिला कांहीं 'सॉल्टस्' देण्यास सांगितलीं. वसंतराव परत आले; व त्यांनीं आपल्या मित्रांना व डॉ. शिणोलीकर यांना बोलावून या बाबतींत त्यांचा सल्ला घेतला व शेवटीं तिला कार्ल्यास डॉ. भाटवडेकर यांच्या आरोग्यभुवनांत ठेवण्याचें ठाम केलें; दुसऱ्याच दिवशीं तिला एका भाड्याच्या मोटारींतून आरोग्यभुवनांत नेण्यांत आलें !

* * *

माझी बी. ए. ची परीक्षा होतांच, ताईच्या आजाराची हकीकत वसंतरावांकडून मला अगोदरच कळल्यामुळें, बाबांच्या परवानगीनें मी कार्ल्यास तिच्या शुश्रुषेसाठीं जाण्याचें ठरविलें.

कार्ल्याला जावयासाठीं मळवली स्टेशनवर उतरावें लागत असल्यामुळें व तेथें एक्सप्रेस उभी रहात नसल्याकारणानें मला पॅसेंजरचा आश्रय घ्यावा लागला. गाडी प्रत्येक स्टेशन घेत घेत आपल्या लहरीप्रमाणें डुलत चालली होती. भिलवडीसारख्या स्टेशनांत मागाहून येणाऱ्या एक्सप्रेस, मेल वगैरे गाड्यांस वाट देण्यासाठीं गाडी अर्धा अर्धा तास उभी राही. त्यावेळीं एंजिन वगैरेचा कांहीं एक आवाज येत नसल्यामुळें गाडी मढें होऊन चेतनारहित अशी पडली आहे कीं काय अशी कल्पना सहज डोक्यांत प्रवेश करी. होतां होतां संध्याकाळीं साडेसात—आठच्या सुमारास, गाडीनें एकदांचें मळवली स्टेशन गांठलें. स्टेशनवर मी, तिकिट कलेक्टर, आणखी कांहीं माणसें व मिणमिण पेटणारे कांहीं दिवे याशिवाय कोणी दिसत नव्हतें. मला रस्ता माहीत नसल्यामुळें व स्टेशनपासून सॅनिटोरिअम एक मैलावर असल्यामुळें मी एका पोर्टरलाच बरोबर नेलें. मध्यें इंद्रायणी नदी लागते ती ओलांडून गेल्यावर सॅनिटोरिअमचे



बंगले दिसूं लागतात. हे एकंदर १८।१९ बंगले आहेत. स्वतः डॉ. भाटवडेकर असतेवेळीं येथें फार उत्तम व्यवस्था होत असे. परंतु आतां तेथें फारसें अगत्य दाखविलें जात नाहीं. असो.

त्यांतीलच एका बंगल्यांत तिलोत्तमाताई व वसंतरावांच्या दोन चुलत बहिणी रहात असत. वसंतराव आपली वकिली संभाळून, दर दोन तीन दिवसांनीं तेथें जात असत. ताईला येथें आणून ठेवल्याला एक महिन्यावर होऊनहि, फारसा गुण पडला नव्हता. बोलाचालावयास घरांत कोणी नसल्यामुळें माझ्या आगमनामुळें तिला आनंद व्हावा यांत नवल नाहीं.

* * *

ती संध्याकाळची वेळ होती. डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाणें ताईकडून सूर्यकिरणस्नान करवून, तिला आंत पलंगावर पडायला लावलें होतें. जवळच मी इकडे तिकडे येरझारा घालीत खोलींतल्याखोलींत हिंडत होतों. तिला पडून पडून करमेना व काळोख झाल्यामुळें आतां वाचावयाची सोय नाहीं म्हणून तिनें मला एखादें गाणें म्हणावयास सांगितलें. माझा आवाज साधारण बऱ्यांत मोडणारा ! मी 'एकच प्याल्यां'तील मला चालीसाठीं आवडणारा गज्जल म्हणूं लागलों:—

"असे पति देवचि ललनांना ।
तयांऽसि अन्य भावना ना ॥"

"कमाल आहे त्या साध्वी सुधेची आणि तिच्यासारखें पात्र उत्पन्न करणाऱ्या त्या गडकऱ्यांची !" ताई, माझें गाणें संपतां संपतां सद्गदित कंठानें म्हणाली; ती गाण्याशीं एकरूप झाली होती !

"होय. खरेंच ! एवढे त्रास सोसूनहि त्या माऊलीनं आपल्या नवऱ्याविरुद्ध एकहि वाईट शब्द काढला नाहीं. पण माझ्या मतें म्हणशील तर हा नवऱ्याबद्दलचा फाजील आदर झाला. एवढा मुळमुळीतपणा काय उपयोगी ? डोळ्यांत झणझणीत अंजन घालावयास पाहिजे होतें."

"तसें मी नाहीं म्हणणार. ती म्हणजे एक आर्य पतिव्रतेचा मासला आहे; आणि अशा कांहीं पतीबद्दल आदर ठेवणाऱ्या आर्य स्त्रिया, आपल्यांत आहेत म्हणूनच आम्हां हिंदु स्त्रियांची पातिव्रत्याबद्दल ख्याती आहे. पण कायरे नाना ! स्टेजवर हें सर्व प्रेक्षकांच्या मनावर फार चांगला ठसा उठवीत असेल नाहीं ? मला हें नाटक पहावयाची फार इच्छा आहे."

ताईचे विचार मला मुळींच पटत नव्हते; पण तिचे ते हृदयापासून निघालेले उद्गार ऐकून कौतुक वाटलें ! !...

"महिन्या दोन महिन्यांनीं गंधर्व कंपनी मुंबईस येईल. तोंपर्यंत तूं बरी होतच आहेस. मग आपण सगळे पहावयास जाऊं एक दिवस ! " मी उत्तर दिलें.

"पुढचं पुढं ! " ताई दुसऱ्या बाजूला मान फिरवून म्हणाली.

मी विषय बदलण्यासाठीं तिला विचारलें, "ताई, तूं गडकऱ्यांची वाग्वैजयंती किंवा केशवसुत वाचला आहेस का ? "

"दोन्हीहि वाचलीं आहेत. पण मला त्यांतील बऱ्याच कवितांचा अर्थ कळलेला नाहीं. आतां मात्र, बरी झालें तर गडकऱ्यांचे सर्व ग्रंथ व केशवसुत पुन्हां मन लावून वाचणार आहें."

"अवश्य वाच. फार वेळ लागणार आहे थोडाच तुला बरी व्हायला ? महिना दीड महिना म्हणजे हद्द झाली." मी तिला धीर देण्यासाठीं मुद्दाम बोललों. नंतर तो विषय अजीबात सोडून आम्ही दुसरा कांहीं हास्यकारक विषय काढला.

* * *

कार्ल्याला महिना आनंदानें गेला. त्या अवधींत ताईच्या प्रकृतींत फारसा फरक पडला नव्हता. मात्र मी तिथें असल्यामुळें बराच वेळ कांहींतरी वादांत किंवा थट्टामस्करींत गेल्यामुळें तिला कंटाळवाणें मुळींच वाटलें नाहीं. आमची परीक्षा झाल्यामुळें आतां आम्हीं मोकळे होतों. तेव्हां आमच्या तिघांचौघां मित्रमंडळीचें दिल्ली आग्रा पहाण्याचें नक्की ठरलें होतें. ती तारीख जवळ येतांच मी ताईला सांगून व बाबांना व वसंतरावांना कळवून कार्ल्याहून निघून गेलों.

ताईला मी तशा चांगल्या स्थितींत त्या दिवशीं शेवटचीच पाहिली ! !

[२]

"मला दिल्लीहून काय आणलंस ? " माझी ताई पलंगावरील बिछान्यावर पडली होती. तिचें अस्थिपंजरवत् झालेलें शरीर बिछान्याला अगदीं खिळलें होतें. मी आलेला पहातांच तिनें अर्धवट उघडलेल्या डोळ्यांनीं मजकडे पाहून मला विचारलें.

मी दिल्लीला गेल्यावर दहापंधरा दिवसांनीं म्हणजे ता. ३० मेच्या सुमारास कार्ल्याहून सर्व रोगी आपापल्या गांवीं तेथें अतिशय पाऊस पडतो म्हणून जातात.



ताईची प्रकृतीही फारशी सुधारली नसल्यामुळें व पुढें पाऊस पडूं लागल्यावर तिला न्यावयास त्रास पडेल म्हणून त्याच सुमारास तिला कल्याणला मोटारमधून नेण्यांत आली. कल्याणला आल्यावर तिला एकदम बराच ताप आला आणि एक दोन दिवसांनंतर तर तिला एक मोठी रक्ताची गुळणी आली. त्यांमुळें ती जास्तच अशक्त झाली आणि तिच्या मनाला एकदम धक्का बसला. त्या पुढल्या आठवड्यांत तर तिला या कुशीवरून त्या कुशीवरहि हलतां येईना.

मी व माझी मित्रमंडळी आमच्या परिक्षेच्या निकालाची तारीख जवळ आल्यावरोबर प्रवासांतून परत फिरलों. मी मध्यें कल्याणला उतरलों, त्यावेळीं मी, ताई कार्ल्यालाच असेल अशी कल्पना केली होती.

घरांत जातों तों सामसूम. तितक्यांत ताई तेथें आल्याचें मला वसंतरावांकडून कळलें. मी आंत गेल्यावर तिची ती स्थिती पाहून मला एकदम आश्चर्य वाटलें. एवढ्या थोड्या अवधींत ती इतकी अशक्त होईल अशी माझी कल्पनाही नव्हती.

मला पाहतांच तिनें विचारलें, "नाना, दिल्लीहून माझ्यासाठीं काय आणलेंस ?"

मी गडबडीनें आल्यामुळें मला दिल्लीला कांहीं विकत घेतां आलें नव्हतें. पण ताईच्या प्रश्नाला कांहींतरी उत्तर देण्यासाठीं व तिची समजूत करण्यासाठीं म्हणालों, "तुझ्यासाठीं कांहीं खरेदी केली आहे. ती प्रवासांत फुटेल म्हणून मागाहून पॅक करून पाठविण्यास दुकानदारास सांगितलें आहे. ती आठदहा दिवसांत येईल."

तेवढ्यानें तिचें साधारण समाधान झालें. नंतर मी आपण होऊनच तिच्या करमणुकीसाठीं प्रवासांतील माहिती सांगूं लागलों.

इतक्यांत तिला रक्ताची गुळणी आली. मी जवळचें भांडें पुढें केलें तें दुसऱ्या गुळणीबरोबर भरून गेलें.

एवढें रक्त अंगांतून गेल्यामुळें तिला आतां जास्त अशक्तपणा वाटूं लागला, व साधारण चांगली बोलत होती ती आतां जेवढ्यास तेवढें खोल आवाजानें बोलूं लागली.

"देवाला माळ घालून धूप दाखवा " ताई खोल आवाजांत आपल्या पतिराजांना म्हणाली. ती एका हवेशीर खोलींत पलंगावर अस्थिपंजररूपानें पडली

होती. तिच्या डोळ्यांसमोरच्या भिंतींतील कोनाड्यांत विष्णूची मूर्ति ठेवली होती. डाव्या हाताकडील भिंतीला तिच्या सांगण्यावरून रामलक्ष्मणसीता या त्रिकु-टांची तसबीर लाविली होती.

गेल्यावेळीं गुळणी होऊन रक्त पडल्यापासून तिनें जवळ जवळ मौनव्रत धारण केलें होतें तें फक्त अशक्तपणामुळेंच नव्हे !

त्या दिवशीं संध्याकाळीं मी तिच्याजवळ बसलों होतों. तिनें डोळे बंद केले होते. ती झोंपली असेल या समजुतीनें मी हातांतील पुस्तक पुढें वाचीत जव-ळच्या खुर्चीवर पुन्हां बसलों.

थोड्या वेळानें मी पुन्हां ताईकडे पाहिलें तेव्हां तिच्या मिटलेल्या डोळ्यांतून अश्रु वहात होते. मी खुर्ची जरा पुढें ओढली. त्या आवाजानें तिनें डोळे उघडले व मजकडे पाहून तिनें म्हटलें, " नाना, माझ्या अगदीं जवळ बैस. "

मी तिच्या अगदीं जवळ बसलों. ताई माझा हात आपल्या छातीवर ठेवून म्हणाली, " नाना, आतां मी मरणार का रे ?"

मी झटकन् म्हणालों, " चल, तुला कोणी सांगितलं ?"

मी वरवर असें म्हणालों खरें; पण मला मनांत ब्राऊनिंगच्या 'Pros'pice' ची एकदम आठवण झाली !

" मला कोणी सांगायला का हवं ? " ती उलट म्हणाली.

पण तेव्हांपासून मात्र तिची मुद्रा गंभीर झाली. त्यानंतर तिच्या डोळ्यांत मी पुन्हां अश्रू पाहिले नाहींत.

दुसऱ्या दिवशीं तिनें घरांतील मोठी विष्णूची मूर्ति माझ्याकडून समोरील कोनाड्यांत ठेवविली व दिवाणखान्यांतील रामसीतेची तसबीर एका बाजूच्या भिंतीला लटकविण्यास सांगितली. नंतर तिनें मला वसंतरावांना हांक मारा-वयाला सांगितलें.

" जरा माझ्याजवळ बसतां का ? " वसंतराव खोलींत येतांच तिनें त्यांना विचारलें.

" तेवढ्याचसाठीं तर मी आतां आंत आलों. " वसंतराव बळेंच हंसून म्हणाले व तिच्या उशीजवळ जाऊन बसले.

" या उजव्या बाजूला येऊन बसावं. आतां मला एक गोष्ट विचारायची आहे आपणाला; विचारूं ?" ती म्हणाली.



" अलबत्. "

" माझी एक अखेरची इच्छा पुरवाल का ?"

" चल, वेडी कुठली. असं कांहींतरी बडबडूं नये." वसंतराव तिचे कपाळा-वरील केस मागें सारीत म्हणाले.

" माझी बडबड कांहींतरी असूं दे. पण आपण ' होय ' म्हणा. मग पुढं मला सांगतां येईल. "

" होय. आतां झालं—!"

" मग आपण थोडे दिवस काम बंद ठेवलंत कोर्टांतलं तर नाहीं का चालणार गडे ? आपण जिथं सध्यां बसलां आहांत तिथं सारखं बसणं होईल का ? मी सांगेन तेव्हांच इथून उठायचं !"

वसंतरावांना त्याचा अर्थ कळेना. ते ताईकडे पहातच राहिले. ते बराच वेळ बोलले नाहींतसे पाहून ताई म्हणाली, " मी हें वेड्यासारखं काय करतें सांगतें आहें असं तुम्हांला वाटणं साहजिकच आहे. पण मी तरी काय करूं ? माझी तशी वेडी समजूत आहे. पण ' होय ' म्हणा ना गडे. उद्यांपासून इथं माझ्या अगदीं जवळ बसाल ना, मी सांगितल्याप्रमाणें ?"

" हूं " वसंतराव म्हणाले.

" माझ्यापासून तुम्हांला फार त्रास होत आहे. पण मला वाटतं तो संपत आला आहे !"

" अग, असं उगीच भलभलतंच बोलूं नये !" वसंतराव तिच्या फिक्या चेहऱ्यावरून हात फिरवीत खिन्नपणें हंसून म्हणाले.

* * *

त्या दिवसापासून वसंतराव ताईच्या उशाशीं बसलेले असत. ताई आतां फारशी बोलत नसे. ती उताणी झोंपलेली असे. सकाळ झाली कीं तोंड धुतल्या-वर ती वसंतरावांकडून आपल्या कपाळाला मोठें कुंकू लाऊन घेई. नंतर समो-रच्या भिंतीवरील विष्णूच्या मूर्तीकडे बराच वेळ टक लावून बघत बसे. बराच वेळ एकाच स्थितींत रहाण्याची तिच्या अंगांत आतां शक्ति नव्हती. म्हणून आपली मान एका बाजूच्या कुशीवर वळे त्यावेळीं तिच्या डोळ्यांसमोर तिला रामलक्ष्मणांची तसबीर दिसे, व दुसऱ्या कुशीवर वळल्यावर तिला वसंतरावांचा चेहरा दिसे, अशा तऱ्हेनें सबंध दिवस जात असे. वसंतराव जेवण, अंघोळ व

जरुरीच्या कामांसाठींच फक्त बाहेर पडत. ताई सकाळ संध्याकाळ देवांची पूजा व कापूर उदबत्तीहि, स्वतःला शक्ति नसल्यामुळें, माझ्याकडून किंवा वसंतरावां-कडून करून घेई. मधून मधून हळू हळू ती तिचे पाठ असलेले तुकारामसमर्थांचे अभंग म्हणे.

दिवसांमागून दिवस गेले. तिचा हाच क्रम चालू होता. येई तो दिवस गेल्या दिवसाला चांगला म्हणे. अंगांत शक्ति मुळींच राहिली नाहीं. बोलण्यास तिला महत्प्रयास पडत. मानसुद्धां बऱ्याच वेळानें फिरवीत असे.

विकृति दिवसें दिवस वाढत होती. आतां तर कफ फार दाटला होता. डॉ. शिणोलीकरांनीं वसंतरावांना बाबांना तार करावयास सांगितलें. त्याप्रमाणें त्यांना तार करण्यांत आली.

* * *

मूल जन्माला येण्याचे वेळीं किंवा एखाद्या मनुष्याच्या मृत्यूच्या वेळीं घरां-तील माणसें आशाजनक उत्कंठेनें सारखीं क्षण क्षण मोजीत असतात. मुलगा होतो का मुलगी होते, या आनंदयुक्त आशेबरोबरच बाळंतीण सुखरूप कशी सुटते ही चिंता लागलेली असते. थोडक्यांत तो एक जन्ममरणाचा, आनंद-भीतीचा भयंकर संगम असतो. तद्वतच मनुष्याच्या मरणसमयीं माणसाच्या हृदयांत कालवाकालव होत असते. एकदां तें माणूस बरें व्हावें असें वाटतें, तर एकदां त्याचे हाल पाहून केव्हां बिचारा एकदां यांतून सुटतो असें वाटतें.

सध्यां आमचीही स्थिति तशीच झाली होती. आम्ही ताईचा या जगांतील एक एक क्षण मोजीत होतों. आधल्या दिवशीं कफ जाड झाल्यामुळें बाहेर पडेना, म्हणून शेवटची मनाची समजूत म्हणून डॉ. देशमुखांना आणण्यांत आलें. पण त्यांनीं नुसतें पाहिलें इतकेंच. जातांना त्यांनीं "आजची रात्र जाणें शक्य नाहीं. तुमचे श्वशुर आज आले तर संध्याकाळपर्यंत भेट; नाहीं तर कांहीं होणार नाहीं." असें वसंतरावांना सांगितलें. इकडे ताई पूर्ण शुद्धीवर असून मधून मधून कोणाची चाहूल लागतांच "बाबा, आले का?" म्हणून विचारीत होती व तिची समजूत करण्यासाठीं मी किंवा वसंतराव, "हो, थोड्याच वेळांत येतील." असें सांगत असूं.

रात्र झाली तरी बाबा आले नाहींत. आतां आम्हांला वाटलें कीं तिची व बाबांची भेट होत नाहीं. काळरात्रच ती! ती किती भयंकर व लांब गेली हें



सांगणें नको! ताई दोन तीन वेळां घाबरी झाली तेव्हां वेळ आला असें वाटे. पण पुन्हां ती श्वास चालवीत असे व अगदीं खोल आवाजांत मला किंवा वसंतरावांना, "बाबा आले का?" म्हणून विचारी. जागी असे त्या वेळीं फोटो-कडे, विष्णूच्या मूर्तीकडे किंवा वसंतरावांकडे सारखी पहात असे. होतां होतां ती कृष्णरात्र उजाडली एकदांची. तिची बाबांना भेटण्याची इच्छा तशीच प्रबळ होती! आतां तर ती पांच पांच मिनिटांनीं "बाबा कधीं येणार?" म्हणून विचारीत होती. इतक्यांत दारांत मोटार थांबली व त्यांतून बाबा खालीं उतरले. ते आंत येऊन ताईच्या पलंगाजवळील खुर्चीवर बसले. बराच वेळ झाला. तरी ती बाबाशीं कांहीं बोलली नाहीं. म्हणून मी तिला ते आल्याचें सांगितलें.

"नाना, पेल्यांतून थोडें पाणी आण. बाबा मला तें पाजतील." ताई म्हणाली.

बाबांच्या डोळ्यांतून पाणी आलें तें तसेंच पुसून त्यांनीं मी आणून दिलेलें पाणी तिला पाजलें. ताईचा बाबांविषयींचा आदर व प्रेम होतेंच तसें.

"बाबा, मेल्यानंतर चांगल्या माणसाचें काय होतें हो?" ताई पाणी प्याल्या-वर म्हणाली.

"तुला काय करावयाचंय त्याच्याशीं?" बाबा म्हणाले.

"पण सांगा मला!"

"तें स्वर्गांत जातें! त्याला सद्गति मिळते. त्याला पुनर्जन्म नसतो."

"हं!" ताई म्हणाली.

बाबांच्यानें तेथें बसवेना म्हणून ते बाहेर गेले.

ताई त्यानंतर कोणाबरोबर कांहींहि बोलली नाहीं. विष्णूच्या मूर्तीकडे सारखी बघत होती. थोड्या वेळानें तिचे डोळे निश्चल झाल्यासारखे झाले. तिच्या अंगाला एक मोठा झटका मिळाला. 'रा....म....' असें कांहींसें म्हणतां म्हणतां तिचा दिव्य आत्मा तिला सोडून गेला!

झालें! माझी ताई मला सोडून गेली. तिच्या सगळ्या इच्छा, सगळ्या आशा, सगळ्या वस्तु मागें राहिल्या. त्याही नश्वरच आहेत. त्या आज ना उद्यां नाश पावतील, विसरल्या जातील. पण तिचीं सत्कर्में व तिचे सद्गुण तेवढेच मागें राहतील. जगांत माणसाचें असेंच आहे. सत्कृत्येंच त्याची कीर्ति अजरामर करतात.

तिचें तें शव पहातां पहातां, मला केशवसुतांचा ‘ मरणकाळां’तील ओवी आठवूं लागल्या.

> “ जाणों तीचें लांबवावया आयुष्य आम्हीं अपुल्या
> अर्ध्या किंबहुना सगळ्याही शक्ति तिला अर्पियल्या.
> अमुच्या आशांनीं भीतीला खोटसाळ हो म्हटलें,
> तसें अमुच्या भीतींनींही आशांला ठरवीलें.
> आम्हांला ती भासे मेली जेव्हां ती निजलेली,
> आणि अहह ! निजलेली जेव्हां हाय ! हाय ! ती मेली ! !”

पण हें मी आपल्याशींच गुणगुणत असतां ‘ तिची आमुच्याहुनी निराळीच पहांट तेव्हां झाली,’ होती—

आणि वसंतरावापुढें त्या पहांटेपूर्वीचा काळोख पसरला होता !

ठाणें; जुलै १९२८.

( प्रसिद्धि—‘ प्रगति ’ )

# २—‘ तारा ’

**एक शब्दचित्र**

शेवटीं तिच्या मनाचा निश्चय ठरला !

सकाळपासून जगांतील दिवसा ढवळ्या चाललेला काळाबेरा व्यवहार पाहून, सूर्यनारायणालाही लाज वाटल्यावांचून राहिली नाहीं. आधींच निस्तेज झालेलें आपलें तोंड, त्यानें काळ्या ढगांच्या आवरणामागें झांकून घेतलें. इतकेंही करून बिचाऱ्याचें मन स्वस्थ होईना. शेवटीं वैतागून तशाच झांकल्या तोंडानें त्यानें पश्चिम डोहीं उडी घेतली; “ नको या जगाशीं संबंध ! ” तो जणूं काय म्हणाला.

त्याची आत्महत्या कोणाच्याही मनाला चटका लावण्यास पुरेशी होती. पण कठोरहृदयी जगाला काय त्याचें ? तें जवळच्या ढगांनींच व्यापलें होतें ! ढगाबाहेर दूरवर, आकाशांत हळहळणाऱ्या तारकांच्या हृदयाची त्यांना काय कल्पना ?

....तारकांच्या मनाची चलबिचल होत होती ! “ हें जग ! हाय ! हें जग दुष्टांनींच गजबजलेलें आहे काय ?”... छेः ! त्यांच्या कोमल मनाला तें असह्यच झालें ! त्यांना नकळत, त्यांच्या डोळ्यांतून खळकन् अश्रू गळाले....पण ते अश्रू हें ओळखण्याइतकी सहृदयता जगांत कोठें होती ?... वर ढगांकडे पहात ते म्हणत होते “ अरे पाऊस आला ! ”

पण ज्याची भाषा त्यालाच समजते ! हृदयें सारख्याच दर्जाचीं असावीं लागतात !....निसर्गाला तारकांची भाषा समजली !...त्यांच्या हृदयाची व्यथा त्याला जाणवली !...सारखे दुःखाचे निश्वास सोडूं लागला !....स्वार्थांतच रमलेले लोक म्हणूं लागले, “ काय वारा झोंबतोय् हो आंगाला !”

....सर्व देखावा पाहून झाडांच्या आंगावर रोमांच उभे राहिले ! त्यांचे देह गदगदां हलत होते !....पण जग स्वतःच्याच दृष्टीनें विचार करीत होतें, “ अरे, काय झाडें हलताहेत आज ! पडेल एखादं कोसळून घरावर ! ”

....फत्तराच्या डोंगराचेंसुद्धां हृदय आज द्रवल्याशिवाय राहिलें नाहीं! बिचाऱ्यांनीं रडून आकांत मांडला? शेवटीं रक्तवर्ण अश्रूही येऊं लागले.... " या गढूळ पाण्यानं नदी कशी फोंफावून चालली आहे!"...ही–ही—जगाची दृष्टी!....कठोर हृदयी जगापुढं निसर्ग काय रडणार??

पृथ्वीनेंही काळें वस्त्र परिधान केलें. तारकांच्या अश्रूंची माला चालूच होती; झाडांचें सळसळणें,....सर्व कांहीं तसेंच चाललें होतें!....मधून मधून कडकडाट होई!....वीज चमकून जगावर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न करी; पण तो फोल ठरे!....

ताराही रडत होती. घरामागच्या अगदीं एका बाजूच्या तुळशीवृंदावनाशीं ती केव्हांपासूनची उभी होती. शून्य मनानें ती चोहूंकडे पहात होती...जगावर अंधार पसरला होता तसाच तिच्या हृदयांतही तो कोंदाटला होता. तथापि आकाशांतील विद्युल्लतेप्रमाणें मनांत आशा चमकावयाची मात्र पूर्ण बंद झाली होती.

आतां गडद काळोख झाला होता. बराच वेळ ती पावसांत उभी असल्यामुळें तिचें लुगडें ओलें चिंब झालें होतें. पण त्याचें तिला भानही नव्हतें......बिचारीचें अंतरंग पेटलें होतें. त्यामुळें जणूं काय पाण्याचा तिला भासही होत नव्हता!......

साधी खेडवळच होती ती!....नाहींतर तिच्या मनांतील प्रश्नांना, जातां जातां सूर्यानें दिलेलें उत्तर समजावयास इतका उशीर लागताना!...सरलमनस्क व प्रेमळ तरुणी! बिचारी रडूनच आपल्या मनाचें थोडें फार समाधान करीत होती!....अबला दुसरें काय करणार?

हो! पण ठरलाच तिचा शेवटीं निश्चय!!....एक दोनदां शहारल्यासारखें केलेंन्!...पण नंतर लगेच चालावयास लागली!....

तिनें एकदां सभोंवार चोरट्या नजरेनें पाहिलें. सर्व माणसें घरांतच होतीं, त्या पावसापाण्याच्या काळोख्या रात्रीं तारेसारख्या दुर्दैवी स्त्रीशिवाय कोण कशाला मरायला बाहेर पडणार??....हो, तारा पण त्या रात्रीं मरायलाच बाहेर पडली होती!...तिला जगणें असह्य झालें होतें....परंतु त्याचीही बिचारीला चोरीच!...

काळोख किनाट होता!....पाऊस झिमझिम पडत होता!...तारेनें हिय्या करून झपझप पावलें टाकावयास सुरवात केली. ढोंपराएवढें वाढलेलें गवत



तुडवीत ती भराभर चालली होती, त्याचा आवाज येत होता. तिच्या हृदयाचाही धडधडाट जरा लक्षपूर्वक ऐकल्यास ऐकूं आला असता!

...वारा व त्याच्याच जोरावर पाऊस....दोघेही तिच्या अंगाशीं झोंबत होते. पण त्याची तिनें पर्वा केली नाहीं!...जातां जातां गवतांतून कांहीं सरपटत गेल्याचा आवाज तिच्या कानीं पडला! पण त्याची तिला मुळींच फिकीर नव्हती... ती थेट एक कुंपण, दुसरें कुंपण, करीत काट्याकुट्यांची, खड्ड्यांची, कशाचीही पर्वा न करतां भराभर चालली होती...भुतांखेतांची खंत बाळगावयास ती नेहमींची तारा राहिली नव्हती! तिच्याच अंगांत भूत संचारलें होतें.

मनांत चाललेल्या विचारामुळें शरीराची तिला काळजीही नव्हती! त्या शरीरालाच मुळीं ती कंटाळली होती....

शेवटीं तिला पाहिजे होतें त्या ठिकाणीं ती आली. तो अगदीं निर्जन प्रदेश होता. रातकिडे 'किर्र' करीत होते! बेडकांचीं 'लग्नें चाललीं होतीं'!...... लांबून येणारें कुत्र्यांचें भुंकणें, आपण वस्ती सोडून बरेच लांब आलों असें तिला दर्शवीत होतें!....त्यांतच पावसाच्या सरीचा मंद आवाज!....

गवत फोंफावून छातीएवढें वाढलें होतें. थंडीनें कुडकुडून झाडें अंग झाडीत होतीं; त्यांचा सळसळ आवाज येत होता. गवतामध्यें लपलेल्या त्या पडक्या विहिरीकडे तिनें आशाळभूत नजरेनें पाहिलें!

....तिला पाण्यांतही काळोखाचें प्रतिबिंबच दिसत होतें.......

ती पहात होती इतक्यांत एका बेडकानें पटकन् तिच्या पायावर उडी मारली!...तिचें अंग थरारलें! मनाचा निश्चय करून आली होती;....पण क्षणभर तिला मोह वाटल्यावांचून राहिला नाहीं...

ती एकदम भानावर आली. "लवकर आटोपून टाकलेलं बरं! नाहीं तर कांहीं विघ्न उपस्थित व्हायचं!" तिनें विचार करीत सभोंवार कोणी नाहीं अशी खात्री करून घेतली!......

लुगड्याचा ओचा नीट खोंवून पदर कमरेभोंवतीं घट्ट गुंडाळला! अंबाडा घट्ट आवळला! बांगड्या मनगटावर चढविल्या!!....न जाणों वेळींच आवाज होऊन कोणी तरी धांवून यावयाचें!...पण छे! अजून तिचें समाधान होईना! तिनें जवळचाच एक भला मोठा धोंडा आपल्या पदरांत घट्ट आंवळून बांधला!

....ती विहिरीच्या कांठावर उभी राहिली !....वर पाहून तिनें हात जोडले ! "देऽवा ! " तिच्या कंठांतून पुढील शब्द बाहेर पडेचनात !........

ती रडूं लागली....पाऊसही जोरानें पडूं लागला.......तिच्या दुःखाच्या उशासाशीं वारा 'सों सों' शब्दानें सहानुभूती दाखवीत होता !

खालीं, विहिरींतील पाण्याकडे एकदां पाहून, तिनें वर दृष्टि फिरविली. हात जोडून तिनें, अश्रूंचा पूर चाललेले आपले डोळे मिटले ! "देऽवा ! मी असं काय गेल्या जन्मीं पाप केलं होतं रे ?....कधींही प्रेमाचा शब्द ऐकावयास येऊं नये ना ? "

तारेच्या कोमल हृदयाच्या चिंधड्या होण्याची पाळी आली !...अश्रूंचा पाऊस चालला होता !...गरीब बिचारी ! प्रेमळपणाची मूर्तीच होती ! पण निर्दय जगाला तिची काय कल्पना ?...

तिच्या अश्रूंनीं डबडबलेल्या डोळ्यांत गतकालांतील अंधुक चित्रें गटंगळ्या खाऊं लागलीं. चित्रपटाप्रमाणें तीं झरझर पुढें चाललीं होतीं....

* * *

परकरी पोर असतांनाची तिची पहिली आठवण !....

"बाळ झालं ! आईला बाळ झालं ! " म्हणून नाचत बागडत शेजाऱ्यांकडे हिंडणारी स्वतःची अस्पष्ट आकृति तिच्या डोळ्यांसमोर आली ! तशाही स्थितींत तिला आनंद झाला. खरंच त्या वेळींचं न् आतांचं जग निरनिराळें का ?...पण लागलीच तिला दोन दिवसांनंतरची, आपल्या आईची बिछान्यावर स्वस्थ पडलेली पीतवस्त्रांतील मूर्ती दिसूं लागली ! त्यावेळीं ती काय भानगड होती तें तिच्या बालिश मनाला समजलें नव्हतें....पण आतां त्या प्रसंगाची आठवण होऊन तिला रडूं कोसळल्यावांचून राहिलं नाहीं..."मेली तें काय वाईट झालं ?...जगून तरी आमच्या सारख्यांनीं काय मिळवलं ?"

तिच्या मनांत विचार आले. त्यावेळीं तिचा आतेभाऊ–अण्णा–कधीं मधीं त्यांच्याकडे येत असे. त्याचीही तिला अंधुक आठवण झाली...

तिला, सबंध शरीरांतून एखादी लाट गेल्यासारखें झालें व तिचें शरीर हादरलें....

यानंतर सात साडेसात वर्षांनंतरचा प्रसंग तिच्या डोळ्यांसमोर उभा राहिला !....होय, तो तिचा लग्नसमारंभ होता....



नुकतीच ती साडी नेसूं लागली होती...नव्या साड्या नेसून दोन दिवस इकडे मिरवण्यास मिळालें यापेक्षां तिला लग्नाचें जास्त महत्त्व वाटलें नाहीं...लहानपणीं आपल्याकडे कधीं मधीं येणारा आपला आतेभाऊ अण्णाच आपला नवरा होईल असें तिला वाटलें नव्हतें !...

पण या गोष्टींचा लहानांनीं कां विचार करावा ?...वडील माणसांपेक्षां काय त्यांना जास्त कळतें ?....तिच्या बाबांनींच तें लग्न ठरविलें होतें !...

अण्णा व्हर्न्याक्युलर फायनल नापास झाला होता....कोंकण सोडून त्यांनीं मुंबईच्या जवळपास लहानसा व्यापारधंदा उभारला होता...बाबांना आपल्या भाच्याचं स्थळ बरें वाटलें !...व अण्णाच्या आईनेंही आपल्या भावाच्या मुलीला होकार दिला....मग आणखी काय राहिलें ?

झालें ! तारेचें लग्न झालें !...आतेची सासू झाली...इतके दिवसांचा आतेभाऊ अण्णा–आतां त्याचं नांव कसं घ्यायचं....नवरदेव झाला. लहानपणीं बरोबर खेळलेली माई आतां तिची नणंद झाली !

माई विधवा असल्यामुळें माहेरींच असे !...

आणि नातीं बदलल्यावर वागणुकींतही फरक झाल्यावांचून राहिला नाहीं.... अन् हें तारेला समजावयासही फारसा वेळ लागला नाहीं.

आतेचा सासुबाईपणा...प्रथम प्रथम तिला जरा चमत्कारीक वाटे, पण नंतर तो तिच्या अंगवळणीं पडूं लागला....परंतु बालपणाच्या मैत्रिणीची नणंदगिरी तिच्या प्रेमळ व खुल्या हृदयाला असह्य होऊं लागली !....वैधव्य आल्यापासून माईचा स्वभाव पार बदलला होता कीं काय नकळे !...दुसऱ्याचें सुख तिला पाहवत नसे....आपल्या वहिनीच्या मनाला व शरीराला होईल तितका त्रास द्यावयाचा जणुं काय तिनं विडाच उचलला होता !...

तिला समजूं लागलें तसतसा तिचा नवऱ्याविषयींचा आदर वाढूं लागला !.... पण अण्णाचा स्वभाव कांहीं औरच !........एककल्ली, हट्टी, तुडस, कानपिसाट.... तारेच्या अगदीं विरुद्ध !....त्या सरळ हृदयी बालिकेला तें कसं खपणार ?

तिला खुल्या अंतःकरणानें आपल्या पतीबरोबर दोन शब्द बोलावे असें कितीदां वाटे ! पण आपल्यांत साधारणतः, मुलाचें लग्न करून सून आणावयाची ती घरकामाकरितां राबावयास अशीच समजूत झालेली असते कीं काय

न कळे ! जणुं काय नवऱ्यापेक्षां त्याच्या अवांतर नातलगांसाठींच तिची घरांत जास्त आवश्यकता असते !....

अन् तारा त्याला तरी कुठें नाकबूल होती. सासूबाईंचें प्रत्येक काम तिनें मोठ्या आनंदानें केलें असतें ! तसें कां ? करीत होती कीं !...सर्वांची कामगिरी करावयास ती तयार होती !....अगदीं मोलकरणीसारखं काम कॆलं असतंन् !

पऽण....पण....तिला प्रेमाचा शब्द पाहिजे होता.

पतीच्या दोषांकडे दुर्लक्ष करावयाचं 'आमच्या आर्य स्त्रियांना' जन्मतःच माहीत असतं !...तो दोष असो, गुण असो, तारा त्याच तऱ्हेची होती. अण्णा-बद्दल किती बऱ्यावाईट गोष्टी तिच्या कानांवर आल्या होत्या. पण त्यांबद्दल ती चकार शब्दही काढीत नसे.

फारच असह्य झालें म्हणजे आपल्याशींच बसून मनसोक्त रडे !

अशीं पांच वर्षें गेलीं ! घरांतील पोशी मोलकरीण यापेक्षां तारेची योग्यता सुधारली नव्हती...फुकाचें समाधान तर राहोच, पण...तिच्या कोमल हृदयाला थडाथड धक्के देणाऱ्या गोष्टी तिच्या डोळ्यांसमोर घडत असत ! आपल्या पतीविषयीं पुष्कळ माहिती तिच्या कानीं आली. पण—त्याकडे तिनें लक्षच दिलें नाहीं.

सासूबाईचा व माईचा क्रम तसाच चालू होता. पण सर्व सहन करणें तारेच्या अंगवळणीं पडलें होतें—तिचें लग्न अण्णाशीं झालें होतें...पण खरें पहातां तें सासूबाईंशींच झालें होतें असें म्हणावयास हरकत नाहीं !......अण्णा तिच्या बरोबर लग्नापासून कधीं प्रेमानें एखादा शब्दही बोलला नव्हता !...पण तो तिला वांकडा शब्दही बोलला नव्हता एवढ्याच समाधानावर ती जीव धरून होती !...त्यावरच ती सर्व सहन करीत असे.

पण तेंही नाहींसें झालें !...शेवटीं एक दिवस उगवला. आणि त्याच्या अस्तापूर्वी तारेच्या मनांतील उरलासरला आशासूर्येही मावळला. तारेच्या आशेचा शेवटचा धागा तटकन् तुटला ! व ती निराशेच्या दरींत पडली !

घरांतलं कोणी नाहीं पण शेजारचा रमेश मात्र तिच्याबरोबर अगदीं प्रेमळ-पणें वागे !...आपलं सगळं हृद्गत मोकळ्या मनानें सांगण्यास त्याच्याशिवाय तिला जगांत दुसरं स्थान नव्हतं. तोही तिचें दुःखी मन आपल्या प्रेमळ शब्दांनीं शांत करी !......एकाच वयाचीं होतीं दोघं !...अन् स्वभावही समान अस-ल्यामुळें त्यांचें मेतकूट फारच लवकर जमे !—वर्षांतून येणाऱ्या कॉलेजच्या



दोन सुट्ट्यांच्या आशेवर बिचारी सर्व दुःखें विसरण्याचा प्रयत्न करी !...त्याच्या सुट्टींतील येण्याची ती अगदीं उत्कंठेनें वाट पाही !...तो तिला अगदीं जवळच्या नातलगासारखा वाटे !...बिचारीला भाऊ नव्हता त्याची जागा त्यानें भरून काढली होती...

रमेशला त्या निष्पाप बालिकेचे हाल पहावत नसत...आपल्यामुळें तिच्या मनाला कांहीं दिवस कां होईना विरंगुळा वाटतो म्हणून तो सुट्टींत कधींही दुसऱ्या गांवीं जात नसे !...सुट्टी पडल्याबरोबर दुसऱ्याच दिवशीं तो थेट आपल्या खेडेगांवीं हजर होई !...

तो आल्याची बातमी समजतांच तारेला किती आनंद होई !...तिचा नेह-मींचा खिन्न व निराश चेहरा थोडासा फुले !...क्षणभर तिला वाटे जगांत अजून आपणास रहावयास हरकत नाहीं !...

...पण तेंही सुख बिचारीला मिळावें अशी कोणाची इच्छा दिसेना !... माईसाहेबांनीं हळहळू आपल्या वहिनीविषयीं फूत्कार सोडावयास सुरवात केली !...सासूबाई सभ्य पद्धतीप्रमाणें टोमण्यानें बोलूं लागल्या !...अण्णा जातां येतां तारेवर आपले डोळे काढूं लागला !...दुष्ट मनांत दुष्ट विचार शिरावयास व रुजावयास वेळ लागत नाहीं !...सगळीकडे बोलबाला होऊं लागला !... रमेशलाही अतिशय वाईट वाटलें...त्याचें जाणेंयेणें, तारेशीं बोलणें, सर्व बंद झालें !—

बिचारी तारा ! सर्व दिवसभर काम करून थोडक्या विश्रांतीसाठीं मिळणाऱ्या रात्री, सारख्या रडून घालवूं लागली !...

अण्णाविषयीं किती खात्रीलायक कुवार्ता तिच्या कानीं येत !! त्यावेळीं तिला वाईट वाटत नसे असें नाहीं !...

पणऽ....पण तो पुरुष होता ना !

अन् प्रेमळ रमेशशीं आपण जरा अघळपघळ बोललों तर काय हा विपरीत अर्थ !....जगांत सगळीकडे दुष्टपणाच भरला आहे काय ?...तिचं मन अगदीं सुन्न होऊन जाई !...तिचें प्रेमळ हृदय फाटून जाण्याच्या बेतांत येई !...

पण तरीही ती कसें बसें सोसून राही !....तिला तिच्या नवऱ्यानें शब्दानें कधीं दुखविलें नव्हतें !....तिला अजूनही आशा होती !....कधीं तरी आपलें नशीब फळफळेल असें तिला अजून वाटत होतें !....

पण ती तिची आशा व्यर्थ होय हें तिला आजच समजून आलें !...

साधी गोष्ट !...तिच्या वन्सं तिला नेहमींच्या पद्धतीप्रमाणें कांहीं बोलत होत्या !...सासूबाईनींही मध्येंच त्याला दुजोरा दिला !...बिचारीनें बराच वेळ सहन केलें !...पण तिला आज तें विनाकारण बोलणें सहनच होईना...तिला रडूं कोसळलें...

"मरेन तेव्हां सुटेन एकदांची !...नको झालाय् हा जीव अगदीं !"... ती वैतागून एकदम मोठ्यानं रडकुंडीला येऊन म्हणाली...अण्णा' बाहेरच्या खोलींत होता...त्याच्या कानीं ते शब्द गेले...

तो झटकन आंत आला...एकदम तारेपुढें उभा राहून त्यानें तिच्या थोबाडींत मारली..."शिंची उलट उत्तरं देते ?...नकोसा झाला असेल तर दे जीव न् हो मोकळी ! उगाच धमकी कशाला ?...असा काय जीव वर आलायू होय ?" तो पुटपुटला. आपल्या आईचें समाधान झालेलें पाहून त्याला बरें वाटलें. आपल्या माईचा आनंदी चेहरा त्याला दिसला !...तो लगलीच बाहेर निघून गेला...त्याचा राग अजून साफ गेला नव्हता !...

आणि तारा !!...तडख एका खोलींत जाऊन आंतून कडी घालून बसली. तिला झाला प्रकार खराच वाटेना !...तिनें गार जमिनीवर आपलें अंग टाकलें पण तिचें भडकलेलें मन शांत होईना. "अरेरे, स्वतः येऊन माझ्या अंगावर हात टाकावा ना ?...ईश्वरा, आतां मी हें सहन तरी कसें करूं ?"...तिला झालेला अपमान सहन होईना !

"जगांत राहून तरी काय करायचं ?...कोणाला माझी पर्वा आहे ?"...... तिच्या डोळ्यांतून घळघळां अश्रु वाहूं लागले !... प्रेमळ शब्दानें सांत्वन करणारें कोणींच जवळपास नव्हतें...

रमेश आला असता...पण तो तेथें नव्हता !

तिचें मन शांत होईना...बिचारीची शेवटची आशेची जागा नष्ट पावली... "आतां जगून तरी काय करायचं मग? खरंच, जगण्यांत कांहींच अर्थ नाहीं !!"

तारा सबंध दिवसांतून खोलीबाहेर पडली नाहीं...पाणी, अन्न, कशाचीही तिला आवश्यकता वाटत नव्हती !...तिला प्रेमाची जरूर होती !...आणि तें तर तिला जगांत कोठेंच सांपडलें नव्हतें !...व त्याबद्दलची आशा आतां समूळ नाश पावली होती ...जग जगण्यास नालायक अशी तिची आतां खात्री झाली !...

तिची सबंध रात्र तळमळून निघाली. सकाळींही ती जेवली नाहीं...सबंध दिवस तसाच विचारांत गेला; तिचा शेवटीं विचार ठरला.



संध्याकाळच्या सुमाराला ती खोलींतून बाहेर पडली; माई उपहासानें हंसली..."किती दिवस चाळे करणार अशी ?" तिनें अस्पष्ट शब्द उचारले, ते स्वतःपेक्षां तारेलाच ऐकविण्यासाठीं होते.

तारा तुळशीवृंदावनाशेजारीं हिरव्या गवतांतच उभी होती...तिच्या अंतःकरणांत वणवा पेटला होता...डोळ्यांतून अश्रु चालले होते.

तिच्या प्रेमळ हृदयाला जगांत आतांपर्यंत प्रेम सांपडलें नव्हतें. दुसऱ्या जगांत तरी मिळेल का, हा प्रश्न सोडविण्याचें तिनें ठरविलें...निदान त्यानें सध्यांचा त्रास तरी कमी होईल असें तिला वाटत होतें खास !...

* * *

तारा त्या काळोख्या विहिरीच्या कांठावर उभी होती. तिच्या डोळ्यांपुढून भरभर हे सर्व प्रसंग येऊन गेले ! ती भानावर आली....पाऊस झिरपतच होता... तिचा अश्रुप्रवाह चाललाच होता....

तिनें खालीं विहिरीच्या पाण्याकडे पाहिलें...ती जरा चमकली ! सभोंवारचा काळोख तिच्या मनाला थोडा हदरवीत होता. इतक्यांत कुत्र्याचें भुंकणें तिला जवळपासच ऐकूं आलें ! "बाईऽ ! नको उगीच उशीर ! मग सगळेंच फसायचें !..." ती जिवाला–नव्हे शरीराला–अगदीं कंटाळली होती !

तिनें पुन्हां सर्व नीट पाहिलें. छातीचा दगड घट्ट केला...छातीही दगडासारखीच घट्ट केली..."देवा...मला या जगाचा कंटाळा आला आहे...... तुझ्याकडेच येतें मी आतां !" तिनें वर पाहून ईश्वराला हात जोडले. आणि... आणि...तशा स्थितींतच विहिरीच्या बाजूला आपला झोंक वळविला...

आधींच गडगडणाऱ्या आकाशांत त्याच वेळीं कडकडाट झाला...आणि त्या आवाजांत तारेचें शरीर पाण्यांत पडण्याचा आवाज विलीन झाला !...

दगडानें तारेला बरीच मदत केली...तारेचें शरीर पाण्याखालीं गेलें तें पुन्हां वर आलेंच नाहीं...माणसांपेक्षांही त्या दगडानें तिच्याबद्दल जास्त प्रेम दाखविलें !...

पुन्हां एक मोठा गडगडाट झाला...व नंतर त्या काळोख्या विहिरीवर चकून एकदां वीज चमकली !...त्या उजेडांतच विहिरीच्या पृष्ठभागीं बुडबुडे येतांना दिसले !...जणू काय तारेची जीवनज्योतच तिच्या शरीरांतून बुडबुड्यांच्या रूपानें वर येऊन चमकून आकाशांत नाहींशी झाली !...

विहिरींतील पाणी निश्चल झालें ! पुन्हां पूर्वीप्रमाणेंच तेथें शांतता पसरलेली दिसत होती. रातकिडे 'किर' करीतच होते ! बेडकांचें लग्नही तेवढ्याच जोरांत लागत होतें !...कुत्रींही पूर्वीप्रमाणेंच रडत–ओरडत होतीं !...

तारेच्या जीवाला आतां तरी आनंद मिळाला असेल काय? कोणास ठाऊक?... विचारणार कोणाला??...

* * *

"अगबाईऽ! तारा कुठं गेली?" सासूबाईंच्या छातींत धस्स झालें!...

माईही कावरी बावरी झाली!...ती अण्णाकडे धांवतच गेली...

अण्णाचें धाबें दणाणलें... त्याच्या मनांत शंकाकुशंका येऊं लागल्या!... कालच्या प्रसंगामुळें खरोखरच कांहीं बरं वाईट झालं नसेल ना? तो रडकुंडीस आला!...

'काय पोरीनं केलंन् कोणास ठाऊक?...आतां अब्रू जायची पाळी आली!' अण्णाची आई कपाळावर हात ठेऊन बसली.

"रमेशाचा हात धरून..." त्याही कल्पना त्यांच्या डोक्यांत आल्यावांचून राहिल्या नाहींत!...खरोखरीच तिनं जीव दिला असेल तर फौजदारापर्यंत भानगडी जाऊन अब्रूवर शिंतोडे उडतील याचीच अण्णाला जास्त काळजी लागली होती...

वार्ताच ती!...भर्‌कन् जवळपास पसरली!...कंदील, सोटे (?) सर्व घेऊन तपास सुरू झाला...सर्व विहिरी धुंडाळल्या! सर्वांच्या घरीं विचारपूस केली.... जवळच्या स्टेशनावर चौकशी केली!...

तारा लपली होती तें ठिकाण कोणालाच सांपडलें नाहीं!!...

दुसऱ्या दिवशीं पोलीस अधिकारी आले....जवळपासची शिष्टमंडळी मध्यें पडली तेव्हां त्यांची बरीच समजूत झाली!....ते तात्पुरते निघून गेले....

मांत्रिकांना प्रश्न विचारण्यांत आले!....प्लँचेटचे प्रयोग करण्यांत आले.... ज्योतिषांनीं कुंडल्या मांडल्या!...कांहीं जिवंत आहे असें सांगत! कांहीं मेली असें सांगत!!...निश्चित कांहींच होईना...

चौथ्या दिवशीं तपासावर असलेल्या कांहीं गडी माणसांकडून सकाळींच माहिती मिळाली....जवळच्या विहिरींत एक प्रेत पाण्यावर तरंगत आहे.

पोलीस आले—डॉक्टर आले!

गड्यांना बक्षिसी ठरवल्यावरच त्यांनीं प्रेत बाहेर काढलें...



त्याच्याकडे बघवत नव्हतें....पाण्यामुळें तें भयंकर फुगलें होतें...तोंडाचा जबडा दुप्पट मोठा दिसत होता...तोंड निर्विकार होतें...ओंचा घट्ट केलेला होता....पदर घट्ट खोंवला होता, हाताची घट्ट मिठी मारलेली दिसत होती... (कदाचित् दगड सुटूं नये म्हणून तो तिनें घट्ट धरलेला असावा)...बांगड्या मासांत रुतल्या होत्या....तें दृश्य पहावत नव्हतें...दुर्गंधी अतिशय सुटली होती...

आधीं जगानें ठरविलेंच होतें! डॉक्टरनींही 'आत्महत्या' असा निर्णय केला!!....

कोणीही प्रेत उचलावयास तयार नव्हता!...गाडींतून—बैलाच्या गाडींतून—तिला नेण्यांत आलें!

तारेला खरोखर आनंद झाला असेल!...माणसांपेक्षां बैलांच्या पाठीवरून आपलें शरीर नेलें गेल्याबद्दल तिला किती संतोष झाला असेल??...

कांहीं भानगड झाली नाहीं म्हणून सर्वांचा जीव खालीं पडला!

* * *

तारेच्या अस्थि स्वतः तीर्थक्षेत्रावर नेण्याचें पुण्य अण्णा व त्याची आई यांनीं मिळविलें!...माईही सर्व विधी यथासांग व्हावेत म्हणून त्यांच्याबरोबर होती!

जगाप्रमाणेंच अण्णा वगैरेंचा सर्व व्यवहार पुन्हां सुरळीत चालूं लागला...

* * *

अशा किती तारा ढगांमागें लपलेल्या असतील!...किती तुटून पडत असतील??...पण निष्ठुर जगाला त्याची काय पर्वा??...

...आणि म्हणूनच जग चाललें आहे!!...

पुणें, आगष्ट १९३०
(प्रसिद्धि–'प्रगति')

# ३–‘ तोच इतिहास ?—’

**एक शब्दचित्र.**

“ आतां घाबरण्याचं कांहीं कारण नाहीं बरंऽ ? ’ डॉक्टरनीं बाहेर येतां येतां उच्चारलेले शब्द ऐकून रामभाऊंनीं चिंता मुक्ततेचा एक लांबलचक सुस्कारा टाकला !...

आंत चौकशी केली; नूतन बालक व त्याची आई सुरक्षितपणें वेगळीं झालीं होतीं !

जगांत एक प्राणी नव्यानेंच अवतरला होता !!...

चोहूंकडे सर्वच नवीन पहाणाऱ्या बालमनानें, कोठें पाहूं न् कोठें नको हा प्रश्न सुरवातीस न सुटल्यामुळें, डोळे बंद करूनच, ‘ क्यॅं ह्याऽऽ...’ अशा आवाजानें, आपल्या हतबल स्थितीचा कबुलीजबाब दिला !

आईला प्रेमाचा पान्हा फुटला !!......

बायकांचा गलबला सुरूच होता !...

‘ सुरक्षित मोकळी झाली; बरं झालं ! ’ या आवाजाबरोबरच, “ या बयेसाठीं आतांपासूनच हुंडा तयार करून ठेवरेऽभाऊ !...नाहींतर स्वतः गहाण रहाण्याची बापाला पाळी !! घरचाच असता बाबा तर ! ” वगैरे, भाऊंच्या आईच्या तोंडचे, हळू हळू पुटपुटलेले व्यवहारी उद्गारही ऐकूं येत होतेच !!...

थोडा फार बोवाळ हा चालूच होता !...

त्या दिवशीं देवाला अंघोळ घडली नाहीं !....भिकाऱ्याला ‘ सुवेर ’ म्हणून सांगत !...कांहीं दिवस असेच चालले होते !!....तोंपर्यंत तरी देवाची न् भिकाऱ्यांची ब्याद गेली पाठची !....

रीतीप्रमाणें ‘ पांचव्या ’ ‘ सातव्या ’ सर्व झाल्या !....( जनरूढ होती तशी !!)...

सटवाई आली न् तिनं पोरीच्या ललाटीं आडव्या उभ्या रेघोट्या ओढल्या ! तिचं नशीब म्हणे त्या दिवशीं ठरून गेलं !! आणि काय तें जाणत्या स्त्रियांनां ठाऊक होतें वाटतं ! ‘ बायकांचा जल्म तो काय असणार आणखी ?...मरेपर्यंत मरमर मरायचं !! ’....



‘ सुवेर ’ संपलं ! कान नाक टोंचले !!...चार बायका जमल्या झबलीं टोपरीं घेऊन !...कांहीं जुनी उसनवार फेडायला; कांहीं ‘ चाल आहे ’ म्हणून आपल्या बडेजावासाठीं नवीन वाण सुरू करायला !!...

त्या नवीन बालेला नवें झबलें टोपरें चढलें !...पाळण्याला पाठीनें झोंके देऊन, तिच्या आईनें तिच्या चिमकुल्या तोंडांत एक चिमूट साखर घातली !! सुवासिनींचा गलबला सुरू झाला !....

विधवा आंतून डोकावून पहात होत्या !!....

एकदांचें नांव ठेवलें...आणि त्या दिवसापासून ती लहानगी बाला, कालिंदी या नांवानें जगांत ओळखली जाऊं लागली !...

* * *

कालिंदी वाढत होती !...

हातापायाची गाडी थांबली ! मुठी सैल झाल्या !...दृष्टि स्थिर होऊन बघूं लागली !!...हळू हळू ‘ पाय फुटले ’; ‘ अऽन्नाऽ ! ’ ‘ ताऽत्ताऽ ! ’ सारखे शब्द येऊं लागले ! झबल्याचें हळू हळू फ्रॉकमध्यें रूपांतर झालें...फ्रॉकनंतर परकरपोलका !...

पण मुलीचें कुठचें फारसं कौतुक व्हायला ? ‘ मुलगा असता तर—’

ती स्वतःच आपली जास्त करमणूक करून घेई !...या कामीं लांकडी बाहुल्यांची तिला बरीच मदत होई !!...

जन्मल्यापासून रोज कांहीं तरी नवीन नवीन शिकत असली तरी कालिंदीच्या निर्मल मनांत अजून आंतबाहेर मुळींच नव्हतें !

आणि योग्यच आहे; जगाचा दांभिकपणा जगांत वावरूं लागल्यावरच येतो अंगांत !!

मागचा भाऊ व स्वतः, यांच्याबद्दलच्या प्रेमांतील वडील माणसांचा पक्षपात पाहून, सुरवातीस कालिंदीच्या सरळ मनाला आश्चर्य वाटे !...

“ त्यानं खाल्लं जास्त म्हणून काय झालं?....त्याचा हक्कच आहे मुळीं !...तुम्ही उद्यां उठाल न् जाल नवऱ्याच्या घरीं !...आहे काय तुमचं या घरांत मेल्यांनों !! ” वगैरे ‘ श्री, ग, णे, शा,...’ प्रथम प्रथम त्या बालिकेला समजण्यास अवघड वाटत; पण मग तें तिच्या अंगवळणीच पडलें ! ‘ खरंच; आपलं कांहींच नाहीं या घरीं !! ’ असं तिला खात्रीपूर्वक वाटूं लागलें शेवटीं !......

* * *

'हल्लींच्या नवऱ्यांना बायका शिकलेल्या लागतात!' दुसरें सभोंवारचे चारचौघेही आपापल्या मुलींना शिकवितात! आणि म्हणूनच कालिंदी शिकत होती!!...

बाकी घरांतील कोणालाच काय, पण तिचें तिलाही ती कशासाठीं शिकत आहे तें समजत नव्हतें!...पास होईपर्यंत त्या वर्गात; पास झाली कीं त्याच्या पुढील!!...

तथापि 'करायचंय काय मुलींनीं शिकून??' असें सर्वांनाच वाटत होतें! "नवऱ्याला काय पुस्तकांची भाजी करून घालणार आहे?" पण आपला जनापवाद नको उगीच आपल्याविषयीं एवढेंच...

आणि म्हणून कांहीं वर्षे अशीच चालढकल झाली!...

*　　*　　*

परकर पोलक्याबरोबरच कालिंदीचे बाहुलाबाहुलींचे खेळ गेले! तिला आतां निर्जीव बाहुल्या व माणसें यांतील फरक समजूं लागला होता!!...

तिचा निर्मल चेहरा बराच बदलला! शांत डोळे तरळ झाले; तिला कांहीं तरी चुकल्या चुकल्यासारखें वाटे...काय तें तिला समजत नसे; पण कांहीं तरी आहे याची तिला पूर्ण जाणीव होती!

...पोलक्यासाडींतील कालिंदी तीच!...पण तिला कृत्रिम जगाची बरीच ओळख झाली होती!

'लहान का तूं आतां? लाज कशी नाहीं वाटत??...'

"खरेंच!...आपण आतां लहान नाहीं!" असें तिला वाटूं लागलें आणि त्यामुळें मधून मधून येणाऱ्या अल्लडपणाच्या लहरी ती आंतल्याआंत दाबी!!...

आतां, तिची प्रत्येक कृति पूर्वीप्रमाणें स्वतःसाठीं होण्यापेक्षां सभोंवारचे चारचौघे काय म्हणतील, या दृष्टीनें होत असे!...

पूर्वीची बालिश कालिंदी आतां पुन्हां कुठची दिसायला??...

*　　*　　*

तिचे हे चमत्कारिक उत्कंठेचे दिवसही गेले!...

अन् मग 'आज' म्हणून एक दिवस उजाडला!!...

कालिंदी आज अस्वस्थ दिसत होती! पण चेहरा हसरा व नेहमींपेक्षां जरा जास्त तेजस्वी दिसत होता!...डोळे बरेच चंचल झाले होते!...कांहींतरी



आज नवीन आहे असें निरीक्षकपणें पहाणाऱ्याच्या तत्काळ लक्षांत येण्यासारखें होतें!...चेहऱ्यावर चोंहीकडे लाज फांकली होती!...गाल बरेच आरक्त झाले होते!!...

कधीं नव्हती ती, रामभाऊंनीं तिला नाटकाला नेण्याचा आजच योग आला! नाटक पहावेंसें तिलाही वाटावें यांत नवल नाहीं!...

सुधाकराला सोडून माहेरीं जाण्यासाठीं निघतांनां सिंधू पुन्हां दोनदां निरोप घ्यायला परत आली!...किती दोघांचं एकमेकांवर प्रेम?...शेवटीं सुधाकर, थट्टाच करायची म्हणून सिंधूला म्हणाला, 'मला एखाद्या बोर्डिंगांत ठेव!'

कालिंदी खुदकन् हंसली!...कां कोणास ठाऊक? तिच्या हृदयांत एकदम चमत्कारिक गुदगुल्या झाल्या!!...अंकामागून अंक, कालिंदीला, सुधाकर सिंधू वगैरे पात्रांबरोबर नेत होते!...पण पुढें तिचें लक्षच लागेना तिकडे!

नाटक कसेंबसें संपलें एकदांचें! आणि त्याबरोबरच त्याचा शेवटचा अंक! ...तरी कालिंदीच्या हृदयावर पहिल्या अंकाचे पहिले कांहीं प्रवेशच अजून आपला ताबा चालवीत होते!

पडण...पण इतक्यांत तिच्या अंगावर एकदम रोमांच उभे राहिले!...एक चमत्कारिक लहर तिच्या शरिरांतून गेली!

त्याच वेळीं तिच्या आयुष्यांतील, एक मोठा फरक...एक महत्त्वाचें स्थित्यंतर घडून आलें!!...

तिला वाटलें, सभोंवारच्या सर्व लोकांना हें समजलें; कल्पना नाहक होती! ...पण ती एकदम अतिशय लाजली!!...

चालतां चालतां तिची मान साहजिक खालीं गेली; तिनें झटकन् पदर सांवरून घेतला!...तिच्या मुखकमलावरचा तेजस्वीपणा व रक्तिमा बराचसा, लाजेनेंच ग्रासला होता!!...

घरांतील इतर माणसें, पाहिलेल्या नाटकाविषयीं बोलत होतीं!...पण कालिंदीचें लक्ष आपल्या आयुष्याच्या नाटकांतील त्या दिवशीं नवीन उघडलेल्या अंकाकडेच लागलें होतें!!...

घरीं येतांच ती सर्वांना टाळून पळाली अन् एका काळोखाच्या खोलींत शिरली!...तिला वाटलें काळोख तरी आपली ही लाज राखील.

तो प्रसंग!...सुरवातीला एकदम सांगणार तरी कसा अन् कोणाला?

लाजेनें तिला मानेपर्यंत गिळली अन् तोंड तिनें गुडघ्यांत लपवून घेतलें ! !...

ती स्वतःच्या माथीं मारून घेत असलेला 'अपराध' निसर्गानें घडवून आणला होता !...पण म्हणून तें सांगणार कसें ??...

...तशांतच तिला पुढील गोड गोड स्वप्नेंही दिसत होतीं !

बराच वेळ झाला तरी कालिंदी कोठें दिसेना म्हणून आजी शोधूं लागल्या; इतक्या अनुभवीच त्या !...पोरीचा एकंदर आजचा नूर पाहून त्यांना संशय आलाच !

'कां ग काळोखांत ?'...म्हणत तिच्याजवळ जातांच ती थोडी लांब सरून, मुसमुसून रडूं लागली !...

...आणि त्या रडण्यांत खूप खोल अर्थ भरला होता ! त्यांत दुःखाचा अंश जास्त होता कीं सुखाचा ?...

"अस्संऽ ! अरे भाऊ, तुला बाबा, मुका नातू झाला रे आज !" रामभाऊंच्या आई त्यांना हंसत सांगूं लागल्या !

जनरूढीप्रमाणें आजींनीं रांगोळी काढून, तेवत्या समईसमोर कालिंदीला गोडधोड वाढलें; तीनचार दिवस असेंच झालें !

...आणि मग नवीन गोष्ट जुनी झाली !

* * *

नव्या काळाप्रमाणें, यानंतरही कांहीं काळ, चारचौघांत फारशी चर्चा होत नाहीं म्हणून, कालिंदी अविवाहित राहूं शकली !

आपण कोण....आपल्या आयुष्याचा हेतू काय, वगैरे स्वतःच्या सर्व इच्छा आकांक्षा, तिला मनःस्फूर्तीनें चांगल्याच कळूं लागल्या होत्या !

ती 'बायकांच्या जल्माला' आली असल्याचेंही ती अगदीं तीनचार वर्षांची होती तेव्हांपासून ती ऐकत आली होती !

...या नेहमींच्या महान् संस्कारानें तिचें मन साफ दुबळें व्हावें यांत नवल काय ? स्वतःला कोणत्या इच्छाआकांक्षा आहेत याची चांगली स्वच्छशी कल्पनाही करतां येणें तिला शक्य नव्हतें !

तत्व व व्यवहार यांच्यांतील उभा वाद उठतां बसतां दिसत असतां तिचें दुर्बल झालेलें मन प्रवाहपतित कां होणार नाहीं ?...



तेव्हां शेवटीं व्हायचा तोच परिणाम झाला ! स्वतःच्या कोणत्याही बाबतींत स्वतःपेक्षां वडील माणसांच्या मतांनाच ती जास्त किंमत देऊं लागली !

आपल्या आयुष्याचें होईल तसें होऊं द्यावयाचें हें तिनें ठरविल्यासारखेंच होतें जवळजवळ !....

हो, यालाच वडील माणसांच्या शब्दकोशांत 'अगदीं आज्ञाधारक' ही प्रतिशब्दांची जोडगोळी सांपडते ! हा एक फार मोठा गुण आहे म्हणतात !......

'बायकांचा जन्म व्यर्थच नाहींतर काय ?' असें मधून मधून तीही स्वतःशीं पुटपुटत असे; घरांतील इतर स्त्रियांप्रमाणेंच तिलाही थोडें थोडें असेंच वाटूं लागलें !!

मात्र, कसेंबसें एकदां लग्न होणें हीच बायकांच्या जन्माची इतिकर्तव्यता काय ? असा तिला अजूनही पुनः पुनः प्रश्न पडे !!

* * *

आणि मग कांहीं दिवसांनीं प्रदर्शनें सुरू झालीं !...फोटो गेले;...लोक आले !...ते चहा चिवडा खाऊन, वर वाचून चालून घेऊं लागले कालिंदीकडून !

कालिंदी आपण स्त्री हें आतां जास्त जास्त ओळखूं लागली...

शेवटीं एके दिवशीं 'सौदा' पटला !...देवाण घेवाण—घेवाण कांहींच नव्हती; सारी देवाणच—ठरली !!...

...नवें लुगडें, नवा पोलका, कधीं वेणी तर कधीं अंबाडा—('पहावयास' येणाऱ्याला पसंत पडण्यासाठीं त्याच्या मताप्रमाणें तर दिसली पाहिजे !... त्या शिवाय पटायचें कसें ?)—ह्या सर्व तऱ्हा आतां थांबल्या !...

दिवस मुक्रर झाला !....रामभाऊंना आणि बाकी सर्वांना हायसें वाटलें !...

स्वतःची जबाबदारी बाजूस झाली कीं ती संपते अशी बऱ्याच जणांची कल्पना असते !

श्रीमंत, पदवीधर जांवईबुवा !...आतां कालिंदीचें आणखी चांगलें तें काय व्हावयाचें ??...

आणि कालिंदीलाही आपल्या आयुष्यांत कांहींतरी नवीन झाल्यासारखें वाटल्यावांचून राहिलें नाहीं !...

पांच पन्नास मंडळी जमली ! दंभ व स्वार्थ थोडा वेळ प्रामुख्यानें वावरले; आणि त्या 'सुमुहूर्ता'वर कालिंदीचें लगीन झालें !...

कालिंदीच्या पतिराजांना तिच्या गळ्यांत माळ घालतांना कांहीं वाटलें असेल कीं काय कोणास ठाऊक ?

कालिंदीच्या हातांतील माळ मात्र थरथर कांपत होती !...कपाळावर घर्मबिंदू चमकत होते !...हृदय धड्‌धड्‌ आवाज करीत होतें !

पण कालिंदीला स्वतःच्या हृदयांतील धडधडाटापेक्षां वऱ्हाडी मंडळीचा कलकलाटच जास्त मोठ्यानें ऐकूं येत होता !

आणि आपल्या आयुष्यांत एक अतिनाविन्यपूर्ण अशी घटना झाली याचा तिला तिच्या नकळत आनंद झाला !...

* * *

पुष्कळशा मानवी सुखांची उत्पत्ति असेल त्यांत सुख मानून घेण्याच्या प्रवृत्तींत असते !

कालिंदी आपल्या घरच्या नवीन वातावरणांत गेली !...

तिला नवे नवे अनुभव येत होते ! प्रथम पतीची दृष्टिभेट,...नंतर भाषण... नंतर थोडासा सहवास !!...

ज्या रात्रीं ती प्रथमच, घरांतील काम आटोपून, पतीच्या खोलींत गेली त्यावेळचा तो प्रसंग !

'यावं' तिचा हात हातीं घेऊन तिचें स्वागत झालें; नंतर दरवाजा बंद झाला.

तिचे पतीच सारखे बोलत होते; आणि ती खालीं मान घालून फक्त मधून-मधून 'अंऽहंऽ ! 'हूंऽ !' असें करीत ऐकत होती !...

तिचें हृदय जोरानें धडधडूं लागलें;—त्यांत तिला अनुभूत आनंदच वाटत होता !

...तिनें आपल्याला पतीच्या आलिंगनांतून सोडवून घेण्याचा मुळींच प्रयत्न केला नाहीं !...त्याक्षणीं आपण अतिशय सुखी आहोंत अशी तिची कल्पना होती !!

* * *

असे सुखाचे वाटणारेही कांहीं दिवस गेले !

आणि मग निसर्गानें पुढला पल्ला गांठला !!...

काम करतां करतां मधूनच तिला चक्कर आल्यासारखें होई !...बाकीचेंही सर्व तिला हळूहळू समजून आलें !....



यावेळींहि सुरवातीस लोकांना कळेल, म्हणून वाटणारी थोडीशी लाज तिच्या चेहऱ्यावर पसरलेली दिसे !...

आणि योग्य वेळीं तिच्या आयुष्यांतील आणखी एक स्थित्यंतर—स्त्रीजातीचें पूर्णत्व-घडून आलें !

* * *

तथापि, कालिंदीला, कन्येच्या, 'मुलगीपणा'बद्दल, तिच्या जन्माच्या वेळेप्रमाणेंच कुरकुर ऐकूं आली !!...

* * *

नाविन्यांत, आनंद असतो;...पण थोड्याच दिवसांत कालिंदीच्या सर्व लक्षांत आलें !

'त्या घरीं आपलें कांहीं नाहीं' तर या घरीं तरी असेल अशी कालिंदीची समजूत होती.

पण दुरून साजरे दिसणारे बरेचसे डोंगर जवळून तिला काजरे असल्याचें समजलें ! आणि मध्यें कांहीं दिवस वाटणारा आनंद थोडाथोडा लोपत गेला !

त्या दोघांतील शारीरिक आकर्षण बरेंचसें नष्ट झालें होतें !...दोघांत मानसिक आकर्षण होतें किंवा काय याबद्दल बराच वाद होता !!...

तिचें नेहमींच्या संस्कारांनीं झालेलें दुबळें मनही, कधीं कधीं बंड करण्याचा प्रयत्न करी !...पण त्यावेळीं सामाजिक बंधनांची सांखळी तिचा पाय मागें ओढी !!

लहानपणापासूनच प्रवाहपतिताप्रमाणें वागण्याची तिला शिकवणूक व संवय झालेली !...पण आतां मात्र ती खरीखुरी प्रवाहपतित झाली !

'बायकांचा जन्म वाईट' असें आतां तिला मनापासून वाटूं लागलें !!

पण कांहीं असलें तरी आमच्या आर्यस्त्रिया महान् विनयवती, पतिव्रता म्हणून प्रसिद्ध....( विशेषतः आमचे पुरुष हे जास्त अभिमानानें सांगतात !! ) आणि तीही एक त्यांपैकींच झाली !...

यांतच, अंतरंग दुर्लक्षिणाऱ्या, समाजाच्या जडवादपूर्ण आचारधर्मांची खरी गंमत दिसून येते !

* * *

आपल्या लहानग्या बालिकेकडे पाहून कालिंदीच्या मनांत पुष्कळ विचार येत !...

तिला मोकळेपणें हातपाय हलवतांना पाहून तिचें हृदय भरून येई!...
" काय आहे पोरीच्या नशीबीं ?...मेला बायकांचा जन्मच वाईट!"

विचार करतां करतां, तिच्या भरल्या डोळीं, स्वतःच्या आतांपर्यंतच्या आयुष्यांतील प्रसंग येत!...

भोंवतालच्या एककल्ली, पक्षपाती, वातावरणांत मनें किती लौकर दुबळीं होऊं शकतात हें तिला आतां स्वानुभवानें समजत होतें!

...ती आपल्या चिमुकलीचा गालगुचा घेऊन हंसण्याचा प्रयत्न करीत म्हणाली, "बाळे, तुझ्या नाहीं ना ग नशीबीं पुन्हां तोच इतिहास?"

ठाणें, नोव्हेंबर १९३१.

# ४–'सूड'

[ प्रतिमा-पूजन ]

एक शब्दचित्र.

**[ दोन भावना-प्रधान जीवांच्या आयुष्याचा हा वृत्तान्त, व्यवहारी जगाला कितीसा गम्य वाटेल कोणास ठाऊक! ]**

"कधीं कधीं विचारांनीं वेड लागण्याची पाळी येते; अन् नको हें जीवित, असं वाटूं लागतं! अशा वेळीं स्वकर्तव्यांत उत्साह आणण्यासाठीं ही तुझी प्रतिमा पुढं ठेवतों! तुझ्याशिवाय मला दुसरं कोण उत्साह देणार?

'असा एकटाच स्वतःशीं काय बडबडतोस रे, दादा? वेडबीड नाहीं ना लागलं!' सुली मला त्या दिवशीं हंसत हंसत विचारीत होती. अजाण बापडी पोर! खेळतें आनंदी फुलपाखरूं आहे तें! तिला अजून जग स्वतःसारखेंच वाटतें आहे! बिचारीला आपल्यासारखा कटु अनुभव न येवो म्हणजे झालें! तिचें हास्य तसेंच कायम राहील ना?

खरेंच, पण मी वेड्यासारखाच नाहीं ना बडबडत?

* * *

"मी म्हातारा झालों नसलों तरी माझें आयुष्य संपल्यासारखेंच आहे! आयुष्याच्या सुरवातीला मी किती उंच उंच मनोरे बांधले होते! पण आतां काय त्याचें?—'तेहि नो दिवसा गताः' म्हणण्याचीच पाळी!

सुधीरला माझी कींव येते! माझी उदासीन वागणूक पाहून तो म्हणतो, 'वेड्या, मर्द ना तूं! असे हातपाय काय गाळतोस?'

भोळा बिचारा! मी मुद्दाम का उदासीन रहातों?

आणि इतर कोणाला तरी कुठें समजतें माझें हृदय?........किशोरी! म्हणूनच तुझी ही प्रतिमा हृदयाला जवळ करतों! पण माझें भाबडें हृदय मनमोकळेपणें तुझ्याजवळ बोलूं लागलें तरी ती माझी 'बडबड' लोकांना वेड्यासारखी वाटते!

* * *

'आतां शिक्षण झालं—सर्व झालं ! हें अजून लग्न न करण्याचं वेड तुझ्या डोक्यांत काय भरलं आहे, समजत नाहीं !....' बाबा त्या दिवशीं पुटपुटत होते !

होय, त्यांना हें वेडच वाटतं ! आणि वेडाची माझ्या मतें व्याख्या—'स्वतःला न पटणाऱ्या, न समजणाऱ्या गोष्टी !'

माझें 'लग्न'? जें एकदां झालें तें त्यांना समजलें नाहीं ! त्याच वेळीं लौकिक लग्न होण्याचा संभव होता; सर्व आयुष्यांत ती एकच वेळ होती !

पण त्या वेळीं तसली कल्पनाहि माझ्या मनांत डोकावूं नये असें त्यांना मनापासून वाटत होतें.

उघडें हृदय दांभिक समाजाला आवडत नाहीं. मनांत एक, बाहेर एक असलें तर तें जगांतलं यशस्वी माणूस !

बाबांना माझ्या करणीचा राग आला ! 'शिक्षणांत व्यत्यय आणणारे आचरट चाळे !' 'अव्यापारेषु व्यापार !' आणखीहि पुष्कळ वाटलें !

'स्वतःच्या आयुष्यांत घडलेल्या उत्क्रान्तीप्रमाणेंच दुसऱ्याच्या आयुष्यांतील घडामोडी व्हावयास पाहिजेत; मानवी जीवनांत सर्व गोष्टी हस्याहस्यानें घडून यावयास पाहिजेत !' वगैरे अट्टाहासाच्या कल्पनांनीं पुष्कळ वेळां कित्येक व्यक्तींच्या आयुष्यांत अनर्थ ओढवतात !

बरें, आली तर आली माझ्या मनांत तसली कल्पना; ती त्यांच्या मनपसंत तरी पाहिजे होती !

'मान—अपमान' 'लहान—मोठें' 'समाजांतील बाबांचें स्थान' सर्वांकडे माझें लक्ष असावयास पाहिजे होतें !

हृदयाचे व्यापार व्यवहारी जगाप्रमाणेंच, रुपये-आणे-पै पाहून होत नसतात, हें यांना कसें पटवावें ?

हे आतांचेहि लग्न न करण्याचे माझे 'चोचले'च वाटावेत त्यांना, यांत नवल नाहीं ! इतर व्यक्तींच्या आयुष्याच्या बाबतींतहि स्वतःच्या सोयीप्रमाणें पाहूं लागल्यावर दुसऱ्या कशाची अपेक्षा करावयाची ?

'त्यांत, मला सुख होण्याची कल्पना !' हो असेलहि कदाचित् ! पण स्वतःला ज्यानें सुख होतें त्यानेंच दुसऱ्यालाहि सुख होतें, हीच ती आकुंचित कल्पना ना ?...



'शिवाय समाजाच्या दृष्टीनें 'हि—खरेंच, तें राहिलेंच !—तें कधीं न दिसणारें 'भूत' सभोंवतीं घिरट्या घालून प्रत्येकाला भेडसावीत असतें !

खरेंच, 'समाज' म्हणजे तरी काय ?

पण मन उत्तर शोधूं लागलें कीं डोळे अश्रूंनीं डबडबून जातात;—आणि अंतःचक्षूंनीं तयार करावयास घेतलेलें समाजाचें कल्पनाचित्र स्पष्ट होण्यापूर्वीच, अश्रूंमध्यें नाहींसें होतें ! जाऊं द्या; मला तरी समाज म्हणजे काय हें समजून काय करावयाचें आहे ?—जें होईल ही कल्पनाहि नव्हती तें केव्हांच झालें... आतां कोण सुधारूं शकणार तें ?

एकूण, बाबानांच काय—कोणालाहि माझें अंतःकरण समजणें शक्यच नाहीं !

आणि न समजलें तरी त्याची मला मुळींच पर्वा नाहीं ! म्हणूनच—हृदयमंदिरांतील देवते ! तुझ्याजवळ असें मन मोकळें करतों !

*   *   *

किशोरी ! प्रिये—त्या गोष्टीला आज पुष्कळ वर्षें—'पुष्कळ' कशाला म्हणूं—हो, हा मे महिनाच होता तो—म्हणजे एकंदर दहा वर्षेंच झालीं !

पहिला प्रसंग आठवतो का तुला ?

अकस्मित पावसाची सर आली, म्हणून फिरावयास गेलेलीं मुलें भिजत भिजत व मोठ्यानें ओरडत घरांत शिरत होतीं ! त्यांच्यामध्यें नुकतीच तारुण्यांत प्रवेश करणारी, काळीसांवळी पण मोहक बाला हंसतां-खिदळतांना पाहिली !—तिच्या विशाल डोळ्यांत तिच्या सरळ हृदयाचें पूर्ण प्रतिबिंब पडलें होतें !

तूंच ना ती ?...

तीच आपली प्रथम भेट !

*   *   *

आणि मग किती तरी प्रसंग घडले !

सगळेंच सांगण्यांत अर्थ नाहीं, एकावरून सर्व भराभर आठवतील तुला !

तुझें तें कॉफी रागांतलें 'प्रभु तेरि दया' हें कर्णमधुर गाणें ! गाणें कर्णमधुर कीं तुझा आवाज ? त्यानेंच माझ्या हृदयाची प्रथम तार छेडली बरें !

लबाडे ! 'देवा'साठीं तो सुमनबरोबर पाठविलेला दोन मोहक गुलाबांच्या फुलांचा गुच्छ आठवतो तुला ? त्याच्याभोंवतीं तीं कांटेरीं पानें ग कां बांधलीं होतींस ?....आणि ती एकदांची लपतीछपती दृष्टिभेट ! हृदयाला हृदय पूर्णपणें ओळखतां आलें !

* * *

दिवसेंदिवस तुझ्या हृदयाला कसली तरी व्यथा होत असल्याचें दिसून आलें ! माझ्याहि हृदयाची अगदीं तीच अवस्था ! किती तरी दिवस अशीं आन्दोलनें होत होतीं !

आणि मग एक क्षण असा आला कीं त्या वेळीं आपापलीं हृदयें नाहींशीं झाल्याचा दोघांनाहि भास झाला ! त्याच क्षणाच्या शेवटाला दोघांनाहि स्वतःच्या वक्षस्थलीं पुन्हां हृदयाचा धडधडाट ऐकूं येऊं लागला !

तथापि दोघांनाहि समजून आलें कीं, हृदयें ठिकाणावर आलीं खरीं, पण त्यांची जणुंकाय अदलाबदलच झाली होती !

आणि गंमत ही कीं, दोघांचीं बदललेलीं हृदयें, आपापल्या नवीन वसतिस्थानांत किती तरी आनंदानें वाढूं लागलीं ! जणूंकाय तीं स्थानेंच त्यांना योग्य होतीं !

त्यानंतर आघात-अपघातहि झाले ! पण एकमेकांना वाटणारीं—आणि एरव्हीं तशीं खरोखरच असणारीं—आपलीं कोमल हृदयें अशा वेळीं वज्रासारखीं होत ! त्यावर कशाचाहि परिणाम होऊं शकला नाहीं !

पुष्कळ अडथळे उत्पन्न झाले तरी मी तुझा झालों व तूं माझी झालीस !

* * *

पद्यांत काय किंवा गद्यांत काय, कशांतहि गुंफलें तरी मानवी जीवित हें एक काव्य आहे, नाहीं ?...

त्यांत सर्व रस अगदीं तुडुंब भरलेले आहेत ! मात्र प्रत्येकाला त्याच्या बदलत्या दृष्टिकोनाप्रमाणें निरनिराळे रस दृष्टीस पडतात !

* * *

मुलें खेळतात...फुलें फुलतात....झाडें सळसळतात...लाटा फेंसाळतात... चांदण्या चमचमतात...भोंवतीं सर्व सृष्टि हंसत असते ! जिकडे तिकडे चोहींकडे आनंदीआनंद भरलेला दिसतो !



सर्व—अगदीं सर्व जग—प्रेमाच्याच पायावरील पसारा आहे ! प्रेम हीच अद्भुत शक्ति ! प्रेम—पवित्र प्रेम म्हणजेच परमेश्वर !

* * *

स्त्री व पुरुष हा भेद अगदीं अनादि-अनंत असा आहे. पण तो हेतुपुरस्सरच नव्हे काय ?

स्त्रीला हृदय असतें !—

आणि पुरुषालाहि असतें !!

पण व्यक्तिशः दोघेंहि अपूर्णच असतात ! म्हणूनच दोघांत नैसर्गिक आकर्षण; ही हृदयाची ओढ म्हणजेच पूर्णत्वास पोंहोंचण्याची धडपड ! त्यांत लज्जास्पद काय आहे ?

हें आकर्षण म्हणजेच त्या दोन आत्म्यांच्या, सच्चिदानंदाशीं तादात्म्य पावून, पूर्णत्वास पोहोंचण्याच्या, प्रगति-मार्गावरील, पहिलें पाऊल !

तोच, तोच त्यांच्या आयुष्यांतील संक्रमणकाल !

हें पवित्र आकर्षण म्हणजेच प्रेम !...नाहीं ?

* * *

पण हें सर्व जडवादी जगाला सांगावें कसें ? अन् त्याला तें पटावें तरी कसें ?

मनुष्याच्या नैसर्गिक स्वभावापेक्षां, मनुष्यनिर्मित नियमनबंधनांवर आणि पुरातन रूढींवरच विश्वास टाकून जेथें सर्व चालणार, तेथें कोण कोणाला काय सांगणार आणि पटवणार !

तरुण स्त्री व पुरुष यांचा संबंध फक्त वैषयिक बाबींसाठींच येत असतो, याशिवाय कोत्या मनाची साक्ष पटविणारी दुसरी कल्पना तरी कोणती ? जणुं, ज्यांना सुशिक्षित करतात व म्हणतात अशा तरुण-तरुणींना त्याशिवाय दुसऱ्या कांहीं इच्छा—आकांक्षा नसतातच अं? कल्पनाहि सहन करवत नाहीं !!

* * *

पण किशोरी, आपल्या हृदयामधील प्रवाहाला अशानें बांध कसा पडेल ?....

सुरवातीला सूक्ष्म वाटणाऱ्या प्रेमबीजाचें सुंदरसें रोपटें झालें ! दिवसेंदिवस त्याची वाढच होत गेली !

असल्या निसर्गानें उत्पन्न केलेल्या रोपाच्या संरक्षणासाठीं, भोंवतीं सामाजिक समारंभबंधनाचें कुंपण पडलेंच पाहिजे असें कांहीं नाहीं ! त्या चिमुकल्या

रोपाची यदृच्छया वाढ होतच होती ! शिवाय खंबीर मनाचे आपण द्रोन पहारेकरी असतांना त्याच्या संरक्षणाबद्दल उगाच कां भीति ?

पण आपल्याला नाहीं, तरी जडवादी समाजाला त्याची तेवढयांतच भीति वाटूं लागली ! कां नाहीं वाटणार ? त्या नैसर्गिक बंधनांपेक्षां त्याच्या दृष्टीनें दुसरीं जास्त जास्त श्रेष्ठ अशीं मनुष्यनिर्मित कृत्रिम बंधनें होतीं ! त्यामुळें त्या सुंदर रोपट्याला जाळण्याची त्याला इच्छा व्हावी यांत नवल नाहीं ! हृदयांच्या व्यापारालाहि सामाजिक शिक्कामोर्तब पाहिजे ! !

पण त्या आगीची झळ त्या रोपाच्या कोमल पालवीला होरपळूं शकली नाहीं ! त्यांच्या त्या विषारी फूत्कारावर आपण खंबीर मनानें, आपल्या सरल हृदयाला अनुसरून शुद्ध प्रेमवल्लीचे उपचार करीत असूं म्हणूनच ना तें होतें सर्व शक्य ?

आणि खरेंच ! किशोरी, तो सुंदर रोप तसाच वाढत जाणार होता ! त्याचा वाढून विशाल बनलेल्या वृक्षाच्या शीतल छायेखालीं, प्रेमळ आश्रय देऊन, श्रान्त पान्थांना यथाशक्ति मदत करतां येईल अशी आपण अपेक्षा करीत होतों, त्यांत आपलें वावगें काय होतें ? यथाकालीं त्याचीं गोंडस, मधुर फळें, पूर्ण परिपक्व करून, समाजाला, त्याच्या प्रगतीसाठीं, उन्नतीसाठीं, सादर करूं; एकमेकांच्या प्रेमळ छत्राखालीं राहून समाजासाठींच जन्म खर्चूं; अशा आपण किती तरी भराऱ्या...हो, आतां त्यांना भराऱ्याच म्हणावयाचें.... मारल्या होत्या ! त्या योग्य, सत्याच्या पायावर उभारलेल्या, नव्हत्या असें कोण म्हणेल ?

* * *

तो शेवटचाच सुखदायक प्रसंग ! आठवतो का तुला ?

आपण दोघें नदीकांठीं बसलों होतों !

पाय टाकून बसलेल्या प्रवाहाइतकाच लांबरुंद प्रवाह तुझ्या हृदयांत खळखळत होता ! बाहेरील प्रवाहाइतकाच तुझ्या हृदयांतील प्रवाह निर्मल होता ना ? पण उगाच शंका कशाला ? काळानेंच तें पूर्णपणें सिद्ध केलें !...

सभोंवारच्या खुल्या मैदानाइतकाच तुझ्या अंतरंगींही खुलेपणा होता !

चंद्रप्रकाशांत जवळच्या वेलीवरील फुलें फुललेलीं दिसत होतीं—तुझें साधें अंतःकरणहि माझ्या सान्निध्यांत तसेंच प्रफुल्ल होऊन हंसूं लागलें ! ती निसर्गतः सरलगामी वेलि, वृक्षाच्या आसऱ्यासाठीं आपल्या मनाविरुद्ध वक्रगतीनें त्याच्यावर चढली होती ! या जुनाट पण दांभिकसमाजाशीं संबंध आल्यामुळें त्याच्या मोठेपणाच्या आसऱ्याखालीं, त्याच्या कृपाछायेखालीं रहाण्यासाठीं, आपल्या आयुष्याचेंहि, अशीच वक्रगति मिळण्याचें भवितव्य आहे, याची तुझ्या सरल हृदयांत कल्पनाहि आली नसेल त्या वेळीं !



सुधाकर कौमुदीचा वर्षाव करीत होता ! बाहेर चंद्रमा व पाण्यांत त्याची छाया दिसत होती ! पाण्याच्या त्या निर्मल प्रवाहांत ती थरथरत होती ! प्रेमपूर्ण नजरेनें तूं एकदां माझ्याकडे पाहिलेंस व स्वतःच्या वक्षस्थलाकडे दृष्टि फिरविलीस ! चंद्राजवळ रोहिणीला पाहून तूं माझ्या जास्त निकट सरून बसलीस !

तुला गद्गदित झाल्यामुळें बोलतांहि येईना ! तूं माझे हात आपल्या हातीं घट्ट धरलेस व अडखळत अडखळत बोलण्याचा प्रयत्न केलास—'खरं ऽ ऽच !.......मी सांऽऽगूं तरी कसं—अन् कोणच्या शब्दांत बाई ऽ ऽ !'

तुझ्या डोळ्यांतून अमोल अश्रुंचे सर ओसरत होते ! 'मी मेल्याशिवाय कांहीं मला यापेक्षां जास्त प्रेम करतां येणार नाहीं !' तुझ्या भावनांना कांहीं तरी शब्दांत मांडण्याचा तूं अखेर प्रयत्न केलास ! आणि भाव समजला कीं भाषा संपते !

मी कांहींच बोललों नाहीं !

तूं आकाशांतील असंख्य ताऱ्यांकडे आपले अश्रूंनीं डबडबलेले नेत्र लावलेस !

'पऽण...मेल्यानंतर तरी इतक्या या गर्दीत या तारकांच्या गजबजाटांत, आपल्या प्रेमाला वाव द्यावयास असं शान्ततेचं ठिकाण सांपडेल का ? तर मग... त्यापेक्षां हें जगच काय वाईट !' तूं पुन्हां गद्गदित होऊन पुटपुटलीस.

त्यावेळीं तुला निष्ठुर जगाची, त्यांतील जडवादाची कल्पना नव्हती ! तुझ्या त्या अज्ञानाविषयीं मला आनंद झाला ! जगाच्या अंतापर्यंत तूं माझ्या हृदयावर तसेंच डोकें टेकून रहावीस—तशाच स्थितींत आपला दोघांचा शेवट व्हावा अशी मला उत्कट इच्छा झाली !

प्रेमानें तुडुंब भरलेलें तुझें हृदय स्पष्ट दर्शविणारे माझ्या वक्षस्थलाजवळील तुझे अर्धोन्मीलित डोळे, चंद्राच्या प्रकाशांत दिसणारें तुझें काळेंसांवळें पण प्रेमामुळें तेजःपुंज झालेलें गोल मुखकमल ! अहाहा ! हृदय आनंदपूर्ण होतें !

त्याच—अगदीं त्याच वेळीं जगाचा एकदम अंत झाला असता तर ?—निदान आपणा दोघांचा ? ?

आपणांपैकीं एकाचाच झाला असता तरी किती बहार झाली असती ! !

माझ्या डोक्यांत एक क्षणभरच प्रेममय—अगदीं प्रेममय पण भीषण—अशी एक कल्पना येऊन गेली !

मला वाटलें, त्याच क्षणीं—त्या तुझ्या आनंदाच्या परमोच्च स्थितींत—तुझा स्वतःच्या हातांनीं अंत करावा ! ! या निष्ठुर, स्वार्थी जगांत आपलीं सरळ सरळ वाटणारीं, रास्त दिसणारीं सुखें खरीं होतातच असें नाहीं ! मग—अशी विषाची परीक्षा घेण्यापेक्षां आपल्या किशोरीचा आपण स्वतःच......! पण—

आणि खरोखर त्या वेळीं तसें झालें असतें तर फारच बरें झालें असतें !

डोक्यांत विचारचक्र सुरू होतें ! दुसऱ्या शंकाहि मनांत डोकावूं लागल्या ! मी चमत्कारिकपणें एकदम पुटपुटलों, ' Love dies !!...'

"हं हं !" म्हणत तूं मला आपल्या डोळ्यांनीं दटावलेंस ! तरीहि Meredith कवीच्या त्यापुढील ओळी यंत्रासारख्या माझ्या तोंडांतून बाहेर पडल्याच—

"In tragic life, God wot,
No villain need be !
passions spin the plot;
We are betrayed by what is
false within !"

पण तुला तें पसंत पडलें नाहीं; तूं झटकन् पुढें झालीस; दोन्ही कर माझ्या गळ्यांत टाकून आपल्या ओंठांनीं माझें मुख बंद केलेंस !

' नको गडे ! असं भलभलतं कां बोलावं ! ती कविकल्पनाच, नव्हे का ? खरंच का वाटतं असं ? ' तूं भराभर अधीरतेनें मला किती तरी असे प्रश्न केलेस !

मला स्वतःला तरी कुठें खरें वाटत होतें ? भांबावल्यामुळें माझी मति सुन्न झाली होती ! कांहींच सुचत नव्हतें !

अतिस्निग्ध आलेल्या तुझ्या नेत्रद्वयांतील तेज मात्र, तुझें म्हणणें पटवीत होतें !

...आणि तशा सुखी स्थितींत आपण किती वेळ जवळजवळ बसलों होतों कोणास ठाऊक !

* * *



' अगबाई ऽ ! आपण कुठं आहों ? वेळ किती झाला बरं ! आई काय म्हणेल ? लोक काय म्हणतील आपल्याला ?' तूं दचकून एकदम उभी राहिलीस, आणि तुझ्यापुढें प्रश्नचिन्हें उभीं राहिलीं !

निसर्ग व व्यवहार यांत हाच फरक असतो ! व्यवहारी जगांत पहिला दुसऱ्याचा अंकित असतो ! एरव्हीं कागदोपत्रीं त्याचा 'निसर्गराज' म्हणून हवा तेवढा उल्लेख होवो !

'लोक काय म्हणतील ?' हा प्रश्न तुलाच प्रथम जाचला ! आणि साहजीक आहे ! स्त्रीलाच तो जगांत जास्त जाचतो ! जगांतील व्यवहारसुद्धां एकतर्फी !

क्षणापूर्वीचें सर्व, स्वतःचें स्वतःलासुद्धां ' अनीती'चें वाटूं लागलें ! कां ?—व्यवहारी दृष्टि !—'मनुष्यनिर्मित बंधनाचा अभाव !'

पण अनीति म्हणजे तरी काय ?

सर्व ! अगदीं सर्व ! ! किंवा कांहींच नाहीं ! !

प्रचलित नीतिकल्पना हीच तेवढी पुण्यप्रद ! जरा तिला सोडून आचरण झालें कीं—अनीतीचा डांगोरा; खासा एककल्ली व अरेरावी न्याय. निसर्गापेक्षां कृत्रिम बंधनांची किंमत जास्त का ? अरेरे, नैसर्गिक प्रेमाची व आशेची हिरवळ अशा फूत्कारांनीं करपून काळी होते !

व्यक्ति समाजासाठीं कीं समाज व्यक्तींसाठीं ?

आपण प्रेमाच्या नैसर्गिक साम्राज्यांत होतों ! सभोंवारचा कृत्रिम बंधनांचा पसारा आपण साफ विसरलों होतों !

पण वेडे, तो कसा आपल्याला विसरेल ? स्वतः आपल्याला आपली काळजी नसेल इतकी आपली काळजी त्याला ! 'चुकलेल्यांना सरळ मार्गावर आणण्याचें,' बंधनें घालून 'नीति' शिकविण्याचें वगैरे महत्त्वाचीं कामें करणारें सामाजिक 'अदृश्य भूत' स्वस्थ कसें बसेल !

पण बंधनांनींच 'अनीति' वाढते; सुसंस्कृत मनुष्यप्राणी निसर्गत फार कमी चुका करतो हें त्यांना कोणी सांगावें ?

किशोरी, आपल्याला किती उमेद होती ! पण आपलीहि तीच स्थिति झाली ! झाली कसली—सर्व हेतुपुरस्सर केलें गेलें !

निसर्ग व व्यवहार, व्यक्ति व जमाव यांचा लढा, जगाच्या अंतापर्यंत हा असाच कायम चालावयाचा काय ?

* * *

आपल्या दृष्टीनें कोणीच पहात नव्हतें ! ज्याची त्याची स्वतःची पहाण्याची दृष्टि निराळीच ! आणि साहजीकच आहे !—व्यवहारी जगाला व्यवहाराशिवाय दुसरें काय दिसणार ?

'मला न विचारतां ? येथपर्यंत मजल !' बाबांना अपमान वाटला ! 'गरिबाची पोर ?—' त्यांची तिडीक मस्तकाला गेली ! 'लोक काय म्हणतील ?—' आणि त्यांची सामाजिक प्रतिष्ठा ? त्यांना चारचौघांत खालीं पहाण्याची वेळ नाहीं कां यावयाची !

कधीं दृश्यमान न होणारें सामाजिक भूत त्यांच्याभोंवतीं घिरट्या घालून त्यांना भेवडावूं लागलें !

तुझ्या अण्णांना, आईलादेखील प्रथम आपला संबंध रास्त वाटत होता ! पण त्यांतहि व्यवहारी दृष्टि होतीच ! नाहीं तर बाबांचें विरुद्ध मानस समजतांच त्यांना आपल्या बाबतींत अकारण वैषम्य कां वाटूं लागावें ? 'उगीच लोकापवाद नको आपल्यावर !' तें भूत त्यांच्याभोंवतींहि घोंटाळूं लागलें !

खुद्द तुझ्या आईलाहि लागलींच तुझ्याविषयीं अविश्वास वाटूं लागला ! तो तुझ्या शिक्षणाचा परिणाम ठरला !—अनीति दिसूं लागली !—आणखीहि पुष्कळ वाटलें !!

कां ?

तिचें तुझ्यावर प्रेम नव्हतें असें नाहीं—पण त्या प्रेमाला त्याच भूतानें पछाडलें होतें !

शिक्षणाच्या माथीं सर्व मारून तुला कॉलेजची पायरी चढूं दिली नाहीं !— आणि मग शेवटीं, ते सर्व आपले 'आचरट चाळे' ठरले ! आपण 'अनीती'नें चालणारीं गुन्हेगार ठरलों! व्यवहारांत निरपेक्ष प्रेम करणें हा गुन्हाच समजतात !

एकाअर्थी तें बरोबर होतें ! आपल्याला मनुष्यनिर्मित बंधनें लागलींच घालणें शक्य नव्हतें ! नैसर्गिक बंधनांवर कृत्रिम जगाचा विश्वास कोठपर्यंत व कां बसावा ?

दांभिकांची एक मात्र गंमत असते ! त्यांच्या मनांत असतें एक न् आपला वृथा मोठेपणा राखण्यासाठीं ते तोंडानें दुसरेंच बोलतात !!

पण आपल्या सरल हृदयांना सभोंवारची ही जनरीति कशी अंगीं आणतां येणार ?



होय ! तें भूतच सर्वांना भेडसावीत होतें ! तरी त्या भुताकडेच सर्वांची सहानुभूति !!

प्रेमापेक्षां जगांत भीतीच्या जोरावरच जास्त कामें चालतात एकूण !!

* * *

आपला संबंध येऊं नये ही बाबांची मनापासून इच्छा ! त्यासाठीं त्यांनीं सर्व उपाय योजले ! त्यांत त्यांचा मान, त्यांची सामाजिक प्रतिष्ठा या सर्वांचें संरक्षण होणार होतें !!

खुद्द पित्याची ही स्थिति बरं ऽ !

आई तरी काय करणार होती ? तिच्या प्रेमामुळें तिचें अंतःकरण चार दिवस धडपडलें असतें ! पण तें अदृश्य भूत मानगुटीवर बसल्यावर इतर सर्वांप्रमाणेंच तिचीहि खरी वाचा बंद पडली असती !

आतां मला चांगली कल्पना आली. सभोंवार स्वार्थाशिवाय फारसें कांहींच दिसून येत नाहीं ! दंभ...दंभ...चोहोंकडे दंभ !

* * *

किशोरी, मला तुझ्या निरपेक्षतेची पूर्ण कल्पना होती !

पण इतक्यांचे स्वार्थ—इतक्यांचे दंभ दुखवून त्यांना दुःखी करावें ? त्यापेक्षां त्या सर्वांना सुखी करण्यासाठीं, मीं यदृच्छा होईल त्या भवितव्याला मान वांकविण्याचें ठरविलें !

तुझ्या विशाल अंतःकरणांतहि तेच विचार आले असतील ! होना ? त्याशिवाय पुढील घटना कशा घडून आल्या असत्या ?

मी तुला पूर्णपणें जाणत होतों !

तुलाहि माझी पूर्ण खात्री होती !

प्रिये, हृदयांच्या मीलनप्रसंगींच आपलें लग्न झालें ! कृत्रिम बंधनांच्या उभारणीनें मध्यें बांध घालणें कोणाला शक्य आहे बरें ?

पण याची पर्वा कोणाला ?

गोरज मुहूर्तावर झालेल्या 'शरीरसंबंधा'च्या मेजवानीचे 'लाडू खावया'स घालणारा लग्नविधि हाच नीतिमान् व श्रेष्ठ ठरतो !

नाटकी जगांत कृत्रिमतेला व गाजावाजालाच जास्त मान असावा यांत नवल नाहीं !

* * *

शेवटीं त्या अदृश्य भुतानें खून करण्याचा घाट घातला.

आणि केलाहि !!

सर्वांनीं त्याला मदत केली.

तुझ्या अण्णांना वाटलें, ‘नको; गोष्टी जास्त थराला गेलेल्या बऱ्या नव्हत!’ त्यांना सर्व ठाऊक असूनहि त्यांनीं ‘ठरवून टाकलें!’ ‘कांहीं नाहीं! जाईल पोर चार दिवसांनीं विसरून लग्नानंतर! तोंपर्यंत बाबासाहेबहि माधवाचं घेतील उरकून!’ त्यांना वाटत होतें.

सभोंवारच्या सर्वांचा उत्साह पाहून तूंहि त्याला मान वांकविलीस!!

तेव्हांच तुझ्या प्रेमाची उत्कटता माझ्या हृदयाला खरी समजली!

*　　*　　*

एका गोरज मुहूर्तावर आधीं ठरविल्याप्रमाणें तुझा पद्माकराशीं ‘शरीरसंबंध’ झाला! रुखवतें नाचलीं! विहिणींचें मानपान झाले! लुगडीं-खणांची खैरात झाली! मेजवान्याहि झाल्या पुष्कळ! चार दिवस चमचमीत चाललें होतें सर्वांचें.

जगांत प्रत्येक प्रसंगाला व्यावहारिक स्वरूप आणण्याचा प्रघात कांहीं नवीन नव्हे!

तुला स्वतःला नाहीं तरी सभोंवतालच्या पुष्कळ लोकांना आनंद झाला ना? तूं त्यांतच आनंद मानलास!!

*　　*　　*

माळ गळ्यांत पडली तेव्हांच त्या अदृश्य भुतानें हंसत हंसत खून केला? त्याच्या हंसण्याच्या खदखदाटांत तुझ्या हृदयाच्या वेदना कोणाला ऐकूं येणार! सर्वांची सहानुभूति त्या खुनी भुताकडेच!!

त्या दिवसापासून तुझी माझी भेट नाहीं!

तसें म्हटलें तर रोजच भेटतों आपण! वक्षस्थलांतील तुझ्या हंसतमुख सूर्तीची मला नेहमीं भेट होते! तिचेंच, हें तूं दिलेलें प्रतिबिंब—ही प्रतिमा माझ्या सन्निधच असते!

*　　*　　*



माझें हृदय हरवल्यासारखें झालें होतें!

तुझ्या हृदयाची ठेव तूं आधींच माझ्याकडे केलेली असल्यामुळें तुझी पद्माकराबरोबरची वागणूक तुझ्या इच्छेविरुद्ध, किंचित् कठोरपणाची होई! पण त्याला तुझा काय इलाज बरें!

शरीरानें किती दिवस नेट धरायचा! तूं अंथरुणाला खिळल्याची बातमी शेवटीं माझ्या कानीं आली!

मी माझ्या खोलींत बसल्याबसल्याच तुझी भेट घेत असें!

तुझें तरी हृदय किती विशाल! त्या अदृश्य भुताच्या भीतीनें पछाडलेल्या सर्वांना, वैषम्य वाटूं नये म्हणून तूं मला भेटण्याची एकदांहि इच्छा दर्शविली नाहींस! प्रिये, किशोरी! मला तुझ्या वागणुकीचा इतकाहि अर्थ समजला नसेल असें तुला वाटलें काय? वेडे! मी दुसरी शंका तरी कसली घेणार?

आणि मग एके दिवशीं त्याच्या—त्या अदृश्य भुताच्या—अगदीं मनासारखें झालें!

तूं शरीराला कंटाळून तें सोडलेंस! जड-बंधनांच्या अतीत गेलीस! कृत्रिम बंधनें फोल ठरलीं!

आणि त्याच वेळीं—तेव्हांच तूं व मी एक झालों!!

*　　*　　*

पद्माकराचा तितक्याच थाटानें दुसरा ‘शरीरसंबंध’ झाला!

आणि त्या सामाजिक अदृश्य भुताला तुझें शरीर तेवढें नष्ट केल्याच्या सुखाशिवाय दुसरें काय मिळणार होतें नाहीं तरी?? शरीरसंबंधच होता तुझा तो!

कृत्रिम बंधनाची इमारत ढांसळून पडली!

पण निसर्गाच्या भक्कम पायावरील आपलें दुमदार प्रेममंदीर तसेंच कायम राहिलें!!

*　　*　　*

देवी! जगांतील तुझ्या महत्त्वाकांक्षा माझ्याप्रमाणेंच नाहींशा झाल्या! पण शरीरत्यागाचें तुला मुळींच वाईट वाटलें नसेल! शेवटपर्यंत तूं सभोंवारच्या लोकांना सुखविण्याचीच खटपट केलीस!

शिवाय आपण एक व्हायचेहि राहिलों नाहीं!

किशोरी, मीहि शरीर असेपर्यंत याच समाजाची सेवा करून त्याला सुखी करण्याचा प्रयत्न करणार आहें!

असा गोड सूड घेणें हेंच आपलें कर्तव्य नव्हे काय? हें जड शरीर त्याच समाजासाठीं झिजवून संपल्यावर आपण खुल्या अगदीं खुल्या वातावरणांत संचार करूं!!....

तोंपर्यंत या हृदयमंदिरांत अशीच माझ्या सन्निध राहून, माझ्या जळालेल्या महत्त्वाकांक्षांच्या अवशेष राखेंतूनच, समाजाला कांहीं तरी उपयुक्त असें सादर करण्याच्या कामीं, उत्साह उत्पन्न करून, मदत करशील ना??

पुणें, ऑगस्ट, १९३१.

(प्रसिद्धि-'यशवंत')

# ५—'पंकस्य प्रक्षालनम्'

**एक समाजकथा**

नरेंद्र देसाईच्या शेतवाडी जवळील साध्याशा घरीं, जगांत, नव्यानेंच पदार्पण करणाऱ्या चिमुरड्याचें, आज बारसें होतें!

दिवाणखान्यांत टांगलेल्या पाळण्याभोंवतीं त्या खेडेगांवच्या, आसपासच्या प्रेमळ सुवासिनी आनंदानें जमल्या होत्या. आपल्या छकुल्याला साध्याच पण टापटिपीच्या थाटमाटोपान्यानें सजवून त्याच्याकडे प्रेमपूर्ण नजरेनें पाहातांना नलिनीच्या मनाला आनंद होणें अगदीं सहाजिक होतें!

"गोविंद घ्याऽऽ.... कुणि गोपाळ घ्याऽऽऽ...." वगैरे शब्द उच्चारीत, जमलेल्या सुवासिनी त्या नूतन बालकाला आपापसांत घेत देत. त्या आनंदाच्या प्रसंगीं सर्वच हसत खिदळत असणार यांत नवल नाहीं!...

पण नलिनी विचार करीत बाजूला स्तब्ध बसली होती!

इतक्यांत सोनार आला. एकीनें बाळाला पुढें नेल्यावर, त्यानें त्याचे कान टोंचून त्याला बराच रडवला!...

बाळाच्या आक्रंदनानें नलिनीचें मातृहृदय आपल्या तंद्रींतून एकदम जागें झालें. तिनें त्याला लगबगीनें घेऊन थोडेंसें पाजलें तेव्हांच तो शांतचित्त झाला.

इतक्यांत त्यांच्यांतील एका पोक्त बाईनें त्याला घेऊन येण्यास सांगितलें; एक उत्साही तरुणी त्याला नलिनीकडून घेऊन त्याचा मुका घेत म्हणाली, "काय हो नलिनीताईऽ नांव ठेवायचं, या छबकड्याचंऽ? लबाऽऽड गुलाम! एवढेंसें बघतोय् पहा कसा कुठं तरीच—अजून बघतां सुद्धां येऊं नये म्हणजे काय...गेलें?...."

नलिनी कौतुकपूर्ण नजरेनें आपल्या चिमण्याकडे पाहूं लागली. इतक्यांत त्याच बाजूस टांगलेल्या मोठ्या फोटोकडे तिचें लक्ष गेलें.

त्यावरच तिची नजर थोडा वेळ खिळली!

ती एकदम दचकली!

" नांव का ?...' अविनाश ' ठेवावं ! " ती इतकंच म्हणाली.

तिचा चेहरा किंचित् त्रस्त दिसत होता. डोक्यांत नाना विचारांचें बरेंच तुंबळ युद्ध चाललें असावें हें थोडें निरखून पाहातां समजून येण्यासारखें होतें.

नलिनी पाळण्याजवळ गेली.

सर्व समारंभ झाले. ती पोक्त बाई, शेवटीं त्या बालकाच्या तोंडांत चिमुटभर साखर घालून म्हणाली " बाळाऽ! तुझं नांव ' अविनाश ' ठेवलं बरं का ! !... "

बाळानें हात पाय हलवले !

नलिनीच्या आधींच किंचित् फिक्या असलेल्या चेहऱ्यावर थोडी दुःखाची छाया पसरली. जरा अश्रूंनीं डबडबलेल्या डोळ्यांनींच तिनें पाळण्यांतील बालकाकडे पाहिलें; तेथून तिची दृष्टि पुन्हां त्या दारावर लटकावलेल्या फोटोवर गेली.

तिनें एक निश्वास टाकला !

अशा आनंदाच्या प्रसंगीं नलिनीच्या डोळ्यांत अश्रू कां उभे रहावेत ? दुःखाचे निश्वास कां ऐकूं यावेत ? ?....

पण स्त्रीहृदय हें एक गुंतागुंतीचें महान् कोडें असतें म्हणतात !...

आणि तें खरेंच ! !

* * *

त्या दाराजवळील फोटोखालीं तिनें पाळणा मांडला होता; बाळ पाळण्यांत गाढ झोपीं गेला होता. त्याच्या अंगावर तिनें नीट पांघरूण घातलें; व मच्छरदाणी सोडून ती टेबलाजवळच्या खुर्चीवर जाऊन बसली.

टेबलावर पडलेल्या आपल्या प्याड मधील निरनिराळीं पत्रें तिनें क्रमवार लावून त्यांतून एक दोन पत्रेंच काढून घेतलीं. मधेंमधें तिनें योग्य ठिकाणीं सकाळीं स्वतःच चिरखाडलेले कागद ठेवले आणि त्या टांचणाच्या वरल्या पानावर तीन चार वाक्यें खरडलीं......

पुन्हां हातावर डोकें ठेवून तशा तऱ्हेनें विचार करण्यांत तिची संध्याकाळ केव्हांच निघून गेली. पुष्कळ वेळ ती तसेंच, टेबलावर डोकें टेकून बसली होती. डोळे मिटतांच किती तरी चित्रें तिच्या दृष्टीपुढें नाचूं लागलीं !

तिनें, समोर उघड्या असलेल्या वहीच्या पहिल्या पानावर अगदीं हळू हळू शेवटचें वाक्य लिहिलें व त्या ठिकाणचीं तिन्ही चारीं वाक्यें तिनें पुन्हां एकदां स्वतःच्या समाधानासाठीं वाचलीं—



" सुख-दुःखामुळेंच आयुष्याला मौज आलेली आहे !....त्या त्या स्थितींत असतांना, मनुष्याला, सुखाचा आनंद व दुःखाचा विषाद, उत्कटतेनें वाटत असतोच !....परंतु नंतरही, एकदां मागें वळून सिंहावलोकन केल्यास, काटलेल्या रस्त्यांतील, काटेकुटे, खांचखळगे पाहून, त्यांतूनच आपण वाट काटीत आल्याबद्दल साभिमान आनंद होतो ! !...."

ती पुन्हां डोकें टेंकून पडून राहिली ! तिच्या मनाची अस्वस्थता प्रत्येक कृतींत दिसून येत होती ! !

महेश व नरेंद्र येऊन, किती तरी वेळ तिच्या खुर्चीजवळ उभे राहिले; पण तिचें त्यांच्याकडे मुळींच लक्ष नव्हतें. नरेंद्राच्या शेतवाडींतील नवीन लागवड पाहून झाल्यावर त्याच्या बरोबर परत येतांना, महेशनें, फुलझाडांच्या विभागांतून, एक मोठेंसें सुंदर गुलाबाचें फूल आपल्या वहिनीसाठीं प्रेमानें आणलें होतें. पण त्याकडे नलिनीनें अजून पाहिलेंही नव्हतें.

दोघांचा थोडासा हिरमोडच झाला. वहिनीची थट्टा करावयास आलेला महेश, तिला तशा तऱ्हेच्या मनःस्थितींत पहातांच हिरमुसला !

" वहिनी, कसला इतका विचार करते आहेस ?" त्यानें तरीही थोड्याशा थट्टेच्या स्वरानें विचारलेंच, " नरेंद्राविषयीं कीं काय ?...हा बघ तोच आला आहे !....कां तुझ्या छकुल्याचा ? ?"

त्याच्या आवाजानें नलिनी आपल्या तंद्रींतून एकदम जागी झाली; तिनें महेशाकडे पाहून हास्य केलें, परंतु तें कृत्रिम होतें हें तो लागलीच समजला.

नरेंद्र टेबलाजवळच उभा होता. टांचणाचें पहिलें पान उघडेंच असल्यामुळें, त्याची दृष्टी सहज तिकडे गेली; तोही एकदम चमकून जवळच्या खुर्चीवर बसला त्याच्या डोक्यांत विचारचक्र सुरू झालें; भूतकालांतील एक एक प्रसंग डोळ्यांपुढें येऊं लागले !....

महेशानें, हें नेहमींचें जोडपें, इतकें गंभीर, फारसें कधींच पाहिलें नव्हतें; त्यानें हातांतील गुलाबाचें फूल एका बाजूस ठेवलें व टेबलावरील टांचणाची वही उचलून घेऊं लागला.

नलिनीनें प्रथम त्याला मानेनें ' नको ' म्हणून आडकाठी केली, पण शेवटीं फारसे आढेवेढे न घेतां ती त्याच्या हातीं दिली.

पहिल्या पानावरील मजकूर वाचतांच महेशचाही नेहमींचा आनंदी अल्लड-पणा ओसरून, तो गंभीरपणें, नरेंद्राजवळच्याच एका खुर्चीवर पुढील पानें चाळूं लागला!

त्यापुढील पानावरच लिहिलें होतें—'[ स्वसमाधानासाठीं कथारूपानें लिहिलेलें आत्मकथन ! ]'

आनंदी वृत्तीनें बोलतां खेळतांना नरेंद्र मध्येंच एकदम गंभीर होऊन एखाद्या तिरसटासारखा कां वागतो, नलिनीच्या थट्टेखोर व साधारणतः आनंदी असणाऱ्या स्वभावामागें, कधीं कधीं दिसणारी खिन्नता कां असते याचा त्याला हळू हळू उलगडा होऊं लागला. त्यानें सुरवातीपासून तें वाचलें—

* * *

"बाल्यावस्था! खरोखर किती मौजेचा काळ तो? मनुष्याच्या आयुष्यभर लहानपणच कां टिकत नाहीं??

त्या दिवशीं लहानग्या नलिनीची कोण धालमेल?....तिच्या घरीं एक छोटा खेळगडी आला होता नवीन! सुरवातीचा थोडा संकोच नाहींसा झाल्यावर त्यांचें मेतकुट जुळायला वेळ लागला नाहीं.

'ए तुझें नांव काय नलेन्द्र काले?'; तिनें विचारलें त्यानें मान हलवली.

'कुठ्ठन ले आलास तूं? न् ते बलोबलचे कोन?'

"आमच्या घरून आलों मी आमच्या आण्णाबरोबर"

"ते तुझे कोन पन? तुझी आईले कुटे आहे? अंऽ!"

"आईऽ?–आई नाहीं मला! ते अण्णा माझे काका!" तो जरा हळू हळू, तिची समजूत पटवीत म्हणाला.

"हं!" तिला 'काका' म्हणजे काय, तें कुठलं कळायला? पण तिचें समाधान झालें होतें, तेवढ्याच नवीन माहितीनें! "आतां तूं आमच्याचकले लहा हं! कद्दीं जाऊं नकोछ अगदीं कऽऽऽद्दीं!"

आणि लागलींच तीं दोघें खेळावयास निघून गेलीं.

मामा आड उभे राहून पहात होते. त्यांना मातृपितृविहीन नरेन्द्राकडे पाहून वाईट वाटलें. त्यांच्या मृतभगिनीची मूर्ती त्यांच्या पुढें येऊन अश्रुपूर्ण नजरेनें त्यांना विचारीत होती "माझ्या नरेन्द्र बाळाला प्रेमानें वाढविशील का?"...

* * *



त्या दिवसापासून नरेन्द्र-नलिनीची जोडी कधींच फुटली नाहीं. शाळेंत जातांना, खेळतांना, जेवतांना, जेव्हां पहावें तेव्हां नलिनी व नरेन्द्र हीं दोघें दिवसरात्रींप्रमाणें पाठोपाठ असत.

नलिनीनें आपल्या पाटीबरोबर नरेंद्राच्या पाटीला कोळसा लावावा, जवळच्या सखूनें सांगितलेलें गुपित 'ए सांगूं नको हं कोणाला आपली जम्मत!' अशी प्रस्तावना करीत नरेंद्राच्या कानांत 'फोडावें.' नरेंद्रानें तिला आपल्या पुस्तकांतील चित्रें दाखवावींत, तिचें एखादें उदाहरण सोडवून द्यावें, किंवा एखाद्या घाईच्या दिवशीं ती रडकुंडीस आली असतां तिचें शुद्धलेखन भराभर लिहावें.

बाहुलाबाहुलीच्या लग्नांत बहुतेक तीं दोघीं नवऱ्यामुलाचीं आईबापें होत असत. मग नलिनीचा, 'वरमाई'चा थाट काय विचारतां! रासन्हाण्याचं करतां करतां, व फाटकीं धोतरें अंथरून त्यावरून वरमाईचा मान काढतां काढतां बिचाऱ्या सखूच्या पाठीचा कणा ढिला होई. अशा वेळीं आपला 'मुलाच्या बापा'चा मान बाजूस ठेवून नरेंद्र बाजा वाजवून वाजंत्र्याचें काम करावयास मागें पुढें पहात नसे. चणे, कुरमुरे, गूळ वगैरेंनीं भरलेलें रुखवताचें ताट नेण्याचें काम गड्याच्या अभावीं त्यालाच करावें लागे. पण त्याबद्दलही तो कधींच कुरकुरत नसे. मात्र या सर्वांचा वचपा, तो एखादा खाद्याचे 'चिमणीच्या दांता'नें तुकडे करतांना पुरेपूर काढी! त्याचप्रमाणें अंतर पाट धरणारा, मोठ्यानें ओरडून 'शुभलग्नसावधान' करणारा भटजी, लग्न लागत असतांनां उभे राहणाऱ्या जोडप्यांतील 'दादला' वगैरे बरींच लहानसान कामें त्याला करावीं लागत. वरातीचा घोडाही तोच होई. मात्र थोडेंसें चालल्यावर तोंडानें बंदुकीचा आवाज काढून घोडा बिचकल्यासारखें करून 'दोन पाया'वर उभा राही; अशा वेळीं बरोबर लक्ष ठेऊन ठोकळ्याबाहुलींना संभाळण्याचें काम नलिनी व सखू यांजवर पडे.

सागरगोटे खेळण्यांत नरेन्द्रनलिनी सखूबरोबर असेच. सतरावेळां खडा हलल्यामुळें त्याचा डाव जाई. नरेंद्र पुन्हां पुन्हां प्रयत्न करी, पण नलिनी खेळण्यांत तरबेज असल्यामुळें नरेंद्राची 'एरखय' संपण्यापूर्वी नलिनीची 'वरची एरखय' चालू असे. नरेन्द्राच्या दुरखई तिरखई पूर्वीच सखू त्याजवर हंडी बसवीत असे; अशा वेळीं चिडून तो हाताचे खडे दोघांच्या अंगावर फेंकून पळून जात असे. बराच वेळ वाट पाहूनही तो बोलायला आला नाहीं तर त्याला देवाची किंवा

स्वतःची ' शप्पत ' घातली कीं तो बोलूं लागे. अशा तऱ्हेनें दिवसांतून कितीदां ' गट्टी फूऽ ' होत न् कितीदां एकी होई याचा नेम नव्हता.

पण नन्दु-नलूची जोडी फुटत नसे !

* * *

बाल्यांतील बालिशपणा संपला ! आतांही बहुतेक आनंदच असे. परंतु मधून मधून दुःखाचीही चुणूक त्यांना दिसत असे. मन पूर्वीप्रमाणें निर्मल राहिलें नव्हतें !

खरें व खोटें त्याचप्रमाणें पाप व पुण्य यांत भेद केला जाऊं लागला होता. स्वार्थ कशाला म्हणतात हें बरेंचसें समजूं लागलें होतें. सदाची खेळकर वृत्ति पुष्कळशी कायम होती, तरी मधून मधून स्वतःच्या अकलेप्रमाणें गंभीर विषयही डोक्यांत येत असत. एकंदरींत आतांची स्थिती बालपण व प्रौढपणा या दोहोंची सीमाच होती !....

वर्षें हां हां म्हणतां निघून गेलीं. दोघांमधील अगदीं लहानपणींचा मोकळेपणा आतां कमी झाला होता. नरेन्द्र मॅट्रिक होऊन पुण्यास कॉलेजांत रहावयास गेला. नलिनी तिसरींत गेली होती.

तोही काळ संपला. आतां, थोडा थोडा, तारुण्यांतील अल्लड सभ्यपणा अंगीं येऊं लागला होता. सभोंवार एक प्रकारचा आनंद दरवळलेला दिसूं लागला !

आयुष्यांतील या भागांत मानवी मन निरनिराळ्या भावनांच्या लाटांनीं उचंबळत असतें ! अनुभवाचें दडपण अजून पडलेलें नसल्यामुळें त्याच्या वृत्ती वेळोवेळीं वाटेंत येणाऱ्या विवेकांचे बांधबंधारे लाथाळून चोहोंबाजूंस अमर्यादपणें फोंफावत असतात. धिम्मेपणा, कडु अनुभव वगैरेच्या ओहटीच्या वेळीं बांधत असलेल्या आपल्या मनोऱ्याचे बरेचसे भाग त्यांच्या भरतीच्या वेळीं, बुडून जातील—कदाचित् मोडूनही पडतील—अशी कल्पनाही नसते !

दुरून डोंगर साजरे दिसत असतात !....जगांतील सर्वच, दिसतें तसेंच असतें अशी ठाम समजूत असते. 'सौख्य' म्हणजे काय याची जो तो आपापल्या मताप्रमाणें व्याख्या करूं लागलेला असतो, व तें मिळवण्याची खटपट कशी करावयाची याची रूपरेषा प्रत्येकजण आपापल्या मनांत आंखून ठेवूं लागतो. ' लाथ मारीन तेथें पाणि काढीन ' अशा तऱ्हेच्या घमेंडखोर उत्साहाचें वारें



अंगांतून खेळत असल्यामुळें आपल्या सर्व बेतांना मूर्त स्वरूप येईल अशी पूर्ण आशा वाटत असते.

पण बिचाऱ्याला काय माहिती कीं, परिस्थितीचें वारें सुरू झालें कीं त्यांचे सर्व मनोरे ढासळून पडतात. एखाद्याचा मनोरा उभा राहिलेला दिसून येतो; पण अर्थात् त्याला चिकाटीचा अतिशय भक्कम पाया घातलेला असतो. तथापि एकदां का हे मनोरे ढासळून, तरुण उघडा पडला, कीं तो परिस्थितीच्या झंझावातांत पुरा सांपडतो. त्यांतून सुटतां सुटतां त्याला आपलें सर्व आयुष्य घालवावें लागतें. तोंपर्यंत त्याचीं हाडें खिळखिळीं झालेलीं असतात. आतां जरी तो मुक्त झालेला असला तरी तो नवीन कामास हात घालण्यास धजत नाहीं. झालें तेवढें पुरें, असें म्हणून स्वस्थ असतो. अशा माणसालाच म्हातारा म्हणतात.

उत्साहपूर्ण, नाविन्यप्रिय, बलवान् पण अनुभवशून्य शेखमहंमद तो तरुण ! अनुभवपूर्ण, अशक्त, नाविन्यद्वेष्टा, निरुत्साहि तो म्हातारा ! ! अशीं हीं विचित्र समीकरणें आहेत.

* * *

नरेन्द्र B. Ag. झाल्यावर एका खत तयार करणाऱ्या अमेरिकन कंपनीचा प्रतिनिधी म्हणून राहिल्यापासून त्याला बरेच दिवस घरीं यावयास मिळालें नव्हतें. नलिनी व मामांच्या आग्रहावरून मुद्दाम रजा काढून तो यावेळीं आला होता.

घरीं आल्याला जवळ जवळ एक आठवडा झाला होता. त्या अवधींत नलिनी व नरेन्द्र यांच्या सहवासांतील अडीच तीन वर्षांचा मध्यें पडलेला खंड, केव्हांच भरून निघाला !

कोको पितां पितां मामांनीं नरेन्द्राच्या लग्नाची गोष्ट काढली !

नरेंद्र चमकला; खालीं मान घालून स्तब्ध राहिला.

थोड्या वेळानें वर पहातो तों नलिनी त्याच्या चेहऱ्यावरील भाव निरखून पहात होती ! आपल्या भांबावलेल्या चेहऱ्यावरील चलबिचल झांकण्यासाठीं तिनें पदरानें तोंड पुसण्याचें निमित्त केलें !

...आणि प्रेमपूर्ण हृदयांना वाचा जरा उशीराच फुटते ! —

* * *

नलिनीचें विचलित मन स्थिर होईना; मामांनीं मघां सांगितलेल्या प्रोफे-सरांच्या, नरेन्द्राला सांगून आलेल्या, मुलीचा फोटो पाहण्यास, एका चमत्कारिक प्रकारच्या उत्कंठेनें, ती मामांच्या खोलींत गेली !

" नरेन्द्राचं लग्न होणार ? पण मग ही आनंदाची गोष्ट ऐकून मला कां वाईट वाटावें ? हें काय बाई ?...त्याचं लग्न होऊं नये. असंच कां बरं मला वाटूं लागलं आहे ?—"

नलिनी खोलीकडे हळूच जात असतांना तिच्या मनांत नाना विचारतरंग येत होते. ती खोलींत शिरली. टेबलावरील पत्रें चाळल्यावर तिला पाहिजे होता तो फोटो मिळाला.

तो एका सुंदर मुलीचा होता, व तिच्याकडे ती 'नरेन्द्राची बायको' या दृष्टीनें पहात होती. पहातां पहातां तिच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले ! तिनें प्रयासानें हुंदका आंवरला ! !

नरेंद्राचें लग्न ठरत असतांना स्वतः दुःखी होण्याचें कारण मात्र तिला अजूनही समजेना !

फोटोकडे अश्रुपूर्ण नेत्रांनीं पहात पहात तिच्या हृदयाला ती एकच प्रश्न पुनःपुन्हा विचारूं लागली, " नरेंद्र माझा कोण ?"

आणि त्या प्रश्नाचें उत्तर तर तिला लौकर मुळींच सुचेना !

" काय करते आहेस तेथें नलिनी ?" मागून नरेन्द्राचा अनपेक्षित आवाज येतांच ती दचकली; पत्र व फोटो घाई घाईनें लपविण्याचा ती प्रयत्न करूं लागली. पण नरेंद्रानें त्यापूर्वींच त्या दोहोंचा कबजा घेतला होता !

आपली, तो फोटो लपविण्याची इतकी घाई कां चालली होती हें तिचें तिलाही समजेना ! !.......

" एवढं काय बुआ निरखून पहात होतीस या फोटोकडे ? " नरेन्द्राला पत्र व फोटो यावरून किंचित् उलगडा झाल्यासारखें वाटलें.

"म्हणजे तुझ्या भावी बायकोचा फोटोही पाहूं नये वाटतं आम्ही ! बरारे, आतां पासूनच वैनीचा ..." तिनें स्वतःच्या हृदयाला फसवून विनोद करण्याचा प्रयत्न केला, कृत्रिम हास्य आणलें...

पण वाक्य पूर्ण होण्यापूर्वीं अश्रू तिच्या मदतीकरितां धांवून आले.



नरेन्द्राचाही कंठ भरून आला; नलिनीच्या जवळ जाऊन तो अगदीं हलक्या व अस्पष्ट आवाजांत म्हणाला, " नलूऽ ! असं काय बरं करावं ?....मला खरं काय तें सांग ना ?"

नलिनीच्या अश्रूंनींच पुन्हां त्याच्या प्रश्नाला उत्तर दिलें !

दोघेंही आणखी थोडा वेळ स्तब्ध राहिलीं.

" मला तूं दुष्ट म्हण पाहिजे तर !" शेवटीं नलिनी अश्रु पुसत म्हणाली, " सकाळीं मामांनीं तुला प्रश्न विचारल्यापासून मी अस्वस्थचित्तच आहें !... कसं ? सांगूं तुला ?....मला....मला, तुझं लग्नं होऊंच नये असें वाटतं ! !"

नरेंद्राचे डोळे एकदम आनंदानें चमकले !

" नलूऽ ! खरंच का तुला असं वाटतं ?" नरेन्द्रानें तिला प्रेमळ स्वरानें विचारलें.

तिनें मानेनें ' हो ' म्हटलें; तिच्या नेत्रांतून अश्रु अजून वहातच होते.

" नलिनी, मी आतां चार दिवसांनीं जाणार !" नरेन्द्रानें तिचा हात हातांत घेतांच दोघांच्या अंगावर अननुभूत रोमांच उभे राहिले. लहानपणीं त्यांनीं खेळतांनां, कितिदां एकमेकांना स्पर्श केला असेल; पण आजच्या सारख्या भावना त्यांच्या मनांत किंवा आजच्या सारखे रोमांच त्यांच्या शरिरावर कधींच उभे राहिले नव्हते !

" नन्दू, नकोरे जाऊंस ! मला कसंसंच वाटेल ! !" नलिनीच्या आवाजांत प्रेम ओतप्रोत भरलें होतें.

" मी काय तुला जन्माचा पुरणार आहें थोडाच ?....उद्यां तुझं लग्न..." नरेन्द्र मुद्दाम थट्टा करावयास गेला खरा, पण त्याच्यानें वाक्य पुरेंच झालें नाहीं !...

मत्सर केव्हां केव्हां पुष्कळ गोष्टी सांगूं शकतो !

नलिनीच्या नेत्रांतूनही घळघळां अश्रू वहात होते. हृदयांतील भावनांचा कोंडमारा झाला होता. तिनें त्याचा हात घट्ट धरिला.

आणि शेवटीं भावनांनीं वाचेचा कबजा मिळवला; नलिनी नरेन्द्राकडे पहात म्हणाली "नन्दू, मला कधीं...कधीं....सोडून जाऊं नकोसरे ! माझें ऐकशील का एवढें ? ?"

नरेन्द्राला इतका आनंद कधींच झाला नव्हता! त्यानें तिचे दोन्ही हात हातीं घेऊन म्हटलें, "माझी त्याला मुळींच ना नाहीं, वेडे! मला स्वतःला सुद्धां तें तितकेंच अशक्य आहे?"

दोघांनाही समजून आलें होतें कीं त्यांचीं जीवितें एकमेकांवर कायमचीं अवलंबून आहेत! त्याशिवाय सर्व व्यर्थ असल्यामुळें त्यांना तीं एकरूप करण्यावांचून गत्यंतर नव्हतें!!

त्या घटकेला दोघांचींही प्रेमपूर्ण हृदयें, एकमेकांना झालेलें समाधान व सुख पाहून क्षणाक्षणाला आनन्दान्दोलनें घेत होतीं....

* * *

दुसऱ्या दिवशीं पुन्हां त्याच्या लग्नाचा विषय निघाला असतां नरेन्द्रानें, प्रोफेसरसाहेबांना, विसंबून न रहाण्याविषयींचें, मामांना लिहावयास सांगून, सध्यां कांहीं दिवस त्याच्या लग्नाबद्दल कसलीही खटपट करूं नये म्हणून विनयपूर्वक सूचना केली!

* * *

आठ दिवसांनंतरची गोष्ट!

नलिनी मॅट्रिक पास झाल्याबद्दल दुपारीं आनंदाची तार आली होती. संध्याकाळीं नरेन्द्र व नलिनी समुद्रावर फिरावयास गेलीं!

सूर्यास्त होण्यास थोडा वेळ होता. इतस्ततः विखुरलेले नानाकृति ढग त्याच्या किरणकरांकडून मिळालेल्या प्रकाशचैतन्यानें, तेजस्वी व नटलेले दिसत होते. सूर्य खालीं खालीं जाऊं लागला तसतसे, त्या ढगांना नानाविध, नाविन्यपूर्ण रंग मिळूं लागले; पण पाहतां पाहतां सूर्य अस्तास गेला व ढग बिचारे काळे ठिक्कर पडले!!

नरेन्द्र समुद्रकांठीं बसून हा देखावा पहातां पहातां त्याच्याशीं तो एकरूप झाला!

त्याला नाहक शंका येऊं लागल्या; 'हा हल्लींचा आमचा आनंद-उल्हास, या ढगांच्या नानाविध रंगांप्रमाणेंच, आशासूर्याच्या अस्तानंतर ओसरून जाण्याचा तर संभव नाहीं ना?'...

अंधार पडूं लागला तसा तो भानावर आला!....नलिनी लाटांजवळच्या सपाट झालेल्या वाळूवर, नखांनीं चित्रें काढीत होती! तीं शाबूत राहतील कीं



समुद्राच्या भरतीच्या वेळच्या लाटांनीं किंवा मनुष्याकडून, नकळत होणाऱ्या पायमल्लीनेंही, कदाचित् नजिकच्या भविष्यकालींच पुसटून जातील, असा बिचारीच्या मनाला संशयही शिवला नाहीं! ती आपल्या मनाप्रमाणें चित्र काढण्यांतच गर्क होती!!....

नरेन्द्र तिच्या पाठीशीं जाऊन उभा राहतांच त्याची तिला चाहूल लागली. तिनें हातानें रेघोट्या आढीत ओढीतच मागें वळून विचारलें, "विचारलंस का मामांनां? काय म्हणाले ते??"

नरेन्द्रानें थोड्या वेळानें मानेनें "नाहीं" असें सांगितलें. नलिनीनें एक दीर्घ सुस्कारा टाकला व ती पुढें म्हणाली, "अशी दिरंगाई करून कसें चालणार?.... एखादं नाहींतेंच विघ्न उपस्थित व्हायचं!"

"अग, पण मी मामांबरोबर एक तासभर गप्पा मारत होतों; तरी या बाबतींत त्यांच्याकडे बोलायला संकोचच वाटे मुळीं! अशा गोष्टी वडील माणसांकडे विषद करून सांगायला थोडी धिटाई लागते, नव्हऽ!....तूं सांगशील का?"

नलिनी नरेन्द्राकडे पाहून हंसली; तिला तर तसें करणें शक्यच नव्हतें! "पहा, लोकां सांगे ब्रह्मज्ञान...." नरेंद्र म्हणाला "चल आतां घरीं परतूं या!"

चालतांनां दोघांच्याही मनांत त्यांच्या भवितव्यांतले उंच मनोरे बांधले जात होते! सर्व जग पूर्ण आशामय आहे, असें त्यांनीं त्यावेळीं कोणीही त्यांस विचारल्यास, सांगितलें असतें!!

पण इतक्यांत नलिनीला मामांच्या उतावीळ व आपसंती स्वभावाची आठवण झाली व तिचें धाबें दणाणलें! 'मामांना हें समजण्यापूर्वींच त्यांनीं कांहीं केलें तर?' तिचा चेहरा थोडा खिन्न झाला.

"या संकोचाला मी तोड काढली आहे बरं का?" नरेन्द्र म्हणाला, "आतां मी उद्यां धरणीपूरला गेलों कीं तेथून मामांना एक सविस्तर पत्रच लिहितों. म्हणजे झालं. आतां हांस पाहुं एकदां तोंडभर तो खिन्नपणा सोडून!' नरेन्द्रानें तिचा हात आपल्या हातीं घेऊन तो प्रेमानें दाबत, तिच्याकडे पाहून म्हटलें.

नलिनीही खुदकन् हसली.

भवितव्यावर पसरलेलें धुकें बऱ्याच वेळां सुखदायक होतें!!....

* * *

आज नरेन्द्र पुन्हां नोकरीवर रुजू व्हावयास जाणार ! नलिनीला कसेंसेंच वाटत होतें. त्यांतून, मामांचा हल्लीं होत असलेला मोठा पत्रव्यवहार; त्यांची हल्लींची विचारीवृत्ति, वगैरे मुळें तिला थोडीफार धास्तीच वाटे ! न जाणों, मामा, नेहमींप्रमाणें थट्टेनें म्हणतां म्हणतां कदाचित्, नरेन्द्रानें त्यांना कळविण्यापूर्वी, तिचें दुसरीकडेच लग्न जुळवून टाकावयाचे, अशी तिला कधीं कधीं भीती वाटे ! संध्याकाळीं नरेन्द्र स्टेशनवर जाण्यापूर्वी तिनें त्याला पुन्हा एकदां मामांना पत्र पाठविण्याची आठवण करून दिली !

दोघेंही स्टेशनावर गेलीं तेव्हां गाडीला सुटावयाला १०।१५ मिनिटें अवकाश होता....नरेन्द्रानें ब्याग आपल्या जागेवर ठेऊन तो मामांशीं व नलिनीशीं बोलावयास खालीं उतरला. इतक्यांत शेजारच्या डब्यांतून बाहेरगांवीं जावयास निघालेल्या मैत्रिणीनें हांक मारल्यामुळें ती तिकडे गेली.

गाडीनें शिटी फुंकली तेव्हां नलिनी पुन्हां नरेन्द्राच्या डब्याकडे वळली. तो डब्यांत चढत होता. तिनें त्याच्याकडे हंसून पाहिलें. पण कां कोणास ठाऊक नरेन्द्राचा क्षणापूर्वीचा आनंदी चेहरा अतिशय खिन्न दिसत होता. त्यानें हंसण्याचा वर वर प्रयत्न केला !....पण....

गाडीबरोबरच खिन्न चेहऱ्याचा नरेन्द्र लांब लांब जात होता ! नलिनीला तो मोठा चमत्कारच वाटला !....आपल्या नरेन्द्राच्या हृदयाला कशाचा धक्का बसला ??....

त्या दिवशीं नलिनीची रात्र तळमळून गेली !

* * *

दुसऱ्याच दिवशीं मामांनीं तिला, त्यांना वाटत असलेली आनंदाची गोष्ट सांगितली ! पण....ती तिच्या कानांत तापलेल्या शिशाप्रमाणें शिरली !!

मामांचे जिवलग मित्र गणपतराव यांच्या अविनाशशीं त्यांनीं नलिनीचें लग्न ठरविलें होतें. गणपतरावांना, आपल्या, नुकत्याच विलायतेहून आलेल्या, अविनाशचें लग्न, यंदाच कर्तव्य असल्यामुळें, चार दिवसांनंतरच्या शेवटच्या मुहूर्तावर बडोद्यास व्हावयाचें ठरलेंही होतें.

मामांची ही आनंदाची बातमी ऐकून नलिनीला जबर धक्का बसला. तिला काय करावें तेंच सुचेना !...ती आपल्या खोलींत जाऊन असहाय्यपणें अश्रू ढाळूं लागली !



संध्याकाळीं मामांना नलिनी खिन्न दिसत होती.

"आपण करीत आहों तें चुकत तर नाहींना ?.......चुकणार तें काय व कुठें ?? तिच्या सुखासाठीं चाललें आहेना सर्व......छे, सर्व सुरळीत होईल !!" ते स्वताची समजूत करीत.

* * *

नलिनीला दुसऱ्या दिवशीं सकाळीं नरेन्द्राचें पत्र आलें !

एकदां संपूर्ण वाचून झाल्यावर तिला अतिशय दुःख झालें ! बराच वेळ ती आपल्या खोलींत, गुडघ्यांत डोकें खुपसून रडत बसली होती !

थोड्या वेळानें तिनें जवळच पडलेलें पत्र हातीं घेतलें. अश्रूंनीं डबडबलेल्या नेत्रांना, पत्रांतील अक्षरें अस्पष्ट दिसत होतीं; ती वाचूं लागली—

घरणीपूर, २२ मे १९३०

प्रिय नलिनी,

प्रेमपूर्वक अनेक आशिर्वाद, विशेष—

करतोंच शेवटीं हिय्या ! तुला एकदां सांगून मोकळा होतों.

हें बहुतेक तुला माझें शेवटचेंच पत्र. या नंतर लिहवेलसं वाटत नाहीं ! अन् लिहिणंही रास्त नाहीं !!

नलिनी, आपले लहानपणचे किती आनंदाचे दिवस ते ! सखूची आठवण आहे का तुला ?

नंतर आपलें शाळेंतलें आयुष्य तरी किती मौजेनें गेलें !....त्यावेळीं अशा कांहीं जगांत भानगडी होत असतात अशी आपल्याला अंधुक कल्पना सुद्धां नव्हती !

बालिशपण जाऊन आतांच कोठें आपले डोळे उघडूं लागलों होतों. आपल्याला, नुकत्याच, आपल्या भावभावना व्यक्त करतां येऊं लागल्यामुळें एकमेकांचीं हृदयें समजूं लागून त्यांचा मिलाफ होऊं लागला होता !

मामा माझें लग्न ठरवूं लागले तोंपर्यंत दोघांनाही कांहीं कल्पना नव्हती ! पण माझ्या मनाची चलबिचल होऊं लागली. तूं मला सांगून आलेल्या मुलीचा फोटो पहात अश्रु ढाळूं लागलीस !! अन् नंतरचें आपलें हृदयनिवेदन !....आठवतें

ना तुला सर्व ? तेव्हांच आपल्याला समजून चुकलें कीं आपलें एकमेकांविव.य जगांत चालणार नाहीं !

हृदयें खुलीं झाल्यानंतरचे ते पांचसहा दिवस किती आनंदाचे गेले !—

त्यानंतर मामांना कोणीं सांगावें याबद्दलची आपली आपापसांतील चुरस किती मोहक होती ? त्याचा शेवट असा होईल असं त्यावेळीं आपल्याला वाटलं सुद्धां नव्हतं !

पण त्या दिवशींचा तुझा समुद्रावरील विश्वास खरा ठरला ! तूंच सांग पण ! यांत आपली दिरंगाई का झाली होती कोणत्या तऱ्हेची ? ? अशा गोष्टी वडील माणसांकडे एकदम बोलण्याची छातीच होत नाहीं. ! !

अशा वेळीं तुझी....तुझी आई असती तर ! मला तुझ्या आईची फार आठवण होते ! ! तुझ्या माझ्यासारख्या मातृविहीन मुलांना समजणार नाहीं;–पण नलिनी, आईचं हृदय फार निराळं असतं ! तिच्याकडे आपलं हृदय उघडून हृद्गत सांगतां येतं ! तिचा या प्रसंगीं किती उपयोग झाला असता !–पण बोलून काय उपयोग ?........

निघालों त्या दिवशीं संध्याकाळपर्यंत मी किती आनंदांत होतों. जिकडे तिकडे प्रफुल्ल दिसत होतं ! थोड्याच वेळांत त्याच्यावर विरजण पडेल असं माझ्या ध्यानीं मनीं पण नव्हतं. मी घरीं जाऊन ठरल्याप्रमाणें पत्र लिहिणार होतों मामांना !....आणि....पण...

तुला तुझ्या मैत्रीणीनं हांक मारली. तूं तिच्या डब्याकडे निघून गेलीस. मामांनीं मला तुझ्याकडे पहात हंसत विचारलं, "बरी आठवण झाली; नरेन्द्र, तो गणपतराव पाटकरांचा अविनाश ठाऊक असेल तुला ?"

"हो हो, तो तर प्रीव्हिअस मध्यें माझ्याच कॉलेजमध्यें होता. चांगला हुशार विद्यार्थी होता." मी म्हणालों, "कां बरं ?"

"नाहीं," मामा म्हणाले, "तो नुकताच विलायतेहून परत आला आहे इंजिनियर होऊन. !"

"हो, त्याच दिवशीं वाचलं टाइम्समध्यें" मी म्हणालों, "त्यांची म्हणे बडोदें संस्थानांत नेमणूकही झाली साडेतीनशें रुपयांवर !"

"त्याचे वडील माझे जुने स्नेही !" मामा म्हणाले, "त्यांना मी आपल्या नलिनीविषयीं लिहिलें होतें. त्याचं आजच सकाळीं पत्र आलं आहे, पसंत



असल्याचं ! त्यांनी पाहिली होती मागें तिला. मुहूर्त एकच राहिला आहे शेवटचा ! तेव्हां तोच ठरविल्याचं मी आज पत्र लिहून टाकलं आहे. नलिनीला योग्य असेंच हें स्थळ आहे नाहीं का ?"

नलिनी, आतां तूंच विचार कर ! त्यावेळीं माझ्या मनाची स्थिती काय झाली असेल ! मी कोणच्या तोंडानें 'होय' किंवा 'नाहीं' म्हणून सांगूं ! !

अशा वेळीं वस्तुस्थितीही नीट सांगण्याचं धाडस माझ्यानें होईना. मला भयंकर यातना होत होत्या; पण मी हृदयाचा खून करून 'हो' असंच उत्तर दिलं !

त्याच वेळीं, तूं आपल्या मैत्रिणीबरोबर हांसत होतीस. तो तुझा निष्पाप हसरा चेहरा पाहून माझ्या हृदयाला जास्त पीळ पडला. मला वाटलें बिचारीच्या ही भानगड ध्यानीं मनीं सुद्धां नसेल ! तसा तुझा हसरा चेहरा पुन्हां कधीं तरी पहावयास मिळेल काय ?....

आपल्याला मामांना दोष देतां येईल ? मला कांहींच उत्तर देतां येत नाहीं !

तुझ्या लग्नाला अवघे चार दिवस राहिले आहेत; आतां सर्व आपल्या आटोक्याबाहेर आहे !

नलिनी, किती आपण दुर्दैवी ! आपल्या सर्व कल्पना, कल्पनाच ठरल्या. नशीबाची आठवण अशा वेळीं होते.

आजपासून माझ्या आयुष्याला निराळें वळण मिळणार !...आणि तुझ्याही—

मी किती जरी सुखी हो म्हणून सांगितलं तरी तूं सुखी होणार नाहींस हें मी जाणून आहें; पण अविनाश फार कोंवळ्या हृदयाचा व प्रेमळ तरुण आहे. त्याच्या संगतींत तुला सुख मिळो अशी मी मनापासून इच्छा करतों.

बिचाऱ्याला या गोष्टीची कांहींच माहिती नसेल. ती तशीच त्याला नकळत ठेवून त्याला सुखी कर.

आणखी पुष्कळ लिहावंसं वाटतं ग ! पण लेखणी चालली पाहिजे ना. चार दिवसांपूर्वी जितका मी सुखी होतों तितकाच आज दुःखी आहें; पण झाल्या गोष्टीस इलाज काय ?

मामांनीं तुला सुखी करण्याचा प्रयत्न केला; असल्यास तो फसला ! आतां त्यांचा तुला सुखी केल्याचा आनंद तरी कायम ठेव.

असो. जास्त मोह आवरतोंच. पत्र संपवितां संपवितां एवढंच सांगतों कीं, मला विसरून तूं आतां अविनाशला सुखी करण्याचा प्रयत्न कर. पत्र संपविलेलेंच बरें आतां....

तुझा दुर्दैवी
नरेंद्र.

ता. क.—तुझ्या लग्नाला यायला माझें हृदय धजणार नाहीं! पण कसं करणार? मामांना वाईट वाटेल तें! मग यावं लागणारच का शेवटीं! तुझ्या-बरोबर बोलण्याइतकं मला धैर्य होणार नाहीं मात्र!!—नरेंद्र."

*    *    *

नलिनी सारखी रडत होती!... तिचें डोकें सुन्न झालें होतें; आजच्या सारखा प्रसंग तिच्यावर कधींच न आल्यामुळें तिला कांहीं उपायच सुचेना!

मामा दुपारीं तिच्या खोलींत आले असतानां डोकें दुखण्याची सबब पुढें करून तिनें वेळ मारून नेली! संध्याकाळीं ती समुद्रावर जाऊन डोकें शांत करण्यासाठीं एकटीच बाहेर पडली.

जातांना मैत्रिणीकडे वळण्याची तिची इच्छा नव्हती; पण तिच्या आईनें तिला हांक मारल्यामुळें आंत जाणें भाग पडलें. "काय ग तुझं बडोद्याला दोन तीन दिवसांनीं लग्न आहे म्हणे!...अंऽ बरीच किंग आंतल्या गांठीची आहेस तूं? आम्हाला दादहीं लागूं दिली नाहींस..."

त्रस्त नलिनी लौकरच तेथून बाहेर पडली.

'मामांनीं माझं सुख पाहिलं का मला दुःखी केली!...सर्वांना समजतं तेव्हांच मलाही समजतं! माझ्या लग्नांत माझ्या विचाराची आवश्यकताच नाहीं का? चार सहा दिवस आधींच मला सांगण्याइतकी का ही बाब क्षुल्लक आहे!.... अरेरे, सुखाच्या स्वतःच ठरविलेल्या कल्पनांमुळें त्यांच्यासकट मीही तोंडघशीं पडून दुःखी झालें!" तिच्या डोक्यांत विचारचक्र सुरू होतें.

क्षणांत चिडणें, क्षणांत रडकुंडी येणें अशीं सारखीं तिच्या हृदयाचीं दुःखद आंदोलनें चाललीं होतीं!

मामा संध्याकाळीं तिची विचारपूस करावयास तिच्या खोलींत गेले. त्यांनीं प्रेमळपणें तिच्या पाठीवरून हात फिरवतांच तिला एक हुंदका आला.



'वेडे, आतां तूं चार दिवसांनीं बड्या इंजिनियरची बायको होणार! अन् असं काय बरे वेड्यासारखं करतेस?' मामा हंसत म्हणाले.

नलिनीच्यानं आतां राहावेना!....ती मुसमुसून रडूं लागली.

"पण मामा, मला लग्नच करायचं नाहीं!" नलिनीनें मामांना बिलगून कांहींतरी सांगण्याचा प्रयत्न केला!

"कां बरं!....असं कां वाटलं तुला!" मामांनीं पाठीवर हात ठेवून विचारलें.

नलिनीला एकदां वाटलें अगदीं सर्व सर्व सांगून टाकून मोकळें व्हावें; पण तें शक्य होतें का?—तशा अगदीं शेवटच्या घटकेला, सर्व कशा तऱ्हेनें सांगावें तें सुचेना!....तितकें धैर्य, प्रयत्न करूनही, तिला आयत्या वेळीं आणतां येईना!!....ती जास्तच मुसमुसून रडूं लागली; संयम करून ती रडें थांबविण्याचा प्रयत्न करीत होती.

"नलूऽ काय ग?" मामांनीं पुन्हां विचारलें.

"मला अजून शिकायचं आहे मामा!" ती अगदीं रडकुंडीस येऊन, कांहीं तरी सबब पुढें करण्याकरतां म्हणाली.

मामांचा जीव खालीं पडला!

"इतकेंच ना वेडे!" मामा तिला कुरवाळून म्हणाले, "अग, तुझे मामंजी शिक्षणाचे मोठे भोक्ते आहेत हो!....ते तुला लग्नानंतरही लागलीच परवानगी देतील!!"

नलिनीच्या नेहमींच्या शांत मनःस्थितींत आणि आतांच्या भावना खवळलेल्या व भयभीत मनस्थितींत फार फरक होता!....तिचे शब्दच उमटेनात!....

कोणत्या तऱ्हेनें इतक्या घाईघाईनें आपले मनोव्यापार, मामांना विषद करून सांगण्याचा प्रयत्न करावा, हें तिला मुळींच समजेना!....

नलिनीची असलेली थोडीबहुत आशाही नष्ट झाली!!....

मामांचें मात्र समाधान झालें होतें; त्यांना आपण नलिनीच्या सुखाला सुरवात करून दिल्याबद्दल अजूनही आनंद होत होता!...

"पोरीला आपल्या आयुष्यांत कांहीं तरी नवीन घडत आहे अशी जाणीव झाल्यामुळें झालं असेल असं!" त्यांनीं आपल्या मनाची समजूत करून घेतली.

मामा गेल्यावर नलिनीनें दार लावून घेतांच, तिला ओक्साबोक्शीं रडूं कोसळलें!...पण तिनें बिछान्यांत तोंड खुपसून तसेंच दाबण्याचा प्रयत्न केला!!...

दुसरे दिवशीं मामा नलिनीसह बडोद्यास गेले! त्यांना त्यांची नातलग मंडळी बडोद्यास मिळणार होती.

नलिनीनें रात्रभर विचार करून मामांना सुखी करण्याचें ठरविलें असल्यामुळें स्वतः दुःखी असूनही तिनें वरवर हंसरा चेहरा केला. कारण आतां गोष्टी इतक्या थराला गेल्या होत्या कीं चूक सुधारणें म्हणजे "दोन घराण्यांची 'अब्रू' घालविणें!" तेव्हां होईल तें होऊं देणें हाच तिला मोकळा मार्ग होता. आणि त्यांतून थोडी स्वार्थत्यागाचीही कल्पना तिला भासूं लागली होती!

नरेन्द्र लग्नासाठीं आल्यावर 'घरचा' म्हणून त्याच्याकडे एकंदर व्यवस्थेचा बराचसा भाग आला. त्यावेळीं त्याला खरा नरेन्द्र व व्यवहारांत वावरणारा नरेन्द्र असे स्वतःचे दोन भाग करावे लागले!

नलिनी–अविनाशाचें ठराविक वेळीं लग्न लागलें!

नलिनीनें हार एका हातांत घेऊन दुसऱ्या हातानें नेत्रांत डबडबून आलेले अश्रु कोणी पहात नाहींसे पाहून पुसले!

सरळ मनस्क अविनाश मात्र आनंदी होता; त्याची मित्रमंडळी त्याची थट्टा करीत होती!

मामा आपल्या मित्रांना समाधानानें हंसत म्हणत होते, "चला, कार्य एकदां निर्विघ्न पार पडलें म्हणजे मनाला कसा आनंद वाटतो!"....

"बरं झालं! नलिनीला वर योग्य मिळाला; पोरगी सुखाला लागो!!" ते आपल्याशींच बोलले.

नवरीप्रमाणेंच त्या मंडपांत आणखी एक व्यक्ती खिन्न मनानें वावरत होती!

नरेन्द्र २।३ दिवसांची रजा संपण्याची वाटच पहात होता!...कांहीं निकटची आप्त मंडळी, सूप वाजल्यानंतरही थोड्याशा नाखुष अंतःकरणानेंच गेली!... आणि अशा तऱ्हेनें, हजार पांचशें लोकांची चारपांच दिवसांची चंगळ व लग्नसोहाळा दोन्ही एकाच वेळीं समाप्त झालीं!!....

*　　　*　　　*



अविनाश आपल्या पत्नीला घेऊन बडोद्यास आल्याला जवळ जवळ एक आठवडा झाला; पण एवढ्या अवधीनंतरही त्याचें व नलिनीचें जेवढ्यास तेवढेंच संभाषण होत असे! लग्नानंतर नवीन नवीन, जास्तच उत्साह! त्यांत अविनाश सारख्या प्रेमळ तरुणांची तर गोष्टच निराळी!....

पण नलिनी सदा खिन्न असे; तो बोलावयास आल्यास जेवढ्यास तेवढेंच बोलून ती स्वस्थ बसे!....

आणि नलिनीलाही त्याबद्दल वाईट वाटे! पण ती तरी काय करील बिचारी?? ...तिचें मन तिच्या स्वाधीनच नव्हतें!

अविनाश कामावरून परत आला कीं तीं दोघें फिरावयास जात. पण दोघांचें बोलणें फार क्वचित होई!...बहुतेक, आठवड्यांतील दोन तीन दिवस तर ती कांहीं तरी सबब पुढें करून घरींच राही!

आजचाही तसाच एक दिवस होता. प्रेमळ अविनाशच्या मनाला फार वाईट वाटलें!...

फिरून परतल्यावर तो नलिनीच्या खोलींत गेला. ती खुर्चीवर, दिव्याशीं कांहींसें पुस्तक वाचत बसली होती. त्या वाचण्याकडे तिचें कितीसें लक्ष होतें तें तिच्या चेहऱ्यावरून व अस्वस्थ हालचालीवरून सहज दिसून येण्यासारखें होतें.

अविनाश ओढून ठेवलेलें दार उघडून खोलींत शिरला. ती डोक्यावर हात ठेवून आपल्याच विचारांत गर्क होती. अविनाश तिच्या खुर्चीच्या मागें जाऊन उभा राहिला.

"कोणतं पुस्तक वाचण्यांत इतक्या गढून गेल्याहांत!" अविनाश हंसत तिच्या खांद्याला स्पर्श करून म्हणाला.

नलिनी चपापली. एकदम उभी राहून ती तोंडावर हास्य आणीत हातांतील पुस्तक पुढें करीत म्हणाली, "कांहीं नाहीं आपल्याच लायब्ररींतलं हॉलकेनचं हें "The woman thou gavest me" सहज फिरून एकदां चाळीत होतें झालं!

तिनें खुर्ची पुढें केली. "बसा कीं, उभें किती वेळ राहणार?"

अविनाश खुर्चीवर बसत म्हणाला, "आम्हीं मात्र बसावं अन् तुम्ही?"

नलिनी जवळची खुर्ची ओढून तिच्यावर हास्य वदनानें बसली. बिचारीच्या हृदयांत काय कालवाकालव चालली होती ती तिची तिलाच ठाऊक!

अविनाश तिच्या चेहऱ्यावरील पालटाकडे पहात होता. ती आनंदी दिसण्याचा प्रयत्न करीत होती. पण चेहरा म्लान व काळवंडलेला होता.

"तुमचं तोंड किती उतरलेलं दिसतं!" अविनाश तिच्याकडे प्रेमळपणें निरखून पाहात म्हणाला, "डॉक्टरला तरी दाखवा प्रकृती! म्हणजे औषध घ्यायला बरं!"

"भलतंच कांहीं तरी!" नलिनीच्या हास्यांत कृत्रिमपणा स्पष्ट दिसत होता. अशा लहान सहान गोष्टी साठीं डॉक्टर कशाला हवेत ते! मला काय होतंय्? चांगली बरी आहें मी!"

"असं काय करतां बरं!" अविनाश नलिनीचा हात आपल्या हातीं घेऊन म्हणाला, "तुमच्या मनांत काय चाललंय तें मीं कसं समजणार? आपण एकमेकांना आपापलीं हृदयं उघडीं करून नको का सांगायला! तुम्हांला काय बरं दुःखकारक होत आहे? मला नाहीं का सांगणार!"

नलिनीला अविनाशचा प्रेमळ स्वभाव पाहून फार वाईट वाटलें!

"देवा, किती सरळ अन् प्रेमळ स्वभाव! अशा माणसाला विनाकारण त्रास देऊन तुला काय मिळालं? आतां मी सांगूं तरी काय? यांचं मन आनंदित कसं करूं!" डोळ्यांतून अश्रु गळूं लागेल.

अविनाशनें तिचे दोन्ही हात प्रेमानें दाबले. व तिच्याकडे पहात म्हणाला "असं काय बरं! सांगा ना तुमच्या दुःखाचं कारण काय तें!"

ती रडतच होती! अविनाशलाही वाईट वाटलें; पण आपल्याला तिचें त्या वेळीं सांत्वन करतां येणार नाहीं, हें जाणून तो तेथून निघून गेला.

बिचारी नलिनी, सरलहृदयी अविनाशला सुखी करण्याचा प्रयत्न करीन असा आपल्या मनाशीं निश्चय करीत होती!

पण हृदयांत वणवा पेटला होता त्याला ती तरी काय करणार?

* * *

धरणीपूरला आपल्या खोलींत गड्यानें नुकतेंच आणून टाकलेलें वर्तमानपत्र घेऊन नरेन्द्र चाळूं लागला!.....मधलें पान उघडतांच तो दचकला; लहानसें शीर्षक मोठ्या अक्षरांत लिहिलें होतें.—

**"बडोद्याच्या तरूण इंजिनिअरची आत्महत्या!!"**

थरथरत्या हातानें वर्तमानपत्र धरून त्यानें त्या खालील थोडक्यांत लिहिलेली माहिती वाचावयास सुरवात केली. त्याचें हृदय धडधडत होतें!



"काल ता. १९ सप्टेंबर १९xx रोजीं बडोद्यास अतिशय खळबळ उडाली. तशा तऱ्हेची खळबळ उडणारी बातमी म्हणजे तेथील हुशार व तरूण इंजिनीअर साहेब श्री. अविनाश पाटकर यांची आत्महत्या! सुशिक्षित पत्नी, प्रेमळ आईबाप व स्नेहसंबंधी आणि मोठ्या मानाची नोकरी यांचा त्याग करून इतक्या तरुणपणीं—अवघ्या २७ व्या वर्षी—आत्महत्या करण्याची त्याची मनःस्थितो कां व्हावी हें मोठें कोडेंच आहे!

....पण मानवी मन गहन असतें!!

प्रेतयात्रेला त्यांचे दुःखी वडील रा. गणपतराव पाटकर, रिटायर्ड हु. दे. कलेक्टर, खुद्द युवराज व संस्थानचे इतर अधिकारीही हजर होते. आपल्या मित्राचा असा शेवट झालेला पाहून युवराजमहाराजांनाही अतिशय वाईट वाटलें!

**मृतात्म्यास शांति मिळो!!"**

नरेंद्राला ही शोचनीय बातमी वाचतांच, टाकीचे घाव डोक्यावर पडत असल्यासारखें वाटलें!....“अरेरे, अविनाश हें तूं काय केलेंस?" त्याच्या तोंडून उद्गार निघाले. दुःख अनावर होऊन अश्रुही ओघळूं लागले!....

इतक्यांत दार उघडून त्याचा शिपाई आंत आला. नरेंद्रानें चपापून डोळे पुसले. पाकीट त्यांच्या हातीं देऊन शिपाई साहेबांच्या मनस्थितीविषयीं विचार करीत निघून गेला.

नरेंद्रानें उत्कंठेनें पाकीट उघडून पाहिलें. त्यांत दोन पत्रें होतीं. त्यांतील एक अपरिचित हस्ताक्षर होतें. परंतु दुसऱ्यांतील अविनाशचें ओळखीचें अक्षर त्यानें तत्काळ ओळखलें. तो पहिलें पत्र वाचूं लागला.—

शांतिभुवन, बडोदें,<br>२० सप्टेंबर १९xx

श्रीयुत नरेन्द्र देसाई यांस,

सा. न. वि. वि. आपली माझी ओळख अशा दुःखद प्रसंगानंतर घडून यावी हें खरोखर दुर्दैव! पण आलेल्या प्रसंगाला तोंड दिलें पाहिजे व माझ्या परम मित्राची शेवटची आज्ञा पाळलीच पाहिजे!!

कोवळ्या अंतःकरणाचा अविनाश मरणानें अविनाशी झाला!

समाज त्याला आत्महत्या म्हणेल कदाचित्, पण त्याच्या आत्म्याच्या उच्च हेतूची, त्याला काय कल्पना होणार!...युवराज महाराज मदतीस होते म्हणून,

नाहींतर सभोंवारच्या शिष्ट समाजाला त्याच्या देहाची चिरफाड करून सर्व निर्णय लावण्याचीही इच्छा झाली असती ! !

अविनाश अगदीं अनपेक्षितपणें आपणाला सोडून गेला; पण त्यानें समाजाची सद्यःस्थिती उघडी केली आहे !....

अशीं उदाहरणें नेहमीं घडून येत नाहींत म्हणून तर या उदाहरणाला जास्तच किंमत ! !

त्यानें मला लिहून ठेवलेलें पत्र आपल्याकडे सोबत पाठवितों. नलिनीताईंनीं तें दुःखपूर्ण अंतःकरणानें अगोदर वाचलेंच आहे !....एकाद्या लेखकानें गोष्टी-रूपानें सर्व हकीकतीसोबतच खुद्द हें पत्र समाजापुढें ठेवलें तर ठीक होईल ! 'Truth is stranger than fiction' !

नरेन्द्र, तुमची व नलिनीताईची स्थिती किती चमत्कारीक झाली असेल याची मला कल्पनाच करतां येत नाहीं. तथापि घडलेली सर्व हकीकत सत्वर विसरणें हेंच तुम्हा दोघांना रास्त आहे !

अविनाशच्या स्वार्थत्यागाची किंमत लक्षांत घ्याल ना ?

अविनाशच्या आत्म्याला आनंदी करणें तुमच्या हातींच आहे !

जास्त पाल्हाळ करण्यास माझी लेखणी सध्यांच्या मनःस्थितींत धजत नाहीं !...

देव अविनाशाच्या आत्म्याला व तुम्हां दोघांना सुखी करो !

कळावें, लोभ असावा, हे विनंति.

आपला नवपरिचित,
विश्वनाथ करमरकर

नरेन्द्रानें आपलें मस्तक दोन्ही हातांनीं घट्ट धरून ठेवलें होतें; त्याच्या डोळ्यांतून सारखा अश्रुप्रवाह चालला होता !

त्यानें अतिशय खिन्न मनानें, सोबतचें, अविनाशाचें अखेरचें पत्र उघडून वाचावयास सुरवात केली—

बडोदें,
(संध्याकाळ) १६ सप्टेंबर १९XX

प्रिय विश्वनाथपंत,

तुम्हाला कदाचित् चमत्कारिक वाटेल; कदाचित् धक्काही बसेल ! पण तुम्ही



सकाळीं मी बोलावल्यावरून याल तेव्हां माझें शरीरच फक्त तुम्हाला दिसेल; मी हें जग सोडून केव्हांच निघून गेलेलों असेन !

चांगलें शिक्षण झालेलें, नोकरी पगारही बरा मिळत होता ! सर्व सुखें होतीं ! नुकतेंच ४ महिन्यापूर्वीं लग्न झालें होतें ! !

मग यानें आत्महत्या कां केली ? 'अरेरे ! खरंच वेडा हा !'—

म्हणा बापडे ! तुम्हांला वस्तुस्थिती ठाऊक नाहीं तोंपर्यंत तुम्हीच काय सगळे असेंच म्हणणार !

निदान मला तरी समाधान वाटत आहे यांत ! !

विश्वनाथपंत, जरा सहृदयपणें वाचा ! तुम्ही माझ्या जागीं असतां तर काय केलें असतेंत ?

सहा महिन्यांपूर्वीं मी इंग्लंडहून परत आलों. आल्यानंतर थोड्याच दिवसांत बाबांनीं लग्नाच्या गोष्टी काढल्या. पुष्कळ मुलींचे बाप बाबांकडे खेटे घालूं लागले होते ! !

पण बाबांच्या मनांत निराळेच विचार चालले होते. त्यांचा व मामांच्या नलिनीचे वडीलांचा—पूर्वीपासूनचा स्नेह. त्या दोघांतून नलिनीचें व माझें लग्न व्हावें ही मामांची फार इच्छा ! त्यांनीं दोनदां बाबांकडे शब्द टाकतांच त्यांनीं तें कबूल केलें. मी बाबांच्या इच्छेबाहेर कधींच नव्हतों; कारण तसें राहण्यांतही अर्थ नसतो. शिवाय नलिनीला तशी एक दोनदां मी पूर्वीं पाहिली होती. त्यामुळें बाबांनीं हा नवीन जोडलेला संबंध मला कळविला, तेव्हां मला वाईट वाटलें नाहीं. त्यांनीं मला मुली पहावयास जाण्याचें सांगितलें. पण मला नलिनीची माहिती असल्यामुळें मी सांगितलें. "कशाला उगीच नाटक ? मी कांहीं आपल्या विचाराबाहेर नाहीं ! मात्र तिची संमती पहा."

बाबांनीं लागलीच शेवटचा मुहूर्त साजरा केला.

थोडे दिवस पुण्यास राहून मी व नलिनी बडोद्यास आलों. लग्नाच्या मेजवानीला युवराज महाराज तुम्ही वगैरे सर्व हजर होतांच.

लग्नानंतर तरुण नवराबायकोंत किती प्रेमळ उत्साह भरलेला असतो याचा अनुभव तुम्हांला आहे ना ? मला नलिनीविषयीं किती प्रेम वाटे तें मी काय सांगूं ?

तिला सुखी कसें करावें याचाच मी प्रथम आपल्या मनाशीं विचार करीत असें; मी अघळपघळ बोलत असें, प्रेमळपणानें प्रश्न विचारीत असें; पण तिचीं उत्तरें जेवढ्यास तेवढीं असत. मला सुरवातीला तो तिचा संकोच असेल असें वाटलें; पण पुढें पुढें मला दिसून आलें कीं तिच्या मनांत कांहीं तरी निराळेंच चाललें आहे. बिचारी मला आनंदी करण्यासाठीं वरवर हसे, पण आंतला खिन्नपणा कसा लपेल ? थट्टेनें कांहीं तरी बोलावयाचा प्रयत्न करी, पण अंतःकरणांत तिला कांहीं तरी डंवचत आहे असें तिच्या केविलवाण्या चेहऱ्यावरून दिसे.

मधून मधून तर ती मला मुद्दाम टाळीतच असे. ती एकटी आपल्या खोलींत असली, तर कसल्या तरी गहन विचारांत गढल्या सारखी दिसे. कांहीं कांहीं वेळां तिला मी अश्रु ढाळतांनाही पाहिलें.

एके दिवशीं तिला मी उडत उडत तिच्या दुःखाचें कारण विचारलें. तिला तिच्या आईची आठवण होते वगैरे सबबी तिनें पुढें केल्या. त्या मला तात्पुरत्या जरी खऱ्या वाटल्या तरी त्यांवर माझा विश्वास कसा बसणार !

दिवसेंदिवस मला जास्तच चमत्कारिक वाटूं लागलें. नलिनीच्या दुःखाचें कारण काय असावें ! तिला काय केलें म्हणजे सुख वाटेल ! अशा तऱ्हेचेच विचार मला सारखे त्रास देत.

मला कांहींच उपाय सुचेना. बाबांपेक्षां मामांनाच तिच्या हृदयाचें गुह्य समजेल असें वाटून शेवटीं मी मामांना पत्र लिहिलें.

ते थोड्याच दिवसांत आपल्या भाच्याला बरोबर घेऊन आले.

नरेन्द्र देसाई कॉलेजमध्यें प्रिव्हिअसच्या वर्गांत असतांना सबंध वर्षभर माझ्या शेजारच्या खोलींत राहात असे. त्यामुळें त्याची माझी ओळख चांगली होती. तो प्रेमळ, मनमिळाऊ, उत्साही, व निगर्वी सहाध्यायी म्हणून मी त्याला बराच मान देत असें. त्यावेळीं त्याचें शरीरही चांगलें बळकट असे. त्यानंतर ४॥–५ वर्षांनीं त्याला मी माझ्या लग्नांत पाहिलें होतें ! पण २–२॥ महिन्यांनीं त्याला आतां पुन्हां पहातां पूर्वींपेक्षां तो कितीतरी किरकोळ व काळजीनें त्रस्त असा दिसत होता. त्याचा स्वभाव तसाच होता. आनंदी चेहरा दिसे, पण असे कांहीं क्षण माझ्या पाहाण्यांत येत कीं, त्यावेळीं तो अस्वस्थचित्त, एकलकोंडेपणानें बसे.

मला ठाऊक होतें कीं नरेन्द्र व नलिनी दोघें लहानपणापासून एके ठिकाणीं वाढलेलीं ! नरेन्द्र माझ्याकडे दोन दिवस होता पण त्या अवधींत त्यांचें एकदांही बोलभाषण झालें नाहीं. झालें तर तेवढ्यापुरतेंच.



पण ह्या दोन दिवसांत नलिनी खरीखुरी आनंदी दिसत होती !

मला मोठें आश्चर्य वाटे. या एक दोन दिवसांत ही इतकी जादू कोणीं केली ?

तिसऱ्या दिवशीं नरेन्द्र आपल्या नोकरीवर निघून गेला. आम्ही तिघेंही पोहोंचवावयास गेलों होतों. नरेन्द्राची गाडी स्टेशन सोडतांनाच त्याचा करुण कटाक्ष, नलिनीचे मूक अश्रु, ते कोणाला दिसूं नयेत म्हणून झट्कन् पुसून टाकण्याची तिची धडपड, या सर्व गोष्टी मला काय सांगूं लागल्या ?

नरेन्द्र व नलिनी एकमेकांशीं बोललीं नाहींत ! कशीं बोलतील बिचारीं ? तींही माणसेंच होतीं ! त्यांना हृदयें नव्हतीं का ? झाल्या गेल्या गोष्टी विसरून महत्प्रयासानें घातलेले बांध, भावनेच्या प्रचंड पुराबरोबर न जाणों वेळीं वाहून जातील ही त्यांना भीति वाटणें साहजीक होतें.

त्या दिवसापासून नलिनी जास्त आनंदी दिसूं लागली. तिची खिन्नता थोडीशी होतीच, पण ती तेव्हांपासून मला कधींच टाळण्याचा प्रयत्न करीत नसे. उलट पुन्हां पुन्हां माझ्याबरोबर गप्पा गोष्टी करण्यास येई. माझी सर्व बाबतींत ती अतिशय काळजी घेई. एकंदरींत ती स्वतःच्या सुखाकडे पाहाण्यापेक्षां मला सुखी कसें करतां येईल या विवंचनेंत असे. ( नलिनी तूं किती थोर हृदयाची ग ! )

तिनें नरेन्द्राच्या दोन दिवसांतील वागणुकीवरून धडा घेतला मला वाटतें !

पण माझें अगदीं विरुद्ध झालें ! त्या दिवसापासून मला तोच तोच संशय जाचूं लागला.

हें खरेंच असेल का ? मी दोन प्रेमी जिवांचीताटातूट करण्यास कारणीभूत झालों ? ? सारखे तेच विचार मनांत येऊन मी अस्वस्थ होई !

थोड्या दिवसांनीं नलिनी, मामा थोडे आजारी असल्यामुळें निघून गेली.

तीच तिची माझी शेवटची भेट !

किती प्रेमळ ! किती उदार मनाची ! तिच्यासाठीं मी वाटेल तें केलें असतें ! ! !....

( आणि आतां करणारही आहें ! )

* * *

नंतर ५।६ दिवसांनंतरची गोष्ट ! संध्याकाळीं हॉलकेनचा सेट झाडून पुन्हां लावीत असतां मला आमच्या लग्नापूर्वीं नलिनीला आलेलें, नरेंद्राचें शेवटचें पत्र सांपडलें !

बिचाऱ्याला लिहितांना किती त्रास झाला असेल ? त्यानें आपलें हृदयच त्यांत ओतलें होतें !

नलिनीनेंसुद्धां तें कितीतरी वेळां वाचलं असेल ! ! पण मला वाटतं ती प्रत्येक वेळीं अश्रु ढाळीत असावी.

बापाला सुखी ठेवण्यासाठीं व मला आनंदी करण्यासाठीं तिचा केवढा बरें स्वार्थत्याग ?

खरोखर त्या दोघांच्या आयुष्याचा तो भाग किती चमत्कारीक होता ? त्यावेळीं त्यांचीं हृदयें धडपडत असतील !

थोड्याच काळापूर्वी ते बांधत असलेलें मनींचे मनोरे पूर्ण होण्यापूर्वीच ढांसळून पडले !

छे ! मला याचा विचार करवतही नाहीं ! !

पण मग हें माझें लग्न झालें तरी कां ?

बाबांचा व मामांचा स्नेह होता म्हणून ! मी शिकलेला होतों कीं ! ! मला चांगला पगार होताना !...

बस्स झालें ! हीं काय कारणें ? जिचें लग्न व्हावयाचें तिचा विचार नको का लक्षांत घ्यायला ? तिच्या सबंध आयुष्याचा प्रश्न तिला नको का सोडवायला ?

मामा, नलिनी दुःखी व्हावी असें तुम्हाला खास वाटत नव्हतें ! मग कशी ही घोडचूक झाली हो तुमच्या हातून ?

तुमचा न् बाबांचा स्नेह आमच्या लग्नांत काय उपयोगाचा ? माझा पगार, शिक्षण वगैरे नुसतें घेऊन, बिचारी नलिनी काय करणार ? तुम्ही तिचा जरा तरी सल्ला घेतला का ?

तुम्ही म्हणाल स्वतः तिनें सांगायला नको का होतं ! वडील माणसांना झट-कन् सांगण्यासारख्या का गोष्टी आहेत या ?—पण तुम्हीं तिच्यावरच हा लग्नाचा प्रश्न सोपवला असतात तर !—हा अनर्थ माजला नसता खास ! तुम्हाला जर नरेंद्राविषयीं कळतें तर तुम्ही तिचें माझ्याशीं लग्न लावून तिला दुःखी करण्याच्या भानगडींत खास पडतांना !—

कदाचित् नरेन्द्राला तुम्हीं दूषण द्याल; पण तुम्हीच पहा—त्याची स्थिति किती चमत्कारिक होती !



आणि तुम्हाला दोष देऊन काय होणार !—नशिबाचीच वाकडी दृष्टी म्हणावयाची !

एवढें बरीक खरें कीं, जो आपल्या मुलांना शिकविण्याइतकी काळजी घेतो त्याचें त्यांना लग्नासारख्या महत्त्वाच्या बाबतींत स्वतःचीच निवड करण्यास देणें हें आद्य कर्तव्य आहे; "लग्न झालें म्हणजे आपोआप पटेल यांचें ! आतांपर्यंत लग्नें नाहींत झालीं ? आम्ही काय केलें ?" असें म्हणून आपलेंच खरें करण्यांत काय अर्थ ? तो स्वतः निवड करतो त्यांत आपल्या मुलांचें अहित इच्छितो अशांतील भाग नव्हे....पण सद्‌हेतुप्रेरित गोष्टींतूनही अनर्थ उत्पन्न होणार नाहींत हें कशावरून ?....त्यापेक्षां त्या बाबतींत त्यांनाच मोकळीक दिलेली बरी नव्हे का ! ! चुका होतील ? पण प्रत्येकाला स्वतःच्या चुकाही करावयास स्वातंत्र्य कीं नसावें ?....प्रत्येकजण आपापला रस्ता आक्रमित असल्यामुळें स्वतःचें स्वतःलाच जास्त समजेल खास !

वडील माणसें, आईबाप, यांच्या अनुभवानें, त्या रस्त्यांना, किंचित् मर्यादा घालणाऱ्या पांढऱ्या दगडाचें काम करावें फार तर !...त्यामुळें निदान असे घोंटाळे तरी उत्पन्न होणार नाहींत.

खरंच विश्वनाथपंत, त्या दिवशीं रात्रभर असलेच विचार मला भंडावून सोडीत होते; सारखा तळमळत होतों !

एकंदरींत दोघांच्या जन्माची घडी विस्कटण्यास अकल्पितपणें कां होईना—कारण झालेलों मी जिवंत तरी कशाला राहूं ?

अशा स्थितींत घटस्फोट आपल्या समाजांत रूढ आहे काय ? मग तोंड दाबून बुक्क्यांचा मार असा किती वेळ चालावयाचा ? ?....

अस्वस्थ मन कांहीं केल्या समाधान पावेना !....लग्न होऊन फक्त दोन सव्वादोन महिनेच झालेले; अजून सर्व आयुष्य जावयाचें ! !...

मग हें आयुष्यभर सारखें असेंच चालावयाचें काय ?

दोन जिवांची ताटातूट !...अक्षम्य चूक झाली खरी; पण तिचें क्षालन कर-तांच येणार नाहीं का ?...दोन हृदयांचें पुनर्मीलन होईल का ?...

"हो हो" सदसद्विवेक बुद्धी सांगत आहे "तूं तुझा कांटा दूर केलाच पाहिजेस; दोघांच्या नव्हे तिघांच्याही आयुष्यांचा नाश होण्यापेक्षां,—त्यांच्या

जिवाची जिवंत आहूती देण्यापेक्षां, एकट्या तुझी स्वतःचीच आहुती देऊन त्या दोघांना सुखी करण्याचा प्रयत्न कर ! !...

याला उतावीळपणा म्हणा पाहिजे तर !...पण सध्यांच्या समाजबंधनांत मला त्याशिवाय गत्यंतरच नाहीं ! !...सर्व आहे तसेंच असतांना तुम्ही माझ्या जागीं जर असतेत तर तुमच्या हातून हेंच घडलें असतें ! !...

विश्वनाथपंत, ठरला माझा निश्चय ! मी आज अफू खाऊन माझ्या शरिराचा शेवट करणार ! ! पण याला तुम्ही आत्महत्त्या म्हणाल का ? ?...

समाजपद्धतीमुळें झालेली समाजाची अक्षम्य चूक, समाजघटक म्हणून स्वतःची आहुती देऊन दुरुस्त करणें हें माझें कर्तव्य नव्हे काय ? ? ?

माझ्यासारखे दुसऱ्यावर प्रसंग येऊं नयेत असें खरेंच वाटत असेल तर समाजानें आपला मार्गच बदलला पाहिजे ! !

अहाहा, माझ्या या निश्चयामुळें मला किती आनंद होत आहे !....आज रात्रीं हें जग सोडून मी कुठें जाईन बरें ?...कोणास ठाऊक, पण मला स्वतःला जगवण्यापेक्षां दोन प्रेमी जिवांना मिळविण्यांतच जास्त आनंद होत आहे ! !

कांहीं वेडा म्हणतील मला !....म्हणोत बिचारे ! मला काय त्याचें ? ?.... याशिवाय निराळा स्वर्ग आहे असें मला तरी वाटत नाहीं ! !...

मात्र वाईट वाटतें तें इतकेंच कीं, समाजाला असल्या चुका सहज टाळतां येणें शक्य असूनही अविचार आड येतो ! !...

[ नलिनी ! नरेन्द्र !....किती थोर अंतःकरणाचीं तुम्ही ?....एकमेकांना अगदीं योग्य आहांत !...माझी शपथ आहे तुम्हाला, तुम्ही जरूर लग्न करा ! !...ही माझी शेवटची इच्छा तुम्ही नाहीं का पुरवणार ? ?.... ]

विश्वनाथपंत, त्यांना हा माझा शेवटचा निरोप जरूर कळवा ! लोकांच्या दृष्टीनें 'पुनर्विवाह' होईल तो !...पण तोच खरा विवाह ! !....नलिनीचा माझ्याबरोबर झाला, तोच पुनर्विवाह—जुलमाचा पुनर्विवाह—होता ! ! !....

नलिनी मला जन्मभर सुखी करण्याचा प्रयत्न करणार होती !...आपल्या आयुष्याची जिवंत आहुति देणार होती !...त्या आर्यस्त्रीचें हृदय विशाल खरेंच ! !...



पण मी स्वार्थी आपमतलबी नाहीं !...मिळालेंच असतें तर मला तुझें हृदय पाहिजे होतें !...पण तें शक्य नव्हतें हें मला ठाऊक आहे.

भगिनी नलिनी, म्हणूनच मी तुम्हांला या सामाजिक खोड्यांतून सोडविण्याचा प्रयत्न करीत आहें !...तुम्हां दोघां प्रेमळ हृदयांच्या, प्रेमपूर्ण वातावरणांत मी जन्मभर दास होऊन राहिलों असतों ! !....

" प्रक्षालनाद्धि पंकस्य दूरादस्पर्शनं वरम् ! " हें तुमच्या प्रमाणेंच मलाही पूर्ण पटतें !...आणि हेंच समाजानें समजलें पाहिजे !...

तरूण स्त्रीपुरुषांचा, समाजांत मोकळेपणें सहवास संबंध येण्यास, सध्यां त्या बाबतींत केला जाणारा बाऊ घालवून, तद्विषयक नीतिकल्पना सत्वर बदलावयास नकोत काय ?

अनुभवाची मदत व्हावी पाहिजे तर ! पण व्यक्तीचें सुख व्यक्तीलाच ठरवूं द्यावयाला नको काय ? ?....

'नियमन मनुजासाठीं; मानव नसे नियमनासाठीं !'

देव घेव जरूर असली तरी समाजाची उभारणी व्यक्तीसाठींच असते ना ?

पण हें लक्षांत न घेतल्यामुळें असे प्रसंग उद्भवतात !....असो. आतां संध्याकाळीं आपली शेवटचीच भेट होईल !....उद्यां यावेळीं मी कोठें असेन ? ?...

पण आज मी आनंदी आहें एवढेंच खास !....

आणि उद्यांही खास असेन ! !....

तुमचा स्नेहांकित—
अविनाश

* * * *

दारावरील हारानें विभूषित केलेला फोटो त्या महात्म्याचाच ! !

* * *

वाचतां वाचतां महेशनें दाराकडे पाहिलें, अविनाशाचा तेजस्वी चेहरा भिंतीवर झळकत होता....नलिनी व नरेन्द्रही तिकडेच पहात होतीं; दोघांची दृष्टि तिकडे किती तरी वेळ खिळून राहिली !....फोटोवरील चेहरा हळूहळू नाहींसा होऊन शेवटीं, आजपर्यंतच्या त्यांच्या आयुष्याचा दुःखमिश्रित चित्रपट दाखविणारा तो पडदाच बनला ! !...

महेश दोघांकडे, व त्या फोटोकडे भरून आलेल्या अंतःकरणानें पहात होता !...

नलिनीच्या डोळ्यांतून अश्रूंची माळ गळत होती !—

" अविऽऽनाऽऽ ! "—पुढें कांहीं बोलावयाचें होतें; पण कंठ गद्गद झाल्यामुळें नरेन्द्राला बोलवेचना !

त्याच वेळीं पाळण्यांत बाळाचा वाळा वाजला !

* * *

महेशनें आजच पाहिलें; पण वरवर आनंदी रहाणाऱ्या नलिनीनरेन्द्राच्या आयुष्यांत नेहमीं असे पुष्कळ प्रसंग येत असत !—

त्यानें दोघांच्या स्तब्धतेचा भंग नकरितां, कळूंच टेबलावरील पेन्सील घेऊन शेवटच्या पानावर लिहिलें—

* * *

" आतां लिहिण्यासारखं काय राहिलं !—

अविनाशाच्या मृत्यूमुळें नलिनीची मनस्थिती काय झाली ?—

नरेन्द्राच्या हृदयाचीं अन्दोलनें कोणत्या तऱ्हेनें होत होतीं ? ?—

अविनाशच्या बाबतींत लोकांचें काय मत झालें ?

" पण या प्रश्नांचीं आपण कशाला उत्तरें द्या ? ?....

ही आत्मकथनाची गोष्ट प्रश्न विचारीत संपविणें हेंच शहाणपणाचें ! !

* * *

नलिनीनरेन्द्राचा पुनर्विवाह तात्काळ झाला असो किंवा कांहीं कालावधीनंतर झाला असो !

नरेन्द्रनलिनीच्या लग्नापूर्वीच्या इच्छा आकांक्षा पूर्ण झाल्या असतील काय ?....

त्यांच्या सभोंवारचें आनंदमय वातावरण व सौख्याच्या कल्पना तशाच कायम राहिल्या असतील ? ?

...प्रेमळ अविनाशची मनापासूनची शपथ नसती तर त्यांचें पुनर्मीलन झालें असतें कीं काय हाहि एक मोठा प्रश्नच आहे ! !

...स्वतःच्या विचारपूर्ण मताप्रमाणें 'पंकस्य प्रक्षालनम्' करणाऱ्या अविनाशच्या पदरीं, शिष्टपणानें, आत्महत्त्येचें पातक व 'गाढवपणा' बांधणारेही आढळून येतील !...



पण खरोखर ती त्याची आत्महत्त्या कीं आत्मत्याग ? ?

" कीं ?" महेशनें पेन्सील खालीं ठेवण्यापूर्वी शेवटचें वाक्य लिहिलें—

" कोत्या बुद्धीनें व अविचारीपणें, आपली आकुंचित दृष्टी विस्तृत न करण्याच्या अट्टाहासामुळें, समाजाच्या हातून पडलेला खून ? ? ?—"

पालघर; १० एप्रिल १९३०

# ६–“ डायरीचा उपयोग ! ”

**संपूर्ण गोष्ट**

[ गोड कट ]

परिक्षेच्या जंजाळांतून नुकताच सुटून आलों होतों.

‘आपले कॉलेजमधील दिवस संपले ’ या विचारानें एकदां आनंद तर एकदां दुःख वाटे !

अण्णाही परवांच ‘ सेकंड लॉ ’ला बसून आल्यामुळें आतां दोघां रिकाम-टेकड्यांची जोडी जमली होती. सकाळसंध्याकाळ लांब फिरावयास जाणें, जेवणें-खाणें, मधल्यावेळीं गप्पागोष्टींत किंवा वाचनांत गुंग होणें याशिवाय सध्यां आमचा दुसरा कार्यक्रमच नव्हता.

शॉचें “ Getting married ” घेऊन इझीचेअरवर ऐसपैस पडलों होतों.

“ भाई, तुला नाना बोलावताहेत माझ्या खोलींत ! ” शरयूनें मला हलवून मोठ्यानें सांगितलें. मी पुस्तक तसंच उघडं टाकून उठलों.

“ कशाला ग ? ” मी तिला विचारलें. धोतराचा शेव खांद्यावर टाकीत, तोंडानें ‘ पियाऽऽके नजरिया, जाऽऽदु भरे ’ अशी लकेर मारीत चालूं लागलों. काय काम आहे तें मला समजेना.

“ मला नाहीं माहीत बुवा ! ” ती म्हणाली अन् माझ्याकडे पाहून खुदकन् हंसली......या लोकांना अलीकडे हंसायला काय होतं बुवा ?...काल आईही माझ्याकडे पाहून मधून मधून अशीच हंसत होती ! ...अण्णा परवां आल्या-पासून तर एखाद्या मुत्सद्यासारखे चाळे करतोय् ! काय त्याच्या मनांत आहे कोणास ठाऊक ! मध्येंच कधींतरी माझ्याकडे पाहून हंसतो मात्र !

मी लगबगीनें तडख शरयूच्या खोलीकडे गेलों.

“ काय नाना ? ” मी आंत जातांच एकदम विचारलें.

पण नाना तेथें दिसेनात. वासंती मात्र बसली होती खुर्चीवर टेबलाजवळच्या....

शरयू भारीच चावट पोर बरं का...आतां तिच्या मघांच्या हंसण्याचा अर्थ लागला....



मी अनपेक्षितपणें आलेलों पाहून वासंती एकदम खुर्चीवरून उठून खिड-कीकडे गेली. ती बहुतेक तिच्या जाण्याची प्रस्तावना असावी...एकदम निघून गेल्यास बरें दिसणार नाहीं म्हणून तिनें तसें केलें.

पांच सहा महिन्यांनीं दोघांची अशी भेट झाल्यामुळें मला खरोखरच आनंद झाला !...

आतां काय बोलावें ? संकोच वाटत होता...पण न बोललं तरी पंचाईत ! एकदम निघून जायची ती....

अन् तें तर मला नको होतें.

पण बोलायला कशी सुरवात करणार ? छे बुवा ! आपलं डोकंच चालेना !...

“ काय ठीक आहे ना ? ” कांहीं तरी विचारलं झालं !

“ हो ” ती अर्धवट वर पहात स्मित करून हळूच म्हणाली.

बरं वाटलं मला !...पण दुसरा प्रश्न कांहीं सुचेना...

“ झाली ना परीक्षा ? ” वेळेवर आठवलेल्या प्रश्नाचा उपयोग केला.

“ हो, झाली बरं भाई ! केव्हांच झाली दोघांचीही परीक्षा ! ” अण्णा हंसत आंत येऊन म्हणाला.

एहेरे अण्णा ! माझ्या म्हणण्याचा अर्थ मॅट्रिकची परीक्षा होता !...पण याला कोणी मध्येंच चोंबडेपणा करायला सांगितलं होतं ? ?....चावट नाहींतर....

“ या डायरीवरूनच आपली परीक्षा झाली चांगली ! ” अण्णा हातांतील डायरी पुढं करून मला म्हणाला “ हं भाईसाहेब ! सांभाळा आपली डायरी ! ”

माझ्या छातींत एकदम् धस्स झालें. पांच सहा महिन्यांपूर्वीं माझी डायरी गेली होती खरी ! पण सर्व शोधून पाहिलें होतें. विसरून मागें राहिली असेल म्हणून कॉलेजमधून ती शोधण्यासाठीं शरयूला पत्रहि लिहिलें होतें. तिचें ‘सांपडत नाहीं ’ असें उत्तर आलें; तेव्हां मला एका अर्थीं बरेंच वाटलें ! तींत मनाला वाटेल तें लिहिलेलं !...तिऱ्हाइताच्या हातीं गेली तर सर्वच घोंटाळा व्हावयाचा ! दुसऱ्याच्या हातीं लागण्यापेक्षां हरवली, बरं झालं, असं मला समाधान झालं ! ...त्यानंतर मी ती सर्व भानगड विसरलोंच होतों.

पण आज तीच नाहींशी झालेली डायरी या खविसाच्या हातीं कशी ? मला मोठें कोडें पडलें !

“ अन् ही घे तुझी डायरी, वासंती ” शरयू दुसऱ्या दरवाजानें आंत येऊन वासंतीकडे दुसरी एक डायरी देत म्हणाली.

इतक्यांत नानाही खोलीच्या दारावरून हंसत हंसत निघून गेले.

मला मोठं चमत्कारिकच झालं !...या लोकांनीं मांडलंय् काय आज !... कोणाच्या नाटकांतील प्रवेश करून दाखविताहेत कीं काय ? ?....माझी वाचा बसायच्याच पंथाला लागली.

"शरयू, किती ग अचरट आहेस ?....'आतां येतें; तूं बस हं !' म्हणून सांगून गेलीस मला, ते हेच धंदे करायला वाटतं ?" वासंतीला वाचा फुटली; ती शरयूकडे रागीट मुद्रेनें पहात होती.

थोडासा आरक्त चेहरा....वर चढलेल्या वक्र भिवया...खरोखर त्यावेळीं ती फार मोहक दिसत होती !...

"अन् काय ग ?" मलाही थोडासा धीर आला. मी 'रागानें' शरयूकडे पहात वेडावून म्हणालों "नाना बोलावत होते नाहीं का मला ?...शरयुदली कुठची !"

"हो हो हो !" शरयू हात वर करून हंसत म्हणाली, "दोघेंही एकदम नको ! एकेकाला उत्तर देतें...त्याचं असं झालं भाईसाहेब, नानांनींच तुला इकडे पाठवायला सांगितलं होतं मला ! मी निराळ्या शब्दांत 'बोलावलं' असें सांगितलें तुला इतकंच !...वासंतीला आतां येतें, म्हणून बसवून गेलें खरं ! पण मधेंच आईनं काम सांगितलं म्हणून जरा मला उशीर झाला ! त्यांत जर माझा कांहीं अपराध झाल्यासारखं आपल्याला वाटत असेल तर माफी करावी वहिनी-साहेबांनीं !"

"इश्श ! हें ग काय चावटे ?" वासंतीचा चेहरा गोरामोरा झाला.

"इतकं 'इश्शऽ' नको करायला बरं का बाई ? असं करायचं असलं तर डायऱ्या तरी लिहूं नयेत मेल्या, माणसांनीं !" शरयू खव्याळपणें म्हणाली.

"अन् भाई तूंहि नकोहो माझ्याकडे इतके डोळे वटारून पहायला !... आमच्याकडे दोघांच्याही हातचा खुद्द लेखी पुरावा आहे !...नाहीं कारे अण्णा ?" शरयू आमच्याकडे पाहून जोराजोरानें हंसूं लागली.

"जेहेत्ते, एकमेकांच्या हरवलेल्या वस्तू शोधून देण्यासाठींच तर ही सारी खटपट !" अण्णानें तिला पुष्टी दिली, "कोणाच्याही उपयोगी पडावं ! नाहीं शरयूताई ?"

दोघें मोठ्यानें हंसत होतीं.

बिचारी वासंती खालीं मान घालून उभी राहिली.



मलाही त्यांच्या थट्टेनें लाजल्यासारखें वाटल्यावांचून राहिलें नाहीं; सांपडलों होतों खरेंच त्यांच्या तावडींत !

"आम्ही जातों आतां !" शरयू थट्टेनें म्हणाली "उगीच नको तुम्हाला त्रास आमचा ! चल रे अण्णा !"

तीं दोघेंही निघून गेलीं.

आम्ही 'हो' ही म्हटलं नाहीं 'नाहींही' म्हटलं नाहीं.

आतां मी व वासंती दोघेंच खोलींत होतों.

मीं हातांतील डायरी उघडून पाहिली. ती माझी जुनी–नाहींशी झालेली—डायरी नव्हती.

"हें काय ? 'कु. वासंती देसाई' !" मी पहिल्या पानावरील सुंदर अक्षरांत लिहिलेलें नांव विस्मित होऊन मोठ्यानें वाचलें. "ही तुमची का डायरी ?"

वासंती आपलें नांव ऐकून एकदम चमकली, व माझ्या हातून डायरी काढून घेण्यासाठीं लगबगीनें जवळ आली.

"होय, ती माझीच." ती हंसत, घेण्यासाठीं हात पुढें करून, म्हणाली "आपण वाचूं नये ! माझी खासगी आहे ती !"

"आपल्या हातांत पडलेली वस्तु, आपण बुवा अशी सुकासुकी सोडणार नाहीं !" मी हात मागें करून म्हटलें.

"मला आडवतां येणार नाहीं असें वाटतं कीं काय ?" तिनं आपल्या हातांतील शरयूनें दिलेली डायरी माझ्यापुढें धरून म्हटलें, "हें पाहिलें का काय तें ?"

ती माझी हरवलेली डायरीच होती.

पाळीपुढें विंचू नांगी टाकतो म्हणतात तसं माझं झालं ! आम्हां दोघांनांही तें कोडंच होतें ! शरयूअण्णांच्या चावटपणामुळें आम्हांला दोघांनाही एकमेकांच्या डायऱ्या एकमेकांना देण्यावांचून गत्यंतर नव्हतें.

"बरं तर ! आपण आतां तडजोडीची भाषा बोलूं !" मी हंसून म्हणालों "एकेक डायरी दोघे मिळूनच वाचूं म्हणजे झालं !"

वासंती कांहींच बोलली नाहीं. हंसली मात्र !

पण बायकांचा अप्पलपोटेपणा लपतो थोडाच ? तिनं माझ्या डायरीपासूनच सुरवात केली !—

* * *

ता०.........

"आज किती दिवसांनीं मी ×××ला येतों आहें. गेल्या दोन वर्षांत अण्णानें मला किती वेळ बोलावलें असेल. पण माझा संकोच व थोडासा हलगर्जीपणा यामुळेंच मी आलों नाहीं. आतां नाना वगैरे सर्व मंडळीच इथं रहायला आली, तेव्हां सुट्टींत घरीं म्हणून येणं भागच पडलं.

बाकी या वयांतील एक दोन वर्षांतच, शरीरांत व मनोवृत्तींत जितका फरक होत असतो, तितका पुढं इतक्या जलदीनें होत नसेल!

चार पांच वर्षांपूर्वी मी व अण्णा येथेंच शाळेंत जाणारे विद्यार्थी होतों; त्या वेळच्या आमच्या आवडीनिवडींत, त्या वेळच्या आमच्या पोरकटपणांत इतक्या थोड्या अवधींत इतका कसा पालट झाला समजत नाहीं! हें आश्चर्य तर खरेंच! आम्ही पूर्वी करीत होतों त्याच गोष्टी आमच्या धाकट्या भावानें केल्या, तर आतां त्या आम्हांला पोरकट वाटतात व त्याबद्दल आम्ही त्याला रागावतों.

पण अण्णा, 'या ठिकाणीं आपण असं करीत होतों, तिकडे असं झालं होतं,' असा जुन्या आठवणी काढूं लागला म्हणजे ते ते प्रसंग डोळ्यांपुढं उभे राहून एक प्रकारची गंमत वाटते!

एकदां दोघां जुन्या मास्तरांना भेटावयास गेलों. त्यांनीं प्रथम मला ओळखलेंच नाहीं. अण्णा दर वर्षी येत जात असे; त्यामुळें त्याच्याबद्दल त्यांना कांहीं वाटलें नाहीं. पण माझ्याकडे पाहून ते एकदम म्हणाले, 'नाईक, अरे, तुझ्यांत किती फरक पडला आहे रे?' मला माझ्यांत इतका फरक पडला आहे असें वाटतसुद्धां नव्हतं! आमचे नानिवडीकर मास्तर तर होते तसेच आहेत! कुंटे मास्तरनीं मला शरीर उत्तम कमावल्याबद्दल शाबासकी दिली....

ता.........

"बाकी बालपणांतलें निष्पाप मन पुढें पुढें गढूळ होत जातें, एवढं खरं! त्यांच्याइतका निःस्वार्थी प्रेमळपणा पुढें जन्मांत तरी पहावयास सांपडतो का? ...जिकडे पहावं तिकडे स्वार्थ! पण मुलांच्या निर्मळ मनांत त्याचा थांगही लागत नाहीं!!

अण्णा माझा चुलत भाऊ–सख्खा! तो मला आग्रह करी, 'अरे, आईनं पुष्कळदां तुझी आठवण काढली होती. चल या सुट्टींत चार दिवस......'

दर सुट्टींत तो एकदोनदां असें सांगे. पण मी मनांत म्हणें 'चुलतभाऊ म्हणजे



काय झालं? कशाला उगाच! हें कलियुग आहे. आपण कोणाशींच जास्त संबंध ठेवूं नये!...'

अशामुळेंच कांहीं तरी सबब पुढें करून मी आज तीनचार वर्षें जावयाचें टाळलें होतें. अन् अण्णा माझा लहानपणापासूनचा जरी सोबती होता तरी तो पण 'कलियुगांतला'च! त्यानेंही कधीं येण्याबद्दल माझ्या इच्छेविरुद्ध जास्त ताणलें नाहीं.

येथें काल मी चार वर्षांनीं आलों. छोट्या वसंताची न् माझी एवढ्यांत किती तरी गट्टी झाली. गुलाम, मी मागच्या खेपेला आलों होतों, त्यावेळीं ६ महिन्यांचासुद्धां नसेल! पण मी येणार म्हणून चार दिवस आधींच गाणें गात होता. मला त्यानं प्रथमच पाहिलें असेल; पण 'आपला भाई' म्हणून मला आल्याबरोबर मिठी मारायला धांवत आला होता. खरोखर मुलें आपल्याला किती गोष्टी शिकवतात?

ता..........

"धाकटी विमल गाणं म्हणत होती!...मला तें बरं वाटलं!...म्हटलं कोणी ग शिकवलं तुला?...ती म्हणाली 'वासंती ताईनं!'

साहजीकच, माझ्या डोक्यांत ही वासंती कोण असावी याविषयीं विचार आले. पण तें नंतर तसंच राहिलं!!...

संध्याकाळीं अण्णाबरोबर फिरावयास गेलों होतों. जरा उशीरांच परत आलों...जेवायला अजून वेळ होता म्हणून ग्यालरींत उभा राहिलों. मधुर स्वरांत कोणीतरी गाणें म्हणत होतें!....हिंदभूमीच्या दारिद्र्याविषयीं तें गाणें होतें....होतं साधंच! पण भावनामय स्वरांत म्हटलं जात असल्यामुळें जास्त उठावदार वाटलं!...

मनाला आनंद झाला! सहज चौकशी केली शरयूकडे, 'कोण ग गातंय्?' म्हणून....

'कोण नाहीं. ती वासंतीच!' मला तिनं सांगितलं. सकाळपासून दोनदां वासंतीचं नांव ऐकलं....म्हटलें कोण असावी ही?...

तिला पाहिलें नव्हतें मी अजून...आपल्या मनाप्रमाणेंच तिची मूर्ति तयार करून डोळ्यांसमोर उभी करण्याचा प्रयत्न मी करूं लागलों—

इतक्यांत मला आईनें जेवायला बोलावलें....

ता..........

"काकी प्रेमळ तर खऱ्याच! मी इतके दिवस त्यांनां भेटावयास वगैरे आलों नव्हतों म्हणून त्या मला किती रागावल्या........

अन् जुन्या बायकांचा बहुतेक विषय असणार म्हणजे लग्न झालें नसल्यास बायकोचा! लग्न झालें असल्यास मुलाबाळांचा!....

तेंच आमच्या काकींनीं केलें आज!...माझं लग्न लवकरच उरकून टाकावं....न् मी अशी मुलगी पाहून ठेवली आहे, यंव् न् त्यंव्....त्यांची किती तरी बडबड सुरू झाली. मला त्यांना आंवरतां आवरतां पुरे झालं!

खरंच! पण लग्नाचा विषय निघाल्यापासून माझ्या डोक्यांत त्याच विचाराला चालना मिळत आहे कीं आज. 'छे, लग्न नाहीं करायचं इतक्यांत!' म्हणून मी काकींना सांगितलं; न् तें खरंच मनापासून होतं! पण याला कारण काय तर माझा सडेपणा जाईल!

लग्नाशिवाय माणसाच्या कर्तृत्वाची पूर्तता होत नाहीं याच मताचा मी आहें...

...आज डोक्यांत सारखे विचार चालले आहेत....

पण खरंच माझी भावी पत्नी कशी असावी बरं?....कल्पनेचं चित्र डोळ्यांपुढं उभं राहिलं!....

सुशिक्षित अर्थात् 'इयत्ता'वालीलाच सुशिक्षित म्हणतां येणार नाहीं, कारण इंग्रजी इयत्तांनांच मान असतो असें नव्हे—देशप्रेमी, सुसंस्कृत, साधी, सुस्वभावी, कलाकौशल्यवान्, निगर्वी...धीट, उत्तम गृहिणी....व यानंतर तरुणाला अवश्य वाटणारें सौंदर्य व जुन्यामंडळीस वाटणारें कुळगोत्र!....

अन् पुन्हां मुख्य सांगाडा असल्यावर उणीवा सहवासानें भरून येतातच!...

मी कांहीं कादंबऱ्यांतील प्रेमविवाह वगैरेंवर फारसा विश्वास ठेवणारा नाहीं....नित्य व्यवहारांत अशा गोष्टी जास्त प्रमाणांत खऱ्या ठरूं शकतही नाहींत....मात्र एवढं खरं कीं, नूतन जोडपें व त्याची संतति, समाजाची घटक असल्यामुळें त्यांचा स्वतः इतकाच समाजाला व देशाला उपयोग झाला पाहिजे! अर्थात् मागाहून पश्चात्ताप न व्हावा एवढ्यासाठीं लग्नापूर्वींच अशा तऱ्हेची एकमेकांची निरीक्षक परीक्षा झाली पाहिजे नको का? आईबापांना मुलांचें हित समजत असल्यामुळें त्यांच्याही मताला साहजिक थोडाबहुत मान हा असणारच!... पण योग्य तितकाच; वावगा चालूं देतां येणार नाहीं!

कितीतरी विचार सारखे डोक्यांत येऊन जात होते....



ता............

"म्हटलं एकदम कोण ही नवीनच मुलगी आमच्या घरांत! शरयूसारखंच पातळ होतं....मला वाटलं शरयूच बसलीअयू वाचत टेबलाजवळ! म्हणून गेलों चेष्टा करायला, तर ही कोणी मी पूर्वी न पाहिलेलीच मुलगी....

माझा खुर्चीला हात लागतांच तिनें मागं वळून पाहिलं! आम्हीं दोघेंही एकदमच चपापलों...ती उठली व लाजून झटकन् बाहेर निघून गेली....

जातां जातां ओझरतीच पाहिली मी तिला....सरळ नाक, वाटोळा चेहरा, भिंवया रेखाटल्यासारख्या, उजळ रंग....थोडक्यांत-मोहकच होती ती...तिचा मला साधेपणा फार आवडला....विनयशील दिसली....

तिच्याचविषयीं मी विचार करीत होतों; इतक्यांत शरयू ओरडत आली, "वासंती, एऽ वासंती, नाहीं ग बाई सांपडत तुझं 'गांधी चरित्र'!!"

माझ्या डोक्यांत प्रकाश पडला-ही आतां बसली होती तीच काल रात्रीं गात असलेली वासंती......

कितीतरी वेळां माझ्या डोक्यांत तिच्याबद्दलच विचार येत होते! तिची ती मघांची बावरलेली मोहक मूर्ति माझ्या मनःचक्षूंपुढून कितीदांतरी गेली....

ता........

"खरंच! माझ्यांत इतका कसा फरक पडला समजत नाहीं! दोन दिवसांपूर्वी जर माझ्या मनःस्थितीचें आजच्यासारखें कोणी चित्र काढतं तर मी तें खरें मानलंच नसतं!

वासंती! कुठची कोण? तिला मी पाहिलं नव्हतं किंवा तिच्याविषयीं कांहीं ऐकलंही नव्हतं!

पण तेंच; दोन दिवसांत तिच्याविषयीं मला किती आपलेपणा वाटूं लागला आहे....तसं म्हटलं तर आमचा कांहीं तसा या अवधींत जास्त सहवास झाला आहे असंही नाहीं. पण मनाची रचनाच तशी आहे कीं काय कोण जाणे?

तिच्याविषयीं कांहीं कोण म्हणत असला कीं माझे कान आपोआपच टवकारून उभे रहातात. तिचा आवाज कुठं ऐकला कीं, मनाला आनंद वाटतो. व कांहींतरी कारण काढून ती दिसावी या हेतूनें त्या बाजूस पाय आपोआप वळतात!

गेल्या तीन चार दिवसांत ती मला इकडे तिकडे जातांना दोन तीन वेळां दिसली. ती लाजतेच फार पण!...पुष्कळ वेळां अण्णाबरोबर फिरून परत

आल्यावर मला ती आमच्या घरीं दिसे. पण मी आलेलों पहातांच कांहीं तरी कारण काढून ती घरीं पळून जाई !...त्यावेळीं ती तेथेंच रहावी असें मला किती तरी वाटे !....मी घरीं नाहीं अशी संधि साधूनच ती येत असते कीं काय कोण जाणे !...

मला या तिच्या भित्रेपणाचा असा राग येतो !—इतका संकोच काय उपयोगी...आतां काय हिला मी वाघ वाटतों कीं काय !!

ता.........

खरंच ! किती अननुभूत अनुभव हा !! हृदयाचे ठोके काय सांगतात !...असा पूर्वी कधींच भांबावून गेलों नव्हतों मी !!

डोळ्यांचा हृदयाशीं इतका सरळ संबंध असतो काय ?

वासंती खालून जात असतांना वर मान करून बघायला व मी खालीं पहायला एकच गांठ पडली ! वीस पंचवीस सेकंदच !...पण माझ्या हृदयांत किती लाटा उठल्या !...तिच्याही हृदयांत तशीच खळबळ झाली असेल का ?...

किती लाजली ती !...

न् मला काय संकोच कमी वाटला ? ?...

ती पटकन् निघून गेली...मी मात्र तिच्याकडं दोन तीन वेळां पाहिलं !...तिनं वळून पाहिलं कीं नाहीं कोणास ठाऊक ?...पुन्हां तशी दृष्टादृष्ट झाली नाहीं, एवढं खरं !...

कादंबऱ्यांतल्या वर्णनांची मी आजवर थट्टा करीत असें ! पण त्यांत थोडं फार तथ्य असतंसं आज वाटूं लागलं !!...खरंच आजचा तो प्रसंग कादंबरींतल्यासारखाच होता नाहीं तर काय ?...

सबंध दिवस ताजा 'मॉडर्न रिव्ह्यू 'चा अंक घेऊन बसलों होतों. पण समोरचें पान कोरें होऊन त्यावर वासंतीची ती मोहक मूर्तीच दिसूं लागे !..."

ता.........

मला येऊन चार आठ दिवसच झाले असतील...पण एवढ्याशा अवधींत मला वासंतीबद्दल इतकं प्रेम कां वाटावं, हें माझं मलाच समजत नाहीं !...

पण खरंच ! वासंती किती साधी आहे !...साधंसं पातळ...केशरचनाही साधीच असते...पण या साधेपणामुळें माणसाला शोभा किती येते !...माझ्या या विचित्र आवडीमुळें ती मला जास्तच मोहक दिसते...अंतःकरणाचे ठसे चेहऱ्यावर चित्रित होतात हें खरं असेल का ?....



खरंच तिच्या सौजन्यपूर्ण चेहऱ्याकडे पहात रहावंसं वाटतं....ते डोळे तिच्या शांत मनाची किती उठावदार तऱ्हेनें कल्पना करून देतात !...

शरयूकडं ती अलिकडं जास्त येत नाहीं...आली तरी झट्कन् जाते...पण हा कसला फाजील विनय ?...

तिच्या आवाजांत तरी किती माधुर्य आहे....गातांना भावना हलविणें सर्वांनाच साधत नाहीं...

ता.........

"आज संध्याकाळीं मला एकदम कांहीं दिवसांपूर्वीच्या विचारांनीं पुन्हां भंडावून सोडलें ! किती तरी वेळ मी विचार करीत होतों.

खरंच, संसारसुख म्हणजे काय ?...लग्न म्हणजे काय ?...लग्नाचा हेतू काय असतो ?....विषयवासनांची तृप्ति म्हणजेच संसारसुख काय ?...अन् तेवढ्यासाठींच लग्न करावयाचें असतें का ?...छे ! किती मूर्खपणाची व कोत्या मनाची साक्ष पटविणारी कल्पना !

विषयसुख ही बाब किती गौण आहे ? मनुष्याला तेवढ्यासाठींच लग्न करण्याची पाळी येती ना ! निव्वळ सुखापेक्षां त्यांत कांहीं तरी जास्त आहे खास !...स्त्री व पुरुष यांनीं जन्मभर एके ठिकाणीं राहण्याचा निश्चय करावयाचा तो कशासाठीं ?...

तो असल्या स्वार्थी सुखासाठींच काय ?...खास नाहीं !...

एकमेकांच्या सहाय्यानें, ज्या समाजाचे ते घटक आहेत, त्याच्या उन्नतीसाठीं झटणें हें त्यांचें कर्तव्य नव्हे काय ?...एकमेकांच्या मदतीनें आपली आत्मिक उन्नति करून घेणें व नवीन नवीन ज्ञान संपादणें यासाठींच त्यांचें लग्नरूपी मीलन असतें. स्वार्थाच्या पलिकडे जाण्याचा प्रयत्न करून परार्थाकडे लक्ष लावणें, शांतता, समता, सख्य यांसारख्या गुणांचा सर्वत्र प्रसार करणें व स्वतः त्या मार्गाचा अवलंब करणें हेंच त्यांचें कर्तव्य होय !...

आपल्यानंतरही समाजाला उपयुक्त होणारी व त्याच्यासाठीं झटणारी नवी पिढी, त्याला अर्पण करणें हेंही त्यांचें कर्तव्यच आहे ! आणि तेवढ्यासाठींच फक्त स्त्री-पुरुषाला विषयसुखाचा अवलंब करावा लागेल !...निदान विशेषतः तेवढ्यासाठींच व्हावा ! आणि सुशिक्षित, सुविचारी स्त्री-पुरुषांचें समाजाला दान करून आपल्या कर्तव्याची पूर्तता करावी !...

हा उदात्त हेतूच लग्नांत गुंफलेला नाहीं काय ?

तर मग हें सर्व सफल व्हावयाला प्रत्येक स्त्री-पुरुषानें लग्नबद्ध होण्यापूर्वीच आपली निवड अनुरूप अशी करून घेतली पाहिजे ना ?...

स्त्री सौंदर्यवान् असली म्हणजे संसार सुखाचा होईल काय ? ती ज्ञानी असली म्हणजे संसारसुख लाभेल काय ?....

माझ्या मनाला मी अशाच प्रश्नांनीं भंडावून सोडलें होतें...अन् या माझ्या शेवटच्या प्रश्नांना उत्तरें नकारार्थीच येत होती....

एकमेकांची उन्नति होण्यास मुख्य त्यांचे स्वभाव, आवडीनिवडी याच गोष्टी जुळावयास पाहिजेत !...

मी मागें काढलेल्या माझ्या भावी पत्नीची मूर्ती मजपुढें उभी राहिली... अन् तिच्याजवळ, माझ्या नकळतच, वासंतीची मूर्ति येऊन स्थिर झाली !

मनाचा हा खेळ पाहून मला कौतुक वाटलें...त्या दोन्ही मनोमय मूर्तींत पुष्कळच साम्य होतें.

खरंच ! वासंतीसारखी स्त्री जन्माची जोडीदार होण्याइतकें माझें भाग्य आहे का ?...

ता........

गेल्या पंधरावीस दिवसांत माझ्या आयुष्यांत जो अनपेक्षित फेरफार झाला त्याचा मनांत विचार करण्यांत मला फार मौज वाटते...

उद्यां मी मुंबईस जाणार...जाण्याची कल्पना किती जाचक होत आहे... नुकताच वासंतीचा संकोच थोडथोडा ओसरूं लागला होता.......सहवासाचं सुख...

खरंच ! बाकी मनांतील सर्वच गोष्टी सुरळीत घडून येत नसतात म्हणून भीति वाटते...माझें भवितव्य काय आहे कोणास ठाऊक ?......

वासंतीचा जन्मभर सहवास लाभण्याइतका भाग्यवान् मी आहें का ?...

तोंडानं कोणाकडेच असल्या विचारांची वाच्यता करतां येत नाहीं !... काय करावं ?....कांहीं सुचत नाहीं...

वासंती, काय समजूं मी तुझ्या मनांतलं ?”

* * *



मी डायरींतून मान काढून वासंतीकडे स्मितपूर्वक वर पाहिलें...तिच्याकडे पहातांच ती लाजली.

‘इश्श !’ तिच्या तोंडून साहजिकच शब्द बाहेर पडले...तिनं झटकन् आपल्या हातांतील माझी डायरी मिटून टाकली व मला पुढील मजकूर वाचूं दिला नाहीं.

...मलाहि तेंच पाहिजे होतें. मी लागलीच माझ्या हातांतील तिची डायरी उघडली !...वासंतीनें तीवर हात ठेऊन मला वाचावयास हरकत घेतली...... पण मी तिचा हात बाजूस करून तिचा स्त्रीसहज स्वार्थी हेका चालूं दिला नाहीं...

तिच्या लाजेनें आरक्त झालेल्या चेहेऱ्याकडे हंसत पहात मी तिच्या डायरीचीं पानें चाळूं लागलों......

ता..........

“ शरयूचा उद्यां भाई येणार आहे म्हणे अण्णांबरोबर !...आम्ही इथं रहायला आल्यापासून कधींच आला नाहीं तो...

ता........

“ कोणाचा कोण ?...शरयूचा भाई ! न् मला कां एवढी उत्कंठा लागली आहे ?...शरयूसारखाच प्रेमळ न् विनोदी असेल का ?

ता........

“ तो आला तेव्हांच मी त्याला पाहिलें...खरंच किती देखणा दिसतो !... शरीर कसं धिप्पाड आहे !...खरा पुरुष शोभतो...चेहरा पण हंसरा आहे अगदीं !...तो खादीचा शुभ्र पोशाख किती खुलून दिसतो त्याला !...त्याची सात्विक मुद्रा कोणावरही पटकन् आपली छाप टाकील !

तो अण्णांसारखाच थट्टेखोर दिसतो बरं का ?...विनोदी भाषण...फारच बाई चेष्टेखोर स्वभाव त्याचा...नेहमीं शरयू बिरयूनां नको नकोसं करील थट्टेनं अगदीं !...

ता.........

“...पुरुषांच्या आवाजांतसुद्धां एक निराळीच गोडी असते...सगळ्यांनाच नसतो आवाज...शरयूच्या भाईच्या आवाजांत किती गोडी आहे....रात्रीं भजन म्हणत होता....खरंच फार प्रेमळ वाटलं मला....अभ्यास संभाळून हीहि कला घेतली आहेन् का त्यानं ? आमच्या भाऊला यांतलं कांहींच ठाऊक नाहीं.... सदा आपला कॉलेजच्या पुस्तकांत डोकं खुपसून....

ता.........

..."शरयूकडं जायला हल्लीं थोडा संकोचच वाटतो बाई मनाला !...पण आज अगदीं शरयूनं श्रीखंडाच्या वड्या करायलाच बोलावलं होतन्...ओटीवरच तिचा भाई बसला होता रहाटावर सूत काढीत...अगबाई...मला नव्हतं वाटलं हा इतका साधा असेलसा...

खरंच ! पण, मला हल्लीं शरयूचा भाई करील त्या त्या गोष्टी चांगल्या, असंच कां बरं वाटतं ?...इतका त्याच्या प्रत्येक कृत्याबद्दल विश्वास व अभिमान कां वाटावा ?...

ता.........

"काय गंमत झाली बाई आज !....शरयूकडं पुस्तक मागायला गेलें होतें माझं ! तिचा भाई....छेः ! एकेरी नांवानं हांक मारणं कसंसंच वाटतं....भाई कुठं बाहेर गेले होते. शरयू म्हणाली 'पुस्तक शोधून आणतें तोंवर बैस माझ्या खोलींत !'...म्हणून बसलें होतें तिच्या टेबलावरचं पुस्तक चाळीत !

कोणसं मागं उभं राहिलं....मला वाटलं शरयू....मागें वळून पाहतें तों भाईच उभे.... आम्ही दोघेंही किती दचकलों. मी ओशाळल्यासारखी होऊन झटकन् निघून गेलें !....छाती किती धडधडत होती माझी !....

मला वाटतं मी शरयूला दहा पंधरा दिवसांपूर्वी माझ्यासारखं स्वदेशी गुलाबी पातळ घ्यायला लावलं होतं त्यानंच हा सर्व घोटाळा केला....

बरं झालं....भाईंनां लोकांची थट्टा करायला पाहिजे असते नाहीं का नेहमीं ?.... चांगलीच खोड मोडली....

ता.........

"अगबाई, 'तारक' या टोपण नांवावर मधुन मधुन निरनिराळ्या मासिकांत कविता येतात त्या भाईंच्याच ! मला हें आजच अण्णांच्या तोंडून सहज समजलं ! खरंच किती सुंदर असतात बहुतेक कविता....एकूण हे कवीही आहेत तर....'तारक' असाच वाङ्मयाकाशांत सारखा चमको....

ता.........

...."भाई आल्यापासून शरयूकडं जायला अगदीं संकोचं वाटतो....पण काय असेल तें असो....तिच्याकडं जावं असंहि सारखं वाटत असतं....

भाईंना दिवसांतून एकदांतरी पाहिल्याशिवाय चुकल्यासारखं होतं...



इतकं काय, पण मला अलीकडं त्यांच्याविषयीं काय वाटतं कोणास ठाऊक ?....

असले विचार मनांत आले कीं हृदय धडधडतं !...

ता.........

"विमलनं सहज म्हटलं 'आमच्या भाईला आज ठेंच लागली !' मला चमत्कारिकच वाटलं !....झटकन् मी तिला विचारलें 'कितीसं लागलंय् ग ?'....

पण लागलीच माझ्या लक्षांत माझी चूक आली !....बरं झालं विमलच पोरीला विचारलं म्हणून...न् पुन्हां ती एकटीच होती....शरयूनं नाहीं नाहीं तो चावटपणा सुरू केला असतान्....मला ठाऊक आहे तिचा वहाटळ स्वभाव ! विमल पोर लहान...तिला माझ्या मनांतली चलबिचल समजली नाहीं; बरं झालं !...

पण खरंच !...भाईंविषयीं मला इतकी काळजी कां वाटावी ?...इतकं त्यांच्याविषयींचं अवस्य कां वाटावं मला ?...काय कीं बाई ! स्वतःच्या मनाची स्वतःला परीक्षाच करतां येत नाहीं बरोबर !

ता.........

"आज माझं हृदय कसं अगदीं उचंबळून येतंय् !...

पुरुषांच्या डोळ्यांत इतकी आकर्षण शक्ति असते का ?...

मला नाहीं वाटत प्रत्येकाच्या असेलच असं...पुष्कळ वेळां चुकून दुसऱ्या पुरुषाच्या डोळ्याला डोळा भिडतो; पण आजच्या सारखा नाविन्यपूर्ण अनुभव नव्हता अनुभवला कधींच !

भाई ग्यालरींत उभे होते हें मला ठाऊकच नव्हतं ! नाहीं तर मी तसं धाडस कधींच केलं नसतं !...पण मी वर बघायला व त्यांनीं खालीं पहायला एकच वेळ झाली !...

बाईऽ ! नुसत्या त्या कल्पनेनेंच आतां रोमांच उभे राहिले...त्यावेळीं माझी काय स्थिति झाली ती माझी मलाच ठाऊक !...खालीं पहाण्याचा माझा प्रयत्न किती तरी सेकंद फुकट गेला !...त्यांच्या त्या तेजस्वी डोळ्यांशीं माझे डोळे खिळूनच राहिले !...

खालीं पाहूं लागल्यावर किती लाजलें मी ! !...हृदय नुसतं धडधड वाजत होतं...अंगांत नवीनच उल्हास संचरला.

भाई, अशी काय हो तुमच्या डोळ्यांत जादू भरली आहे ?...आज मला अगदीं चैन पडेनासं झालं आहे...

खरंच, भाईंबद्दल मला किती आदर व प्रेम वाटत आहे ! आतां नाहीं बाई माझ्या हृदयांत मावत !...

मला सगळं सगळं अगदीं शरयूकडं सांगावंसं वाटतं...पण...दुष्ट शरयू... तिचा स्वभाव खव्याळ आहे अगदीं ! माझी थट्टा करून करून मला पिसडून खाईल !...

मी माझं हृदय उघडूं तरी कोणाकडं बाई ?

*   *   *

ता..........

उद्यां भाई परत जाणार...मला अगदीं चमत्कारिकच वाटतं आहे...सारखे त्यांच्याविषयींच विचार मनांत येतात......

पण मी तरी काय करूं !...मनोवारू सारखा त्याच दिशेला धांवत सुटतो... त्याला आटोक्यांत ठेवणं मला शक्यच नाहीं !

माझं हृदयच भाईंच्या मूर्तीनं भरून गेलं आहे तर त्याला मी काय करावं ?...

माझी तेवढी योग्यता असेल का ? कोणास ठाऊक ! ईश्वरा, महत्वाकांक्षा आटोक्याबाहेर करूं नकोस म्हणजे झालें !

खरंच...पण...आपला काय निर्णय होईल कोणास ठाऊक !...

मला आशा ठेवायला कांहीं तरी जागा आहे का ?..."

*   *   *

मी वासंतीकडे पाहिलें. ती त्याच वेळीं तिरक्या डोळ्यानें चोरून माझ्याकडे पहात होती. मी डायरी बंद करून तिचा हात आपल्या हातीं घेत हंसून म्हटलें, "हो पुष्कळ...तुला हवी तेवढी जागा आहे आशा ठेवायला !"

ती लाजून खालीं पाहूं लागली.

आम्ही दोघेंहि आनंदांत होतों.

शरयू, अण्णा व रमावहिनी सगळे केव्हां आले तें समजलेंही नाहीं.

"वत्सांनो, माझा तुम्हांला आशीर्वाद असो !" अण्णा चेष्टेनें हात वर करून आशीर्वाद देऊं लागतांच आम्ही भानावर आलों.

"हें हो काय अण्णा ?" वासंती उठून जातां जातां लटक्या रागानें म्हणाली,



"हं ! बसा, बसा, वहिनीसाहेब ! तुमची ओटी भरून कुंकू लावतें... आम्हाला घरांत माहीत आहे म्हणा सर्वांना आतां...पण शेजाऱ्यापाजाऱ्यांना साखर वांटून कळवून टाकूं !...भाईच्या 'मामंजीं'नींही केव्हांच संमती दिली आहे आनंदानं !" शरयूनं नाटकी प्रवेश केला...

"ही डायरी लिहावयाची संवय बरं का ?" अण्णाला अक्कल सुचूं लागली. "तुम्ही दोघंही लिहीत होतां म्हणून बरं पडलं आम्हाला !...हो, असेंच दुसरी तरुण मंडळी करतील तर पालकांनां बरं पडेल तेवढं !....उगीच अपयशाचीं खापरें नकोत फुटायला त्यांच्या डोक्यावर !"

"फार मोठेपणाचा आव नका आणूं बरं का अण्णासाहेब !" मी म्हणालों "दोन वर्षांतच आपण आजोबा झालांत असें आपल्याला वाटूं लागलं कीं काय ?...अहो, नुकताच १०।११ महिन्यांपूर्वी मुलगा झाला आहे ! आपल्याला आजोबांचा मान मिळायला अजून किती तपं काढावीं लागतील याचा विचार करा न् मग बोला !...अन् हें पहा, आपला 'पूर्वेतिहास' आम्ही आजच विसरलों नाहीं बरं का ?"

मी रमा वहिनीकडे पहातांच ती लाजली.

"बाकी शरयूच्या चोरीच्या शिताफीमुळेंच दोन्ही डायऱ्या नानांच्या हातांत टाकतां आल्या !"...अण्णानें सावधगिरीनें विषय बदलला....व तो मोठ्यानें हंसूं लागला.

शरयूनें त्याला पुष्टि दिली.

मी मनांतल्या मनांत चूर झालों.

वासंतीही लाजली. पण लगेच ती शरयूकडे तिरकी पहात लाडिकपणें पुटपुटली, "दुष्ट कुठची...चोर...."

"बाई बाई बाई, पाहिलं !...अलीकडच्या मुलीच अशा !!" शरयू रागाचा आव आणून म्हणाली, "आतांपासूनच का ही सुरवात !...बोलावतें बरं का तुझ्या सासूबाईंना !...पोरी, अग जरा तरी आपल्या वन्संची भीडमुर्वत ठेव !"

सर्वांनाच तिच्या नाटकाचें हंसूं आलें.

"अन् हें पहा वहिनी," अण्णा हंसत म्हणाला, 'पुरावा लोकांच्या हातांत असला म्हणजे गप्प बसणं फार चांगलं !...तो भाईच पहा ना ! कांहीं बोलतो आहे का ?"...

...इतक्यांत नाना व आई आमच्याच बाजूला येतांना पाहून मी व वासंती तेथून पळालोंच.

अण्णाच्या मुत्सद्देगिरीचा आतां उलगडा झाला. मधून मधून माझ्याकडे पाहून तो हंसे तो एवढ्यासाठीं तर !...एकूण या सर्वांचा तो कटच होता !...

पण त्यांना वासंतीनें व मी आपापल्या डायऱ्या लिहून मदतच केली म्हणायाची...

युनिव्हर्सिटीनें आमच्या परिक्षांचा उत्तम निकाल लाविला.

त्यानंतर लौकरच आमच्या खाजगी परीक्षांचाही निकाल लागला !

पुणें २१ जून १९३०
( प्रसिद्धि 'प्रगति' )

# ७—हरवलेले तारे !

एक शब्दचित्र.

कमलाक्षी आंत कांहींसें करत होती. घरांत एकटीच ती ! सारें काम तिलाच करावें लागे.

मी नव्या सुनीताच्या रचलेल्या ओळी गुणगुणत व पुढील ओळींविषयीं विचार करीत सहज सतरंजीवर पडलों होतों. कल्पनांचें नुसतें तुंबळ चाललें होतें. माझे डोळे अर्धवट उघडे होते.

कल्पनाच कल्पना !......

ठॉक ठॉक !...दारावर थाप ऐकूं आली.

'कोण आहे ?' यावेळीं माझ्याकडे कोण आलें असावें मला समजेना, म्हणून मीं प्रश्न केला.

"जरा दार उघडाल का ?" स्त्रियांचा कोमल आवाज लागलीच ओळखतां येतो !

दार उघडतांच दोन सुंदर स्त्रिया आंत आल्या. त्यांचा शुभ्र पोशाख, व कांतियुक्त मुखकमलें पाहून मी तर आश्चर्यचकितच झालों. त्या कोण असाव्यात याचा मला उलगडा होईना !

यापूर्वी माझ्याकडे त्या कधींच आल्या नव्हत्या !

"कोण आपण ? या, बसा, "...मी इतकें सर्व बोलण्यापूर्वीच त्या स्थानापन्न झाल्या होत्या. यानंतर मला जास्त बोलावें लागलें नाहीं. त्या दोघींपैकीं एक पुढाकार घेऊन बोलूं लागली.

"आदर-आतिथ्य, चालीरीती बाजूस ठेऊन, मी आपणांस एकदम सांगावयास सुरवात करतें; म्हणजे प्रश्नोत्तरांत विनाकारण अमूल्य वेळ जावयास नको. नाहीं ?..." असें हास्यवदनानें ती प्रस्तावनेदाखल बोलली.

मला तिच्या स्पष्टवक्तेपणाचें कौतुक वाटलें.

"होय;...जवळ जवळ सत्रा अठरा वर्षांपूर्वींची गोष्ट..." ती आपल्या मैत्रिणीकडे पाहून नंतर मला सांगूं लागली. "बाकीच्या यक्षकन्या दुसरे कांहीं खेळ खेळण्यांत गुंग झाल्या होत्या. हिला व मला सागरगोटे खेळण्याची इच्छा

झाली. आम्ही सगळीकडे फिरून अगदीं सुंदर सुंदर सात तारे जमा केले. त्यांतील दोन तर अतिशय सुंदर व तेजःपुंज होते. आम्ही आकाशाच्या निळ्या गालिच्यावर पाय पसरून खेळावयास बसलों.

दोघीही खेळणाऱ्या अट्टल; पण काय असेल तें असो, त्या दिवशीं माझ्यावर हिनें एक हुंडी चढवली. मी चुरशीला पेटलें, व आम्ही पुन्हां खेळूं लागलों.

पण साधारण नियमच आहे कीं, एखादा चुरशीला पेटला कीं त्याच्या हातून जास्तच चुका होऊं लागतात ! तसेंच माझें झालें; मी लागोपाठ डाव हरूं लागलें. मला माझा राग येऊं लागला, आणि त्याचा वचपा मी हातांतील खड्यांवर काढला.

रागानें उडवल्यामुळें ते नीट तर पडले नाहींतच, पण इतक्यांत ही माझी मैत्रीण ओरडली, 'अगऽ बाई !'

मी पाहूं लागलें तों उडवलेल्या खड्यांतील दोन घरंगळत घरंगळत टोंकावरून खालीं, अगदीं खाऽलीं येऊन पडले !"...

"टोंकावरून ? कसल्या टोंकावरून बरं ??" मी मध्येंच कुतूहलानें प्रश्न विचारला.

त्यांची ती हकीकत ऐकून मला फार मौज वाटली.

"कसल्या म्हणून काय विचारतां ? त्या निळ्या आकाशाच्या सोनेरी क्षितिजावरून ! मला किती वाईट वाटलें...पहातां पहातां ते दोन्ही तारे तुमच्या पृथ्वीवर आलेसुद्धां. आम्ही दोघीही एकदम घाबरलों. आम्हांला ठाऊक होतें कीं ही हकीकत आमच्या स्वर्गाच्या राजाला समजली तर आमची धडगत नाहीं ! ...आणि तसं पाहिलें तर तें साहजिकच आहे. दोन अतिसुंदर तारे आमच्यांतून जाऊन पृथ्वीवर येणें हें त्याला केव्हांही सहन होणें शक्य नाहीं. त्यांत त्याला दोष देण्यांत काय अर्थ ! कोणाही अभिमानी व्यक्तीला तसेंच वाटलें असतें !...

त्याला ही हकिकत समजतांच तो आमच्यावर खूपच रागावला, व आम्ही ते हरवलेले तेजःपुंज तारे पुन्हां जागच्या जागीं आणून ठेविल्याशिवाय घराची पायरीही चढूं नये अशी सक्त ताकीद त्यानें आम्हांला दिली !

झालें ! तेव्हांपासून आम्ही त्या ताऱ्यांच्या शोधार्थ असे वणवण हिंडत आहोंत. इतकीं वर्षें झालीं, अहोरात्र भटकणें चाललें आहे. कोठें म्हणून कोठेंच त्यांचा शोध लागेना ! आम्ही अगदीं निराश झालों; आम्हांला समजून चुकलें कीं आतां आमच्या नशिबीं जन्माची हद्दपारी....



"पऽण, काल परवांच आम्हांला पुन्हां आशेचा किरण दिसूं लागला"... या वेळीं ती थोडेंसें हंसरें तोंड करून आपल्या मैत्रिणीकडे पाहूं लागली.

"हा किरण कुठून आला बरं ?" मी उत्कंठेनें विचारलें.

"आपल्याच घरांतून !....आणि म्हणून आपल्याकडे आम्ही आज आलों आहों !"

मला हें तिचें म्हणणें मात्र कांहींच समजेना !

"म्हणजे ??" माझ्या तोंडून एकदम शब्द बाहेर पडले.

"तेंच आतां सांगतें आपल्याला !" ती म्हणाली. "आम्ही हताश होऊन परत फिरलोंसुद्धां होतों, इतक्यांत आम्हांला अशी हकीकत समजली कीं, अगदीं अनुपम डोळ्यांची एक सुंदर तरुणी या गांवांत आहे. तसे जगांत दुसऱ्या कोणाचेच डोळे सांपडणें शक्य नाहीं.

आम्हीं कयास केला कीं या मर्त्य जगांत ज्या अर्थी अशी असंभाव्य गोष्ट घडून आलेली दिसते, त्या अर्थी त्या तरुणीचे डोळे दुसरे तिसरे कशाचे नसून, आमच्या हातून खालीं आलेले ते दोन तेजस्वी तारेच असावेत !....

आम्ही या गांवांत येऊन तपास केला तेव्हां आम्हांला सर्वांकडून समजलें कीं ती तरुणी म्हणजे तुमची प्रिया !!....आतां आम्ही येथें कां आलों तें आपल्याला समजलें असेलच !...."

मी गोंधळूनच गेलों.

त्या माझ्याकडे कां आल्या आहेत हें आतां पूर्ण समजलें.

आनंद झाला, पण तो फार वेळ टिकला नाहीं.

माझ्या प्रियेचे डोळे काढून नेण्याची कल्पनाहि मला असह्य झाली ! थोडासा धक्काच बसला !

...पणऽ...

या दोघी यक्षकन्या सांगत असलेली हकिकत जर खरी असेल तर त्यांचा हक्क बुडविणें हें अन्यायाचें होईल असें मला वाटूं लागलें !...

"मग ? बोलावतां ना आपल्या प्रियेला ??" ती स्त्री पुन्हां मला आठवण करण्यासाठीं म्हणाली.

"कमलाक्षी ! ए कमूऽ !" मी हांक मारली.

"आलेंच !" असा कोमल आवाज आंतून ऐकूं आला.

आत्मस्तब्धतेनंतर, थोड्याच वेळांत माझी प्रिया बाहेर आली.

तिला थोडक्यांत मी त्या दोघींची हकीकत सांगितली !

पण कमलाक्षीला दुःख झालेलें दिसलें नाहीं किंवा ती थोडीसुद्धां गोंधळली नाहीं !!

किंचित् काल तिनें विचार केला, व ती त्या यक्षकन्यांसमोर जाऊन उभी राहिली !

"प्रिय मैत्रिणींनो, पहा हो ! हे तुमचे हरवलेले तारे असल्याची तुम्हांला ओळख पटली तर ते खुशाल घेऊन जा ! माझी थोडीसुद्धां आडकाठी नाहीं !!"

त्या दोघी स्त्रिया जवळ जवळ आल्या. अगदीं जवळ उभ्या राहून त्या तिच्या डोळ्यांकडे—माझ्या प्रियेच्या अतिसुंदर डोळ्यांकडे—पाहूं लागल्या !

त्या वेळीं कमलाक्षी किति किति सुंदर दिसत होती ?

वर्णन न केलेलेंच बरें !!...

दोघींनीं आपापल्या परीनें माझ्या प्रियेच्या डोळ्यांची कसून तपासणी केली !...

नंतर थोडा वेळ त्या आपापसांत कुजबुजत होत्या !!

...माझी छाती धडधडत होती !

निकाल काय लागतो याविषयींच सर्व चिंता !! मी त्यांच्या चेहऱ्यावरील सूक्ष्म फरकाकडे आशापूर्ण नजरेनें पहात होतों !......

दोघींचेही चेहरे उतरलेले दिसले !

मला बरीच आशा उत्पन्न झाली !

इतक्यांत ती पूर्वीचीच स्त्री म्हणाली, "छे हो छे, हे सत्राअठरा वर्षांपूर्वी आमच्या हातून हरवलेले तारे खात्रीनें नव्हत ! त्यांना आम्ही सुंदर म्हटलें तरी ते इतके तेजस्वी किंवा इतके चकचकीत मुळींच नव्हते, हें प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे !"

आणि त्या दोघी जड पावलें टाकीत निघून गेल्या !

त्या दोघींविषयीं थोडेंसें दुःख होत होतें तरी मी माझ्या प्रियेकडे प्रेमपूर्ण नजरेनें पाहिलें !!

माझा आनंद गगनांत मावेना !

पण कमलाक्षी हंसतच होती ! मला कारण कांहीं समजेना !!

"त्या दोघींना मी किती छानदारपणें चकविलें, नाहीं ?" कमलाक्षी हंसत माझ्या अगदीं जवळ आली.



"कसं ग ?" मी प्रश्नसूचक चेहरा केला.

मला त्यांतलें कांहींच समजलें नव्हतें !

"त्या दोघींनीं सांगितलेली बातमी खरी होती !" कमू माझ्याकडे प्रेमळ कटाक्ष टाकीत म्हणाली.

थोडा वेळ माझ्या छातीवरील बटन फिरवीत स्तब्ध होती. नंतर हळूच म्हणाली, "माझी आई मला कितीदां तरी सांगे कीं माझा जन्म झाल्यावर थोड्याच अवधीनंतर, आकाशांतून दोन घरंगळत येणारे सुंदर तारे खिडकींतून एकदम माझ्या पापण्यांत येऊन पडले ! पण त्या दोघी जेव्हां माझ्या डोळ्यांची तपासणी करीत होत्या त्या वेळीं..."

इतकें बोलून ती एकदम लाजली ! तिच्या कपोलभागावर किती लवकर गुलाबी छटा पसरली ?

"काय झालें, सांग ना ?" मी तिचा हात आपल्या हातीं घेऊन प्रेमानें विचारलें, "'त्या वेळीं' काय ??..."

"त्या माझ्याकडे पहात होत्या त्यावेळीं मी एका मोहक प्रसंगाची आठवण करीत होतें..."

"सांगतेस कीं नाहीं ? कोणता बरं तो प्रसंग ?" मी लाडिक रागानें तिच्या गालावर हळूच चापट मारली.

"...कसं सांगूं ?...ज्यावेळीं" ती लाजेनें खालीं पहात म्हणाली, "आपण अगदीं पहिल्या प्रथमच ओष्ठांचें चुंबन घेऊन आपल्या प्रेमाचा ठसा माझ्या कपोलभागीं उठविलात तो !"

माझी प्रिया या वेळीं मघांपेक्षांही जास्त सुंदर दिसत होती.

तिचे डोळे किती तरी चकाकत होते !

मी आनंदांत तल्लिन होतों. इतक्यांत ती पुढें म्हणाली—

"मला मोठी आशा होती कीं, त्या प्रसंगाच्या—त्या वेळच्या आनंदाच्या, नुसत्या आठवणीही, माझ्या डोळ्यांना—त्या पूर्वीच्या दोघां तेजःपुंज ताऱ्यांना—आकाशांतील कोणच्याही ताऱ्यापेक्षां जास्त तेजस्वी करूं शकतील !! आणि ...तसें झालेंच ! नाहीं का? त्या दोघांनींही तें कबूल केलें !!"

कमलाक्षी पुन्हां मोहक हंसली. तिच्या चेहऱ्यावर उल्हास पसरला होता !

मला माझ्या प्रियेविषयीं जास्तच अभिमान वाटूं लागला !

" लबाडे ! " मी तिचे दोन्ही हात माझ्या हातांत घेतले, " एकूण हरवलेले तारे माझेच तर ! !"

मी तिच्या डोळ्यांकडे अनिमिष नेत्रांनीं पहात होतों—

* * *

" म्हणजे ! सुनीतें करतां करतां झोंपाही काढतां येतात वाटतं ? ? " कमलाक्षी मला उठविण्यासाठीं माझ्या गालावर हळू हळू फुंकर घालून गुदगुल्या करीत होती.

मी बराच वेळ ' माशा हाकलीत ' होतों. शेवटीं कानाजवळ मोठ्यानें उच्चारलेल्या वरील वाक्यानें मी डोळे उघडले !

" अरेच्या ! एकूण, साऱ्या येथून तेथून कल्पनाच का ? " मी भानावर येऊन म्हणालों, " थांब तर मग, मला माझ्या मालकीचे हरवलेले तारे तरी पाहूं दे !"

मी कमलाक्षीचे हात धरून तिच्याकडे सारखा पहात राहिलों.

" वेडबीड लागलं कीं काय ? " ती तशीच माझ्याकडे हंसत पहात म्हणाली.

" होय ! ' हरवलेल्या ताऱ्यांचें ' ! ! मी तिला जवळ ओढून म्हणालों. ती जास्तच गोंधळली ! !*

पुणें, मार्च १९३१.

( प्रसिद्धि–'प्रगति' )

* मध्यवर्ती कल्पना, ' सी-मेंडिस ' या फ्रेंच लेखकाच्या ' The Lost Stars ' वरून घेतली आहे—लेखक.

## ८–गोष्टीची गोष्ट–

**एक शब्दचित्र.**

शाळेंतून परतल्यावर वासूनें दप्तर कोंपऱ्यांत फेंकलें.

प्रदर्शनांत; सुंदर अक्षरांत लिहिलेलीं, मुलांचीं मासिकें, काल पाहिल्यापासून त्याच्या डोक्यांत तेच विचार सारखे येत; आज खेळावयास जावयाचा त्याचा विचार नव्हता. त्यानें कोटटोपी भिरकावली. त्याला वाटलें, " हं ! आज आपण गोष्ट लिहावी ! "

चाकूनें पेन्सिलीचें दोनदां टोंक मोडलें. कंटाळून, दातानें लांकूड कुरतडतच त्यानें शिसें मोठें केलें. दादांच्या टेबलावरील एका कागदाचे चार तुकडे करून तो लिहावयास बसला.

पण कसली गोष्ट लिहायची ?

तो तोंडांत पेन्शील घालून विचार करूं लागला !...

बगदादचा चोर न् त्याचा जादूचा गालिचा ! तो कागदाकडे पाहूं लागला;...

' अंहं, अशी नसते गोष्ट कांहीं ! ' त्यानें मान हलवली.

मग कशी ?...

खोडून तो पुन्हां लिहूं लागला.... ' एक होता राजा; त्याला दोन बायका होत्या. एक आवडती न् एक...' " छेः ! ही कसली गोष्ट ? ही तर मधूच्या आजीनें सांगितलेली !...लोक म्हणे स्वतः आपणच लिहितात..."

दोन ओळी खोडून तो पुन्हां पेनशिलीचें शिसें जिभेनें ओलें करून, तोंड वेडें वांकडें करीत कागदावर खरडूं लागला—" ' एक होता कावळा व एक होता कोल्हा...' कोल्हा कावळ्याला म्हणाला, ' पण छे ! कावळ्याबरोबर कोल्हा कसा बोलेल ? ' "...त्यानें, लौकर लौकर लिहिलेलें सर्व, पुन्हां शिशानें काळें केलें !...

तोंडांत ' पेणशील ' घालून तो विचार करूं लागला !

पेन्सील करतां करतां चाकूनें हात कापावा; घळघळ रक्त वाहूं लागल्यावर एखादा जसा एकदम चमकेल तसा वासू दचकला !...त्याला आठवण झाली दुपारची—

सरनीं त्याला विचारलें होतें–'नाईल हें काय आहे ? शहर कीं डोंगर कीं...?'

जास्त विचार न करतां 'डोंगर' म्हणून सांगितल्यामुळें त्याच्यावर डोंगर कोसळला होता !

नंतरचा तास इंग्रजीचा—

सर सांगत होते, 'Early to bed and early to rise...'

बाहेर पाऊस पडत होता; एका बाजूस उन्हाचे किरण व त्यामुळें धनुष्य ! झिम झिम पाऊस...खिडकीजवळच पाण्याचे हिरवे निळे जांभळे थेंब ! बेभान होऊन तो एकदम मोठ्यानें म्हणाला "हें असं कसं दिसतं ?"

"मूर्ख नाहींतर ! लक्ष कुठं तुझं भलतीकडे अंऽ !...चल...इकडे ये !"... फट्‌ फट्‌; दोन छड्या !

तो हिरमुसला जाग्यावर जाऊन बसला !

त्यापुढें मराठी;—सर 'गोपिकाबाईचा पुत्रशोक' मुलांना सांगत होते. 'पुढें माझा नाराऽयण तरुण तोऽपुत्र तिसरा !'...

वासूनें जांभई दिली.

वहीच्या कोऱ्या पानावर त्यानें पेन्सिलीनें धनुष्य काढलें. ड्राईंगसाठीं आणलेल्या रंगाच्या काड्यांनीं तो रंग भरूं लागला ! तांबडा, निळा, पिवळा, हिरवा...

जवळचा मुलगा पाहूं लागला. कुजबुज झाली.

सरचें लक्ष वर गेलें. 'गोपिकाबाईचा शोक' आंवरून ते ओरडले "तूं रे, महाजन, कुठं आहे तुझं लक्ष ?"

मास्तर जवळ आले. हा त्याचा दुसरा गुन्हा !

मास्तरांनीं सबंध दिवसभर वासूला वर्गाकडे पाठ करून, वर्गाबाहेर उभें रहाण्याची शिक्षा फर्माविली.

वासू थोडा वेळ रडला; पण नंतर त्याचें लक्ष रस्त्यावरील सोनेरी किरणें, पावसाचे तुषार...या सर्वांकडेच लागलें.

आणि आतां मास्तरांनीं गुन्ह्याबद्दल दिलेली शिक्षा–उद्यां करून न्यावयाचा अभ्यास त्याला आठवला—

पांच चक्रवाढव्याजाचीं गणितें, इंग्रजी सबंध धड्याचा शब्दार्थ, व्याकरणाचीं दोन पानें, माणसाच्या बरगड्यांचीं हाडें, स्नायूंचे व सांध्यांचे प्रकार, भूगोलाचा एक धडा, 'गोपिकाबाईच्या पुत्रशोकां'तील चार कविता पाठ...



वासूला भीती वाटली !

तो म्हणाला प्रथम कविता पाठ करूं या; तें सोपें असतें ! त्यानें पुस्तक हातीं घेऊन वाचावयास सुरवात केली—

'नवस करितीऽ पुत्रासाठींऽ कितिक जगिं स्त्रिया !'...

छेः ! त्याच्यापुढें आज गोष्ट लिहावयाचा विचार थैमान घालीत होता !

त्यानें पुस्तक बाजूस भिरकावलें; गोखल्यांचें अंकगणीत व गणिताची वही दूर लोटली.

पुन्हां मघांचा कागद त्यानें पुढें ओढला.

तोंडांत 'पेणशील' घालून चोखत तो विचार करूं लागला. त्यानें भरभर वर लिहिलें—'गोष्ट' !

पण नाहीं—

त्याला 'नवाकाळां'तील गोष्टींवरील मथळा आठवला...त्यानें खोडून पुन्हां लिहिलें...'स्फुट गोष्ट' !

पण पुढें काय ?

तो पेन्सील चोखूं लागला; डोकें खाजविलें ! त्याला सुचेना !

'पेणशील' कुरतडून खराब झाली; कागद खोडाखोडीनें भरून गेला !

त्याला दुपारचा देखावा आठवला. त्यानें जिभेवर शिसें ओलें केलें; लिहावयास खालीं वांकला—

'वासू चल जेवायला !' त्याला आंत जावें लागलें. जेवणाकडे त्याचें लक्ष नव्हतें; तें कसें बसें उरकून पुन्हां दिव्याजवळ येऊन बसला.

दादा रागावतील म्हणून अभ्यासाच्या पुस्तकांत कागद घालून त्यानें पुन्हां लिहावयास सुरवात केली. तोच देखावा त्याला पुढें दिसत होता. तो लिहूं लागला—

"सर आम्हांला शिकवीत होते.

बाहेर कसा पण पाऊस पडत होता—आणि कनी कित्ती कित्ती गंमत होती ?

खूप अगदीं खूप रंग दिसत होते—पिवळें पिवळें ऊन; हिरवें हिरवें गवत; अन्‌ इंद्रधनुष्य पडलें होतें !

पावसाच्या थेंबांचा रंग किती छान छान दिसत होता. हिरवा, निळा, तांबडा, पिवळा...!

पण हे निरनिराळे कसे रंग ?..."

किती वेळ गेला एवढें सर्व लिहायला?

तो येथें थबकला; व त्याला दुपारचें सर्व आठवलें.—

त्यानें पुढचेंही लिहिलें.

"मी सरनां विचारलें, 'सर, हें असं कसं दिसतं?'

सर रागावले व मला दिवसभर वर्गाबाहेर उभें केलें—"

इतक्यांत आई ओरडली, "अरे सकाळची शाळा आहे ना? पुरे, झोंप आतां!"

वासूनें पुस्तक मिटलें.

बिछान्यावर त्याला तेंच सर्व आठवत होतें.

* * *

आईनें टोपी शोधून दिली, कोट चढवून वासू शाळेंत गेला.

तो वर्गांत शिरला. त्यानें स्वतः लिहिलेली 'स्फुट गोष्ट' वाचावयास सुरवात केली.

दामू, विनू, कृष्णा सर्व भोंवतीं जमले.

"कायरे तें बघूं?" दामूनें विचारलें.

'गोष्ट! मी लिहिली!' वासूचे डोळे अभिमानानें मोठे झाले होते.

विन्यानें ओढून वाचावयास सुरवात केली.

सर्व डोकावून पहात ऐकूं लागले.

"एः ऽ! ही काय गोष्ट?" मधूनें तोंड उडविलें.

विनू हंसला.

"काल मारलं म्हणून बरं आहे सरनीं! अभ्यास केलास का आज दिलेला?" कृष्णा—वर्गांतला पहिला नंबर—हेटाळणीनें म्हणाला.

दामूनें वासूच्या पाठीवर हात ठेऊन त्याच्याकडे पाहिलें.

सर वर्गांत शिरले तेव्हां हाच गोंधळ चालला होता, "काय आहे रे गडबड? अंऽ?"

चूपाचूप झाली. मुलें जागेवर गेलीं.

"काय चाललं होतं विनू?" सर तीक्ष्ण नजरेनें सर्वांकडे पहात म्हणाले.

"या वासूनें गोष्ट लिहिली आहे सर!" तो घाबरत म्हणाला.

"काय आहे रे महाजन? पाहूं!" सर वासूकडे नजर रोंखून म्हणाले.



त्याला भीति वाटली!

पण त्याला आशा वाटली; आनंद झाला!

तो चांचरत पुढें आला.

त्यानें गोष्ट सरांच्या हातांत दिली!

सरनीं वाचली ती गोष्ट.

वासू त्यांच्याकडे आशेनें पहात होता! पण—

सरचे डोळे मोठे झाले!

वासू घाबरला!!

"मूर्ख!" ते त्या गोष्टीचा चोळा मोळा करून कोंपऱ्यांत फेकीत म्हणाले. "आजचा अभ्यास केलास का?"

वासूचे डोळे भरले होते; गळा दाटला होता! त्यानें मानेनेंच सांगितलें 'नाहीं!'

"मुलांनीं कसं असायला पाहिजे? आपण बरं कीं आपला अभ्यास बरा!" सर वासूला व सर्व वर्गाला उद्देशून म्हणाले. "अभ्यास नको करायला न् नाहीं तेंच—चल दोन छड्या घे न् जाऊन दोन तास बांकावर उभा रहा!"

मुलें, एकमेकांकडे पाहून सरांचें 'आपण बरं कीं आपला अभ्यास बरा!' हें वाक्य एकमेकांवर ठसवीत होते!

सर पहात नाहींतसें पाहून, दामूनें चुरगळून टाकलेल्या गोष्टीचा बोळा, पायानें हळूच ओढून, आपल्या खिशांत घातला.

वासूनें बांकावर उभें असतांना तें पाहिलें; डोळे पुसतां पुसतां दामूकडे पाहून तो हंसला!

"बरं झालं! दिलेला अभ्यास नाहीं करायचा न् नाहीं तोच आचरटपणा!" जवळच बांकावर बसल्याबसल्या कृष्णा त्याच्याकडे वर पहात म्हणाला.

सर शिकवीत होते.—

"झांबिझी नदीचे उत्तर ऱ्होडेशिया व दक्षिण ऱ्होडेशिया असे दोन विभाग पडतात—"

ठाणें, सप्टेंबर १९३२.

# ९—हृदय

**—एक शब्दचित्र.**

शिवरामभाऊ निराश अंतःकरणानें सुमतीसह, टांग्यांतून उतरून घरांत शिरले तों गोपाळानें त्यांना पहिलीच बातमी दिली. ‘ हंऽ ! बाबा, त्या अंब्यांचीं पिल्लें झालीं हो ! ’

शिवरामभाऊंनीं कपाळाला आंठ्या घालून त्रासिकपणें त्याच्याकडे पाहिलें व उपरणें आणि फेंटा निष्काळजीपणें खुंटीवर फेंकलीं; कोटाचीं बटणें काढतां काढतां त्यांनीं आंतल्या बाजूस पाहिलें तों अनुसूयाबाई प्रश्नसूचक चेहरा करून दाराशीं उभ्या !

“ नेहमींप्रमाणेंच ना ? नाहीं वाटतं पसंत पडली त्यांना ? जाण्यायेण्याची यातायात न् खर्च फुकटच तर ? ?....” त्या बोलतांना जरा चांचरल्या.

“ नाहीं तरी इकडे येऊन जाण्याचा खर्च द्यावा लागला असताच ना ?—आपली मनाची समजूत तरी करून घेतली ! ” शिवरामभाऊ सदरा खुंटीला अडकावून धोतर जरा गुडघ्यावर सारीत, ‘ हुऽश्श ’—करून तक्याशीं उताणे झाले.

“ काय उणं पडलं तिच्यांत ? ” अनुसूयाबाईंनीं खिळ्याचा पंखा काढून त्यांच्या हातीं देत विचारलें.

“ पोरी आमच्या घरीं जन्माला आली हेंच ! ” ते वारा घेऊं लागले; “ तें स्थळही ठीक आहे—पण मी गरीब. कुठले तीन हजार रुपये देणार ? आतांपर्यंत दोघींचीं करतां करतां दुड्ड संपले !....”

“ कोन ? ताई काग आई ? ” गोपाळ इतका वेळ न समजतां तेथेंच ऐकत उभा होता; आतां त्यानें प्रश्न विचारला.

“ गप् बस रे तूं ! उगीच मध्यें मध्यें बोलत असतो...जा बाहेर—” अनुसूयाबाई एकदम ओरडल्या त्याच्यावर—

पोवळ्यासारखे ओठ थरथरत पुढें आले. सुंदर डोळे पाण्यानें भुरके झाले. आईकडे एकदां पाहून त्यानें बाबांकडे आपले भरले डोळे लावले. त्याला वाटलें न जाणों बाबाही आपल्याकडे मघांपासून अजून तसेच पहात असतील.



शिवरामभाऊंनीं त्या चिमुकल्या मूर्तीला पाहिलें. पडल्या पडल्या स्मित करीत त्यांनीं त्याला आपल्याकडे हातानें बोलावलें.

दोहोंपैकीं आपल्या बाजूचें कोण तें कळतांच तो दुड्डदुड्ड धांवत गेला; विरुद्ध बाजूकडे त्यानें भृकुटी जरा वक्र करून, विजयी नजर फेंकली. आणि बाबांच्या गळ्याला मिठी मारली.

“ अं हूं....हूं...हूं...हूं ! ” शिरामभाऊ जवळ आलेल्या कोंवळ्या गालावर आपलें नाक दाबून, गोपाळाला आपल्या जवळ घट्ट ओढीत लाडकपणें म्हणाले. “ आपण ळलतो कां कदी ? ”

‘ कधीं रडलों ? ’ तो डोळे मोठे करून रडलों नाहीं असें दाखवीत म्हणाला; पण तितक्यांत डोळे एकदम बारीक होऊन, गालावरून अश्रू ओघळलेच त्याच्या !

“ अन् तें कायरे मुलामा ? ” अनुसूयाबाई आपली मघांची वृत्ती सांवरून घेण्यासाठीं त्याला थट्टेनें खिजवीत म्हणाल्या.

“ आमी नाय् एका माणसाशीं बोलत ! ” तो आईकडे गाल फुगवून पहात म्हणाला व सदऱ्याच्या बाहीनें त्यानें हळूच डोळे पुसले.

“ हं हं ! मी पण हं... ” बाबा त्याच्या खांद्यावर हात टाकीत म्हणाले, “ आपण आईशीं बोलायचंच् नाहीं !...तूं सांग आपलं मघां मला काय सांगणार होतास तें ?...”

“ सांगूं ?...त्या अंब्यांचीं ना, पिलें झालीं ! ” तो मोठी बातमी म्हणून सांगूं लागला.

पितापुत्राकडे कौतुकानें पहात अनुसूयाबाई आंत गेल्या.

“ कुठच्या ? त्या झाडावरच्या ?” बाबांनीं त्याला आश्चर्यानें विचारलें.

“ होऽऽ ! ” हास्याचा व आनंदाचा उमाळा अर्धवट फोडीत तो म्हणाला.

“ खरं ? चल, पाहूंया बरं ! ” शिवरामभाऊ उठत म्हणाले.

“ चला चला....जंमत आहे !... ” त्यांचा हात धरून तो लगबगीनें चालूं लागला....

* * *

गोपाळ मोठा चौकस गोड पोरगा होता. एखादी नवी गोष्ट त्यानें पाहिली कीं त्याचे डोळे मोठे होत, भृकुट्या दुमडत, खेळकर हास्य चेहऱ्यावरून निघून

जाई...अन् मग प्रश्नांचा सपाटा सुरू...जितके विचारी त्याच्या किती तरी पट तो विचारण्यापूर्वीच विसरे!

अन् विचारी ते तरी किती विविध—

"आपण कुठून आलों?....ढग पांढरे, तांबडे, काळे कां असतात?....आकाशाच्या आंत जायला दरवाजा कुठं आहे? देवाचं मोठं सिंहासन असतं काहो? अगदीं प्रथम देव कुठून आला? या फुलाला वास येतो नू त्याला कां येत नाहीं?...."

आई पुष्कळदां कंटाळे! पण बाबा त्याला शक्य तितकीं खरीं उत्तरें देण्याचा प्रयत्न करीत. आणि त्यामुळें त्याची कोणतीही शंका अलीकडे तो बाबांनाच विचारी. त्याचे बाबा त्याला एक ज्ञानभांडारच वाटत!

'बाबा त्या शेजारच्या शंभूनं पोपट धरला!' त्याला नवीन कांहीं दिसलें होतें; 'आतां त्या लहान पिलांचे आईबाप काय करतील हो?'

"शोधतील शोधतील सगळीकडे, नू रडतील मग बिचारीं!' बाबा म्हणाले.

"मग शंभू सोडून कां नई हो देत त्याला?' त्याचे डोळे मोठे झाले; कपाळाला आंठ्या पडल्या.

"त्याला खेळायला पाहिजेय् तो! तो कसा बरं सोडील? रडतील त्याचे आईबाप तर रडतील!" बाबांना त्याच्या प्रश्नांचें कौतुक वाटलें.

"दुष्ट आहे नाहीं तो!" गोपाळ रागानें म्हणाला; पण इतक्यांत त्याला नवा प्रश्न उद्भवला; "बाबा, मी केवढा मोठा असेन हो?—"

"तूं? असशील सहा वर्षांचा!"

"अन् मग तो शंभूनें धरलेला पोपट?—" त्यानें पुढें प्रश्न केला.

"तो असेल पंधरा वीस दिवसांचा, महिन्यादीडमहिन्याचा!"

"अगदीं प्रथम झाला तेव्हां सुद्धां असाच होता?"

"हा वेड्या! सुरवातीला तो एक नुसतें अंडें होता!"

"अंडें?" येथें गोपाळला मोठा प्रश्न पडला. हा शब्द....ही कल्पना....त्याला नवीन होती. बाबांना त्याची अडचण समजली; पण त्याचें आतां समाधान कसें करायचें?



गोपाळ तासचे तास तें पहात राही!....

लहान लहान फांद्यांच्या आधारानें बांधलेल्या काटक्यांच्या भक्कम घरट्यांत तीं निळसर, टपोरीं अंडीं...! ती, 'किर्रर्ऽऽ' आवाज करीत खालीं उतरे, व शेवटीं त्या अंड्यांवर पंख पसरून बसे!...

चित्रकार०—श्री. बाळ कुळकर्णी, शीव. [पान २४२]

इतक्यांत, त्यांना एकदम आठवण झाली. त्याचा हात हातीं घेऊन उठत ते एकदम म्हणाले 'चल दाखवतों तुला!'

ते दोघे चाळीच्या ग्यालरींत गेले; कोपऱ्यावरचेंच त्यांचें बिऱ्हाड!

थोड्याशा अंतरावर, त्या तिसऱ्या मजल्याच्या उंचीपर्यंत, खालपासून एक झाड वाढत आलें होतें.

जरा खालच्या उंचीला, तीन बाजूंनीं बऱ्याचशा लहान लहान फांद्या येऊन एक सुरक्षित कोंपरा झाला होता झाडाचा! त्यांत एका घारीनें सुंदर व मऊसें घरटें तयार करून त्यांत आपलीं चारपांच अंडीं घातलीं होतीं.

गोपाळ व बाबा ग्यालरीच्या कठड्याशीं आले त्यावेळीं तेथें घार नव्हती. घरटें व त्यांतील अंडीं मात्र स्पष्ट दिसत होतीं.

"तीं पाहिलींस अंडीं? तसा तो पोपट होता पूर्वी!" बाबा बोट दाखवून त्याला समजावूं लागले.

"मी पण तसाच होतों का हो बाबा? अंऽ"—त्यानें उत्कंठेनें विचारलें.

"छे; वेडा! तूं आईच्या पोटांत होतास!" बाबा म्हणाले.

"पऽण!" इतकें म्हणून गोपाळ घुटमळला व मग पुढें म्हणाला "पण मग मी आईच्या पोटांत हो...."

त्याचा प्रश्न अर्धवटच राहिला...'किर्रर्रऽऽ' असा कांहींसा आवाज व फड-फडाट करून आपल्या पंखांचें पांघरूण घालावयास, ती घार यांच्याकडे पहात, येऊन त्या झाडावरच घरट्याजवळ बसली. ती उंच उडत होती पण तिच्या दृष्टींतून त्याजवळपासची हालचाल सुटली नाहीं!

"ती बघ त्यांची आई!" बाबांनाही विषयांतराला संधि मिळाली.

"आतां ती काय करील हो? दूध पाजील?"

"छेः! त्यांना दूध नाहीं लागत सध्यां!...खाणं पिणं झाल्यावर आपल्याला काय लागतं?" बाबा त्याचा सदरा छातीजवळ ओढून त्याला उत्तर सुचवीत म्हणाले.

"कपडे!"

"हं! ....अन् कपड्यानें थंडी थांबली नाहीं म्हणजे तूं काय करतोस?"

"आईजवळ जातों अगदीं पांघरुणांत!"

“ होना ? तशीच त्यांचीही आई त्यांना आपल्या पंखांनीं ऊब देईल....मग हळू हळू त्यांतूनच पिलें बाहेर येतील.”

“ पण मग आतां हलत नाहींत तीं ?”

“ नाहीं...पिलें झालीं कीं हलतील !”....

“ हो का ?” तो अगदीं मोठ्यानें हंसला. “ रोज बघत जाईन हं मी अन् पिलें झालीं कीं तुम्हाला सांगेन !”....

“ हं !”....

*     *     *

त्या दिवसापासून गोपाळला हा नवीनच विषय झाला. तो तासचे तास ग्यालरीच्या त्या कठड्याला टेंकून समोरच्या झाडावरील घरट्याकडे पहात उभा राही.

दोन खांद्या जवळ जवळ आल्या होत्या. त्यांच्या लहान लहान फांद्यांच्या आधारानें तिनें काटक्यांचें भक्कम घरटें बांधलें होतें !

त्यांतील तीं टपोरीं निळसर अंडीं किती मोहक दिसत ?...एकदां तर त्याला वाटलें आपण तीं खेळायला घ्यावीं ! पण—

पण त्याला बाबांच्या म्हणण्याची आठवण झाली;....‘ हळू हळू त्यांतूनच पिलें बाहेर येतील’—तो दचकला; आणि त्याच्या डोक्यांतून तो विचार गेला.

असा थोडा वेळ उभा आहे तों ती घार लहान लहान वळसे घेत शेवटीं फांदीवर उतरे, ‘ किर्रर्ऽऽ ’ असा आवाज करी, पंख फडफडवी आणि शेवटीं त्या अंड्यांवर पंख पसरून बसे !....त्या वेळीं पुन्हां त्याला बाबांच्या म्हणण्याची आणि त्यावरून थंडीच्या दिवसांची आठवण होई.

एके दिवशीं हळूच जाऊन त्यानें ताईला बोलावून आणलें, “ सगळेच पक्षी असे आपल्या अंड्यांवर बसतात का ग ताई ? ”

“ हो !—पण बसत नाहींत ते त्यांवर....उबवतात आपलीं अंडीं ! कावळीण तर कोकिळेचीं अंडींही आपलीं समजून उबवते ! ” सुमतीला त्याला समजेल असें सांगण्याची कला अवगत नव्हती !

शंभूकडे कोंबडीचीं अंडीं त्याला पहायला मिळालीं होतीं. तीं जरा लहान पण तशींच दिसत असत साधारण !



गोपाळ त्याला विचारायला गेला त्यावेळीं तो जेवायला बसला होता. त्यानें त्याला विचारलें, “ त्या अंड्यांवर त्याची आई बसते का रे ? त्यांतून सुद्धां पिलें येतात बाहेर हळूहळू ?....”

“ हो ! ” आईनें आणून वाढलेलें उकडलेलें अंडें फोडून खात तो म्हणाला.

गोपाळ दचकून घरीं आला. त्यानें बाबांना सर्व सांगितलें.

बाबा म्हणाले, “ तें झाडावरचें घरटें दाखवूं नकोस हो—त्या शंभूला !”

त्या दिवसापासून तो शंभूकडे फारसा फिरकला नाहीं कीं त्या घरट्याची त्याला त्यानें जरासुद्धां माहिती सांगितली नाहीं.

आणि यानंतर, तो एकटाच, त्या घरट्याकडे, सारखा उत्कंठित मनानें पहात बसे !

असे किती तरी दिवस गेले !

*     *     *

बाबा ताईबरोबर कुठेंसे गेल्याच्या तिसऱ्या दिवशीं सकाळीं तोंड धुतल्यावर गोपाळनें कठड्याजवळून पाहिलें तर घरट्यांतील पेंढ्याच्या अगदीं वरच्या थरावर अंड्यांचीं फुटलेलीं कवचें......

गोपाळ एकदम चमकला; त्याला शंभूच्या त्या दिवशींच्या जेवणाची आठवण झाली !

पण इतक्यांत घार नेहमींप्रमाणें लहान लहान वळसे घेत खांदीवर येऊन बसली.

तिचा नेहमींचा ‘ किर्रर्ऽ ’ आवाज सुरू झाला तोंच त्या घरट्यांत एकदम चिवचिवाट झाला.

आश्चर्याचा पहिला भर गेल्यावर त्याच्या चेहऱ्यावर स्मित पसरूं लागलें.... तो हसला....मोठ्यानें हसला....आणि उड्या मारीत आईकडे जाऊन म्हणाला, “ आई....आईऽ....त्या अंड्यांचीं पिलें झालीं ग ! पहायला चल !....

“ मला बाबा कामं आहेत हं माझीं ! ” आई आपल्याच गोंधळांत गर्क होती.

तो हिरमुसला होऊन बाहेर ग्यालरींत आला.....

ताईला सांगावें तर ताईही घरीं नाहीं ?

तो घरट्यांतल्या चिवचिवणाऱ्या पिलांकडे पाही; आणि रस्त्यावरून जाणाऱ्या ढोम्यांकडे आशेनें टक लावी !

संध्याकाळच्या सुमारापर्यंत त्यानें उत्कंठेनें बाबांची वाट पाहिली !....आणि शेवटीं एकदां त्याच्या मनासारखें झालें.

शिवरामभाऊ, निराश अंतःकरणानें, सुमतीसह, टांग्यांतून उतरून, घरांत शिरले, तों, गोपाळानें त्यांनां पहिलीच बातमी दिली "हंऽ! बाबा, त्या अंड्यांचीं पिलें झालीं हो !..."

*　　　*　　　*

बाबांचा हात धरून गोपाळ गॅलरींत गेला ! वडिलांबरोबर पुन्हा एकदां तें चिवचिवणारें घरटें त्यानें पाहिलें.

"आतां या पिलांचें काय होईल हो बाबा ?" त्याला पुढला प्रश्न उद्भवला.

"त्यांची आई खायाला घालील त्यांना ! तीं मोठीं होतील....उडूं-लागतील.... उडून जातील !...." बाबा त्याला उत्तर देतांदेतां विचार करूं लागले.

गोपाळाला एकदम ताईच्या त्या दिवशींच्या शब्दांची आठवण झाली.

"बाबा, ताई म्हणते कावळी कोकिळेचीं पिलें आपलीं समजून वाढवते ? खरंऽ ?" त्यानें एकदम प्रश्न केला.

बाबा आपल्या विचारांत होते !

त्यानें पुन्हां तोच प्रश्न केला.

"ताईला समजत नाहीं अजून ?...आपलीं पिलें सोडून दुसऱ्याबद्दल काळजी बाळगण्याची कोण कशाला खटपट करणार ? एखादा कावळाच तसा बावळा !" बाबा बरेंचसें स्वगत बोलले.

'अंऽ ?' गोपाळच्या बालिश उत्कंठित चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह उभें राहिलें !

बाबा आपल्याशींच खिन्नपणें हसले ! "अरे ! आपण या लहान पोराशीं काय वेड्यासारखें बोलतों आहों हें ?" त्यांना तें मागाहून सुचलें. त्याच्यासाठीं कांहीं तरी बोलणार इतक्यांत शंभू व त्याची आई यांची खालची ओरड एकदम त्यांच्या कानीं आली.

गोपाळ व बाबा लगबगीनें तिकडे जाऊन पाहूं लागले.

'कॉत्-कॉत्-कॉत्' शंभूची कोंबडी ओरडत होती ! तिच्या पिलांपैकीं एक पिलूं आपल्या तोंडांत धरून घारीनें पळविलें होतें. शंभूची आई ओरडत होती 'नेहमीं नेहमीं पिलं न्यायला सवकली आहे मेली !'



बाबांनीं मागें वळून पाहिलें तों गोपाळ पुन्हां आपल्या नेहमींच्या कठड्याला टेंकून घरट्याकडे पहाण्यांत व्यग्र होता. तेही तिकडेच परतले.

पहातात तों तो देखावा मोठा गमतीचा होता.

आपल्या नेहमींच्या खांदीवर बसून पंख फडफडवीत, ती घार आपल्या चिमुकल्या पिलांच्या पेचलेल्या चोचींत आपली चोंच प्रेमानें घालीत होती. ती त्यांची प्रेमळ कुजबुज !

बाबांचें हृदय भरून आलें !

त्यांचा विचार चालला होता. कांहींसा निश्चय केल्यासारखें करून ते म्हणाले "हो असंच !"

गोपाळ दचकून मागें वळून म्हणाला, "तिनें तें कोंबडीचें पिलूं कां हो मारलें ?"

"याला काय कळणार ?" ते आपल्याशींच म्हणाले.

"त्या शंभूकडे सांगूं नको हं त्या घारीच्या घरट्याचें !" पुन्हां त्यांना संशय आल्यासारखें झाल्यामुळें त्यांनीं त्याला बजावलें.

*　　　*　　　*

पुढल्या आठवड्यांत शिवरामभाऊ अनुसूयाबाईंना म्हणाले "ठरलं बरं सुमतीचं तिथंच !....त्यांच्या म्हणण्याप्रमाणें चार दिवसांपूर्वी रक्कम पाठविली. आज पत्र आलं आहे, आणखी आठ दिवसांनंतरच्या मुहूर्तावर त्यांच्या गांवीं लग्नाला जायचं !"

ताईच्या लग्नामुळें घरांत गोंधळ चालला होता. आठ दिवस भर्कन् उडून गेले.

आणि ठरल्या दिवशीं लग्न होऊन सर्व मंडळी परत फिरली.

*　　　*　　　*

घरीं येतांच गोपाळ कोटटोपी काढून प्रथम त्याच्या नेहमींच्या ठिकाणीं धांवत गेला. पण तो घाबरून ओरडतच परत फिरला.

त्यानें बाबांना बरोबर नेलें !

बाबाही तें पाहून दुःखपूर्णपणें विव्हळले.

पिलें घरट्यांत नव्हतीं !—घरटें पूर्वींच्या ठिकाणीं नव्हतें ! एकंदर सर्व नाश झाला होता !!

झाडाच्या मुळाशीं....पिलें, घरटें, सर्व....छिन्नविछिन्न पडलें होतें !.... जवळपास दगड विखुरले होते !....घार ठिकाणावरून दूर गेली होती !!—

बाबांचें अंग थरारलें !....

“शंभूला कोणी सांगितलें कीं काय ?” त्यांनीं सहज उद्गार काढले.

“मी नाहीं बा !” गोपाळ स्वतःपुरतें म्हणाला. बाबांनीं त्याचा गोडसा पापा घेतला ! त्यांना थोडें हायसें वाटलें !!

* * * *

पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं सबइन्स्पेक्टर व दोन पोलीस शिवरामभाऊंच्या ओळखीचा माफीचा साक्षीदार घेऊन आले. शिवरामभाऊंनीं आपल्या वरिष्ठाला या नवीन नात्यानें आजच ओळखलें !

“आयत्यावेळीं मोह झाल्यामुळें, उघडकीस आलेली गोष्ट लपवून ठेवण्याबद्दल सदहू माफीच्या साक्षीदारानें आपण होऊन दिलेली तीन हजार रुपयांची रक्कम, मी घेतली ! यापेक्षां माझ्या हातून कांहीं एक अपराध झालेला नाहीं !” अशी त्यांनीं गायत्रीची शपथ घेऊन आपली जबानी लिहून दिली.

परंतु माफीच्या साक्षीदाराच्या जोरावर, त्यांच्यावर मोठी केस भरण्याचें ठरलें.

बाबांना पोलीस अंमलदार नेऊं लागतांच गोपाळाला रडूं कोसळलें !....अनुसूयाबाईंनीं हंबरडा फोडला....

बाबांचाही गळा दाटून आला. अश्रू ओघळूं लागले; त्यांनीं सर्व मुलांची समजूत केली.

गोपाळला वर उचलून त्याचा पापा घेत, खिन्नपणें हंसण्याचा प्रयत्न करून ते म्हणाले, ‘बाळ, कल्पनाही नव्हती; पण क्षणिक मोहामुळें, तें चिवचिवणारें घरटें जमीनदोस्त झालें !’

गोपाळला तें समजलें कीं नाहीं कोणास ठाऊक !!

ठाणें, १२ नोव्हेंबर १९३२.

‘विश्रान्ति’

" हृदयिंचीं फुलें ना अजुनि पूर्ण उमललीं,
परि फुलल्या पुष्पांची त्या माधुरी असे लाभली !
ज्यांमुळें* मला थोरवी, भरुनि अंजुल्या,
स्मृतिसमाधीवरी त्यांच्या उधळितों कळ्या कोंवळ्या !"

—दत्तात्रय.

* मानवी मूर्ति त्या जरी अस्त पावल्या.

# परिशिष्ट (अ)

## कांहीं प्रादेशिक शब्द, वाक्प्रचार वगैरेंचें स्पष्टीकरण—

### अप्पांची बैलांची जोडी—

**पान ९–' दुसरा कोंबडा'**—खेडेगांवांत साधारणतः अजूनही कोंबड्याच्या आरवण्यावरच वेळ ठरवितात. निरनिराळ्या ठिकाणीं 'पहिला कोंबडा' होण्याची वेळ थोडी पुढेंमागें असली तरी सुरवातीस कोंबडा ३।-३॥ च्या दरम्यान ओरडतो. दुसरा कोंबडा ४।-४॥ च्या दरम्यान होतो. यानंतरही, लक्षपूर्वक पाहिल्यास, दिवसांतून साधारणतः प्रत्येक तासाच्या जवळपास, कोंबडा अंतःस्फूर्तीनें आरवतोच. रात्रीं बाराच्या सुमारास कोंबडा ओरडल्यास ठाणें जिल्ह्यांत कांहीं ठिकाणीं अशुभ मानण्याचा प्रघात आहे.

**' वई '**—कुंपण ( Compound )

**' गोपटीं '** ( एकवचन–' गोपटें ' )—कांट्याकुट्याच्या केलेल्या वईला मधून मधून पडलेलीं भगदाडें.

–**' टोणगा '**—रेडा; **' वंगण '**—घर्षण होत असलेल्या ठिकाणीं घालावयाचा स्निग्ध पदार्थ. याला माहीम तालुक्यांत " माखण "हि म्हणतात.

**' चोप '**—रहाटानें काढलेलें पाणी गुरांढोरांसाठीं केलेल्या कुंडीपर्यंत न्यावयास, ताड किंवा माड यांचें जुनाट व पोकळ बुंध मधोमध कापून केलेले पन्हळ; नेहमीं नेहमीं पाणी जाऊन त्यावर शेवाळ वाढते. तें मधून मधून साफ करावें लागतें.

**' बांड्या '**—( एकवचन–बांडी )—रहाटाच्या माळेस किंवा इतर कामांत वापरावयाचीं मडकीं.

**' कुटाखत '**—झाडें फोंफावून वाढावीं म्हणून, जुनी सुकी मासळी खत म्हणून, मधून मधून घालतात. मीठही घालतात.

**' डोक्रा '**—वारली, कोळी वगैरे लोक म्हातारा या अर्थानें हा शब्द वापरतात. **' वाडगो '** **' डोबी '** हेही याच अर्थाचे शब्द आहेत. हे शब्द माहीम तालुक्यांत विशेष प्रचारांत आहेत.

**'वावली'**—विडी या अर्थी हा शब्द वापरतात. तंबाखूला **'तमाख'** म्हणतात.

**पान १०-'वाडगो'** पान ९. वरील टीप पहा.

**'सारवट गाडी'**—बैलगाड्यांचे निरनिराळे प्रकार असतात. मुख्य दोन—मालाची ने-आण करणारी 'काबाडी' व स्वतः मालकाला न्यावयास छप्पर वगैरे लावून केलेली 'स्वारीची' किंवा 'सारवट गाडी.' कांहीं कांहीं गाड्या मोठ्या सुंदर असतात. खेडेगांवांतील लोकांचा, स्वतःच्या मालकीची सुंदर टुमदार सारवट गाडी असणें, हा शोक असतो. कांहीं गाड्यांची रचना जरा मौजेची असते. बैल जोरानें धावूं लागले कीं वरच्या टपांतून जाणारा वारा घुमल्याचा गंभीर नाद मैलमैलहि ऐकूं येतो.

**'खोंड'**—न बडवलेला तरुण बैल; (त्याला गोराही म्हणतात). स्वतःच्या घरींच लहानाचा मोठा झालेल्या घरगुती खोंडांची जोडी आपल्या गाडीला जुंपणें हाही एक खेडेगांवचा शोक आहे.

**'गोठा'**—गुरें बांधावयास केलेली जागा; 'बेडें' असेंही म्हणतात. —कौलारू छप्पर व चोपून तयार केलेली उतरती जमीन हा याचा विशेष असल्यामुळें गुरांना त्यांत रहाणें सुखदायक होतें. पावसाळ्यांत त्याची विशेष काळजी घेतली जाते.

**पान ११-'शिवळजोत'**—बैलगाडी—ती काबाडी असो किंवा स्वारीची असो—बसावयाच्या किंवा सामान ठेवावयाच्या (Body) भागाला 'साटी' म्हणतात. त्याखालील भक्कम लाकडाच्या भागाला 'डांबरी' असें म्हणतात. डांबरी गाडीच्या आसावर बसवलेलें असतें. या डांबरी मधूनच दोन बळकट वाटोळीं लाकडें निघून शेवटीं एके ठिकाणीं मिळतात, त्यालाच धुराण म्हणतात. धुराणाच्या सुरवातीसच दोन्ही दांड्यांवर एक फळी टाकलेली असते. (त्यावरच 'खेड्या' किंवा गाडी हांकणारा गडी बसतो.) धुराणाच्या शेवटाला, धुराण व 'चकण' (दोन आडव्या खुंट्या) यांशीं चामड्याच्या वादीनें दोन्ही बैल जुंपावयास, मजबूत बांधलेल्या आडव्या भागास 'जूं' किंवा 'जूसर' म्हणतात. याच्या प्रत्येक टोंकाला बैलांना जुंपावयास केलेलीं 'जोतीं' (मानेभोंवतींचा पट्टा) अडकविण्यासाठीं केलेल्या शिवळा (खुंट्या; एकवचन शिवळ) बसविण्यास, दोनदोन भोंकें केलेलीं असतात.



**'शेपट्या पिळायला नकोत कीं पराणी मारायला नको!'**—बैल चालत नसल्यास त्यांना अशा अमानुष तऱ्हेनेंही चालवितात. विशेषतः हा प्रकार 'काढाकाढी'—गाड्यांची शर्यत—चालू असतां फार दिसून येतो.

**'खंडाची मापणी'**—कांहीं शेतें खंडानें दिलेलीं असतात. झोडणी वगैरे नंतर स्वतः शेटच्या पुढें फरीनें मापणी होऊन ठरलेला खंड दिला जातो. साधारणतः फरीनें मापणी होते. प्रत्येक फरी मापल्यानंतर एक मूठ बाजूस ठेवतात. अशातऱ्हेनें सर्व मापणी किती झाली हें त्या लहान लहान पुंजांवरून, नक्की ठरतेंच; पण 'थेंबें थेंबें' प्रमाणें मापणाऱ्याला तें सर्व धान्य मिळतें.

**'काबाडी गाडी'**—पान १० 'सारवट गाडी' पहा.

**पान १२-'गराडींत'**—इंग्रजसरकारच्या अमदानींत हिंदुस्थानभर रस्ते फिरले. त्यापूर्वी किती 'गराडी' झाल्या असतील आणि किती नाश पावल्या असतील. खेडेगांवाकडे सोईच्या गाडीवाटा पडल्यावर त्यांवरूनच गाड्यांची जा ये होते. या वाटा रस्त्याप्रमाणें पक्क्या नसल्यामुळें चाकांच्या घर्षणानें चाकोऱ्या पडतात. अशा मध्यभागीं उंच व चाकें घसरणाऱ्या ठिकाणीं खोलगट अशा शेतांतून जाणाऱ्या वाटांना 'गराडी' म्हणतात. (एकवचन-गराड.)

**'करवंदीच्या जाळ्या'**—कांहीं कांहीं ठिकाणीं हीं करवंदांचीं जाळीं भलीं मोठीं असतात. त्यांना येणारीं करवंदेंही बोराएवढीं मोठीं असतात.

**'धुराण'**—पान ११. 'शेवळ जोत' पहा.

**'बांडी-कोयता'**—वर गेल्यावर ताडाला 'शेव'—खांदीला कापून रस गळावयास जागा—करावयास कोयता, व ताडीचा रस सांठवून ठेवावयास बांडी (मडकें). आधल्या रात्रीं बांडी धुवून लावली व दुसऱ्या दिवशीं सूर्योदयापूर्वी उतरवून प्यायल्यास ती ताडी उत्तम औषधी असते.

**'काथोडी'**—ही एक मेहनती जात आहे. गवत किंवा धान्यकापणीच्या सुमारास सर्व संसार डोक्यावर घेऊन या गांवाहून त्या गांवीं यांच्या झुंडीच्या झुंडी जातांना दिसतात.

**पान १३-'भुताटकीनें उकडलेल्या बटाट्यांचा वास'**—ही वनस्पती ठाणें जिल्ह्यांत पुष्कळ ठिकाणीं आहे. संध्याकाळच्या सुमारास हिचा उग्र वास हुबेहुब उकडलेल्या बटाट्यांसारखा-सारखा दरवळतो. रात्रीं ७॥-८ च्या सुमारास विक्रोळी व ठाणें या दरम्यान लोकलनें प्रवास केल्यास याची प्रतीति येईल.

**पान १४-' दावीं '**—गुरांना बांधावयाचे दोर.

**' वाघ खाय येन् ! '**—ही एक वारल्या-कोळ्यांत शिवी आहे.

**' गोवारी '**—गुरें संभाळणारा गुराखी.

**पान १५-' विषारी किरडूं '**—साप वगैरे विषारी प्राणी गुरांना कुठें चावतात तें समजत नाहीं. पण तशीं चावून गुरें मेल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत.

**' वाशांवर '**—लांकडांचे लांब खांब (एक वचन—वासा. अनेक वचन—वासे.)

**जीवन—**

**पान ३२-' असा दीस व्हता तवा जयमयोय् '**—वारली कोळी हे खरे कालातीत प्राणी. 'कासराभर दीस' ( क्षितिजापासून दोन्ही हात पूर्ण लांब करून होण्याऱ्या अंतरा इतका ), 'असा दीस ' ( हात दाखवून ), वगैरे त्यांचे नेहमींचे वेळ दाखविण्याचे प्रकार होत. त्यांच्यांत विसापेक्षां जास्त मोजतां येणाऱ्या व्यक्ती क्वचितच् ! एक 'विसा' दोन 'विसा' असे त्यांचे हिशेब चालतात. त्यांना आपल्या वयाची 'तरणा' व डोबा' याशिवाय फारशी कल्पनाच नसते. आणि करायची आहे काय त्या बापड्या पोटार्थी अशिक्षितांना ?—त्यांना आय.सी.एस्. ला जायचें आहे थोडेंच ?

**पान ३५-'अडोसरी '**—वारल्या कोळ्यांपैकीं एखाद्याला लग्न वगैरे करण्यासाठीं पैसा पाहिजे असला कीं तो एखाद्या शेटकडे जातो. लग्न केल्यानंतर झालेलें कर्ज फेडण्यासाठीं त्याच्याकडेच नोकरीस रहातो. अर्थात् शेट स्वतःला पुष्कळ फायदा होईल अशा तऱ्हेनेंच त्याला बांधून घेतो. तरी त्याच्या पोटाला पोरांबाळांसह लागणारें खाणें, व त्याचें स्वतःचें लेणें शेटला दर महिन्याच्या महिन्याला किंवा वर्षांतून कांहीं ठराविक वेळीं द्यावें लागतें. कांहीं ठिकाणीं बंडी, घोंगडी व भात वगैरे देण्याचा प्रघात आहे. या ठरलेल्या 'खावटी' ( खाण्याचें धान्य वगैरे ) व कपडालत्ता देण्याच्या पद्धतीला साधारण मानानें 'अडोसरी ' म्हणतात. 'अडोसरी' म्हणजे अडीच मण धान्य किंवा कांहीं असा शब्दशः अर्थ घ्यावयाचा नाहीं.

**सुभान्या—**

**पान ३६.-' कुडतें '**—अंगांतील बंडी.

**' तमाखु ', वावली**—' आप्पांची बैलांची जोडी ' पहा.



**' चकमक '**—गारेचा तुकडा व लोखंड यांच्या सहाय्यानें नळकंड्यांतील सांवरीच्या कापसावर ठिणगी पाडून विडी वगैरेसाठीं विस्तव पेटवतात. आगपेट्यांच्या या काळातही त्या अजून पुष्कळ गरीबांकडे दृष्टीस पडतात.

**' वलव वलव वलकारी '**—कोळ्यांत अशा तऱ्हेचीं पुष्कळ गाणीं ऐकायला मिळतात. कोणी संपादन केल्यास त्याचा उपयोग होईल.

**' कोरड्यास '**—याला ' कालवण 'ही ( आमटी ) म्हणतात.

**' सुक्या काडया '**—बोंबील, यांचा वास न खाणाऱ्याला घाणेरडा पण खाणाऱ्यास ' उदबत्ती.'

**पान ५८-' पहिला कोंबडा ' ' दुसरा कोंबडा '**—' अप्पांची बैलांची जोडी ' मधील टीप पहा.

**पान ५८-' तांबडें फुटणें '**—पूर्व बाजूचे क्षितिजावर गुलाबी तांबडे रंग चमकलेले दिसणें.

**मासळीविक्री—**

**पान ५२-' असा '**—जीवन ' मधील टीप पहा.

**' ओढली '**—मासे सांपडल्यावर वर ओढली होती.

**' उदान '**—शेतकऱ्यांना जसा पाऊस तसें कोळ्यांना उदान—समुद्राची भरती—

*

या पुस्तकाच्या, पुनर्मुद्रण किंवा भाषांतर यासंबंधाचे,
किंवा इतर सर्व प्रकारचे हक्क, लेखकानें, आपणा-
कडे राखून ठेविले आहेत.

*

मुद्रक व प्रकाशक—मं. ना. कुळकर्णी, कर्नाटक प्रेस,
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई.

अद्यतन पद्धतीचें
—शास्त्रीय व मानसशास्त्रीय

बा
ल
वा
ङ्मय

(बालवाङ्मय)

विशिष्ट दर्जा संभाळून वाङ्मयकार्य करणाऱ्या

महाराष्ट्राच्या

# दोन प्रकाशन संस्था

अमर ज्योति
वाङ्मय

पारिजात प्रकाशन

म
रा
ठीं
ती
ल

(मराठींतील)

१४ बी हरजीवनदास एस्टेट; व्हिन्सेन्ट रोड दादर मुंबई १४

सोज्वल वाङ्मय